22-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SMT/ 12:00

22-03-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SMT/ SBT/ ST/ 12:00

सभापतीस्थानी - माननीय सभापती

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

राज्य शासकीय कार्यालयातील तसेच कृषी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन संरचनेनुसार सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा प्रस्ताव

(1) * 2783 श्री. व्ही.यु. डायगव्हाणे, श्री.कपिल पाटील, श्री. जयंत प्र.पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 58 ला दिनांक 9 डिसेंबर, 2009 रोजी दिलेल्या दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील शासकीय तंत्र निकेतने आणि अभियांत्रिकी संस्थांतील शिक्षकीय पदांना तसेच अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आणि कृषी विद्यापीठातील शिक्षकीय पदांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतन संरचना लागू करण्याच्या प्रस्तावावरील कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(2) तसेच केंद्रीय शिक्षकीय पदांप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना जशाच्या तशा लागू करण्याबाबत विचाराधीन असलेल्या बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(3) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(4) अद्याप निर्णय झाला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता: (1) राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने आणि अभियांत्रिकी संस्थेतील शिक्षकीय पदांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना लागू करण्याबाबत अखिल भारतील तंत्र शिक्षण परिषदेने अधिसूचना निर्गमित केली नसल्याने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याची कार्यवाही केलेली नाही. अशासकीय अनुदानित संस्थेत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना लागू करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येत आहे. कृषि विद्यापीठातील शिक्षकीय पदांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना लागू करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या दि.17.2.2010 च्या बैठकीत मान्य केला असून, सबंधित विभागाकडून शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(2) सदर प्रस्ताव वेतनत्रुटी समितीसमोर विचाराधीन आहे. वेतनत्रुटी समितीस दि. 31.5.2010 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. जीवन-मरणाचा प्रश्न जितका महत्वाचा आहे तितका हा प्रश्न महत्वाचा आहे. पाचवा वेतन आयोग जसाच्यातसा लागू करण्याच्या संदर्भात आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या बाबतीत युती शासनाने सभागृहात स्पष्टपणे जाहीर केले की, पाचवा वेतन आयोग केंद्राप्रमाणे जसाच्यातसा लागू करण्यात येईल. पण सहाव्या वेतन आयोगाचा जेव्हा प्रश्न आला तेव्हा कारण नसताना हकीम समिती नेमण्यात आली. या हकीम समितीने अशी जादू केली की, शिक्षकीय पदांची संख्या जास्त असल्यामुळे केंद्राप्रमाणे यांना सहावा वेतन आयोग लागू करता येत नाही असे लंगडे कारण देण्यात आले. सभापती महोदय, माझा नेमका प्रश्न असा आहे की, सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात केंद्रीय कर्मचारी आणि राज्य शासनाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शासकीय कर्मचाऱ्याच्या वेतनामध्ये ग्रेड-पे आणि पे-बँड मध्ये जी तफावत राहिलेली आहे ती तफावत दूर करण्याच्या संदर्भात शासनाने एक त्रुटी समिती नेमलेली आहे. तसेच शासनानेच या समितीला 31 मार्च पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, यामध्ये ग्रेड-पे मध्ये जी तफावत आहे, पाचव्या वेतन आयोगाच्या बाबतीत 1977 मध्ये 54 दिवसांचा संप केल्यानंतर जे सूत्र स्वीकारण्यात आले ते सूत्र आणि त्यासंबंधीचा जी.आर. आजही कायम आहे. त्या जी.आर. प्रमाणे सहाव्या वेतन आयोगातील ग्रेड-पे आणि पे बॅण्डमधील तफावत दूर करणे आवश्यक आहे. 31 मार्च पर्यंत या समितीला मुदत वाढ देण्यात आलेली आहे. खरे म्हणजे हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा निर्णय घेतला पाहिजे. तसेच यासंदर्भात 30 तारखेला जी चर्चा झाली आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने आम्ही जे मुद्दे मांडलेले आहेत त्या मुद्यांच्या संदर्भात

विचार करुन एक महिन्या आत किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी तातडीने शासनाने यासंबंधीचा निर्णय घ्यावा. तसा तो घेण्यात येईल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे.....

सभापती महोदय माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 3 ऑगस्ट रोजी कर्णीक साहेबांच्या नेतृत्वाखाली माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर जी चर्चा झाली त्यावेळेस जे मान्य केले, त्याचे इतिवृत्त माझ्याजवळ आहे. त्यातील काही मुद्दे क्लीअर करण्यात आलेले आहेत. परंतु वाहतूक भत्यासंबंधीचा एक स्पेसिफिक मुद्दा शिल्लक राहिलेला आहे. वाहतूक भत्याचा दर पुढील आर्थिक वर्षापासून दुप्पट करण्यात येईल याबाबतीत शासनाने लेखी कमिटमेंट दिलेले आहे म्हणून या दोन्ही मुद्याच्या संदर्भात शासन एका महिन्याच्या आत निर्णय घेईल काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे साहेबांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केला आहे. खरे म्हणजे आज पर्यंत पॉलिटेक्निक व इंजिनियरींग कॉलेजच्या संदर्भातील प्रश्न होता. ज्याप्रमाणे एआयसीटीईचे प्राध्यापक आहेत त्या अंतर्गत, त्या पदांसाठीची शिफारस अद्याप अप्राप्त आहे. (अडथळा).....

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे, सदरच्या बाबीच्या संदर्भात वेतन त्रुटी समितीसमोर नुकतीच सुनावणी झालेली आहे आणि त्यांचा निर्णय लवकरात लवकर अपेक्षित आहे. विशिष्ट कालावधीच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा मांडण्यात आला. एक समिती नेमलेली असते त्यांना मुदतवाढ एकदा दिलेली आहे. मी स्वत: प्रयत्न करील की, त्यांनी मेरीटवर यासंदर्भातील त्यांचा निर्णय लवकरात लवकर द्यावा, अशा प्रकारची भूमिका स्वीकारली जाईल. वाहतूक भत्याच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या समवेत ज्या बैठका झालेल्या आहेत त्या अनुषंगाने ज्या बाबी मान्य केलेल्या आहेत त्यांची कार्यवाही सुरु आहे. विशेषकरुन वाहतूक भत्याचा प्रश्न हा सर्वच कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न आहे. त्यामुळे शासनावर त्याचा पडणारा भार आणि त्याबाबतीत घ्यावयाचा निर्णय यामध्ये काही कालावधी निश्चितपणे जाऊ शकतो पण याबाबतीत सहानुभूतीपूर्वक धोरण स्वीकारले जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने आणि अभियांत्रिकी संस्थेतील शिक्षकीय पदांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनसंरचना लागू करण्याबाबत अखिल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ ST/

ता.प्र.क्र.2783...

प्रा. बी. टी. देशमुख....

भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने अधिसूचना निर्गमित केली नसल्याने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याची कार्यवाही केलेली नाही." सभापती महोदय, हे विधान वस्तुस्थितीवर आधारित नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2783..... प्रा. बी. टी. देशमुख...

एआयसीटीईने याबाबतची अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्यांनी 22 जानेवारी, 2010 रोजी अधिसूचना क्रमांक एफ-37/लिगल/2110 निर्गमित केलेली आहे. राज्य शासनाला त्याची प्रत देण्यात आलेली आहे. त्याची प्रत माझ्याकडे सुध्दा आहे. जानेवारी महिन्यामध्ये 22 तारखेला त्यांनी अधिसूचना निर्गमित केल्यानंतर आज या ठिकाणी पहिला प्रश्न असताना लेखी उत्तर सादर करताना सुध्दा आपल्या अधिकाऱ्यांकडून ती बाब नजरेस न आणून देणे ही अत्यंत हलगर्जीपणाची गोष्ट आहे. ही अधिसूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना कळविण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी 25 जानेवारीला उच्च शिक्षण मंत्र्यांना पत्र देऊन तसेच कळविले आहे. असे असताना त्यांनी आपल्यासमोर ही वस्तुस्थिती का मांडलेली नाही ? याला जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल काय ? दुसरा प्रश्न असा की, को-ऑर्डिनेशन ऑफ स्टॅण्डर्डस् अँड मेन्टेनन्स ऑफ स्टॅण्डर्डस् हे युनियन लिस्टमधील विषय आहेत. त्या अंतर्गत ती अधिसूचना निर्गमित झालेली आहे आणि राज्य शासनामार्फत दरवेळी त्याची अंमलबजावणी केलेली आहे. जानेवारी महिन्यामध्ये अधिसूचना आपल्याकडे आलेली असताना त्याची अंमलबजावणी किती दिवसात करणार ? आपण तारीख जाहीर केली तर भ्रष्टाचाराला अजिबात वाव राहात नाही. आपण तारीख जाहीर केली नाही तर काही लोक चुकीचे धंदे करायला मोकळे राहतात अधिसूचना एआयसीटीईने निर्गमित केल्याची बाब आपल्या लक्षात आणून न देणाऱ्यावर काय कारवाई करणार? ती अधिसूचना निर्गमित झालेली असल्यामुळे त्याबाबतचा शासन निर्णय पंधरा दिवसात, एक महिन्यात, किती दिवसात निर्गमित करणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, खरे म्हणजे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी जो प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्याचे सांगितले तो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहे तो शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एका आठवड्याच्या आत निर्णय घेऊन तो लागू करणार आहोत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2783.....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, तंत्रनिकेतनाबरोबरच या ठिकाणी कृषी विद्यापीठांचा प्रश्न आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये यांसदर्भात प्रश्न उपस्थित केला असता विद्यापीठीय शिक्षकांना सहावा वेतन आयोग तातडीने लागू करण्याच्या संदर्भात निर्णय घेऊ असे आश्वासन दिलेले आहे. 17.2.2010 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये विद्यापीठीय शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. जो शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक आहे तो अद्यापही निर्गमित झालेला नाही. त्यासंदर्भात किती दिवसात शासन आदेश निर्गमित करणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, जेवढ्या शासकीय अनुदानित संस्था आहेत त्यांच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जी. आर. काढलेला आहे. विद्यापीठाच्या संदर्भात 7 ऑक्टोबर, 2009 रोजी जी. आर. काढलेला आहे तसेच अकृषी विद्यापीठांच्या संदर्भात सुध्दा 7 ऑक्टोबर, 2009 रोजी जी. आर. काढलेला आहे. अनुदानित शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुध्दा जी. आर. काढलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी विद्यापीठाच्या संदर्भात विचारले. विद्यापीठाच्या संदर्भात ज्या अनुदानित संस्था आहेत त्यांच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भात जी. आर. काढलेला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने राज्य शासकीय कर्मचारी तसेच निमशासकीय कर्मचारी यांना सहावा वेतन आयोग लागू केला. पण त्यामध्ये अमूक मंडळाला लागू केला नाही, विद्यापीठाला लागू केला नाही असे प्रश्न येतात. यासंदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेईल काय ? शासनाने पाचवा वेतन आयोग लागू केला, सहावा वेतन आयोग लागू केला. यानंतर सातवा वेतन आयोग येईल तेव्हा दरवेळी शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेले सन्माननीय सदस्य या विद्यापीठाच्या बाबतीत केले नाही, त्या विद्यापीठाच्या बाबतीत केले नाही असे प्रश्न उपस्थित करणार. म्हणून एखादा वेतन आयोग जाहीर झाल्यानंतर तो शासकीय तसेच निमशासकीय कम्रचाऱ्यांना लागू करतो तेव्हा तो वेतन आयोग सर्वांना लागू होईल असा धोरणात्मक निर्णय शासन केव्हा घेणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/

ता.प्र.क्र. 2783.....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, यासंदर्भात केंद्र शासन सुध्दा जेव्हा त्यांच्या वेतन आयोगाच्या शिफारशी मान्य करते तेव्हा त्या ठिकाणी सुध्दा दोन पध्दतीने ते लागू होत असते. एक म्हणजे जे नियमित कर्मचारी असतात त्यांच्या संदर्भात लागू होत असते आणि दुसरे म्हणजे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एआयसीटीई मार्फत धोरण स्वीकारले जाते. केंद्र सरकार ज्या पध्दतीचा अवलंब करते त्याच पध्दतीचा अवलंब करुन राज्य सरकार निर्णय घेत असते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2783.....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. परंतु त्याच्यातील जो असमाधानकारक भाग आहे तो आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. राज्यमंत्री महोदयांनी मघाशी दिलेले उत्तर अत्यंत चुकीचे आहे. म्हणून मी पुन्हा प्रश्न विचारतो. तंत्र शिक्षणाच्या अंतर्गत असलेल्या शिक्षकीय पदांच्याबाबतीत केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाकडून 7 ऑक्टोबर रोजी तंत्रशिक्षण सचिवांना एक पत्र पाठवून आपली योजना कळविली आहे. त्यानंतर एआयसीटीईने दिनांक 22 जानेवारी, 2010 रोजी एक अधिसूचना निगर्मित केली आहे. महाराष्ट्र राज्य प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी दिनांक 25.1.2010 रोजी तंत्रशिक्षण मंत्र्यांना एक निवेदन सादर करुन दिनांक 22 जानेवारी, 2010 ची ती अधिसूचना लक्षात आणून दिलेली आहे हे खरे आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या पहिल्याच प्रश्नाला उत्तर दिले आहे. त्यांनी जे पहिल्यांदा सांगितले आहे ती गोष्ट खरी आहे. परंतु एआयसीटीईने.....

प्रा.बी.टी.देशमुख : मी पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे, त्यामुळे मंत्रिमहोदयांनी पॉईन्टेड उत्तर द्यावे.

श्री.विजय वडेट्टीवार : सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे तंत्रशिक्षण सचिवांना पत्र पाठविलेले आहे. जे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिनांक 22 फेब्रुवारीला ते पत्र आमच्याकडे आले आहे. त्याची अंमलबजावणी केली आहे. शिक्षकांच्या बाबतीत अद्याप शिफारस आलेली नाही, ती शिफारस आल्यबरोबर शासन करुन घेणार आहे. ही केवळ औपचारिक बाब आहे. विभागाचे हे रुटिन काम आहे, ते एक आठवडा किंवा दोन आठवडयात होऊ शकते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील चंद्रपूर, डोंबिवली, औरंगाबाद, नवी मुंबई आणि तारापूर या शहरांतील प्रदुषणामुळे आरोग्यास निर्माण झालेला धोका

(२) * ५०६१ श्री. नितीन गडकरी, श्री. संजय केळकर, श्री. रामनाथ मोते, श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाच शहरांतील प्रदुषणाने अतिशय गंभीर स्वरुप धारण केले असून यात चंद्रपूर, डोंबिवली, औरंगाबाद, नवी मुंबई आणि तारापूरचा समावेश असून यामुळे जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर २००९ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदुषण नियंत्रणांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सचिन अहिर, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) राज्यातील ५ औद्योगिक क्षेत्रात प्रदूषणाची वाढ झाली आहे, हे खरे आहे, परंतु यामुळे जनतेच्या आरोग्यास धोका झाल्याचे हे खरे नाही.

(२) व (३) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने औद्योगिक पट्ट्याच्या पर्यावरण अहवालामध्ये गुणांकनासाठी अवलंबिलेल्या पध्दती व निकष यामधील तांत्रिक त्रुटी, अहवाल तयार करताना राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा नसलेला सहभाग, तसेच सदर अहवालामध्ये एकूण औद्योगिक क्षेत्रे/ समुह यांचा भौगोलिक विस्तार नमूद नसणे इत्यादी बाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास अधिक माहिती मागविण्यात आलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रदूषण वाढत असल्याचे शासनाने लेखी उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. राज्यातील 5 औद्योगिक क्षेत्रात प्रदूषणात वाढ झाली आहे हे खरे आहे. आमच्या उल्हासनगर नदीच्या पाण्यामध्ये जल प्रदूषण, वायू प्रदूषण मोठया प्रमाणात झालेले आहे. ठाण्यासारख्या जिल्हयात घोडबंदर जवळ रविशीर नावाची कंपनी आहे, तेथे कोळशावर चालणा-या बॉयलरमुळे व पार्टीकल्समुळे प्रचंड प्रदूषण वाढत आहे. त्याचबरोबर पालघरमध्ये पाणेरी कंपनीचे प्रदूषित पाणी सांडपाण्यामध्ये सोडले जात असल्यामुळे मोठया प्रमाणात प्रदूषणात वाढ झाली आहे. लेखी उत्तरात प्रदूषण वाढत असल्याचे मान्य केले असल्यामुळे ते रोखण्यासाठी शासन ताबडतोब कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, प्रदूषण वाढत आहे अशातील भाग नाही. परंतु या 5 क्षेत्रामधील प्रदूषणाची रेंज आहे त्यात वाढ झाली आहे हे खरे आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून यावर नियंत्रण ठेवण्याची भूमिका घेतली जाते. विशेष करुन केंद्र

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाच्या विभागाकडून या सर्व 5 झोनमध्ये त्याऐवजी 8 झोन म्हणता येतील, या झोनमध्ये क्रिटिकल व बाकीच्या झोनमध्ये सिव्हियर प्रोल्यूशन आहे अशी माहिती या रेग्यूलेटरीकडे प्राप्त झालेली आहे. म्हणून शासनाने त्याबाबत एक ॲक्शन प्लॅन तयार करुन तो केंद्र सरकारकडे पाठविण्याची भूमिका घेतली आहे. एवढेच नव्हेतर राज्य शासनाने ही बाब गांभीर्याने घेतली असून त्याबाबत मंत्रिमंडळात चर्चा करुन योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण व राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ या दोन संस्था आहेत. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ ही एक स्वायत्त संस्था शासनाने निर्माण केलेली आहे. या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात त्रुटी राहिल्या आहेत, परंतु अशाप्रकारचा अहवाल राज्य प्रदूषण मंडळ सहज तयार करु शकते. या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे हे खरे नाही असे शासनाचे म्हणणे असले तरी अशाप्रकारे प्रदूषणात वाढ होत राहिली आणि त्यावर उपाययोजना झाली नाही तर आपल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत अधिक सतर्क होऊन आपला अहवाल तयार करण्याच्या सूचना त्यांना दिल्या जातील काय ?

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : महाराष्ट्र शासनाने ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे. केन्द्राकडून राज्याला आदेश मिळतील आणि त्यानंतर राज्य शासन कारवाई करील अशातला भाग नाही. या सर्व क्षेत्राचा ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे. त्या ॲक्शन प्लॅन प्रमाणे कारवाई करण्याचे काम केलेले आहे. एवढेच नाही तर सन्माननीय मंत्री महोदयांनी आदरणीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात विनंती केलेली आहे. यामध्ये विविध विभागांचा संबंध येतो. त्याठिकाणी एमआयडीसीचा काही भाग असल्यामुळे उद्योग विभागाचाही संबंधे येतो. मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमण्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी आदरणीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली असून मुख्यमंत्र्यांनी त्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदय, या प्रश्नाला अत्यंत बेफिकिरीने उत्तर दिलेले आहे हे मी जाणीवपूर्वक सांगत आहे. उत्तराच्या भाग (1)मध्ये "राज्यातील 5 औद्योगिक क्षेत्रात प्रदूषणाची वाढ झाली आहे, हे खरे, परंतु यामुळे जनतेच्या आरोग्यास धोका झाला, हे खरे नाही"असे ठाकळेबाज उत्तर दिलेले आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने अहवाल तयार केलेला आहे. मग आपले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ काय कारीत आहे ? ते यावर उपाययोजना का करीत नाही ? प्रदूषणामध्ये डोंबिवलीचा 14वा क्रमांक लागतो हे शासनाला मान्य आहे काय ? रोज दीड ते दोन हजार बालके अस्थमामुळे डॉक्टरांकडे उपचार घेण्यासाठी येत असताना जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण झाला नाही असे शासन कसे काय म्हणते ? यासंदर्भात राज्य शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? माझ्या प्रश्नांचे माननीय मंत्री महोदयांनी कृपया विस्तृत उत्तर द्यावे.

श्री. सचिन अहिर : मी सांगितले की, राज्य शासनाने याबाबतीत ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे. केन्द्र शासनाने ही यादी तयार करीत असताना जे निकष लावलेले आहेत त्याबाबत राज्य शासनाने त्याना विचारणा केलेली आहे. डोंबिवलीमध्ये रेसिडेन्शियल आणि एमआयडीसीचाही भाग आहे. इंडस्ट्रीमुळे होत असलेले प्रदूषण आणि त्याच्या रेडियसमध्ये राहाणारे लोक याचा सर्व्हे करुन रिपोर्ट दिलेला आहे...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 5061...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न आपण गांभीर्याने घ्यावा. केन्द्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यामध्ये वाद आहे. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. प्रदूषणाच्या बाबतीत डोंबिवलीचा 14वा क्रमांक लागतो. याबाबतीत राज्य शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? यासंदर्भात केन्द्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ काय उपाययोजना करणार आहे याची आपण वाट पहात आहात काय ?

श्री. सचिन अहिर : केन्द्रीय प्रदूषण मंडळाची वाट पहाण्याची आवश्यकता नाही. केन्द्रीय प्रदुषण मंडळाने जे काही निकष ठरविलेले आहेत त्यासंबंधी आम्ही चर्चा करीत आहोत. तरी देखील राज्य शासनाने स्वतंत्र ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे. प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे काम प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून चालू आहे. यामध्ये विविध खात्यांचा संबंध येतो. यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी आदरणीय मुख्यमंत्र्यांना लिहिलेले असून त्यांनी त्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे. कॅबिनेटची सबकमिटी झाल्यानंतर सर्व खात्यांचे सचिव, माननीय मंत्री महोदय हे एकत्र बसून या सर्व गोष्टीवर नियंत्रण ठेवण्याबाबत मास्टर प्लॅनची अमलबजावणी करण्याचे काम केलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी, सबकमिटी, कॅबिनेट, ॲक्शन प्लॅन याऐवजी उपसमिती, मंत्रिमंडळ, कृती आराखडा असे मराठी शब्दप्रयोग करावेत.

सभापती : राज्यमंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

श्री. सचिन अहिर : नोंद घेतलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण झाला हे खरे नाही. केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने जी 88 प्रदुषित शहरांची यादी दिली त्या यादीमध्ये या पाच शहरांचा समावेश आहे. ही यादी केवळ मेरिट लिस्ट म्हणून जाहीर केली का? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दरवर्षी Annual concentration of Pollutants survey Report सादर होतो. त्यामध्ये सल्फर डाय ऑक्सॉईड, नायट्रोजन डाय ऑक्सॉईड, आरएसपीएम यांचे प्रमाण वाढत चालले असून ते घातक आहे असे मंडळ म्हणत आहे. चेंबूर, तारापूर, नवी मुंबईतील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत फुफ्फुसाचे आजार कसे वाढत चालले आहेत याची माहिती जाहीर केली जात आहे. घातक असल्याचे आरोग्य विभाग म्हणत असताना मंत्रीमहोदय म्हणतात की आरोग्याला घातक नाही. पर्यावरण विभागाकडे स्पेशल डॉक्टर आहेत का? जे आरोग्याला घातक नाही असे म्हणतात. डिटेल ॲक्शन प्लॅन तातडीने लागू झाला पाहिजे, त्यासाठी कालमर्यादा निश्चित केली पाहिजे. एमआयडीसी आणि महानगरपालिका चुकीच्या गोष्टी करीत असतील तर प्रदूषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिका आणि एमआयडीसी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला पाहिजे. त्यांना आरोग्याची चिंता वाटत नाही. या जरी सरकारी आस्थापना असल्या तरी त्यांच्यावर केसेस दाखल करणार आहात का?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, घातक नाही. ॲक्शन प्लॅन तयार करुन त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून तयारी करीत आहोत. धोका नाही असे म्हटले आहे. सद्यस्थितीत तेथे जे लोक रहात आहेत त्यांना धोका नाही असा उल्लेख केला आहे. याचा अर्थ फार धोक्याच्या परिस्थितीत लोक रहात आहेत अशी बाब नाही.

श्री.विनोद तावडे : त्यांना आयसीयूमध्ये नेण्यास ते पात्र नाहीत असे आहे का?

श्री.सचिन अहिर : आयसीयू म्हणजे काय?

डॉ.दीपक सावंत : अतिदक्षता विभागात पाठविण्याची गरज आहे का?

श्री.सचिन अहिर : मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, शासनाने कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. त्यादृष्टीने वेगवेगळया विभागांमध्ये समन्वय करण्याची भूमिका आहे. उद्योग विभागाला सांगितले आहे की, औद्योगिक क्षेत्राच्या आजूबाजूला असलेल्या निवासी वस्त्यांवर प्रदूषणाचा परिणाम होणार नाही यासाठी वृक्ष लागवड करणे, औद्योगिक क्षेत्र आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवासी क्षेत्रामध्ये पुरेसे अंतर ठेवणे. दोन्ही बाजूला एमआयडीसी आणि मधल्या भागात निवासी वस्ती आहे. निवासी वस्ती लगेच स्थलांतरीत करता येणार नाही. भविष्यकाळात परिणाम होऊ नये म्हणून जिथे जिथे चुकीच्या पध्दतीने प्रदूषण होत असेल तर त्यासंदर्भात कारवाई केली आहे. डोंबिवली शहरामध्ये कारखाने बंद करण्याबाबत 32 जणांना नोटीसा पाठविल्या आहेत. त्यापैकी 31 जणांनी नॉर्मप्रमाणे पूर्तता करण्याचे काम केले आहे. शासनाने ॲक्शन प्लॅन तयार केला आहे. कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. इतकेच नव्हे तर मंत्रिमंडळाची उपसमिती तयार करीत आहोत. सरकार या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोल्हापूर जिल्ह्यातील अधिकाऱ्याने शासनाच्या दरपत्रकाला न जुमानता कोट्यावधी रूपयांची औषधे खरेदी करण्याचा केलेला करार

(३) * २९८० श्री.किरण पावसकर, डॉ. दीपक सावंत, श्री. अनिल परब, श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तयार केलेल्या दरपत्रकाला न जुमानता कोल्हापूर जिल्ह्यातील अधिकाऱ्याने केलेला करार संपूर्ण राज्याला लागू करून कोट्यावधी रूपयांची निकृष्ट दर्जाची औषधे खरेदी केल्याचे माहे जानेवारी, २०१० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या औषधांची किंवा साधनसामुग्रीची खरेदी याअंतर्गत करण्यात आली त्या सर्व वस्तू शासनाने केलेल्या दर करारामध्ये नमूद असतांनाही अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यावधी रूपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) होय. अशा आशयाची बातमी दैनिक लोकमतमध्ये जानेवारी, २०१० मध्ये आलेली आहे.

२), ३), ४) व ५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत माहे जानेवारी, २०१० पासून आजतागायत चौकशी सुरु आहे. तसेच सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्यामार्फत सुध्दा चौकशी चालू आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, शासनाने आश्चर्यजनक उत्तर दिले आहे. दारिद्र्य रेषेखालील रुग्णांना उपचार व्हावेत यासाठी 1997 साली जीवनदायी योजना सुरु झाली. हृदयविकार व कर्करोगाने दगावणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. या योजनेत भ्रष्टाचार झाला आहे काय या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिले असून पुढे म्हटले आहे की, अशा आशयाची बातमी दैनिक लोकमतमध्ये जानेवारी, 2010 मध्ये आलेली आहे. मी आपल्यामार्फत शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, जीवनदायी योजनेचा करार झाला. त्या करारान्वये 2005 ते 2007 पर्यंतचा कालावधी निश्चित केला होता. हा कालावधी 2009 पर्यंत वाढविल्याबद्दल फक्त कोल्हापूरच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? वैद्यकीय शिक्षण संचालकांविरुध्द कारवाई करणार आहात की नाही? म्हाडामधील भ्रष्ट अधिकाऱ्यांना तिरुपतीची वारी घडविल्याचे आम्ही वृत्तपत्रातून वाचले होते.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वैद्यकीय क्षेत्रात भ्रष्टाचार करुन त्यांना परदेश वाऱ्या या औषध कंपन्यांनी घडवून आणल्या आहेत. यात ज्या वजनाच्या मशिन्स खरेदी करण्यात आल्या त्या एका मशिनची किंमत 936 रुपये असताना 6 हजारापर्यंतची किंमत देऊन खरेदी केल्या. तसेच औषधाच्या बाबतीतील हाच करार सन 2009 पर्यंत वाढवून एकूण 9 कोटीचा भ्रष्टाचार यामध्ये झालेला असल्याचे निदर्शनास आले. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, या सर्व प्रकरणात शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच हा भ्रष्टाचार कालपरवाचाच नव्हे तर सन 2005 पासून सुरु असून लोकमतने बातमी दिल्यानंतरच शासनाच्या लक्षात आला आहे हे खरे आहे काय ? कोल्हापूरच्या ज्या उपसंचालकांवर शासन कारवाई करणार असल्याचे म्हणते ते उपसंचालक सन 2007 मध्ये निवृत्त झालेले आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्यावर कारवाई कशी करणार आहात ?

प्रा.फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जीवनदायी योजनेसाठी लाणाऱ्या डिस्पोजेबल मटेरियलसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच सन 2005 पासून हा भ्रष्टाचार सुरु असल्याचाही त्यांनी उल्लेख केलेला आहे. यासंबंधी शासनाने ऐसीबी आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांकडून सुध्दा चौकशी सुरु केली असून येत्या 15 दिवसातच हा अहवाल अपेक्षित आहे. हा अहवाल ज्यावेळेस प्राप्त होईल तेव्हा तो सभागृहाच्या पटलावर ठेवून त्यावर चर्चा करण्यास शासन तयार आहे. अहवालात जे अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याचे कामही शासनाच्या मार्फत होणार आहे. त्याचबरोबर आम्ही ज्यावेळेस नव्यानेच शासनामध्ये आलो त्यावेळेस या सिस्टममधील काही दोष आमच्या लक्षात आले आहेत. त्यामुळे पहिली प्रॉयॉरिटी आम्ही या प्रोसेसमध्ये सुधारणा करण्यासाठी दिली. त्यानंतर प्रोक्यूरमेंट पॉलिसी नव्याने सुरु करण्याची प्रक्रिया झालेली आहे. या पॉलिसीनुसार मध्ये कोणीही डिस्ट्रीब्युटर नको तर सरळ मॅन्युफॅक्चररकडून डायरेक्ट पर्चेस करुन तीन रिजनल वेअर हाऊसेसमार्फत ही औषधे डिस्ट्रीकच्या ठिकाणी व हॉस्पिटलपर्यंत नेण्यासंबंधीची एक ट्रान्सपरंट पॉलिसी तयार करण्याचे काम होणार आहे. त्याचप्रमाणे काही दिवसात आम्ही ही संपूर्ण प्रक्रिया त्याचे डिक्लरेशन करणार आहोत. माननीय मंत्री महोदय आणि मी दोघेही मिळून या प्रोसेसमध्ये ट्रान्सपरन्सी आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत. तसेच चौकशी दोषी आढळून येणारा अधिकारी कितीही मोठा असला तरी त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2980.....

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, आता आपण स्वत: प्रोक्यूअरमेंट करणार आहोत. आपल्याला माहिती आहे की, नाही परंतु यासंदर्भात केंद्राचा एक जी.आर. आहे. आपल्याला काही औषधे केंद्राच्या पीएसयु कडून खरेदी करावी लागतात. त्यामुळे यासाठी डिस्ट्रीब्यूटर नेमणे अत्यंत आवश्यक असते. उदा. कर्नाटक राज्यात अशी व्यवस्था आहे. त्यामुळे यावेळी आपण नेमके काय करणार आहात ? श्रीमती चंद्रा अय्यंगार या सचिव होत्या त्यावेळी केंद्रशासनाचा जी.आर.आला होता. तो जी.आर. खारीज झाला आहे काय ?

मला दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, डायरेक्टर श्री. डाखोरे यांच्याकडून जीवनदायी योजनेविषयी 10 मार्च, 2010 रोजी मला एक पत्र प्राप्त झालेले आहे. या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "आपले उपरोक्त पत्र संदर्भीत दिनांक 2 फेब्रुवारी, 2010 चे पत्र संचालनालयास प्राप्त झालेले आहे. त्या अनुषंगाने संचालनालयाचे 10 फेब्रुवारी, 2010 व 17 फेब्रुवारी, 2010च्या पत्राद्वारे सर्व विभाग प्रमुख आणि उपसंचालक आरोग्य सेवा यांच्याकडून त्यांच्या कार्यालयातील अभिपत्त्याखालील कार्यालयांकडून रुग्णालयांसबंधी माहिती मागविण्यात आलेली आहे. सदर पत्र व्यवहाराच्या प्रती जोडलेल्या आहेत. आतापर्यंत बरीच माहिती प्राप्त झालेली असून उर्वरीत माहिती लवकरच प्राप्त होईल." सभापती महोदय, जीवनदायी योनजेविषयी मी माहिती मागवली होती परंतु आज पर्यंत मला प्राप्त झालेली नाही. 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिली जावी, असा नियम असतांना मला 40-42 दिवस उलटून गेल्यानंतरही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे ही माहिती मला अजून पर्यंत का प्राप्त झाली नाही ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, यामध्ये गैरव्यवहार झाला आहे, असे आपल्याला लोकमत या वर्तमान पत्रातून कळालेले आहे. मी मागील बजेट सेशनमध्ये या विषयाच्या संदर्भात तयारी करुन या, असे सांगितले होते परंतु त्यासंदर्भातील तयारी काही केलेली दिसत नाही. एन्जीओग्राफी आणि एन्जीओप्लॉस्टी यासाठी आपण जे काही साहित्य मागवता त्यांच्या व बाजाराच्या दरामध्ये तफावत आहे त्यामुळे आपण यासंदर्भात कारवाई करणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2980.....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आदरणीय आमदार डॉ. दीपक सावंत यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. 6-7 कंपन्यांना जे पीएसयु आहेत त्यांच्याकडून औषध घेण्याच्या संदर्भात केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला आहे, त्यानुसार केन्द्र शासनाने जी. आर. काढला आहे, असा त्यांनी पहिला प्रश्न विचारलेला आहे. केंद्रसरकारच्या कॅबिनेटने यासंदर्भात निर्णय घेतला आहे, ही वस्तुस्थिती आहे. जे काही सीक युनीटस् आहेत त्यांना मदत व्हावी, या उद्देशाने केंद्रशासनाने जी. आर. काढून सर्व राज्यांना तो जी.आर. पाठविला आहे. 6-7 कंपन्याकडून म्हणजे कर्नाटक मधील अँटीबायोटीक असेल, राजस्थानची कोणती कंपनी असेल, अशा कंपन्याकडून औषधे घ्यावीत याबाबत विनंती केली आहे. परंतु मी या खात्याचा मंत्री झाल्यानंतर माझ्या राज्यमंत्र्यांच्या व अधिकायांसमवेत चर्चा केली तेव्हा आम्हाला आढळून आले की, एमएसएसआयडीसी, एक्स सर्व्हीस मॅनची संघटना, कन्झूमर फेडरेशन व पीएसयु मार्फत महाराष्ट्र शासनाचे डिपार्टमेंट औषधे खरेदी करीत असतात. तसेच हे जे 6-7 पीएसयु आहेत, ते स्वत: काही औषधे तयार करीत नाहीत तर ते दुसयांकडून औषधे घेऊन राज्य सरकारला औषधांचा सप्लाय करीत असतात ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय राज्यमंत्रीमहोदयांनी या ठिकाणी प्रोक्यूअरमेंट संदर्भात माहिती दिलेली आहे. 2 वर्षापूर्वी , 3 वर्षापूवी, 5 वर्षापूर्वी जो औषध खरेदी झाली होती, त्या संदर्भात लोकमत दैनिक वर्तमानपत्राने 15-20 दिवस कंटीन्यूअस माहिती छापली होती. जे घडले त्यासंदर्भातील तपास करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांकडे हे काम सोपवेलेले आहे. 15-20 दिवसांत त्यांच्याकडून अहवाल येईल. त्या अहवालात जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर आपण निश्चितपणे कारवाई करणार आहोत.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

ता.प्र.क्र.2980 श्री.सुरेश शेट्टी....

सभापती महोदय, जानेवारी महिन्यामध्ये हे प्रकरण ॲन्टी करप्शन ब्युरोकडे चौकशीसाठी देण्यात आले असून ते सुध्दा चौकशी करीत आहे . त्यांचा अहवाल 15 दिवसात येईल असे मला वाटते. अशा प्रकारे दोन्ही एजन्सीच्या अधिकाऱ्यांकडून आपल्याकडे अहवाल येणार आहे. तसेच अधिवेशन संपण्याच्या अगोदर तो अहवाल येणार आहे. राज्य मंत्री महोदयांनी आताच सांगिल्याप्रमाणे तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर ॲक्शन टेकन रिपोर्ट सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रोक्युअरमेन्टच्या नवीन पॉलिसीच्या संदर्भात दुसरा एक महत्वाचा प्रश्न विचारला असून त्याबाबत मी सांगू इच्छितो की, प्रोक्युअरमेन्टची नवीन पॉलिसी आता फ्रेम केली जात आहे. कॅबिनेटच्या बैठकीत या पक्षाच्या काही सन्माननीय सदस्याबरोबर तसेच राष्ट्रवादी कॉग्रेस आणि कॉग्रेस या पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांबरोबर देखील मी चर्चा केली होती. गेल्या दहा वर्षापासून मी खालच्या सभागृहाचा सदस्य आहे. या विषयाच्या संदर्भात जेव्हा चर्चा होत असते तेव्हा आरोग्य मंत्र्यांवर आणि आरोग्य विभागाच्या अधिका-यांवर फक्त आरोप करण्यात येतात की, औषधाची खरेदी करीत असतांना गोंधळ वा गडबड होत असते. त्याचबरोबर साहित्याची खरेदी करीत असतांनासुध्दा गोंधळ वा गडबड होत असते. आर.सी. रेट 100 रुपयांचा असेल तर मार्केटमध्ये 70 रुपयास ते औषध मिळत असते. या सर्व बाबी लक्षात घेऊन नवीन प्रोक्युअरमेन्ट पॉलिसी राज्य सरकारकडून राबविण्यात येणार आहे या संदर्भात लवकरच जी.आर. काढण्यात येणार आहे व मे महिन्यापासून .अशा प्रकारे नवीन प्रोक्युअरमेन्ट पॉलिसी राज्यात सुरु करण्यात येणार आहे. या संदर्भात ॲडिशनल चीफ सेक्रेटरीच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येणार आहे. सपूर्ण देशात आपले पहिले राज्य असे आहे की, या ठिकाणी डी.जी. लेव्हलचा एक अधिकारी व्हिजीलन्स ऑफिसर म्हणून या समितीमध्ये नेमण्यात येणार आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या नव्याने निवडणुका झालेल्या असल्यामुळे त्यांचे दोन प्रतिनिधी या समितीत राहणार आहेत, त्याचबरोबर फुड ॲन्ड ड्रग्ज ॲडमिनिस्ट्रेशनचा एक प्रतिनिधी, त्याचबरोबर ' महाराष्ट्र शासनाचे दोन एक्सपर्ट डॉक्टर्स या समितीमध्ये नेमण्यात येणार आहेत.या समितीमध्ये ड्रग्ज वा इक्युपमेन्टची खरेदी करण्याकरिता

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्पेशल स्पेसिफिकेशन कमिटी देखील करण्यात येणार आहे. कार्डेक्ससंबधी इक्विपमेन्ट खरेदी करावयाची असेल तर राज्यातील सरकारी हॉस्पिटलमधील असो वा खाजगी हॉस्पिटलमधील कार्डेक्स सर्जन व कार्डेक्स फिजिशिअन असो त्यांना या कमिटीमध्ये घेण्यात येणार असून कोणत्या स्पेसिफिकेशन्सचे इक्विपमेन्टस् कार्डियाक डिपार्टमेन्टमध्ये खरेदी करावयाचे आहेत या बाबी ते ठरविणार आहेत. त्याचबरोबर ते स्पेसिफिकेशन आर.सी. वर खरेदी करावयाचे नसून प्रोक्युअरमेन्ट कमिटी टेंडर काढून ते खरेदी करणार आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, डी.एम.ई.आर. असो बी.एम.सी. असो अथवा इ.एस.आय.ई.एस. असो, आरोग्य खाते असो त्या ठिकाणी मे महिन्यानंतर प्रत्येक औषधांची वा प्रत्येक साहित्याची आर.सी.वर खरेदी न करता टेंडरवरच खरेदी करण्यात येणार आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील ८४ शहरे आणि निमशहरांमध्ये झपाट्याने होणाऱ्या नागरिकरणामुळे स्वच्छतेचा व सांडपाण्याचा निर्माण झालेला प्रश्न

(४) * ४९२९ श्री.मोहन जोशी, श्री माणिकराव ठाकरे, श्री. संजय दत्त, श्री जयप्रकाश छाजेड :

सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ८४ शहरे आणि निमशहरांमध्ये झपाटयाने होणाऱ्या नागरीकरणामुळे स्वच्छतेचा आणि पर्यायाने सांडपाण्याचा प्रश्न गंभीर झालेला असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या तपशीलवार पाहणीच्या अहवालातून माहे फेब्रुवारी, २०१० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई आणि पुणे या महानगरांत तयार होणाऱ्या सर्वच सांडपाण्यावर प्रक्रिया न केलेले तब्बल ६० टक्के म्हणजे ६०१८ दशलक्ष लिटर सांडपाणी जसेच्या तसे सोडण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यशासनाने सांडपाण्याचे १०० टक्के पाणी प्रक्रिया करुनच समुद्रात किंवा खाडीत सोडण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सचिन अहिर,श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता: (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

अ) या दोन्ही महानगरपालिकेमधून एकूण ७१० लक्षघनलीटर सांडपाणी प्रक्रिया न करता सोडले जाते. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतून एकूण तयार होणाऱ्या ४७४ एम.एल.डी. घरगुती सांडपाण्यापैकी ३०५ एम.एल.डी. (६४.००%) सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. उर्वरीत प्रक्रिया न केलेले सांडपाणी (३६%) मुळा-मुठा नदीत सोडले जाते.

ब) मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत तयार होणाऱ्या २६७१ एमएलडी घरगुती सांडपाण्यापैकी २१३० (८०%) एमएलडी सांडपाण्यावर शुध्दीकरणाची प्रक्रिया करण्यात येते. उर्वरित ५४१ एमएलडी झोपडपट्टी क्षेत्रातून निर्माण होणारे सांडपाणी विना प्रक्रिया पावसाळी नाल्यामार्फत खाडीत सोडण्यात येते.

(३) म.प्र.नि.मंडळाने पुर्ण सांडपाण्यावर महानगरपालिका प्रक्रिया करत नसल्याने पुणे येथे न्यायालयीन खटला दाखल केला आहे व तो न्यायप्रविष्ट आहे. तसेच १४.०९.२००९ रोजी महानगरपालिकेला जल प्रदूषण नियंत्रण कायदा, १९७४, ३३अ अन्वये प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहे.

मुंबई महानगरपालिकेमध्ये उपनगरातील काही भागामध्ये भुयारी गटार नसलेल्या ठिकाणी योजना राबवून सांडपाणी एकत्रित करुन शुध्दीकरण यंत्रणेकडे पाठविण्यासाठी उपाययोजना महानगरपालिकेला टप्याटप्याने राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्याचा पाठपूरावा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात येत आहे.

(४) उर्वरीत सांडपाण्यावर प्रक्रिया सयंत्रणा उभारण्याचे काम पुणे महानगरपालिकेतर्फे सन २०१० पर्यंत होणार असल्याचे पुणे महानगरपालिकेतर्फे कळविण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, केन्द्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने देशातील सांडपाण्याच्या बाबतीत आणि त्यावर प्रक्रिया करण्याच्या बाबतीत गेल्या महिन्यात एक अहवाल प्रसिध्द केला आहे. त्या अहवालात असे म्हटलेले आहे की, महाराष्ट्र हे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यामध्ये अव्वल स्थानावरील राज्य आहे. प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुध्दा शासनाने ते मान्य केलेले आहे. पुणे शहराच्या मध्यभागातून मुळा आणि मुठा या नद्या वाहतात आणि ४० टक्के सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडण्यात येते. गटार गंगा असे या नद्याचे स्वरुप झालेले आहे. मुंबई महानगरपालिकासुध्दा उपनगरामधील सांडपाणी कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता समुद्रात सोडत असते असे या अहवालात नमूद केलेले आहे...

श्री.दिवाकर रावते (बसून) :तसे नाही.

श्री.मोहन जोशी :सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेमध्ये आपली सत्ता असली तरी सुदा त्या अहवालात तसे म्हटलेले आहे.तेव्हा हा अत्यंत महत्वाचा मुद्दा असल्यामुळे त्याला आपण पाठिंबा द्यावा..सोलापूर जिल्हयामध्ये कॉलराची साथ आली आहे. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात असे म्हटलेले आहे की, "म.प्र.नि.मंडळाने पूर्ण सांडपाण्यावर महानगरपालिका प्रक्रिया करत नसल्याने पुणे येथे न्यायालयीन खटला दाखल केला आहे."

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. 4929...

श्री. मोहन जोशी...

हा खटला केव्हा दाखल केला, त्या खटल्याचा कालावधी किती आहे? तो खटला लवकरात लवकर निकालात काढण्यासाठी प्रयत्न करणार की नाही? आणि सर्वात महत्वाची गोष्ट अशी की, याबाबत केवळ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर जबाबदारी सोपवून चालणार नाही. महाराष्ट्रामध्ये झपाटयाने वाढत जाणाऱ्या नागरिकीकरणाचा विचार करुन शासन धोरण ठरविणार आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. आणि म्हणूनच राज्य सरकारच्या माध्यमातून धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. भविष्यकाळात येणारा केंद्र सरकारचा निधी असेल, राज्य सरकारचा निधी असेल त्यामधील मोठया प्रमाणातील निधी या कामासाठी खर्च केला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. आणि म्हणूनच पुणे शहर, मुंबई शहरामध्ये जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून मोठया प्रमाणात सेव्हरेज ट्रिटमेंट प्लँट करण्यासाठी निधी देण्याचे काम त्या त्या संस्थेला किंवा त्या महानगरपालिकेला दिले जाते. पुण्याच्या बाबतीत तीच परिस्थिती होती. पुणे येथे दोन ठिकाणी 145 एमएलडी मलनिस्सारण प्रक्रिया यंत्रणेचे काम प्रगतिपथावर असून आणखी एक 40 एमएलडी मलनिस्सारण प्रक्रिया यंत्रणेचे काम नियोजित आहे. अशाप्रकारे भविष्यकाळात तीन नियोजित कामे त्यांनी करावीत अशी महानगरपालिकेला सूचना देण्यात आली आहे. मुंबईच्या बाबतीत सांगितलेली गोष्ट खरी आहे. विशेषकरुन मुंबई शहराच्या उपनगरामध्ये ड्रेनेज सिस्टीम नाही अशी अवस्था आहे. आज त्याठिकाणी सक्शन टँकमधून मलप्रवाह बाहेर टाकण्याचा पर्याय स्वीकारला जातो. त्याठिकाणी ड्रेनेज सिस्टीमशी कनेक्टिव्हीटी होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही ही वस्तुस्थिती असल्यामुळे राज्य सरकारच्या व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून महानगरपालिकेला सूचना देण्यात आल्या आहेत. इतकेच नव्हेतर त्यांनी याबाबत अंमलबजावणी केली नाहीतर त्यांना नोटीस देण्याचे काम केले आहेत. अशाप्रकारे पुणे महानगरपालिकेलाही नोटिस दिली आहे. इतकेच नव्हेतर त्यांच्याविरुध्द न्यायालयामध्ये एफआयआर दाखल करण्याचे काम राज्य सरकार आणि एमपीसीबीने केले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या बाबतीत उत्तर देण्यात आले. त्याच्या उलट दुसरीही बाजू आहे. माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी मुळा-मुठा नदीची गटारगंगा झाली आहे असे सांगितले. पुणे जिल्हयाचे पालकमंत्री माननीय श्री. अजितदादा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

ता.प्र.क्र. 4929...

श्री. दिवाकर रावते...

पवार यांच्या अधिपत्याखालील पुण्यामध्ये हे असे होणे शक्य नाही. आपण मुंबईबाबत देखील प्रश्न विचारला, मुंबई तुमची आहे. मुंबई आमची असली तरी तुमच्या कॉंग्रेसचे कर्म या मुंबईला मिळाले आहे. या छापील उत्तरामध्येच असे म्हटले आहे की, "मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत तयार होणाऱ्या 2671 एमएलडी घरगुती सांडपाण्यापैकी 2130 (80%) एमएलडी सांडपाण्यावर शुध्दीकरणाची प्रक्रिया करण्यात येते. उर्वरित 541 एमएलडी झोपडपट्टी क्षेत्रातून निर्माण होणारे सांडपाणी विना प्रक्रिया पावसाळी नाल्यामार्फत खाडीत सोडण्यात येते". मुंबई शहरामध्ये परप्रांतियांनी बेकायदेशीरपणे वाढविलेल्या झोपडपट्टयांमधील विना प्रक्रिया केलेले सांडपाणी जाते कुठे? अहो, मुंबई महानगरपालिकेमध्ये जरी आमची सत्ता असली तरी या शहरामध्ये झोपडपट्टया वाढविल्या कुणी?

(गोंधळ)

हे कॉंग्रेसचे सरकार झोपडपट्टया वाढवीत आहे, असा माझा आरोप आहे. तुमच्या पापामुळे झोपडया वाढत आहेत.

(गोंधळ)

तुम्ही मुंबई सर्वांची सांगता, तुमचे राजीव गांधी मुंबई सर्वांची सांगतात....मुंबई शहरामध्ये सर्वांनी या, उत्तर भारतीयांनी या आणि झोपडया बांधा असे सांगतात, त्या झोपडपट्टयामधून वाहणाऱ्या 20 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया होत नसल्यामुळे ही मुंबई दूषित होत आहे. हे तुमचे पाप आहे, हे राजीव गांधी यांचे पाप आहे....

(दोन्ही बाजूकडील अनेक माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलू लागतात.)

आणि म्हणून या अनधिकृतपणे बांधलेल्या झोपडया आपण पाडणार काय? राजीव गांधी यांचे पाप असलेल्या या झोपडया आपण पाडणार की नाही हे सांगा? मुंबई शहर खराब करणारे तुमचे सरकार आहे. तुमच्यामुळे या बेकायदेशीर झोपडया वाढल्या आहेत. त्यामुळे 541 एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करता येत नाही. या झोपडया आपण नष्ट करणार की, राजीव गांधी यांच्या आशिर्वादाने आणखी वाढविणार?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, ...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मूळ प्रश्न आहे, त्याच्यावर उप प्रश्न विचारला आहे. त्या उप प्रश्नाशी संबंधित असणाऱ्या वक्तव्या व्यतिरिक्त बाकी सर्व वक्तव्य मी काढून टाकत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मग त्यांचेही वक्तव्य काढून टाकले पाहिजे.

सभापती : त्यांचेही काढू.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो उप प्रश्न विचारला आहे, त्यासंबंधातच सर्वकाही झाले आहे आणि आपण ते काढून टाकल्यामुळे आता तो प्रश्न रहात नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तुम्ही या झोपडया कधी काढणार आहात ? असा माझा प्रश्न होता. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी हे जरी काँग्रेस पक्षाचे असले तरी हा पक्षाचा विषय नाही. मी असे म्हटलेले आहे की, मुळा-मुठा नदीला गटारगंगेचे स्वरुप आणले, परंतु माननीय श्री.अजितदादा पवार हे तेथील पालक मंत्री असल्याने असे होणे शक्य नाही. तेव्हा असे तुम्ही कसे काय म्हणत आहात ? असा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारताना पुढे असे म्हटले आहे की, या ज्या झोपड्या वाढलेल्या आहेत, त्यामुळे आम्हाला 20 टक्के प्रयोजन करता येत नाही तर तुम्ही या झोपडपट्ट्या पाडण्याची कारवाई करणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, ज्या-ज्या वेळी अनधिकृत झोपड्या निर्माण होत असतात, त्या-त्यावेळी राज्य शासन महानगरपालिकेच्या मदतीने अशा झोपड्या काढण्याची कारवाई सातत्याने करीत असते. याठिकाणी नाल्यावर बांधण्यात आलेल्या झोपडपट्ट्यांच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाला, तेव्हा राज्य शासनाने मोठी मोहीम घेऊन एम.यु.टी.पी.आणि एम.यु.पी.आय.च्या अंतर्गत जे अधिकृत आहेत, ज्यांना आपण कायद्याने संरक्षण दिलेले आहे, त्यांनाही पर्यायी घराची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याची भूमिका असून त्याप्रमाणे घरे उपलब्ध करुन देण्याचे काम केलेले आहे. अशाही काही बाबी समोर आल्या तर राज्य शासनाकडून त्यांना पर्यायी घर देऊन त्यांच्या पुनर्वसनाचे काम केले जाईल.

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4929 . . . .

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, यासंबंधात माझा उप प्रश्न आहे की, राज्यातील 84 शहरे आणि निम-शहरांमध्ये झपाट्याने वाढ होत असताना राज्य शासन व महानगरपालिका यांच्या मार्फत सांडपाणी व कचरा व्हिलेव्हाट या दोन बाबींच्या बाबतीत कोणत्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत ? दुसरा उप प्रश्न असा आहे की, प्रत्येक महानगरपालिकेला व नगरपालिकेला सांडपाणी प्रक्रिया व कचरा व्हिलेवाट प्रक्रिया प्रकल्प तयार करावेत असे सक्तीचे करणार आहात का ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, होय.

. . . .जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुरुड (जि.रायगड) येथील ग्रामीण रुग्णालयाकडे वर्ग केलेल्या जिल्हा परिषद प्रसुती गृह रुग्णालयात कुशल कर्मचारी वर्ग मंजूर करण्याबाबत करावयाची कार्यवाही

(5) * 2728 **श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुरुड (जि.रायगड) येथील सुरु असलेला जिल्हा परिषदेचा प्रसुती गृह दवाखाना शासनाच्या ग्रामीण रुग्णालयाकडे वर्ग केला असल्याने सदरहू दवाखान्यात आवश्यक कुशल कर्मचारी वर्ग मंजूर केला नसल्यामुळे तो प्रसुतीगृह दवाखाना बंद आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, येथील गरोदर महिलांची फारच गैरसोय होत असल्यामुळे या ग्रामीण रुग्णालयात कर्मचारी वर्ग मंजूर करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्यापपावेतो उक्त प्रकरणी शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्रीमती फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) मुरुड येथे लेडी कुलसुम बेगम प्रसुतीगृह दवाखाना व फातिमा बेगम दवाखाना हे दोन्ही दवाखाने जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून शासनाकडे हस्तांतरीत करणेत आलेली आहेत. त्यापैकी फातिमा बेगम दवाखान्यामध्ये ग्रामीण रुग्णालय कार्यरत असून तेथे प्रसुती विभागाचे कामकाज चालु आहे. त्यामुळे हस्तांतरीत केलेले लेडी कुलसुम बेगम प्रसुतीगृह दवाखाना बंद स्वरुपात आहे.

(2) फातिमा बेगम दवाखान्यामध्ये ग्रामीण रुग्णालय कार्यरत असून तेथे प्रसुती विभागाचे कामकाज चालु आहे. त्यामुळे महिलांची गैरसोय होत नाही. तसेच ग्रामीण रुग्णालयाचे 30 खाटांच्या कक्षाचे बांधकाम पुर्ण झाले नसल्याने आकृतीबंधानुसार मंजुर 25 पदांपैकी फक्त 15 पदे भरण्यास मंजुरी देण्यात आलेली असल्याने सद्य:स्थितीत तेथे 15 पदांपैकी 12 पदे भरलेली आहेत.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुरुड शहर आणि तालुक्यामध्ये नवाबाच्या काळामध्ये लेडी हॉस्पिटल होते. ते लेडी हॉस्पिटल बंद झालेले आहे. त्याठिकाणी लेडी कुलसुम बेगम प्रसुतीगृह दवाखाना व फातिमा बेगम दवाखाना येथे लेडी डॉक्टरांची नेमणूक केलेली आहे का ? फातिमा बेगम दवाखान्यामध्ये सध्या लेडी डॉक्टर आहे काय ? जर नसेल तर त्याठिकाणी ताबडतोब नेमणूक करण्यात येणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मुरुड येथील लोकसंख्या जवळजवळ 15 हजार इतकी आहे. येथे लेडी कुलसुम बेगम प्रसुतीगृह व फातिमा बेगम हॉस्पिटल अशी दोन हॉस्पिटल होती. हे दोन्ही दवाखाने एक कि.मी.च्या आतील आहेत. सध्या फातिमा बेगम हॉस्पिटल मध्येच प्रसुती विभागाचे कामकाज सुरु आहे. कारण आता जिल्हा परिषदेचे हे रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत झालेले आहे. त्याचे बांधकाम रुरल हॉस्पिटलच्या बाजूला सुरु आहे. ज्यावेळी 30 खाटांच्या कक्षाचे बांधकाम संपेल, तेव्हा आकृतीबंधानुसार जी 25 पदे मंजूर झालेली आहेत, ती ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भरता येतील. सध्या तेथे 15 पदांपैकी 12 पदे भरलेली आहेत. तेथे मेडिकल ऑफीसर आहेत, ते जनरल सर्जन आहेत आणि बाकीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी यासंबंधातील मूळ प्रश्न मागील अधिवेशनाच्या वेळी विचारला होता. याबाबतीत मी आणि विधानसभेच्या सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील असे आम्ही दोघेजण सन्माननीय मंत्री महोदयांनाही भेटलो होतो. मला असे वाटते की, सन्माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारण्यामागील उद्देश कळलेला नसावा. मुरुड शहरामध्ये 15 हजार लोकवस्ती आहे आणि त्यातील 8 हजार लोकवस्ती ही मुस्लीम आहे आणि मुस्लीम महिला कधी पुरुष डॉक्टरांकडे जात नाहीत. त्यामुळे खास बाब म्हणून त्या काळामध्ये नवाबांनी सदरहू दोन दवाखाने सुरु केले होते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील..

म्हणून सभापती महोदय माझी विनंती आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी मला कबूल केले होते. मी यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांना तीन वेळा भेटलो होतो. या ठिकाणी "खास बाब" म्हणून स्त्री रुग्णालय चालू करणार काय? स्त्री रुग्णालय चालू करण्याची जिल्हा परिषदेची तयारी आहे त्यांना शासन परवानगी देणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एक तर स्त्री डॉक्टर देण्याच्या बाबतीत प्रश्न विचारला तर त्या ठिकाणी स्त्री डॉक्टरांची नियुक्ती करता येईल. फातिका बेगम रुग्णालय म्हणजे या ग्रामीण रुग्णालयात स्त्री डॉक्टरांचे पद भरण्यात येईल. (अडथळा).....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी यासंदर्भात या सभागृहात तीन-चार वेळा प्रश्न विचारलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी तेथील परिस्थिती समजून घ्यावी. मुस्लीम महिला या जनरल रुग्णलयात जात नाहीत. मुरुड शहरात 50 टक्के मुस्लीम समाज आहे. जवळ जवळ 8 नगरसेवक हे मुस्लीम आहेत म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षा करतो. कारण त्यांना मुस्लीम महिलांची दु:ख कळतात.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील आपण कृपया खाली बसावे. आपण आपला प्रश्न विचारलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयाचे उत्तर अर्धवट राहिलेले आहे.(अडथळा) आपल्याला अपेक्षित असलेले उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे असे नाही. त्यांचे जे उत्तर आहे ते त्या देतील. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे खरे आहे की, प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. लेडी कुलसुम बेगम प्रसुतीगृह आणि फातिमा बेगम रुग्णालय हे जिल्हा परिषदेने सन 2007 साली महाराष्ट्र शासनाकडे दिलेले आहे. आता सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, ही दोन्ही रुग्णालये जिल्हा परिषदेला परत देण्यात यावीत. शासन त्यासाठी तयार आहे. सभापती महोदय, या दोन्ही रुग्णालयातील अंतर फक्त एक कि.मी. आहे. एक कि.मी.मध्ये दोन रुग्णालये चालविणे नियमात बसत नाही. फातिका बेगम रुग्णालयात आता 15 बेड आहेत. त्या वाढवून 30 बेड करण्यात येणार आहेत तसेच त्याठिकाणी ॲडिशनल 25 पोस्ट सॅक्शन करण्यात येणार आहेत, असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. त्याठिकाणी महिला प्रसुती तज्ञांची आवश्यकता आहे. त्या देण्याची शासनाची तयारी आहे. पण दोन्ही रुग्णालयात प्रसुतीगृह चालविणे शक्य नाही. कारण ते नियमात बसत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गुढे पाचगणी (ता.शिराळा, जि.सांगली) पठारावरील शिरसाटवाडी व खरींगवाडी येथील शेतकऱ्यांची मे सुझलॉन कंपनीने केलेली फसवणूक

(6) * 3502 श्री. भगवान साळुंखे, श्री. रामनाथ मोते : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गुढे पाचगणी (ता.शिराळा, जि.सांगली) पठारावरील शिरसाटवाडी, खरींगवाडी येथील मे सुझलॉन कंपनीने पवनचक्क्या उभारताना व शेतकऱ्यांशी खरेदी विक्रीचे व्यवहार करतांना शेतकऱ्यांची मोठया प्रमाणावर फसवणुक केल्याचे माहे नोव्हेंबर 2009 मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, व त्यानुसार सदर प्रकरणी दोषी आढळून आलेल्या व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक : (1) हे अंशत: खरे आहे, गुढे पाचगणी (ता.शिराळा,जि.सांगली) पठारावरील शिरसाटवाडी, येथे सुझलॉन कंपनीने पवनचक्क्या उभारताना शेतकऱ्यांशी खरेदी विक्रीचे व्यवहार करतांना डिसेंबर 2009 मध्ये फसवणूकीचे एक प्रकरण निदर्शनास आले आहे. खरींगवाडी येथे फसवणूकीची एकही घटना घडल्याचे निदर्शनास आले नाही.

(2) होय.

(3) सदर प्रकरकणी पोलीस यंत्रणेमार्फत चौकशी करण्यात आली असून खोटे दस्तऐवज ताब्यात घेण्या बाबतची कार्यवाही पोलीसांमार्फत करण्यात येत आहे, दोषी आढळून आलेल्या व्यक्तिवर न्यायालयीन आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, (1) गुढे पाचगणी ता. शिराळा,जि.सांगली) पठारावरील शिरसाटवाडी, खरींगवाडी येथील मे सुझलॉन कंपनीने पवनचक्क्या उभरताना व शेतकऱ्यांशी खरेदी विक्रीचे व्यवहार करतांना शेतकऱ्यांची मोठया प्रमाणावर फसवणूक केल्याचे माहे नोव्हेंबर, 2009 मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय?

(2) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय?

सभापती महोदय, शेतकऱ्यांची फसवणूक झालेली असताना उत्तरात फक्त एक प्रकरण दाखल झाल्याचा उल्लेख आहे. प्रत्यक्षात बहुतेक सर्व शेतकऱ्यांची खरेदी-विक्रीच्या व्यवहारात फसवणूक झालेली आहे. यासंदर्भात चौकशी झालेली आहे काय? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, या खरेदीमध्ये जी दलाल मंडळी सक्रीय झालेली होती त्यांनी शेतकऱ्यांवर दबाव आणून प्रकरणे दाखल होऊ दिलेली नाहीत. त्या दलालांचा बंदोबस्त करण्याकरिता काही उपाययोजना केलेली आहे काय?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3502.... श्री. गणेश नाईक ....

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, शिरसाटवाडी,ता. शिराळा येथील श्री. बळीराम बापू शिरसाट यांच्या मालकीमध्ये गट क्रमांक 28 चा भाग 1 आणि 29, त्यात भागीदार श्री. हिंदूराव बापू शिरसाट, लक्ष्मण ज्ञानू शिरसाट व सौ. वंदना रघुनाथ खटींग यांची मूळ जमीन असताना त्या ठिकाणी श्री. भोईर नावाच्या एका एजन्टने डमी लोक उभे केले आणि या मूळ लोकांची जागा त्याने सुझलॉन कंपनीला एजन्टमार्फत विक्री करण्याचा प्रयत्न केला. दिनांक 14.12.2009 रोजी ज्यावेळेला श्री. बळीराम बापू शिरसाट यांच्या निदर्शनास ही बाब आली त्यावेळी त्याने तक्रार केली आणि तक्रार केल्यानंतर श्री. भगवान ज्ञानू पाटील, रा. पाचगणी, श्री. प्रकाश रामचंद्र जाधव, बांबरवाडी, वसंत मंगलदास भोईर व अन्य इसमांविरुध्द तक्रार दाखल केली आणि त्यानंतर गुन्हा क्रमांक 60/2009 भारतीय दंड विधान संहिता कलम 420, 465, 468, 471 व 34 अन्वये गुन्हा दखल करुन त्या दोषींना अटक केली. त्यानंतर त्यांच्याकडे असलेले अधिक पुरावे जमा करण्याचे काम पोलिसांनी सुरु केलेले आहे. सुझलॉन कंपनीचा एजंट श्री. वसंत मंगलदास भोईर यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. त्या ठिकाणी हा जो एजंट आहे ज्याच्यामार्फत या जमिनीची विक्री खोट्या पध्दतीने केली गेली, खऱ्या शेतकऱ्यांना विश्वासात न घेता किंवा त्यांना मोबदला न देता जमिनीची विक्री केली गेली म्हणून त्या कंपनीने सांगितले की, हा आमचा एजंट आहे आणि त्या एजंटने गुन्हा केलेला आहे. म्हणून त्या कंपनीने सांगितले की, यापुढे भविष्य काळामध्ये ज्यांचे कॅरेक्टर चांगले आहे अशाच लोकांची नेमणूक करु. श्री. वसंत मंगलदास भोईर यांच्याकडील काम त्यांनी काढून घेतलेले आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या ठिकाणी 'अंशत: खरे आहे' असे स्पष्ट उत्तर शासनाच्या वतीने दिलेले आहे. पुढे असे उत्तर दिले आहे की, हे प्रकरण न्यायालयामध्ये गेले आणि त्यांच्यावर खटले दाखल झाले. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या ठिकाणी उत्तर देतांना 'अंशत: खरे आहे' असे म्हटले आहे त्यामध्ये शासनाची 'अंशत:' ची व्याख्या काय आहे ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3502....

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, प्रश्नामध्ये शिरसाटवाडी आणि खरींगवाडी अशा दोन ठिकाणांचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये फक्त शिरसाटवाडी येथीलच शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले म्हणून या ठिकाणी 'अंशत: खरे आहे' असे उत्तर दिलेले आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल गेली अडीच ते तीन वर्षे सातत्याने सुझलॉन कंपनीबद्दल वेगवेगळ्या ठिकाणी फसवणुकीच्या संदर्भात अनेक वेळा प्रश्न आले आणि त्यावर चर्चा झाली. या ठिकाणी चौकशी जी करण्यात आलेली आहे त्यामध्ये एकूण सर्व जिल्ह्यांमध्ये, सातारा सांगली मिळून किती ठिकाणी फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले याचा अहवाल पटलावर ठेवला जाईल काय ? दुसरा प्रश्न असा की, जे लोक दोषी आढळून आले त्यांचे वकीलपत्र हीच कंपनी घेते आणि त्यांना जामिनावर सोडवते आणि त्याच्या पाठीमागे कंपनी संपूर्ण सूत्रधार आहे. जे लोक जामिनावर सुटले असतील त्यांना परत अटक करुन खटले चालविण्याच्या संदर्भात शासन काय करणार आहे ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, शासनाने 6.3.2010 रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती संपूर्ण महाराष्ट्रातील पवन ऊर्जा निर्माण करणाऱ्या कंपन्यांनी घेतलेल्या जमिनीच्या अनुषंगाने चौकशी करण्याच्या संदर्भात नेमलेली आहे. त्यामध्ये अपर मुख्यसचिव महसूल, अपर मुख्यसचिव वने आणि सचिव, ऊर्जा विभाग अशा सदस्यांची नेमणूक केलेली आहे आणि या समितीमार्फत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पवन ऊर्जेसाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्या जमिनी घेताना तो व्यवहार योग्य पध्दतीने झाला आहे की नाही, शेतकऱ्यांना मोबदला मिळाला की नाही, त्या परिसरातील लोकांना जो विकासाचा शब्द दिला तो पूर्ण केला की नाही अशा सर्वच गोष्टींचा समावेशक अहवाल शासनाला प्राप्त होणार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : तो अहवाल पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. गणेश नाईक : अहवाल पटलावर ठेवला जाईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्रिय पर्यावरण, वन मंत्रालय व आयआयटी, दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालात डोंबिवली शहराचा १४ वा क्रमांक लागत असल्याबाबत करावयाची उपाययोजना

(७) * २८८१ श्री. संजय दत्त, श्री सुभाष चव्हाण, श्री. एम.एम.शेख, श्री.सय्यद ज़मा, प्रा. सुरेश नवले, श्री.राजन तेली, डॉ. दीपक सावंत, श्री. रामदास कदम, श्री. दिवाकर रावते, श्री. अनिल परब, श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री. अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय आणि आयआयटी, दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालात प्रदूषणाच्या यादीत डोंबिवली (जि.ठाणे) हे देशात चौदावे व राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर म्हणून घोषित केले आहे, असे असतानाही येथील प्रदूषणाची मोजणी करण्यासाठी कल्याण प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकच प्रदूषण मोजणी यंत्र बसवले असल्याचे माहे जानेवारी, २०१० च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली हे औद्योगिक वसाहतीचे शहर असून येथे अनेक रासायनिक कंपन्या आहेत या रासायनिक कंपन्यातून सोडण्यात येणारा धूर व रसायनयुक्त सांडपाण्यामुळे येथील रहिवाशी हैराण असल्याने शासनाने याबाबत दखल घेऊन डोंबिवली शहराचे प्रदूषण नियंत्रित ठेवण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सचिन अहिर, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता: (१) होय.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारखान्यांच्या सर्वेक्षणाच्या वेळी दोषी आढळलेल्या ३२ कारखान्यांवर उत्पादन बंदचे आदेश बजावण्यात आले होते. तसेच त्यांच्या विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा बंद करण्यात आला होता.

प्रदूषणाची पातळी कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करुन तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण विभागाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कल्याण-डोंबिवली मॅन्युफॅक्चर्स असो., पोलीस तसेच शासनाचे विविध विभाग यांनी स्वत:च्या स्तरावर उपाययोजना राबविण्याबाबत कृती आराखड्यात नमूद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझी लेखी उत्तराला हरकत आहे. या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारखान्यांच्या सर्वेक्षणाच्या वेळी दोषी आढळलेल्या 32 कारखान्यांवर उत्पादन बंदचे आदेश बजावण्यात आले होते. तसेच त्यांचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा बंद करण्यात आला होता." सभापती महोदय, हे सर्वच्या सर्व 32 कारखाने आजही चालू आहेत. आम्ही दोन-दोन महिने प्रश्न विचारतो त्याला वस्तुस्थिती दर्शक असे उत्तर दिले जात नाही, असत्य उत्तर दिले जाते, त्याला माझी हरकत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2881...

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, लेखी उत्तर बरोबर दिलेले आहे. या कारखान्यांना उत्पादन बंदच्या नोटिसा बजावण्यात आल्या होता. त्यानुसार 32 पैकी एका कारखान्याने नोटीसमध्ये जे कारण दिले होते त्याची पूर्तता केली नाही, त्यामुळे तो कारखाना बंद आहे, उर्वरित 31 कारखाने चालू आहेत.

श्री.संजय दत्त : सन्माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, "प्रदूषणाची पातळी कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करुन तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण विभागाकडे पाठविण्यात आला आहे." तेथील प्रदूषण तातडीने थांबविण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या कार्यवाहीचा कोठेच उल्लेख केलेला नाही. सध्या होत असलेल्या प्रदूषणाचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी जे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असते त्याचा उपयोग तेथे करण्यात आला आहे काय आणि शासनाकडून जी उपाययोजना केली जात आहे त्याचे स्वरुप काय आहे आणि या उपाययोजनांमुळे प्रदूषणाचे प्रमाण किती टक्क्यांनी कमी झाले आहे, त्याचे मंत्रिमहोदय उत्तर देतील काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, डोंबिवली सारख्या भागामध्ये एमआयडीसी आहे. या एमआयडीसीच्या दोन्ही बाजूला लोकवस्ती आहे. तेथील कारखान्यांनी एसटीपी न बसविता डायरेक्ट पाणी नाल्यात सोडले जात असल्याची बाब लक्षात आल्यामुळे त्यांना नोटीस दिली आहे. अनेक वेळा बाकीचे डिस्चार्ज नाल्यामध्ये सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. डोंबिवलीसाठी कृती आराखडा तयार केलेला आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर मी त्याठिकाणी भेट देईन आणि जो आराखडा तयार केला आहे त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही केली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापासून नाही

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

श्री.छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले. या अभिभाषणावरील चर्चेला सत्ताधारी पक्षाच्यावतीने सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, श्री.रमेशन शेंडगे यांनी सुरुवात केली. त्यानंतर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली, त्यामध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, गुरुनाथ कुलकर्णी, जयंतराव पाटील, संजय केळकर, विनोद तावडे, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा, सुभाष भोईर, श्रीमती नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, सुरेश नवले, जैनुद्दीन जव्हेरी, प्रकाश पाटील, सुभाष चव्हाण, सन्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन, श्रीमती वंदना चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत साळुंखे.....

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ....)

राजन तेली, डॉ. सुधीर तांबे, श्रीमती अलका देसाई अशा दोन्ही बाजूच्या ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेतला त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी सर्वप्रथम मनापासून अभिनंदन करतो.

या सर्व सन्माननीय सदस्यांनी राज्याच्या हिताच्या ब-याचशा बाबींचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. त्यांनी आपल्या भाषणातून हितकारक अशा बाबी मांडलेल्या आहेत. यापुढे राज्याचे धोरण ठरविताना, निर्णय घेतांना या बाबींचा शासनाला निश्चितपणे अतिशय चांगला उपयोग होणार आहे. 105 हुतात्म्यांच्या बलिदानानंतर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आपल्याला मिळाला आणि त्यास आता 50 वर्षे पूर्ण होत आहेत. हे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून आपण साजरे करीत आहोत. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर या राज्याचे भाग्यविधाते स्व. यशवंतराव चव्हाण साहेब पहिले मुख्यमंत्री झाले आणि हे राज्य कोणत्या दिशेने जाणार आहे त्याचा रोडमॅप त्यांनी ठरवून दिला, एक दिशा ठरवून दिली. हे राज्य शेतीच्या बाबतीत, शेतमजुरांच्या बाबतीत कसे पुढे जाईल, उद्योगधंद्याच्या बाबतीत कसे पुढे जाईल, एवढेच नाही तर लोकशाहीच्या माध्यमातून मंत्रालयामध्ये शासनस्तरावर एकत्र झालेल्या अधिकारांचे गाव पातळीपर्यन्त कसे विकेन्द्रीकरण होईल, शिक्षणाच्या बाबतीत राज्य कसे पुढे जाऊ इच्छित आहे, सामाजिक न्यायाच्या बाबतीत हे राज्य काय निर्णय घेणार आहे या सगळयांची दिशा स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, या राज्याचे पहिले मुख्यमंत्री, यांनी आपल्याला ठरवून दिलेली आहे आणि त्यानुसार आपण वाटचाल करीत आहोत. मग माजी मुख्यमंत्री स्व. कन्नमवारसाहेब असतील, स्व. वसंतराव नाईक असतील, स्व. वसंतदादा पाटील असतील, स्व. सुधाकरराव नाईक असतील, स्व.शंकरराव चव्हाण असतील, स्व. बाबासाहेब भोसले असतील यांच्या पासून ते श्री. शरद पवारसाहेब, श्री. मनोहर जोशी, श्री. विलासराव देशमुख आणि श्री. नारायण राणे यांच्यापर्यन्त सर्वांनी अतिशय प्रामाणिकपणे आपापल्यापरीने आपले राज्य पुढे कसे जाईल यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या विधिमंडळामध्ये आणि विधिमंडळाच्या बाहेर असलेल्या महाराष्ट्राच्या हितासाठी प्रयत्न करणारे सर्वच लोक यांनी जे काम केले त्यामुळे विविध क्षेत्रामध्ये या राज्याची निश्चितपणे नेत्रदीपक प्रगती झालेली आहे. किंबहुना अनेक क्षेत्रामध्ये या राज्याने आघाडी घेतलेली आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने ही चर्चा होत असताना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ....

यापुढे सुध्दा आपण हे राज्य देशात नाही तर जगामध्ये एक प्रगतिशील राज्य म्हणून कसे पुढे येईल यादृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करुया.

गेल्या 50 वर्षामध्ये अनेक ऐतिहासिक निर्णय या विधिमंडळाने, या राज्याने घेतलेले आहेत. रोजगार हमी योजनेचा कायदा या महाराष्ट्रात पहिल्यांदा निर्माण झाला. आज हा कायदा संपूर्ण देशामध्ये अमलात आणला जात आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

खरे म्हणजे आपले राज्य अनेक वेळेला पथदर्शी ठरत आहे. आपण अनेक निर्णय घेतो त्याची अंमलबजावणी करतो आणि देशातील इतर राज्ये त्याच मार्गाने पुढे जायला मागत आहेत. 73 आणि 74 व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला आणि मागासवर्गीयांना आरक्षण देण्याचे काम सुध्दा या राज्याने केले. महिलांचे धोरण पहिल्यांदा या राज्याने अंमलात आणले आणि मंडल आयोगाच्या शिफारशी आल्या त्या शिफारशी पहिल्यांदा या देशामध्ये कोणत्या राज्याने अंमलात आणल्या असतील तर त्या पुरोगामी फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपतींच्या महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा हा न्याय दिला गेला. विकासाच्या गरजेनुसार पर्यावरण असेल, माहिती व तंत्रज्ञान यासाठी स्वतंत्र प्रशासकीय विभागाची निर्मिती आपण केली. सहकाराच्या माध्यमातून 2 लाख सहकारी संस्थांची स्थापना झाली. हे राज्य पुढे नेण्याचा प्रयत्न आतापर्यंतच्या सर्व राज्यकर्त्यांनी आणि समाज धुरिणांनी या राज्यामध्ये केला. माहितीचा अधिकार देणारे पहिले राज्य महाराष्ट्रच आहे. अनुसूचित जाती आणि जमातींची जी लोकसंख्या आहे त्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पामध्ये तरतूद करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. स्वतंत्र अल्पसंख्याक विभागाची स्थापना सुध्दा या महाराष्ट्राने केली आणि ग्रामीण व नागरी स्वच्छता अभियान, तंटामुक्ती गाव योजना अशा अनेक नवनवीन योजनांची सुध्दा सुरुवात याच महाराष्ट्रामध्ये झाली. जवळजवळ 25 अवर्षणग्रस्त जिल्हयांमध्ये शेततळयांचा विकास ही नवीन कल्पना आपण राज्यामध्ये राबविली. पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 25 हजार रुपयांपर्यंत पीक कर्ज आता पूर्णपणे बिनव्याजी करण्यात आले आहे. 2008-09 मध्ये 6399 कोटी रुपये खर्च करुन 3540 दशलक्ष घनमीटर पाणी साठवण क्षमता आणि 1.47 लाख हेक्टर इतकी अतिरिक्त सिंचन क्षमतेची निर्मिती या राज्याने प्राप्त केलेली आहे. राज्यात मान्यता देण्यात आलेल्या ज्या इंडस्ट्रीज आहेत त्यातील 169 विशाल प्रकल्पांपैकी 51 प्रकल्पांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरु झालेले आहे. सर्वाधिक थेट विदेशी गुंतवणूक आकर्षिक करण्यासाठी महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. विदेशी गुंतवणुकीच्या बाबतीत केवळ या देशामध्ये नव्हे तर जगामध्ये जे इतर देश आहेत त्या देशाची क्रमवारी लावण्यात आली त्यावेळी महाराष्ट्र चौथ्या-पाचव्या क्रमांकावर होता. त्या देशांबरोबर आज महाराष्ट्र राज्य स्पर्धा करीत आहे. शेगाव, देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, तुळजाभवानी, माहूरगढ, संत तुकडोची महाराज यांचे मोझरी गांव अशा अनेक महत्वाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

तीर्थक्षेत्र विकास योजनांना सुध्दा प्राधान्य देण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर शहरी भागातील गरीब लोकांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत 2.73 लाख घरकुले बांधण्याचा कार्यक्रम आपण पूर्ण केला. वेगवेगळया विषयांमध्ये या राज्याने वेगवेगळे प्रश्न हाती घेतले, निर्णय घेतले आणि त्यातून वंचितांचा फायदा होईल यासाठी प्रयत्न केला. सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना ज्यावेळेला माननीय राज्यपाल महोदयांनी आपले अभिभाषण केले त्यामध्ये दहा महत्वाच्या गोष्टी मांडण्यात आल्या.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रत्येक तालुक्यात 200 शेततळी घेण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. विदर्भातील 6 आपद्ग्रस्त जिल्ह्यांसाठी महाराष्ट्र समन्वित कृषी विकास प्रकल्प मान्य केले असून त्याचा लाभ 1200 गावातील 20 लाख लोकांना होणार आहे. गावांच्या शाश्वत विकासासाठी पर्यावरण संतुलित समर्थ गाव हा अभिनव कार्यक्रम राबविण्याचेही शासनाने ठरविले आहे. मध्यवर्ती ठिकाणी शासकीय माहिती उपलब्ध व्हावी म्हणून राज्य डेटा सेंटर देखील हे शासन उभे करणार आहे. कृषी आधारित उद्योगांच्या वाढीसाठी पायाभूत सुविधा देण्याच्या दृष्टीने महत्वाच्या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याचेही या शासनाने नक्की केले आहे. सन 2009 ते सन 2012 या कालावधीत 7.35 लाख घरे बांधावयाचा निर्णय शासनाने घेतला असून दारिद्र्येषेखालील एकही कुटुंब घरापासून वंचित राहणार नाही, अशा प्रकारचा ठोस निर्णय यामध्ये घेण्यात आला आहे. 11 ते 18 वयोगटातील मुलींना पूरक आहार व इतर सेवा पुरविण्याचा तसेच किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण योजना घेण्याचा शासनाचा निर्धार आहे. अल्पसंख्यांकबहुल वर्गासाठी देखील कार्यक्रम राबवावयास सुरुवात झालेली आहे. व्यावसायिक क्षेत्रासाठी प्रोत्साहन देणे आणि जास्तीत जास्त युवा वर्गाला पुरेसा रोजगार सक्षम कौशल्य पुरविण्याचा निर्णय घेतला. तसेच शीघ्र गतीने न्याय मिळावा म्हणून न्यायाधीशांच्या संख्येत वाढ करण्याचाही या शासनाचा प्रयत्न आहे. पायाभूत सुविधांचा विकास करण्याचे शासनाने ठरविले आहे. राज्यातील वेगवेगळ्या घटकांसाठी नेमके काय करावयाचे आहे त्याचे प्रतिबिंब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नक्की झालेले आहे आणि त्याप्रमाणे यापुढे हे राज्य काम करणार आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी महागाईचा विषय उपस्थित केला. पण या शासनाने महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी यापूर्वीच पावले उचलली असून देशात पहिल्यांदा या राज्याने तसा निर्णय घेतला आहे. तो म्हणजे पाच जीवनावश्यक वस्तुंचा स्वस्त धान्य दुकानातून नियंत्रित दराने पुरवठा करणे. दारिद्र्यरेषेखालील आणि दारिद्र्यरेषेच्या वरील केसरी शिधा पत्रिकांवर या वस्तुंचा पुरवठा करण्याचा निर्णय 21 ऑगस्ट, 2009 रोजी शासनाने घेतला असून त्याला मुदतवाढ देण्यात आली आहे. अशा प्रकारे 532 कोटी रुपये शासन स्वत:च्या तिजोरीतून या कामासाठी खर्च करणार व या पाच वस्तू मार्केटमधून त्या दराने खरेदी करणार व त्यापेक्षा कमी दराने गरिबांसाठी उपलब्ध करुन देणार आहे. एक वर्षभर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

हा कार्यक्रम शासन राबविणार आहे. देशाच्या इतर राज्यांबरोबर तुलना देखील मी करणार आहे. त्यानुसार छत्तीसगडचा विचार केला तर त्या राज्यात 65 रुपये प्रति किलो तूर डाळ मिळते तर आपल्या राज्यात हा भाव 63 रुपये प्रति किलो एवढा आहे. गुजरातमध्ये दुधाचा दर 26 रुपये लिटर आणि महाराष्ट्रात 24 रुपये प्रति लिटर एवढा आहे.....

श्री. दिवाकर रावते : मी यासंबंधी जो प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर आपण .....

श्री. छगन भुजबळ : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण आताच माझ्याबद्दल अत्यंत चांगले बोललात आणि आता मध्येच डिस्टर्ब करुन माझ्यावर अन्याय का करीत आहात हे मला समजत नाही. तसेच आपले मित्र सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनाही जरा आपण सांगावे....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ....

सभापती महोदय, मार्केटमध्ये तांदळाचा भाव प्रती किलो 19 रुपये असतांना शासनाने सर्व सामान्य जनतेसाठी 9.60 रुपये प्रती किलो दराने तांदूळ उपलब्ध करुन दिलेले आहे. गव्हाचा मार्केटमधील दर प्रती किलो 18-50 ते 19.50 रुपये असा आहे परंतु शासनाने जनतेसाठी हाच गहू 7.20 रुपये प्रती किलो या दराने उपलब्ध करुन दिलेला आहे. मार्केटमध्ये तूरडाळीची किंमत प्रती किलो 87.50 रुपये असतांना शासनाने हीच तूरडाळ 55 रुपये प्रती किलो या दराने उपलब्ध करुन दिलेली आहे. मार्केटमधील साखरेचा भाव प्रती किलो 38.50 रुपये असतांना शासनाने हीच साखर 20 रुपये प्रती किलो या दराने उपलब्ध करुन दिलेली आहे. मार्केटमध्ये पामतेलाचा दर 50 पये प्रती किलो असतांना शासनाने हेच पामतेल 30 रुपये दराने उपलब्ध करुन दिलेले आहे. दर महिन्याला राज्यशासन 125 कोटी रुपये गरिबांसाठी खर्च करीत आहे. शेतक-याच्या घामाप्रमाणे त्याच्या मालाला दाम मिळाला पाहिजे यासाठी माननीय शरद जोशी यांनी शेतक-यांच्या संदर्भात या राज्यामध्ये आंदोलने केले होती. त्याप्रमाणे शेतक-याच्या घामाला दाम देण्याचे काम देशात सुरु झालेले आहे. गहू पिकविणा-या शेतक-याला गव्हाचे योग्य ते दाम दिले, तांदूळ पिकविणा-या शेतक-याला त्याच्या तांदळाचे योग्य ते दाम या शासनाने दिलेले आहे. या निर्णयामुळे घाम गाळणा-या शेतक-याला दोन पैसे जास्त मिळू लागले त्यामुळे मार्केटमध्ये भाव वाढले गेले. भाववाढीचा फटका सामान्य माणसाला बसू नये म्हणून राज्य शासन दर महिन्याला 125 कोटी रुपये खर्च करीत आहे.

सभापती महोदय, अन्नधान्याचा अवैध रितीने ज्यांनी साठा केलेला होता त्यांच्यावर राज्यशासनाने धाडी टाकलेल्या आहेत. सन 2009 मध्ये 11225 धाडी टाकण्यात आल्या व त्यातून 300 कोटी रुपयांचा धान्य साठा ताब्यात घेण्यात आला, यामध्ये 45 गुन्हेही दाखल करण्यात आले आणि 73 लोकांना अटक करण्यात आली. सन 2010 मध्ये आतापर्यंत 1450 कोटी धाडी टाकण्यात आल्या आणि त्यातून 77 कोटी रुपयांचा धान्य साठा ताब्यात घेतला, 23 गुन्हे दाखल केले आणि 9 लोकांना अटक करण्यात आलेली आहे. जो साठा करेल त्याच्यावर कारवाई करण्यास राज्यशासनाने सुरुवात केलेली आहे. साठा मर्यादेमध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ....

करण्यासाठी केंद्रशासनाने राज्यशासनाचे प्रस्ताव मान्य केलेले आहेत तसेच अपात्र जे शिधापत्रिका धारक आहेत त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केलेली आहे. सामान्य जनतेला महागाईला तोंड द्यावे लागू नये म्हणून, अन्नधान्याचे उत्पादन वाढावे म्हणून महापीक योजना टप्पा दोन द्वारे विशेष प्रयत्न शासनातर्फे करण्यात येणार आहेत. एक पीक शेती पध्दतीचा प्रचार आणि प्रसार करुन धान्याचे उत्पादन वाढविण्यावर शासन भर देत आहे. उत्पादनामधील तूट भरुन काढण्यासाठी कडधान्य अभियान, जमीन,आरोग्य अभियान सुरु केले आहे. शेतक-यांचे कौशल्य विकसित करण्याचा कार्यक्रम आपण सुरु केला तसेच कीड आणि रोग नियंत्रित करण्यासाठीही शासनाने कार्यक्रम आखलेले आहेत.

सभापती महोदय, आयपीएल वरील कर माफ करा, माफ करा अशी मागणी या ठिकाणी करण्यात आली परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की,आयपीएलवर शासनाने कर लावलेलाच नव्हता परंतु ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आयपीएलवर कर लावण्यात येणार आहे असे माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी सांगितले होते परंतु प्रत्यक्षात आयपीएल वर करलावलेलाच नाही. त्यामुळे हा विषय या सभागृहात आलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य त्या बाबतीत सतत बोलत आहेत परंतु गुजराथ आणि कर्नाटक या राज्यामध्ये आय.पी.एल.वर कर आहे काय या बाबतीत आम्ही माहिती घेण्याचा पयत्न करीत आहोत.

श्री.विनोद तावडे (बसून): तिथे कर नव्हता.

श्री.छगन भुजबळ : मग येथेसुध्दा कर नव्हता. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी अशा प्रकारचा विनोद करु नये.

श्री.विनोद तावड (बसून) : तिकडे एकच सामना होतो परंतु आपल्याकडे बारा सामने होतात.

श्री.छगन भुजबळ : देशामध्ये सर्वांना समान न्याय देण्याची आपण भूमिका घेत असतो. सन्माननीय सदस्य आमच्यावर टीका करीत असतात तेव्हा देशामध्ये कोणत्या राज्यात काय चालले आहे हेसुध्दा त्यांनी पहावे.

श्री.विनोद तावडे (बसून): तिकडे एकच सामना होतो.

श्री.छगन भुजबळ : तुम्ही रोज सामने पहा. आज सुध्दा मुंबईमध्ये सामना होणार आहे तेव्हा तो आपण अवश्य जाऊन पहावा.

श्री.विनोद तावडे (बसून): परवडत नाही.

श्री.छगन भुजबळ : माननीय सदस्य फुकट तिकीट मागत आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सामान्य माणसाना परवडेल अशा प्रकारे धान्य देण्यासबंधी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी भाषण केले होते. माझ्या सारख्या आमदाराला सामना पाहणे परवडत नाही म्हणून मी जात नाही. मी फुकट तिकीट मागितले आहे असे एका तरी मंत्र्यांनी किंवा एम.सी.ए.ने सांगावे . मी दोन क्लबशी संबंधित आहे तरीसुध्दा मी कधी तिकीटे घेत नाही.त्यामुळे फुकटात सामना पाहण्याची माझी कल्पना नाही. चुकीची माहिती रेकॉर्डवर राहू नये एवढेच माझे म्हणणे आहे. फुकटात तिकीटे मिळावीत यासाठी माझ्याकडे काहीजण फोन करीत असतात त्यामुळे ही नावे देखील माझ्याकडे आहे परंतु त्याचा उल्लेख मी करणार नाही.

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी माझ्याकडे कधीही तिकीट मागितलेले नाही. माझ्याकडे तिकीटे नसतातच तेव्हा मी तिकीट कसे देणार ?मला सुध्दा तिकीट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ ....

विकत घ्यावे लागते.मी सत्य परिस्थिती सांगितली आहे. कर का लावण्यात आला नाही यासंबंधी बाहेर बरीच चर्चा् चालू आहे .असो. सर्वसाधारणपणे इतर ठिकाणी काय स्थिती आहे यासबंधीची माहिती घेऊन त्याप्रमाणे विचार करावयाचा असेल तर जरुर विचार करता येईल.कर्नाटक व गुजराथ या राज्यामध्ये काय स्थिती आहे याची आपण जरुर चौकशी करु.एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, विजेच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत.सध्या राज्यामध्ये 16 हजार 201 मेगॅवॅटस इतकी विजेची मागणी आहे.आणि 12 हजार 198 मेगॅवॅटस इतकी वीज उपलब्ध असून 4 हजार 3 मेगॅवॅटस विजेची कमतरता आहे.राज्यामध्ये कमी वीज निर्माण होत असल्यामुळे भारनियमन करणे आवश्यक झाले आहे.हा तुटवडा कायम स्वरुपी भरुन काढण्यासाठी राज्य शासनाने ठोस पावले उचलली असून 2010 पर्यंत भारनियमन मुक्त करण्यासाठी नियोजन केलेले आहे.महानिर्मिती कंपनीच्या स्वत:च्या प्रकल्पातून तसेच केन्द्र शासनाच्या वीज निर्मिती करणा-या संस्थांकडून, खाजगी वीज निर्माण करणा-या कंपन्याकडून तोपर्यंत आपण वीज खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे व त्यासाठी दीर्घ मुदतीचे करार देखील केलेले आहेत. 2009-2010 मध्ये नवीन परळी, पारस विस्तार,रत्नागिरी गॅस पॉवर इत्यादीमधून 1820 मेगॅवॅटस इतकी विजेच्या क्षमतेत वाढ होणार आहे.2010-2011 मध्ये खापरखेंडा युनिट 5चा विस्तार, भुसावळ युनिट 4 चा विस्तार, युनिट 5 चा विस्तार, सीपत , जिंदल स्टील वर्क,जयगड इत्यादी ठिकाणाहून 1970 मेगॅवॅटस वीज क्षमता वाढणार आहे.त्याचबरोबर 2011-12 मध्ये परळी प्रकल्प नुतनीकरण, मुंदरा प्रकल्प,सीपत आणि मौदा इत्यादी ठिकाणाहून 3 हजार 590 वीज मिळणार आहे . आज आपल्या राज्यात 4 हजार मेगॅवॅटस विजेचा तुटवडा असतांना 7 हजारापेक्षा जास्त वीज 2012पर्यंत राज्यात निर्माण होईल अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे व त्याप्रमाणे् काम सुरु आहे.

सभापती महोदय , काही सन्माननीय सदस्यांनी पाणी टंचाईच्या बाबतीत मुद्दे मांडलेले आहेत. गेल्या दोन वर्षात कमी जास्त पाऊस पडत आहे याची आपल्या सर्वांना कलपना आहे.जेव्हा पाऊस पडावयास पाहिजे तेव्हा पडत नाही.जिथे पाऊस पडावयास पाहिजे तिथे पडत नाही. ्ग्लोबल वॉर्मिगचा हा परिणाम आहे किवा नाही यासाबंधी देखील आपण चर्चा करीत आहोत .

नंतर श्री.सरफरे

अशुद्धलिपि प्रत / शीघ्रलिपि नाही

श्री. छगन भुजबळ...

परंतु पाऊस देखील आवश्यकता नसतांना पडतो, तो इतका पडतो की सर्व वाहून जाते, आपल्याला पाहिजे तेव्हा पाऊस पडत नाही. आठ दिवसापूर्वी नको तिथे पाऊस पडला, गारपीट झाली. त्यामुळे शेतकऱ्याच्या हाती आलेले उत्पादन नष्ट झाले. शहरी भागामध्ये व ग्रामीण भागामध्ये पाणी टचांई निर्माण झाली आहे. राज्यातील 18 हजार गावांमध्ये पाणी टंचाई भासणार आहे. त्याकरिता 217 कोटींचा कृती आराखडा तयार केला आहे. त्याची अंमलबजावणी सुरु आहे. यामध्ये चालू योजना पूर्ण करणे, तात्पुरत्या नळ योजना घेणे, विंधन विहिरी, टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे या सर्व योजना घेतल्या आहेत. शहरी भागासाठी पूरक नळ योजना, विंधन विहिरी घेतल्या आहेत. त्याचप्रमाणे सिंचन तलावाचे पाणी पिण्यासाठी आरक्षित केले जात आहे. वितरण व्यवस्थेमधील गळती कमी करण्यात आली आहे, नवीन जलस्त्रोत विकसित करण्यासाठी प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील पिंजाळ, काळू, पोशीर, बाळगंगा या सर्व प्रकल्पांचा त्यामध्ये समावेश केला आहे. मुंबई शहरातील पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी भातसा धरणामधून जादा पाणी दिले जात आहे. त्याचप्रमाणे समुद्राचे खारे पाणी गोड करण्याच्या डिसॅलिनेशन प्रकल्पाचा अभ्यास सुरु असून आवश्यक वाटल्यास तो प्रकल्प सुरु करण्याच्या संदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, फुटलेल्या जलवाहिन्यांबाबत माननीय सदस्यांनी चर्चा केली. त्याबाबत मुंबई महानगरपालिकेने जरुर काही निर्णय घ्यावयाचे आहेत. ते घेण्यासाठी त्यांना सूचना देण्यात येतील. तलावातील पाणी साठयामध्ये 30 टक्के घट दिसून येते. आणि म्हणून येत्या पावसाळयापर्यंत मुंबई शहराला पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेऊन उपाय योजना करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. सभापती महोदय, नदी जल प्रदूषणाच्या संदर्भात सांगण्यात आले. राज्यातील नद्यांच्या पाण्याचा दर्जा सुधारण्यासाठी सन 2000 सालापर्यंत रिव्हर रिक्वीएशन झोन पॉलीसी म्हणजेच नदी नियंत्रण क्षेत्र धोरण अंमलात आणून या धोरणांतर्गत सर्व अधिसूचित नद्यांची चार झोनमध्ये विभागणी केली आहे. त्यानुसार उद्योगांचे स्थान निर्धारीत केले आहे. त्या धोरणामध्ये सन 2009 मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार अे 1 संवर्गातील नद्याच्या जवळील औद्योगिक घटकांनी तीन वर्षाच्या कालावधीत संबंधित नदीत सोडण्यात येणारे सांडपाण्याचे प्रमाण शून्य टक्के केले पाहिजे असे बंधन त्यांच्यावर टाकले आहे. याबाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. छगन भुजबळ...

महाराष्ट्रामध्ये रायगड जिल्हयात जास्त अडचण निर्माण झाली आहे. त्या जिल्हयातील नदीच्या पाण्याच्या शुध्दतेचा दर्जा निश्चितपणे वाढेल यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. रायगड जिल्हयात रोहा, महाड येथील औद्योगिक घटकांसाठी कॉमन एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँट तयार केला आहे. त्यामुळे कुंडलिका आणि सावित्री नदीच्या पाण्याच्या शुध्दतेमध्ये सुधारणा झाली आहे. त्या परिसरातील सर्व नगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्र स्थापन केले आहे. घनकचरा, जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट यंत्रणेमध्ये सुधारणा केली आहे. त्या यंत्रणेमध्ये काही अडचण निर्माण झाली असेल, मशिनरी बंद पडली असेल तर ती आपण दुरुस्त करुन त्यामध्ये सुधारणा करु. परंतु आपण हे प्रकल्प राबविण्यासाठी सुरुवात केली हे महत्वाचे आहे. याशिवाय स्थानिक पातळीवर निर्माण झालेल्या प्रश्नांच्या बाबतीत जरुर लक्ष घालू.

सभापती महोदय, राज्यामध्ये महत्वाचा शेततळयांचा कार्यक्रम अंमलात आणला आहे. मराठवाडयामध्ये 8, विदर्भामध्ये 8 आणि नाशिक विभागात 5 अशा 21 कापूस उत्पादक जिल्हयांमध्ये शेत तळयांचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबवीत आहोत. 39 हजार शेततळयांपैकी 38 हजार 858 शेततळी पूर्ण झाली आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांना 213 कोटी रुपयांचे अनुदान अदा केले आहे. सन 2009-10 मध्ये 27 हजार शेततळी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रत्येक तालुक्यात 200 शेततळी निर्माण केली आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

शेतकऱ्यांना आपणच तांत्रिक मार्गदर्शन करीत आहोत. तसेच सर्व कामे ही गुणवत्तेवर करण्याचा भर दिलेला आहे. भूगर्भातील पाणी साठ्यात भरीव वाढ झाली पाहिजे, त्यामुळे दुष्काळाची तीव्रता कमी होईल. याकरता या शासनाने जलसिंचनाचा फार मोठा कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे.

सभापती महोदय, याठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या बाबतीत अनेक वेळा, वारंवार प्रश्न उपस्थित केले जातात आणि हा एक चिंतेचा विषय आहे. राज्यातील एकाही शेतकऱ्याने आत्महत्या करु नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे आणि त्या प्रयत्नांना निश्चितपणे यश देखील मिळत आहे. पंतप्रधान पॅकेजमधून विविध कामांसाठी 3750 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून प्रत्यक्षात फेब्रुवारी 2010 पर्यंत 4275 कोटी रुपये म्हणजे 114 टक्क्यापर्यंत अंमलबजावणी करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या पॅकेजमधून विविध कामांसाठी 1075 रुपयांची तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी आतापर्यंत 1338 कोटी रुपये म्हणजे 124 टक्के अंमलबजावणी झालेली आहे. म्हणून गेल्या 4 वर्षामध्ये निश्चितपणे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संख्येमध्ये घट होत आहे, हा एक आशेचा किरण आहे. तसेच आपल्या प्रयत्नांना यश येत आहे ही एक आनंदाची गोष्ट आहे. अगोदर हे यश कमी होते हे आपण मान्य करु या. 2006 मध्ये एकंदर पात्र आत्महत्या 1028 इतक्या होत्या. आता त्याचे प्रमाण कमी होत-होत 2009 मध्ये 446 पर्यंत खाली आलेले आहे म्हणजेच आपण जे काम करीत आहोत, त्याला निश्चितपणे कुठेतरी प्रतिसाद मिळत आहे आणि त्यामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होत आहे, हा त्यातील एक चांगला भाग आहे. अर्थात हे प्रमाण कमी झाले असले तरी आम्ही त्यावर खुष आहोत असे म्हणता येणार नाही. तर राज्यामध्ये एकाही शेतकऱ्यांची आत्महत्या होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मागील दोन वर्षाच्या तुलनेमध्ये आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले आहे. यासाठी माननीय पंतप्रधान यांनी जाहीर केलेले पॅकेज, राज्य शासनाने जाहीर केलेले पॅकेज बाबत अंमलबजावणी . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : माननीय मंत्री महोदय, एकंदर राज्यामध्ये ज्या आत्महत्या झालेल्या आहेत, त्या बाबतीत सांगत आहेत की पात्र आत्महत्यांच्या बाबतीत सांगत आहेत हे रेकॉर्डवर आले पाहिजे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी पात्र आत्महत्यांच्या बाबतीत सांगत आहे. आपल्याला त्याबाबतीत सुध्दा चांगले परिणाम दिसून येत आहेत. या राज्यामध्ये रोजगार हमी .....

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

योजना 1972 पासून सुरु झाली. . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधीचा मुद्दा संपलेला आहे काय? शेतकरी दारु पिऊन आत्महत्या करतात असे एक माननीय मंत्री महोदय म्हणाले होते. आता धान्यापासून मद्यार्क तयार करणार आहात. तेव्हा . . . .

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जरा धीर धरावा. आपल्या सारख्या ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांकडून संयमाची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, रोजगार हमी योजनेवर 15 हजार कोटी रुपये खर्च केलेले आहेत. महाराष्ट्र राज्याने सुरु केलेल्या योजनेचा आज केंद्र शासनाने संपूर्ण देशभर अंगीकार केलेला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : रोजगार हमीच्या कामावर मजूर दिसतात काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यामध्ये काही अडचणी असतील तर सांगावे, मी दुरुस्त करतो. आपण रोजगार हमी योजना अंमलात आणत आहोत आणि केंद्र शासनाची एमआर-ईजीएस योजना आहे. त्यानुसार केंद्र शासन मजुरांना फक्त 100 दिवसासाठी काम देते आणि आपण 365 दिवसासाठी कामाची हमी दिलेली आहे. केंद्र शासन त्यांच्या योजनेनुसार कुटुंबातील एका व्यक्तीलाच रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत बांधील आहे आणि आपण कुटुंबातील चार-पाच व्यक्ती किंवा त्या कुटुंबातील सर्वांना काम देण्यासाठी बांधील आहोत.

डॉ.दीपक सावंत (खाली बसून) : सध्या शेल्फवर किती कामे आहेत ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, 13 मार्च पर्यंत 96 हजार मजूरांची उपस्थिती आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : नगर आणि बीड जिल्ह्यामध्ये 25-25 हजार मजूर कामावर आहेत.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या योजनेअंतगर्त आपण शेततळी, रस्ते, जलसिंचन, वनीकरण, जमीन सुधारणा इ.कामे करीत आहोत आणि 40 टक्के कामे ग्राम पंचायतीच्या माध्यमातून करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी धान्यापासून दारु निर्मितीच्या धोरणाबाबात वारंवार चर्चा केली. आता सुध्दा ते हाच प्रश्न सातत्याने विचारीत आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

आता सुध्दा सतत उठून प्रश्न विचारित आहेत. दारु निर्मितीची ही योजना या राज्यात 2000 सालापासून सुरु आहे आणि 2007 पासून या धोरणांतर्गत आर्थिक प्रोत्साहन दिले गेले. सध्या या राज्यात 17 कारखाने सुरु आहेत. मी आपल्यापुढे सगळे सत्य कथन करीत आहे. पाहिजे तर आपण लिहून घ्या.

श्री.जयंत प्र. पाटील : नावे द्यावीत.

श्री. छगन भुजबळ : नावे पण देता येतील. पण त्यामध्ये आपले नाव नाही.

श्री. जयंत प्र. पाटील (बसून) : मी दारु पित नाही.

श्री. छगन भुजबळ : आपण दारु पिता असे कोण म्हणेल. दारु न पिणारेच दारुचे उत्पादन करीत असतात. खरीप काळया ज्वारीचा जास्तीत जास्त उपयोग या कारखान्यांमध्ये केला जातो. या खरीप काळया ज्वारीला योग्य भाव मिळत नाही. कारखाने या काळया ज्वारीला अधिक भाव देत आहेत त्यमुळे शेतकऱ्यांचा फायदा होत आहे. या ज्वारी पासून निर्माण होणारे जे अल्कोहोल आहे ते या राज्यामध्ये जी अल्कोहोलची गरज आहे मग ती सौंदर्यप्रसाधानासाठी असेल, औषधासाठी असेल तसेच मद्यनिर्मिती करणारे जे इतर घटक आहेत त्यासाठी या अल्कोहोलचा वापर करण्यात येतो. (अडथळा) इंडस्ट्रिएल अल्कोहोल निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम आखण्यात आला होता. हे अल्कोहोल फक्त पिण्यासाठीच वापरण्यात येते असे नाही. हे अल्कोहोल औषधासाठी वापरण्यात येते. सौंदर्यप्रसाधनासाठी वापरण्यात येते. इंडस्ट्रिजमध्ये वापरण्यात येते. यासंदर्भात श्री. पाशा पटेल यांना आपण विचारावे. श्री. पाशा पाटेल, बरोबर आहे काय? ते बरोबर आहे असे म्हणत आहेत.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, आदरणीय उप मुख्यमंत्री महोदयांनी येथे सांगितले की, काळया ज्वारीवर प्रक्रिया करुन (अडथळा) आपण सर्वजण महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या जीवावर येथे निवडून आलेलो आहोत.

सभापती : आपण आपले म्हणणे एका मिनिटात पूर्ण करावे.

श्री. पाशा पटेल : काळया ज्वारीची मस्करी कृपा करुन कोणी करु नये. कारण "ज्याचे जळते त्यालाच कळते." अवकाळी पाऊस पडून ज्वारी काळी झाल्यानंतर शेतकरी अक्षरश: हंबरडा फोडून रडायचे. ज्वारीचे एकच पीक त्या भागात येते आणि ती ज्वारीही काळी झाली तर त्यात

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

शेतकऱ्याचा दोष नाही. तो निसर्गाचा दोष आहे. ज्वारी काळी झाल्यानंतर त्या काळया ज्वारीची खरेदी कोणी करीत नव्हते. म्हणून त्या काळया ज्वारीवर प्रक्रिया करणारे उद्योग निघत असतील तर मी या शासनाचे अभिनंदन करण्यास तयार आहे. याबाबतीत कृपाकरुन कोणीही राजकारण करु नये. काळया ज्वारीवर प्रक्रिया झाली पाहिजे, असे माझ्या सारख्या एका शेतकरी कार्यकर्त्याचे म्हणणे आहे. महाराष्ट्रतील ज्वारीच्या उत्पादनाबद्दल बोलावयाचे झाले तर आज महाराष्ट्रात ज्वारीचा पेरा दहा हेक्टरने कमी झालेला आहे. ज्वारी संपली आहे. ज्वारी पेरली नाही तर कडब्याचे उत्पादन होत नाही आणि कडब्याचे उत्पादन झाले नाही तर जनावरे जीवंत रहाणार नाहीत आणि जणावरे जीवंत राहिली नाहीत तर शेती जगणार नाही. या महाराष्ट्रातील शेती जीवंत ठेवावयाची असेल, शेतीला खत पाहिजे असेल, जनावरांना कडबा पाहिजे असेल तर काळया ज्वारीवर आणखीन काहीही प्रक्रिया करण्यात यावी पण काळया ज्वारीला वाचवावे,असे मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, श्री. पाशा पटेल यांचे मला आता याठिकाणी जे म्हणणे ऐकावयास मिळाले ते अगोदर आम्हाला कळले असते तर आम्ही याचा चांगला उपयोग केला असता. पण आता याला काय करायचे? लोकांचा विरोध आहे.अनेक घटकांनी याला विरोध केला आहे. म्हणून यापुढे समाजातील विरोधाची भावना लक्षात ठेवून हे धोरण यापुढे सुरु ठेवावयाचे नाही असा निर्णय या शासनाने घेतला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. छगन भुजबळ ....

आणि या प्रकल्प उभारण्यासाठीची इरादापत्रे देण्याचे आता बंद करण्यात आलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : आपले पोट भरले...

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सुरु ठेवले तर का ठेवले आणि बंद केले तर का बंद केले अशा पध्दतीने दोन्ही बाजूने सन्माननीय सदस्यांना बोलता येणार नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या विभागाचा जी. आर. आहे. 17 लोकांना दिले. ज्यांचे चालू झाले नाही त्यांनाही पैसे देणार आहेत. ही योजना आधीच बंद केलेली आहे. ही योजना काल बंद केलेली नाही. आपल्या सचिवांकडून बाहेर पत्रे गेलेली आहेत.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी असे विधान केले की, समाजातील भावना लक्षात घेऊन हे धोरण यापुढे सुरु ठेवावयाचे नाही असा निर्णय शासनाने घेतलेला आहे आणि इरादा पत्रे देण्याचे बंद करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर दारुचे व्यसन हे सामाजिकदृष्ट्या घातक असल्यामुळे दारु व्यसन मुक्तीबाबत लोकांमध्ये जाणीव निर्माण करण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सच्चर कमिटीच्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित केला होता. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून फक्त एकाच समाजाला मदत करतो असा आक्षेप सन्माननीय सदस्यांनी घेतला होता. मी त्याबाबत खास माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये ख्रिश्चन, बौध्द, शीख, जैन या सगळ्या लोकांना या मदतीचे वाटप आतापर्यंत केलेले आहे. एकच आहे की, ज्या समाजाची संख्या जास्त असेल त्या ठिकाणी खर्च सुध्दा जासत होईल हे स्वाभाविक आहे. या ठिकाणी पारशी सुध्दा अल्पसंख्यांक आहेत परंतु यामध्ये त्यांची संख्या शून्य आहे. सन्माननीय सदस्यांनी ही बाब समजून घेतली पहिजे.

श्री. दिवाकर रावते : ती माहिती पटलावर ठेवावी. आपण ज्या समाजाचा उल्लेख केला ते घटनेमध्ये आहे.

श्री. छगन भुजबळ : माझ्याकडे माहिती आहे. ती पटलावर ठेवण्यात येईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माझा मुद्दा काय होता ?

श्री. छगन भुजबळ : एकच समाज अल्पसंख्याक आहे काय ? बाकीच्यांना का दिले नाही असा आपला मुद्दा होता.

श्री. दिवाकर रावते : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख आहे की, अल्पसंख्यांकबहुल गावामध्ये विकासाचा कार्यक्रम जोरात राबविणार. त्याबाबत मी असे म्हणालो की, आता मुस्लिमांची संख्या वाढवा आणि विकास घ्या. मी जे म्हणालो ते सांगितले. मुस्लीम हा शब्द उच्चारणे या देशामध्ये गुन्हा आहे काय ? हे सगळे समाज अल्पसंख्यांकामध्ये येतात परंतु ते नगण्य आहेत आणि यांची संख्या जास्त असल्यामुळे यांना जास्त लाभ होतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील वाक्य मी सांगितले. आपण मान्य केले की, त्यांची संख्या जास्त असल्यामुळे ते लाभार्थी आहेत. मी तेच म्हणालो होतो की, मुस्लिमांची संख्या वाढवा. इतरांची संख्या वाढत नाही.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल काही सन्माननीय सदस्यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे. माननीय राज्यपालांनी काय बोलावे हे सन्माननीय सदस्यांनी सांगणे बरोबर नाही. सभापती महोदय, पुण्याच्या बॉम्बस्फोटाच्या बाबतीत मी अधिक काही बोलणे बरोबर नाही. सगळ्यांना कल्पना आहे की, ती दुर्दैवी घटना आहे. त्या घटनेमध्ये 17 स्त्री-पुरुष मृत झाले आणि 56 लोकांना गंभीर दुखापत झाली. मृत व्यक्तींमध्ये 4 परदेशी नागरिकांचा समावेश आहे. आतापर्यंत जवळजवळ 47 लाख रुपयांची मदत त्यांच्या वारसांना देण्यात आली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : एक महिना झाला तरी चेक आलेले नाहीत.

सभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देण्याची गरज नाही. मंत्रिमहोदयांनी, मला उद्देशून भाषण करावे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हा खटला अंतिम टप्प्यामध्ये आहे. त्यामुळे त्याबाबतीत अधिक काही बोलावे असे वाटत नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

या सगळयाच्या बाबतीत शासनाने निश्चितपणे कार्यवाही करण्यास सुरुवात केलेली आहे. सुरक्षा व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याला सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. हा हल्ला झाल्यानंतर माझ्याच अध्यक्षतेखाली कमिटी निर्माण झाली. त्यानंतर 15 दिवसांच्या आत पोलीस खात्यासाठी जे जे आवश्यक आहे मग आवश्यक तो फंड असेल तो त्वरित मंजूर करण्याचे काम शासनाने केले आहे. त्याशिवाय अनेक गोष्टी निर्माण झाल्या आहेत. सुरक्षा परिषदेची निर्मिती झाली, फोर्स-1 कमांडोची निर्मिती झाली, मोठया शहरांसाठी शीघ्र कृती दलाची निर्मिती झाली, आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास आपण प्राधान्य दिले, 258 पोलीस ठाण्याचे संगणकीकरण केले, उर्वरित पोलीस ठाण्याचे संगणकीकरण करण्याचा कालबध्द कार्यक्रम सुरु केला आहे, ॲनलिसीस विंग सुरु केली आहे, डाटा कलेक्शन विंग सुरु झ्झाली, पुणे येथे गुप्तचर प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाली. सागरी किनारा सुरक्षिततेसाठी बोटींची उपलब्धता झाली. पोलिसांचे मनुष्यबळ कमी असल्यामुळे 44 हजार पोलीस कर्मचा-यांची भरती सुरु करण्यात आली, त्यापैकी यावर्षी 11 हजार पदे भरणार आहे. नक्षलवाद्यांशी मुकाबला करण्यासाठी शासनाने काही चांगल्या योजना केल्या आहेत. त्या भागासाठी 1386 कोटींचा विशेष कृती कार्यक्रम अंमलात आणत आहोत. पोलीस दलाचे आधुनिकीकरण केले आहे, बळकटीकरण केले आहे. या पोलीस दलास 2355 पदे आणि आधुनिक शस्त्रे व साहित्य त्या भागामध्ये दिले आहे. गडचिरोली जिल्हयातील पोलीस विभागाचे विभाजन केले. स्वतंत्र अहेरी पोलीस जिल्हयाची निर्मिती केली. राखीव पोलीस दलाच्या 3 बटालियन्सची निर्मिती झाली. अहेरी येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाची निर्मिती झाली. तेथे चांगले काम व्हावे, यासाठी सा.बां.विभागामध्ये सुध्दा अधिकची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. सामाजिक, आर्थिक प्रश्न असल्यामुळे तेथे जास्तीत जास्त पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने पावले उचलली असून दुस-या बाजूने सुध्दा त्यांचा मुकाबला करता येईल. महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत सुध्दा बोलले गेले. ही अतिशय चिंतेची बाब आहे, परंतु अशा प्रकरणांची संख्या कमी झालेली आहे. पूर्वीचे जे रेकॉर्ड पाहता त्यांची संख्या कमी होत आहे. ही संख्या आणखी कमी होण्यासाठी शीघ्र गती न्यायालय स्थापन करण्यासाठी माननीय मुख्य न्यायाधीशांकडे शासन पाठपुरावा करणार

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.छगन भुजबळ....

आहोत. लैंगिक अत्याचाराच्या संदर्भात एक वर्षाहून अधिक काळ न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे जलद गती न्यायालयाकडे सोपविण्याची शासन कार्यवाही करणार आहे. आश्रमशाळांमध्ये अशाप्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून अभ्यास समिती नेमलेली आहे. त्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी हे अधिवेशन संपण्यापूर्वी करण्याचे ठरविलेले आहे. त्यामुळे अशा गुन्हयातील आरोपींना गंभीर व कठोर शासन व्हावे म्हणून कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करीत आहे.

सभापती महोदय, मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. या मुंबईसाठी 50 हजार कोटीं रुपयांहून जास्त किंमतीच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे काम केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. यामध्ये मेट्रो रेल्वे, मोनो रेल्वे हे प्रकल्प आहेत. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर 11.7 कि.मी.लांबीचा व 2356 कोटी रुपये किंमतीचा प्रकल्प सुरु आहे. डिसेंबर, 2010 मध्ये काम पूर्ण होणार आहे. (अडथळा) जे चांगले आहे, योग्य आहे त्याकडे सन्माननीय सदस्यांचे लक्ष थोडेसे कमी असल्यामुळे परत त्याकडे आपले लक्ष वळविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. चारकोप-वांद्रे-मानखुर्द हे 32 कि.मी.चे काम आहे, ते 2013-14 मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे, जेकब सर्कल-वडाळा-चेंबूर 20 कि.मी.लांबीचे 2460 कोटींचे काम जून, 2011 पर्यंत पूर्ण करणार आहोत आणि मागील 26 जानेवारीला त्याची यशस्वी ट्रायल सुध्दा झालेली आहे. एमयुटीपी अंतर्गत उपनगरीय रेल्वेसाठी जागतिक बँकेच्या सहकार्याने शासनाने विविध योजना आखलेल्या आहेत. त्यासाठी 3680 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. उपनगरीय रेल्वेसाठी 101 नवीन रेल्वे गाडया पुरविण्याचे नियोजन केले असून आतापर्यंत 72 गाडया आल्या आहेत. 1 हजार पेक्षा अधिक डबे प्रवाशाच्या सेवेत दाखल झालेले आहेत. काही गोष्टींची नोंद करुन घेतली तर सन्माननीय सदस्यांना अभ्यास करणे सोयीचे होईल.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ...

राजीव गांधी सागरी सेतू वाहतुकीसाठी पूर्ण झालेला आहे. त्याचा दुसरा भाग हा देखील बुधवारपासून सुरु करीत आहोत. वरळी ते हाजीअली सीलिंक आपण करणार आहोत. .(अडथळा).. वरळी-वांद्रे सीलिंकमुळे ट्राफीक जाम होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना जर संध्याकाळी सेनाभवनामध्ये जायचे असेल तर त्यावेळी ट्राफिक कमी असते.

श्री. दिवाकर रावते : हायवे वर दीड-दीड तास ट्राफिक जाम असते.

श्री. छगन भुजबळ : ट्राफिक जाम होत असेल तर सन्माननीय सदस्यांनी मला फोन करुन सांगावे. सभापती महोदय, 1460 कोटी रुपये खर्च करुन 20 स्कायवॉक बांधून पूर्ण झालेले आहेत. आणखी 61 ठिकाणी स्कायवॉक बांधण्यात येणार आहेत...(अडथळा).. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर 4 उड्डाण पूल बांधण्यात येत असून हे काम ऑक्टोबर 2010मध्ये पूर्ण होईल. सायन हॉस्पिटल आणि हिंदमाता येथील दोन उड्डाण पूल जानेवारी 2010मध्ये पूर्ण केलेले आहेत. उर्वरित ऑक्टोबरमध्ये पूर्ण करीत आहोत. एमयूटीपी अंतर्गत जोगेश्वरी-विक्रळी जोड रस्ता, सांताक्रूझ-चेंबूर जोड रस्ता, ओव्हर ब्रीज, 64 मार्गावर क्षेत्रीय वाहतूक नियंत्रण व्यवस्था, रेल्वेस्टेशन परिसर सुधारणा, नवीन बसेसची खरेदी अशी कामे घेतलेली असून त्यामधील सांताक्रूझ-चेंबूर जोडरस्ता वगळता ही सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे देखील मुंबईचे महापौर होते. राज्य आणि केन्द्र शासनाने एवढे पैसे कधी खर्च केले होते का ? हे त्यांनी मला सांगावे. तुम्ही आणि मी, आपण नेहमी सांगत होतो की, या मुंबई शहरामध्ये केन्द्र आणि राज्य शासनाने खर्च करुन सुविधा निर्माण कराव्यात. आज आपण 50 हजार कोटी पेक्षा जास्त रकमेची विकास कामे या मुंबईमध्ये घेत आहोत. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेचे काम कमी होत आहे. या कामासाठी राज्य आणि केन्द्र शासन पैसे देत आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : युतीच्या शासनाने अनेक ठिकाणी उड्डाण पूल बांधले त्यावेळी नको तेथे पूल अशी टीका विरोधक करीत होते. आता युतीच्याच पावलावर पाऊन ठेवून आपण पूल बांधीत आहात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ : आम्ही नको तिथे पूल नाही तर नाका तिथे पूल बांधित आहोत. चौपदरी रस्ते बांधित आहोत. मराठवाड्यामध्ये तीन हजार कोटी रु. खर्च करुन रस्ते पूर्ण केलेले आहेत. तसेच विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातीलही रस्ते पूर्ण केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे नेहमी चांगल्या चांगले म्हणतात. त्यामुळे त्यांचे नेतृत्व लोकांना भावते. ते चांगल्याला चांगले म्हणतात म्हणून त्यांनी आता तरी आमच्यावर टीका करु नये. 50 हजार कोटी रु. खर्च करीत असताना त्यांनी चांगल्याला चांगले म्हटले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मुंबईचे महापौर होते त्यांनी मुंबईच्या विकासासाठी फार कष्ट घेतलेले आहेत, टीकाटिपणी केलेली आहे. त्या सर्वांचा परिणाम म्हणून आज राज्य आणि केन्द्र शासन खर्च करीत आहे. (अडथळा) मुंबइ-गोवा मार्गाचे चौपदरीकरण करावयाचे आहे परंतु एकराला 80 लाख रुपये द्यावेत अशी लोकांची मागणी आहे. आता अशा प्रकारच्या बातम्या तुमचेच पेपरवाले छापतात...(अडथळा).. ही बातमी " दै. सकाळ"मध्ये आलेली नाही...(अडथळा)...

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

टीका जरुर करा. विनोदाचा भाग सोडला तर देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर गेल्या 60 वर्षामध्ये पहिल्यांदा मुंबईमध्ये ही कामे सुरु झाली. केवळ मुंबई नव्हे तर नाशिक, पुणे आणि इतर अनेक महानगरपालिकांमध्ये जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून निधी मिळाला. नाशिकला 3500 कोटी रुपये मिळाले. इतका निधी कधी मिळण्याची शक्यता नव्हती. पुणे शहराला निधी मिळाला. इतर अनेक ठिकाणी विकासासाठी निधी मिळाला. 12000 कोटी रुपये आतापर्यंत जेएनएनयुआरएम मार्फत मिळाले. मिठी नदीच्या विकासाचा कार्यक्रम सुरु आहे. दगड फोडणे, संरक्षक भिंत बांधणे ही कामे जून, 2010 पर्यंत पूर्ण करणार आहोत. महात्मा गांधी पदक्रांती योजना या योजनेंतर्गत पदपथावरील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्याचे काम केले. पदपथांची दुरुस्ती, देखभाल व सुशोभीकरण, सुरक्षा याचा कालबध्द कार्यक्रम राबविला. या योजनेनुसार पी.डिमेलो रोड, सेनापती बापट मार्ग, इ.मोझेस रोड, केशवराव खाड्ये मार्ग, भायखळा या मार्गांच्या पदपथावरील झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन झाले आहे. ब्रिमस्टोवॅड प्रकल्प राबविला जात आहे. पाऊस आणि इतिवृष्टी झाल्यानंतर पाण्याचे निचरा सक्षमपणे करण्यासाठी केंद्र शासनाने 1200 कोटी रुपयांचे अनुदान मुंबई महानगरपालिकेला मंजूर केले. आतापर्यंत 550 कोटी रुपये देण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे मुंबई शहराचे माजी महापौर आहेत, त्यांनी महापालिका सभागृहाचे नेते, स्थायी समितीचे चेअरमन यांना सांगून हे काम लवकरात लवकर कसे पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. म्हणजे अधिकचा निधी त्वरित मिळेल. मुंबई महानगरपालिका ही त्यांच्याच पक्षाच्या ताब्यात आहे. या कामाला पैसे मिळावेत यासाठी हे काम लवकर पूर्ण करण्याकरिता प्रयत्न करावा. माजी महापौर म्हणून आपण हा प्रयत्न कराल अशी माझी खात्री आहे. जवळजवळ 12681 कोटी रुपये जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून या राज्याला निधी मिळाला. संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र या कामामध्ये फार पुढे आहे. शिक्षणाबाबत आनंदाची गोष्ट आहे. बेस्ट फाईव्ह म्हणजे सर्वोत्तम पाच. मराठीमध्ये बोलले पाहिजे म्हणून सांगतो. सर्वोत्तम पाच ही योजना आता अंमलात आणीत आहोत. एखादी योजना आली की कोर्टात गेले, कोणती योजना आली की कोर्टात गेले. आता सुदैवाने या योजनेमध्ये गुणांची टक्केवारी ठरविताना श्रेणी व्यतिरिक्त 6 अनिवार्य विषयांपैकी सर्वोत्तम 5 विषयांच्या गुणांची टक्केवारी दर्शविण्यात येईल. जवळजवळ सर्वांनी मान्यता दिलेली आहे. म्हणून सर्वोत्तम पाच हा कार्यक्रम अंमलात येईल. अकरावी विज्ञान शाखेमध्ये प्रवेशासाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

असलेल्या विज्ञान विषयात किमान 40 टक्के गुणांची अट कायम ठेवण्यात आली आहे. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात आपण पुढे गेलेलो आहोत. ग्राम पातळीवर ई-गव्हर्नन्सचा फायदा मिळावा, विविध सेवा मिळण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सोबत महाऑनलाईन सेवेसाठी करार केला आहे. 35 जिल्हे आणि 316 तालुक्यांमध्ये सेतू केंद्रे सुरु झाली असून शासनाच्या थेट सेवा पुरविण्यासाठी गाव पातळीवर 3615 केंद्रे निर्माण झाली आहेत. प्रशासन अधिक सक्षम आणि पारदर्शी करण्यासाठी सर्व विभागांच्या प्रकल्पांची कामे ई-निविदा पध्दतीने देणे बंधनकारक केले आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. पहिला क्रमांक कर्नाटक राज्याचा आहे. महाराष्ट्र राज्यात 81 खाजगी व 36 सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्याने कार्यान्वित झाली आहेत. 4 लाखाहून अधिक रोजगार निर्मिती झाली असून नवीन माहिती तंत्रज्ञान धोरण 2009 मध्ये जाहीर करण्यात आले. मागास भागामध्ये या विषयावर आधारित असे उद्योग निर्माण करण्यास भर देत आहोत. आम आदमीचा विकास डोळ्यासमोर ठेवून आपण ही जी कामे करीत आहोत त्यामुळे सरासरी प्रत्येक कुटुंबाचे उत्पन्न 1 लाख रुपयापर्यंत झाले पाहिजे. यामुळे कृषि, औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील प्रभावी योजनांमुळे हे शक्य होईल यासाठी प्रयत्न करीत आहोत. 10 लाख घरे पाच वर्षामध्ये निर्माण करण्यात येत असून प्रत्येक ग्रामीण भागामध्ये प्रत्येक बेघराला पक्के घर देण्याचे काम करीत आहोत. जूनी मोडकळीस आलेली घरे आहेत तेथे 300 चौ.फूट क्षेत्र असलेली पक्की घरे देण्याचे ठरविले आहे. झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र करण्याचा निर्धार केला आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

राज्यात 4 कोटी एवढी कामगारांची संख्या असून त्यापैकी 90 टक्के असंघटित कामगार आहेत. त्यांना कायद्याचा फायदा मिळवून देण्याचे शासनाने ठरविले आहे.....

श्री. दिवाकर रावते : शासनाने यासंबंधीचे जे धोरण मांडले त्याबाबतचे उत्तर द्यावे.....

श्री. छगन भुजबळ : महोदय, एक कोटी ग्रामीण कुटुंबांपैकी निव्वळ 10 टक्के लोक जवळजवळ घरगुती नळ जोडणीपासून वंचित आहेत. येत्या 3 वर्षात या सर्व कुटुंबांना नळ जोडण्या मिळाव्यात असा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. जीवनदायी योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील कमकुवत घटकातील लोकांनाही उच्च व तंत्रशिक्षणाची समान संधी दिली जाईल. तसेच येत्या पाच वर्षात संपूर्ण महाराष्ट्र कुपोषण मुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सन 2020 पर्यंत आपले राज्य कशी वाटचाल करणार यासंबंधीचे व्हिजन डाकुमेंट तयार करण्याचेही आमच्या शासनाने ठरविले आहे. अशा प्रकारे वेगवेगळे निर्णय शासनाने यावर्षी घेतले आहेत. वांद्रे येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याचे शासनाने ठरविले असून या वसाहतीत जे कर्मचारी राहत आहेत त्या इमारतीतील पहिल्या मजल्यापर्यंत पाणी भरले होते. तसेच सध्या जी घरे आहेत त्यापेक्षा मोठी घरे बांधण्यात येणार आहेत. आता वसाहतीत जवळजवळ 4848 सदनिका असून त्यात भरीव वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याचे क्षेत्रफळही वाढवून देण्यात येईल. हे सर्व करीत असताना त्यात पदव्युत्तर शिक्षण संस्था, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, जिम्स, जॉगिंग पार्क अशा सुखसोयी पुरविण्यात येतील. .....अडथळा.....जे जे कर्मचारी व अधिकारी सेवेत आहेत त्या सर्वांना सेवा क्वार्टर्स देण्यात येतील.....अडथळा.....तसेच ज्यावेळी आपण राज्यासंबंधी असा निर्णय घेऊ त्यावेळेस कुठेतरी त्याचा विचार काता येईल. परंतु सध्या जे लहान घरात राहतात आणि ती घरे सतत रिपेअर करावी लागतात त्या घरांची पुनर्बांधणी करुन सर्व सुविधा त्यात निर्माण केल्या जातील, सन्माननीय सदस्यांनी कृपया समजून घेतला पाहिजे. यातून शासनाला सुध्दा 1300 कोटी एवढा मोठा निधी मिळणार आहे.

श्री. राम पंडागळे : महोदय, मी कांदिवली येथील 100 एकर जागा किरण हेमानी नावाच्या ब्लॅक लिस्टेड बिल्डरला हा प्रकल्प देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, त्यासंबंधीचा उल्लेख मंत्री महोदयांच्या भाषणात आलेला नाही.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ : महोदय, अनेक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले परंतु प्रत्येकाच्या मुद्याला उत्तर देणे शक्य होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सुध्दा व्हिजन डाकुमेंटबाबतचा प्रश्न उपस्थित केला.....अडथळा.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ ...

सभापती महोदय, जेजूरी तीर्थक्षेत्राला रोप वे उपलब्ध करुन देण्याची मागणी या ठिकाणी करण्यात आलेली आहे त्यामुळे ही बाब तपासून घेऊन रोप वे बसविण्याचा निर्णय निश्चितपणे घेण्यात येईल. सभापती महोदय, मुंबई-गोवा हायवेच्या संदर्भात मी स्वत: लक्ष घालीत आहे. यासंदर्भात केंद्रीय मंत्र्यांबरोबर अनेक वेळा चर्चा केलेली आहे. यासंदर्भात पीडब्ल्यूडीच्या मिटींगमध्ये हा मुद्दा मी स्वत: उपस्थित केलेला आहे तसेच याबाबतीत वर्तमानपत्रातून सुध्दा माहिती छापून आलेली आहे. त्यामुळे या कामाला लवकर सुरुवात कशी होईल यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. ज्यावेळेस यासंदर्भात आपण अभ्यास करावयास लागलो तेव्हा त्या ठिकाणी जे अभयारण्य आहे त्याबाबत काय करावे असा मुद्दा उपस्थित झाला. अभयारण्यात एक इंच सुध्दा जागा दिली गेली नाही. शेवटी असा निर्णय घेण्यात आला की, अभ्यारण्याचा जो काही 10-15 कि.मी. चा भाग आहे तो सोडून अलिकडे आणि पलिकडचा चार पदरी रस्ता करुन मोकळे होऊ या आणि पुढे काय ते पाहू या असा निर्णय घेण्यात आला. इंदापूरच्या रस्त्याचा अभ्यास करण्यास आपण सुरुवात केलेली आहे. हे काम लवकरात लवकर सुरु व्हावे यासाठी केंद्रसरकारकडे आपण प्रचंड पाठपुरावा करीत आहोत. या कामासाठी माननीय पवार साहेब सुध्दा प्रयत्न करीत आहेत.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर या ठिकाणी बरीच व्यापक चर्चा झालेली आहे व या व्यापक चर्चेला मी व्यापक उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे बजेट अधिवेशन जवळ एक ते दीड महिना चालणार आहे. वेगवेगळया खात्याच्या पुरवणी मागण्यावर, अर्थसंकल्पावर या ठिकाणी चर्चा होणार आहे त्यावेळेस सन्माननीय सदस्यांना अजून विस्तृतपणे आपले प्रश्न मांडता येतील व त्यावेळेस सुध्दा सन्माननीय सदस्यांना उत्तरे मिळतील. या ठिकाणी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर साधक बाधक चर्चा झालेली आहे व त्या अनुषंगाने चांगले मुद्दे या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत व या ठिकाणी जे काही मुद्दे मांडले गेलेले आहेत त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. जे चांगले मुद्दे या ठिकाणी मांडले गेले आहेत त्यांना प्रतिसाद देण्याचे शासनाचे धोरण राहणार आहे. त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण सभागृहाने मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो. धन्यवाद.

सभापती :आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला .

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांना संरक्षण पुरवले जात असते. परंतु मी शाहरुख खानच्या बंगल्यावर निदर्शन केले म्हणून एका तासाच्या आतमध्ये माझे संरक्षण तातडीने काढून घेण्यात आले. निदर्शन करणे हा कायद्याने मला अधिकार दिलेला आहे. मी निदर्शन केले म्हणून माझे संरक्षण काढून घेतलेले आहे परंतु काल माननीय राज्यमंत्री श्री. अब्दूल सत्तार यांनी मारामारी केल्याची माहिती टी.व्ही. वरुन दाखविण्यात आली होती. त्यामुळे माझे संरक्षण जसे काढून घेण्यात आले तसेच माननीय मंत्रीमहोदय श्री. अब्दूल सत्तार यांचे पोलीस संरक्षण काढून घेतले जाणार आहे काय ? जो कायदा मला लागू झाला तोच कायदा राज्य मंत्रीमहोदयांना लावणार आहात काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात हा मुद्दा मांडलेला नव्हता.

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी "माझ्या वैयक्तिक सुरक्षेबाबत" या विषयाच्या संदर्भात माझ्याकडे एक पत्र दिलेले आहे. सदस्यांना एखादा मुद्दा सदनात मांडावयाचा असेल तर त्याला नियम 47 अन्वये परवानगी दिली जाते. म्हणून "माझ्या वैयक्तिक सुरक्षेबाबत" एवढाच मुद्दा त्यांनी आपल्या पत्रात मांडलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी आपल्या पत्रात सन्माननीय राज्यमंत्र्याच्या मुद्याचा उल्लेख केलेला नाही. त्यांच्या वैयक्तिक सुरक्षेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला याबाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी माहिती द्यावी.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माहिती मागवून गृहखात्याशी चर्चा करेन.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री श्री. अब्दूल सत्तार यांनी कार्यकत्याला मारहाण केल्याची माहिती टी.व्ही. वरुन आम्हाला बघावयास मिळालेली आहे. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी मारहाण केल्यामुळे पोलिसात केस दाखल झालेली आहे काय ? जर ही माहिती खोटी दाखवली गेली असेल तर संबंधित चॅनलवर केस केली जाणार आहे काय ? त्यामुळे या मुद्याच्या संदर्भात माननीय सभागृह नेत्यांनी सभागृहाला माहिती द्यावी. माननीय राज्यमंत्र्यांवर गुन्हा दाखल झालेला आहे काय, गुन्हा दाखल झाला असेल आणि त्यांना अटक केली गेली असेल तर त्यासंदर्भात सभागृहात माहिती दिली जावी एवढीच आमची माफक मागणी आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, अधिवेशनामध्ये सुरक्षेचा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहेत. सुरक्षेच्या संदर्भात आम्ही प्रश्न उपस्थित केल्यामुळे आम्ही कोणाच्या अधिकारावर अतिक्रमण केले, असा त्याचा अर्थ होत नाही. खरे म्हणजे सन्माननीय राज्यमंत्र्यांच्या संदर्भात स्वत:होऊन सरकाने दखल घेतली पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब यांना संरक्षण मिळण्यासबंधी त्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत सभापती महोदयांनी लवकरात लवकर शासनाला निदेश द्यावेत त्याच बरोबर श्री अब्दुल सत्तार यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे.

ॲड.अनिल परब : मला जो न्याय दिला तोच न्याय सन्माननीय राज्यमंत्री श्री अब्दुल सत्तार यांना दिला गेला पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड अनिल परब यांचे संरक्षण काढून घेण्यात आले असून त्याबाबतीत त्यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे.आज सर्व वर्तमानपत्रात राज्यमंत्र्यांच्या संदर्भातील बातमी छापून आलेली आहे. एखाद्या राज्यमंत्र्यांचे सरक्षण काढून घेण्यात आलेले आहे. एखाद्या कार्यकर्त्याची राज्यमंत्र्यांच्या अंगावर धावून जाण्याची हिंमत कशी होते ? सभापती महोदय, राज्यमंत्र्यांनी त्या कार्यकर्त्याला बदडल्या सबंधीच्या बातम्यासुध्दा वर्तमानपत्रात आलेल्या आहेत. त्यामुळे खरे काय आहे यासबंधीची सत्य माहिती संध्याकाळपर्यत आम्हाला मिळाली पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एका प्रकरणात हायकोर्टाने असा निदेश दिला आहे की,लोकशाहीमध्ये निदर्शने करणे हा त्या व्यक्तिचा अधिकार आहे परंतु राजकीय निदर्शने केल्याबद्दल विधान सभा सदस्य श्री. वायकर, श्री.बाळा सावंत यांची सुरक्षा काढून घेण्यात आली आहे. त्याचबरोबर आपल्या सभागृहातील सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांचीसुध्दा सुरक्षा काढून घेण्यात आली आहे.विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची सुरक्षा काढावयाची असे शासनाचे धोरण आहे काय ? आम्हाला सुरुवातीला वाटले होते की, फक्त विरोधी पक्षातील सदस्यांची फक्त सुरक्षा काढण्यात येत आहे काय परंतु गृह राज्यमंत्री श्री रमेश बागवे यांची देखील सुरक्षा काढून घेण्यात आली असल्याची बातमी नतर प्रसिध्द झाली होती .गृह राज्यमंत्री असे म्हणतात की," माझी सुरक्षाकाढून घेण्यात आलेली आहे." गृह खाते आंबाच्या हातात नाही तसेच गृह राज्यमंत्री श्री रमेश बागवे यांच्या हातात नाही तर मुख्यमंत्र्यांच्या हातात ते खाते आहे असे यावरुन दिसते.याबाबतीत आबांना विचारले असता ते असे म्हणतात की," मला याबाबतीत काही माहिती नाही ".हतबल झाल्यासारखे ते वागत आहेत. श्री.अब्दुल सत्तार यांनी आपल्या संरक्षणासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असलेल्या पोलिसाला बरोबर घेऊन त्या माणसाला मारलेले आहे. इतकेच नव्हे तर त्या पोलिसानेसुध्दा त्या माणसाला मारले आहे. तो माणूस बेशुध्द पडला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलेले आहे.ॲड.अनिल परब यांनी निदर्शने केली म्हणून त्यांचे संरक्षण काढून घेण्यात आलेले होते तेव्हा त्यांना पुन्हा संरक्षण दिले जाणार आहे किंवा नाही हे जाहीर करण्यात यावे तसेच श्री.अब्दुल सत्तार यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे हे सुध्दा आज आम्हाला समजले पाहिजे. त्यांनी मारहारण केली असल्याचे संपूर्ण राज्यातील आणि संपूर्ण देशातील लोकांनी चॅनल्सवरुन पाहिले आहे. महाराष्ट्र राज्यातील एक राज्यमंत्री त्याला दिलेली सुरक्षा घेऊन त्या भागातील एक माणसाला मारहाण करीत आहे.हे सर्वांनी पाहिलेले आहे. त्याचबरोबर ज्या माणसाला मारहाण केली गेली तो अल्पसंख्याक समाजाचा आहे .तेव्हा शासनाच्या धोरणांप्रमाणे त्याचा कळवळासुध्दा शासनाला यावयास पाहिजे.सच्चरने सच्चरला मारहाण केली म्हणून नव्हे तर एका राज्यमंत्र्यांनी हे कृत्य केलेले असल्यामुळे त्यासंबंधीची माहिती आम्हाला आज संध्याकाळपर्यंत मिळाली पाहिजे त्याचबरोबर आमच्या पक्षाच्या ज्या आमदारांची सुरक्षा काढून घेण्यात आली आहे ती परत देण्यात येणार आहे काय हे सुध्दा समजले पाहिजे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

ॲड.अनिल परब :उपसभापती महोदय,आपण आताच सभापतीस्थानी आला आहात म्हणून आपल्या माहितीकरिता मी हे सांगू इच्छितो की,शाहरुख खानच्या बंगल्यासमोर निदर्शने केली म्हणून कोणत्याही प्रकारची चौकशी न करता एक तासाच्या आत माझे संरक्षण काढून घेण्यात आले होते. काल राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांनी पोलीस संरक्षणामध्ये, पोलिसाला बरोबर घेऊन,एका माजी नगरसेवकाला मारहाण केली होती व त्यासंबंधी गुन्हा दाखल झाला आहे.निदर्शने केली म्हणून माझे संरक्षण काढून घेण्यात येत असेल तर तोच न्याय श्री.अब्दुल सत्तार यांना हे शासन लावणार आहे काय ? व त्यांची सुरक्षा काढून घेण्यात येणार आहे काय किंवा आमदाराच्या सुरक्षितते बाबत शासनाचे कोणते धोरण आहे यासबंधीची माहिती आम्हाला देण्यात येणार आहे काय ?

उपसभापती : मी या सगळया प्रकरणाची व्यवस्थित माहिती घेऊन स्वत: सभागृहाला यासंबंधीची माहिती देईन.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : अब्दुल सत्तार यांनी मारहाण केली त्यासंबंधी माहिती मिळाली पाहिजे.

उपसभापती : या सगळया प्रकरणाची मी चौकशी करुन माहिती देईन.

श्री.राम पंडागळे :सभापती महोदय, कोणत्याही पक्षाचा आमदार असला तरी त्याचे संरक्षण शासनाने केले पाहिजे.जर त्या आमदाराला भिती वाटत असेल , त्याला संरक्षणाची आवश्यकता व त्याने मागणी केली असेल तर निश्चितपणे शासनाने संरक्षण दिले पाहिजे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते वा ॲड.अनिल परब यांना सगळेजण घाबरतात .

श्री.दिवाकर रावते (बसून) : मी सरंक्षण घेत नाही.

नंतर श्री सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

(2.20 ते 3.00 मध्यंतर)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी -मा.उप सभापती

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नुकतेच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभे-मध्ये असे सांगितलेले आहे की, माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांच्या प्रकरणाच्या बाबतीत नक्की काय प्रकार आहे, त्याबाबत मी तातडीने निवेदन करीत आहे. याबाबतीत आमचाही असा आग्रह आहे की, आताच्या आता, आजच्या आज, पाहिजे तर आपण याबाबतीत त्यांना 4.00 वाजेपर्यंतचा वेळ द्यावा. आमच्या या सदनामध्ये देखील तातडीने यासंबंधातील जी 100 टक्के माहिती आहे, ती समोर आली पाहिजे आणि माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांच्या प्रकरणामध्ये शासन नेमकी कोणती कार्यवाही करीत आहे हे तर समजले पाहिजेच. पण त्या अनुषंगाने आम्ही सन्माननीय सदस्यांच्या संरक्षणाच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, मग सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब असतील, विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र वायकर असतील तसेच सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सावंत असतील, तर त्यासंबंधातील आम्हाला 100 टक्के माहिती मिळाली पाहिजे. कारण राजकारणामध्ये निदर्शने करणे हा हाय कोर्टाने देखील मान्य केलेला मुद्दा आहे. निदर्शनामध्ये नक्की काय असावे आणि काय असू नये याबाबतीतही त्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. आमच्या हातून जी आगळीक झालेली आहे, त्याबद्दल आम्हाला दंड सुध्दा करण्यात आलेला आहे. पण या लोकशाहीमध्ये आमचा निदर्शने करण्याचा हक्क अबाधित ठेवलेला असल्याकारणाने, केवळ निदर्शने केली म्हणून आमचे संरक्षण काढून घेतले असेल तर त्याच्या संबंधातील निवेदन देखील आम्हाला उपलब्ध झाले पाहिजे अशा प्रकारचे जर आपण तातडीने निदेश दिले तर ते फार बरे होईल आणि सदरहू निवेदन आम्हाला संध्याकाळी 4.00 वाजेपर्यंत मिळाले पाहिजे. अन्यथा आम्हाला माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांच्या प्रकरणामुळे कोणतेही कामकाज करण्यामध्ये रस नाही. आम्हाला कामकाज करावयाचे आहे पण जर या राज्यातील मंत्रीच जर गुंडगिरी करीत असेल तर मग आम्ही या सदनामध्ये बसून कशासाठी कामकाज करावयाचे असा आमच्यासमोर प्रश्न आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. जर सन्माननीय मुख्यमंत्री विधानसभेमध्ये माननीय राज्यमंत्री श्री.अब्दुल सत्तार यांच्या बाबतीत जे ..

. . . .2 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

काही घडलेले आहे, त्याबाबतीत निवेदन करणार असतील तर विधान परिषदेमध्ये देखील अशा प्रकारचे निवेदन आजच होणे आवश्यक आहे.हे निवेदन किती वाजता झाले पाहिजे असे मी सांगत नाही ाण सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी निवेदन येथे व्हावे असे मी शासनाला सूचित करतो आणि .. . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : माननीय गृहमंत्री आहेत काय ?

उपसभापती : माननीय गृहमंत्री करतील किंवा कोणीही माननीय मंत्री महोदय करतील. दुसरी गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्यांनी सन्माननीय सदस्यांच्या संरक्षणाबाबत जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यासंदर्भात देखील माननीय गृह राज्यमंत्री . . . ..

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, ते निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांनी करावे. कारण माननीय गृह राज्यमंत्र्यांची तक्रार आहे की, त्यांचेही संरक्षण काढून घेतलेले आहे. त्यामुळे त्यांनी निवेदन करुन उपयोग नाही.

उपसभापती : एक गोष्ट नक्की आहे की, कोणत्याही पक्षाचे सन्माननीय सदस्य असोत, त्यांना जर संरक्षण हवे असेल आणि तसे ते देणे आवश्यक असेल तर ते दिले गेले पाहिजे असे मला वाटते याबद्दल माझेही दुमत नाही. त्यामुळे याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, होय. निवेदन करु.

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री. व्ही.यू.डायगव्हाणे,जयंत प्र.पाटील यांनी "केंद्र शासनाने त्यांचेकडील कर्मचाऱ्यांना व पेन्शन धारकांना 8 टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचे 1 जानेवारी 2010 पासून देण्याचे मान्य केले, त्याप्रमाणे राज्य शासनाने त्यांचे कर्मचारी व शिक्षक यांना वाढीव महागाई भत्ता जसाच्या तसा देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "राज्य शासनाने 4 नगरपरिषदा व 53 ग्रामपंचायतींचा व 59 गावांचा समावेश असलेल्या वसई-विरार महानगरपालिकेची स्थापना दि.3-7-2009 रोजी केल्यामुळे त्या-त्या नगरपरिषदांवर ग्राम-पंचायतीच्या क्षेत्रातील विकास कामे व दैनंदिन कामकाज ठप्प झालेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "राज्यात तालुका स्तरावर सुरु करण्यात आलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये मंजूर केलेली 153 कंत्राटी पदे, कंत्राटी पध्दतीने भरण्यास परवानगी दिली असताही त्यापैकी 69 कर्मचाऱ्यांना गेल्या 8 वर्षापासून मुदतवाढ देऊनही त्यांना 31 मे 2007 पासून अचानक सेवेतून कमी केल्यामुळे त्यांच्या चरितार्थाचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.गोपीकिशन बाजोरिया, दिवाकर रावते, किशनचंद तनवाणी यांनी"अकोला महानगरपालिकेला एकात्मिक घरकुल आवास योजनेअंतर्गत शासनाने मंजूर केलेला 8 कोटी रुपयांचा निधी महानगरपालिकेच्या आयुक्तांनी शासनाच्या पूर्व परवानगी शिवाय इतर विभागाकडे वळविल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उपसभापती . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील महाजने गावातील श्री.समीर हरिश्चंद्र पाटील व श्री.नारायण महादेव अवचटकर यांच्या मोटारसायकली जाळून टाकल्याबाबत घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "अन्न व औषध प्रशासनाने "कोडीयन फॉस्फेट" हे कफ सिरपमध्ये वापरण्यात येणारे नशिले औषध द्रव्य सन 2008 मध्ये सहा हजार किलोग्रामचे वाटप औषध कंपन्यांना करण्याची परवानगी केंद्रीय अन्न,औषध नियंत्रण विभागाने दिली असताही प्रत्यक्षात तिपटीने म्हणजेच 19,768 कि.ग्रॅ. नशिल्या औषध द्रव्याचे वितरण करुन नियमभंग केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ठिकाणी असलेल्या देवांच्या मंदिरांमध्ये वाढलेले चोरीचे प्रमाण तसेच दि.22 मार्च,2010 च्या सुकारास चिखली-कुदळवाडी (जि.पुणे) येथील दुर्गा मंदिरातील कालिमाता देवीची मूर्ती व श्रीकृष्णाची मूर्ती तसेच सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक गावातील मंदिरातील वेगवेगळया प्रकारच्या मुर्त्या चोरीस गेल्याने देवांची मंदिरे असुरक्षित असल्याचे भाविकांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, यांनी "कुडाळ तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) मानगाव खोऱ्यातील आंबोरी गावात रानटी हत्तीचा सुळा उपवन संरक्षक सावंतवाडी यांनी कापल्याने जनतेमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोकणातील आंबा उत्पादकांना मदत वाढवून देण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता.

मु. शी. : कोकणातील आंबा उत्पादकांना मदत वाढवून देण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर,डॉ.दीपक सावंत,किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (फलोत्पादन राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत, किरण पावसकर यांनी "कोकणातील आंबा उत्पादकांना मदत वाढवून देण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, दर वर्षी आंब्याचे मोठया प्रमाणात नुकसान होते. याही वर्षी आंब्याचे मोठया प्रमाणात नुकसान झालले आहे. आंब्यावर थ्रीप्स नावाचा रोग पडल्यामुळे आंबा मार्केटमध्ये उशिरा आलेला आहे. त्यामुळे शासन या आंब्यासाठी यावर्षी हेक्टरी 50 हजार रुपये मदत देणार आहे काय? जी मदत दिलेली आहे ती 6 हजार रुपये प्रती हेक्टरी जाहीर झालेली आहे. म्हणजेच प्रत्येक झाडाला फक्त 60 रुपये मिळणार आहेत म्हणून ही मदत वाढवून देण्याचा शासनाचा विचार आहे काय? तसेच जे खत खरेदी करण्यात आलेले होते ते 11 कोटी रुपयाचे खत निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे परत पाठविण्यात आले आहे हे खरे आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, फयान वादळामध्ये जे नुकसान झाले होते त्यासाठी 15 हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे जाहीर केले होते त्याप्रमाणे सरासरी 15 हजार रुपये मदत देण्यात येणार आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी 50 हजार रुपये प्रती हेक्टरी मदत देणार काय असा प्रश्न विचारलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे. यासाठी हेक्टरी 15 हजार रुपये नुकसान भरपाई जाहीर झालेली आहे त्याप्रमाणे ती 15 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात येईल. संपूर्ण राज्यासाठी ती लागू आहे. सन्मानीय सदस्यांनी तिसरा प्रश्न खताच्या संदर्भात विचारलेला आहे. पण ते खरे नाही. याचे कारण असे की, आता पर्यंत खते वितरित केलेली नाहीत. खताचे वाटप करण्यामध्ये विलंब झालेला आहे. याबाबतीत असे ठरले होते की, विद्यापीठाच्या शिफारशी घेऊन कोणत्या प्रकारची खते व औषधे द्यावयाची हे ठरवावयाचे होते. त्यामध्ये ऑरगॅनिक आणि इनऑरगॅनिक हे दोन्ही अगोदर द्यावयाचे ठरले होते. परंतु त्या विभागातील कास्तकारांनी असे सांगितले की,आम्हाला आरगॅनिक खत नको. पेस्टीसाईडच्या माध्यमातूनच फर्टिलायझर पाहिजे. त्यामुळे आता असे ठरलेले आहे की, जी काही खते आणि फर्टिलायझर द्यावयाचे आहे ते डायरेक्ट देण्यात येणार आहे. या अगोदर तालुका स्तरावर यासंबंधीचे वाटप होत होते. त्यामुळे यावेळी कास्तकारांची अशी विनंती होती की, आम्हाला गाव पातळीवर किंवा काही गावे मिळून गाव पातळीवर वितरित करण्यात यावे. त्यामुळे सोसायटीच्या माध्यमातून, परमिटच्या माध्यमातून हे वितरित करण्यात येणार आहे. लवकरात लवकर परमिट वितरित होणार आहेत आणि त्यासंबंधीचे पैसे पूर्णपणे आलेले आहेत.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कोकणात गेल्या वर्षी ज्यावेळी आंब्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले त्यावेळी आम्ही यासंबंधी या सभागृहात चर्चा केली होती. त्यावेळी आम्ही शासनाला विनंती केली होती की, ही नुकसान भरपाई हेक्टरी न ठेवता प्रत्येक झाडवाईज नुकसान भरपाई देण्यात यावी. कोकणात सुरुवातील आंब्याची लागवड करण्यात आली त्यावेळी झाडे जवळजवळ लावण्यात आली होती त्यामुळे हेक्टरी झाडांची संख्या जास्त आहे. आता नव्याने आंब्याच्या झाडांची जी लागवड करण्यात आलेली आहे ती ठराविक अंतरावर करण्यात आलेली आहे. त्यामुळे झाडांची संख्या कमी आहे. म्हणून शासनाने त्यावेळी आश्वासन दिले होते की, यापुढे कधीही आंब्याच्या झाडांचे नुकसान झाले तर कलमवाईज, झाडवाईज नुकसान भरपाई देण्यात येईल तेव्हा शासनाला याचा विसर पडला आहे काय, असल्यास त्याबाबत विचार करुन झाडवाईज नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय?

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, एप्रिल, 2008 मध्ये ज्यावेळी पाऊस पडला त्यावेळी आपण 6 हजार रुपये देत होतो. ज्यावेळी चक्रीवादळ आले त्यावेळी सरासरी 15 हजार रुपये फळबागांसाठी किंवा कोणत्याही पेरेनियल क्रॉपसाठी देण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यामुळे पेरेनियल क्रॉपसाठी 15 हजार रुपये देणार आहोत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे उत्तर दिले ते समाधानकारक नाही. जो मूळ प्रश्न होता त्याला बगल देण्याचा प्रयत्न या निमित्ताने इ ालेला आहे. हेक्टरी 15 हजार रुपये कलमाला नुकसानभरपाई दिली. फयान वादळामुळे जे नुकसान झाले त्या नुकसानीच्या भरपाईपोटी 15 हजार रुपये दिलेले आहेत. त्या ठिकाणी आंब्याच्या कलमाला मोहोर यावयास पाहिजे, आंब्याचे उत्पादन वाढावयास पाहिजे ही शेतकऱ्यांची जी अपेक्षा होती ती भंग झालेली आहे. या पार्श्वभूमीवर या ठिकाणी हेक्टरी 50 हजार रुपये देण्याची जी मागणी केलेली आहे त्याचा शासन पुनर्विचार करणार काय आणि ही मदत शासन त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना देणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही भरपाई नव्हे तर मदत आहे. हे पूर्ण् राज्यामध्ये झालेले आहे. ही फक्त मदत होती. चक्रीवादळ झाल्यानंतर ज्या ठिकाणी पिकाचे 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले त्या ठिकाणी पूर्ण राज्यासाठी ज्या ठिकाणी फळबागा आहेत, हॉर्टिकल्चर आहे त्यांच्यासाठी सरासरी हेक्टरी 15 हजार रुपये देणार आहोत. समजा पुढे धोरण बदलले तर वेगळा प्रश्न आहे. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात जे सरासरी हेक्टरी 15 हजार रुपये देतो त्याप्रमाणे 15 हजार रुपये देणार आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, संपूर्ण् राज्याकरिता जे आहे त्याप्रमाणे होणार आहे. हा प्रश्न कोकणातील आंबा पिकाच्या संदर्भात आहे. त्या ठिकाणी आंबा फळबाग हे त्यांचे प्रमूख पीक आहे.

उपसभापती : पुण्याला माझ्या शेतात 100 एकरमध्ये आंबा आहे. त्याचेही नुकसान झाले. त्याचीही नुकसानभरपाई मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय अशा पध्दतीने सभागृहामध्ये उत्तर देणार असतील तर ही पध्दत चालणार नाही. एवढ्या गाफीलपणे शेतकऱ्यांच्या मानेवर सुरी फिरविणार कय ? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, रु. 15,000/- प्रति हेक्टरी एवढी मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचा जी.आर. निघालेला आहे. त्यामुळे ते माननीय मंत्रिमहोदयांनी येऊन सांगण्याची गरज नाही. निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये फळपिकाचे बाधित क्षेत्र अनुक्रमे 1,32,454 हेक्टर व 26.67 हेक्टर एवढे आहे. सदर मदत ही 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या क्षेत्रासाठी व प्रति खातेदार 2 हेक्म्टर क्षेत्राच्या मर्यादेत होती." याबाबत शासनाचा जी.आर.आहे. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, "मदतीच्या वाटपामध्ये आंबा पिकाची फळधारणा एक वर्षाआड होते. ही बाब विचारात घेण्यात आली नव्हती." हे आपण मान्य केले त्यामुळे ही बाब विचारात घेऊन ते अनुदान वाढविणार हे सांगितले पाहिजे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आंब्याला दरवर्षी बहर येत नाही. त्यामुळे अगोदर आपण सरासरी 60 टक्के देत होतो. ज्यावेळी फयान आले त्यावेळी सरासरी जे देण्याचे ठरले त्याप्रमाणे 15 हजार रुपये दिले. अगोदर आपण 9 हजार रुपयेच देत होतो. या वर्षी जो सरासरी दर 15 हजार रुपये ठरलेला आहे त्याप्रमाणे दिलेले आहेत. म्हणजे 6 हजार रुपयांची वाढ करुन दिलेली आहे. आंबा हे पीक एक वर्षाआड म्हणजे अल्टरनेट वर्षाला येते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

त्यामुळे आंब्याच्या पिकासाठी यापूर्वी 60 टक्के मदत दिली जात होती. या वर्षी 100 टक्के मदत दिली असून ती 6 हजार रुपयांच्या वर दिलेली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नांदेड जिल्हयात हत्तीरोग रुग्ण शोध मोहिमेत हजारो रुग्णांमध्ये हत्तीरोगाची लक्षणे आढळून येणे

मु. शी. : नांदेड जिल्हयात हत्तीरोग रुग्ण शोध मोहिमेत हजारो रुग्णांमध्ये हत्तीरोगाची लक्षणे आढळून येणे यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, श्री.गोपीकिसन बाजोरिया,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नांदेड जिल्ह्यात दिनांक 16 ते 31 ऑगस्ट, 2009 या कालावधीत राबविण्यात आलेल्या हत्तीरोग रुग्ण शोध माहिमेत 34 हजार 498 व्यक्तींना हत्ती रोगाची लागण होणे, 5 हजार 937 रुग्णांमध्ये हत्तीरोगाची लक्षणे आढळून येणे, क्यूलेक्स जातीच्या डासामार्फत हत्ती रोगाचा प्रसार होणे, तसेच नांदेड महानगरपालिका हद्द, शहरी भाग तसेच ग्रामीण भागात राबविण्यात आलेल्या शोध माहिमेत 3500 रुग्णांना हत्ती रोगाची लागण झाली असून सुमारे 6000 व्यक्तींमध्ये हत्ती रोगाची लक्षणे आढळून येणे, या प्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करुन प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचार करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही हत्तीरोगावरील लक्षवेधी सूचना आहे. "नांदेड जिल्हयामध्ये एकूण 18,59,818 पात्र लाभार्थ्यांपैकी 17,17,937 लाभार्थ्यांना म्हणजे 92.37 टक्के रुग्णांना डीईसी व अल्बेडाझॉल गोळया वयोगटानुसार खाऊ घालण्यात आल्या." असे निवेदनात म्हटलेले आहे. म्हणजे 1,41,881 लोकापर्यंत या गोळया का पोहोचल्या नाही ? सध्या या रोगाची लागण झालेले 6 हजार रुग्ण आहेत त्यात वाढ होऊन ते 60 हजार होण्याची शक्यता आहे, याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ज्या लोकांना औषध दिले आहे ते रुग्ण नव्हते. प्रिव्हेंटिव्ह मेजर्स म्हणून मोठया प्रमाणात गोळयांचे वाटप केलेले आहे. गरोदर माता, बालक व गंभीर आजार अशा लोकांना वगळून या गोळया देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे ही संख्या कमी आहे. या गोळयांचे वाटप महानगरपालिकेकडून केले जाते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना नांदेडची असली तरी संपूर्ण महाराष्ट्रातील हा प्रश्न आहे हे मी प्रथम सांगतो. केंद्र सरकारच्या एनआरएचएम योजनेतर्फे फायलेरिया या रोगासाठी पैसे येतात. एनव्हीबीसीपी अंतर्गत या रोगाला नोटिफाय केलेले आहे. यावर्षी या रोगाच्या निर्मूलनासाठी राज्यामध्ये किती निधीचा पुरवठा झाला ? हा प्रकल्प फक्त 2015 पर्यंत राबविला जाणार आहे. याची मंत्री महोदयांना कल्पना आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या रोगाच्या तपासासाठी स्टाफ नेमलेला आहे त्यामध्ये किती पदे रिक्त आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या मास ड्रग्ज ॲडमिनिस्ट्रेशन कॅम्पेन अंतर्गत फायलेरियासाठी नांदेडमध्ये फायलेरिया इन्टेमिक रिजनमध्ये लाभार्थ्यांना औषधे देण्यात आलेली आहेत. त्यामुळे मायक्रोफायलेरियाचे प्रमाण 4.9 इतके होते ते आता 1.9 झालेले आहे असे आढळले आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

(प्रा. फौजिया खान...

2009-2010 साठी 1.75 लाख रुपये निधी दिलेला असून 1.34 कोटी अतिरिक्त निधी दिलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : 2004मध्ये हा प्रोजेक्ट सुरु झालेला असून तो 2015मध्ये संपणार आहे. या प्रोजेक्टसाठी आतापर्यन्त किती निधी केन्द्र सरकारकडून प्राप्त झाला आहे ?

प्रा. फौजिया खान : ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. भाई जगताप : कोणत्या जिल्ह्यामध्ये या रोगाची जास्त लागण झालेली आहे ? या रोगाला प्रतिबंध करण्यासाठी किती कर्मचारी वर्ग आहे ?

प्रा. फौजिया खान : एकूण 20924 पदे असून 4861पदे रिक्त आहेत.

श्री. भाई जगताप : एवढया मोठ्या प्रमाणावर लागण असलेल्या या रोगाच्या बाबतीत शासन इतके उदासीन का ? मी असा प्रश्न विचारलेला होता की, कोणत्या जिल्ह्यामध्ये या रोगाची जास्त लागण झालेली आहे ? एवढया मोठ्या प्रमाणावर असलेली रिक्त पदे भरण्याची शासनाची काय भूमिका आहे ? ही रिक्त पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : रिक्त पदांसंबंधी या सभागृहामध्ये वेळोवेळी चर्चा केली जाते. केवळ आरोग्य खात्यामध्येच नाही तर आरोग्य विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग, गृह विभाग इत्यादी विभागामध्ये रिक्त पदे आहेत. ही रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. खासकरुन आरोग्य विभागातील सर्व रिक्त पदे पुढच्या तीन महिन्यामध्ये भरण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, पिछले 1-2 साल में सभागृह में जब भी यह सवाल आता है तो यह कहा जाता है कि रिक्त पद जल्दी से जल्दी भरे जाएंगे, लेकिन . . . .

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना फायलेरिया संबंधीची आहे आणि सन्माननीय सदस्य रिक्त पदांसंबंधी चर्चा करीत आहेत.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, प्रश्न यह है कि आपके विभाग में 4 हजार पद खाली हैं तो आप काम कैसे कर पाएंगे ? जहां पर इतने स्टाफ की कमी है तो इस बीमारी का मुकाबला कैसे करेंगे, इसलिए महाराष्ट्र शासन का आरोग्य विभाग समय सीमा बताए कि कितने दिनों के अन्दर ये पद भरे जाएंगे ?

. . . HH-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : आरोग्य विभागामध्ये रिक्त पदे असली तरी देखील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनच्या माध्यमातून कॉण्ट्रॅक्ट पध्दतीवर भरती करण्याची पदत आहे. त्यामुळे जास्त पदे रिक्त राहातात अशातला भाग नाही. हे सर्व काम महानगरपालिकेचे आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे काम हे आरोग्य विभागाचे आहे. या कामामध्ये विभागाकडून कोणताही हलगर्जीपणा झालेला नाही.

डॉ. दीपक सावंत : जेव्हा एखादा प्रकल्प केन्द्र सरकार तर्फे पुरस्कृत केला जातो त्यावेळी त्या प्रकल्पाचा राज्य शासन किंवा महानगरपालिका यांच्याशी संबंध नसतो. केन्द्राने पुरस्कृत केलेल्या प्रकल्पासाठी केन्द्राकडून निधी प्राप्त होत असतो. कर्मचा-यांच्या पगारावर तसेच औषधांवर होणा-या खर्चासाठी केन्द्राकडून निधी प्राप्त होत असतो. कॉण्ट्रॅक्टवर पदे भरण्याची पदत आहे. तर मग ही पदे का भरली जात नाही. 2004 ते 2010 पर्यन्त या प्रकल्पावर एकूण किती रक्कम केन्द्र सरकारकडून प्राप्त झाली ?

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1.....

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांना पाच वर्षाची आकडेवारी मी अर्ध्यातासाच्या वेळेत देतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 4 हजार पदे रिक्त आहेत, कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने ही पदे भरावयाची असून केंद्र शासनाकडून निधी दिला जात आहे. राज्याच्या तिजोरीवर भार पडणार नाही. टेक्नीशियन्सची पदे आहेत. इतक्या वर्षात पदे भरली नाहीत, आता तीन महिन्याच्या काळात तुम्ही जादूची कांडी फिरविणार आहात का? ती महिन्यात ही पदे कशी भरणार आहात?

श्री.सुरेश शेट्टी : मी उत्तरात सांगितले की, तीन महिन्यात आरोग्य विभागाची सर्व रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. मी या खात्याचा मंत्री म्हणून पदभार स्वीकारुन तीन महिनेच झाले आहेत. आणखी कमीत कमी तीन महिन्याची मुदत तरी द्यावी.

उपसभापती : मंत्रीमहोदय, आपल्या उत्तरातील एक शब्द धोकादायक वाटतो. तीन महिन्यात ही पदे कशी भरली जाणार आहेत?

श्री.सुरेश शेट्टी : काही पदे अशी आहेत, ज्या पदांबाबत ओपन इन्टरव्ह्यू ठेवला तरी उमेदवार मिळत नाहीत. काही कॅटॅगरीचे डॉक्टर आहेत, वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत जे.जे.हॉस्पिटलमध्ये ओपन इन्टरव्ह्यू ठेवला तरी एकही उमेदवार येत नाही म्हणून मी तसे उत्तर दिले.

श्री.दिवाकर रावते : महत्वाची धोरणात्मक बाब आमच्या लक्षात आली. व्हेंटिलेटर खरेदीचा प्रश्न होता. बोगस औषध खरेदीबाबतचा कोल्हापूरचा प्रश्न सकाळी चर्चेला आला होता. गेल्या चार वर्षापासून हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत जी रिक्त पदे आहेत ती भरण्याचा प्रश्न आहे. हे सरकार सत्तेवर येण्याच्या वेळी काही महत्वाची खाती आम्हाला हवी आहेत असा काँग्रेस पक्षाचा आग्रह होता. आरोग्य विभाग पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे होता. मंत्रीमहोदयांनी सभागृहात गेल्या पाच वर्षात झालेला भ्रष्टाचार वगैरे सांगितले. चौकशी संदर्भात सांगितले. गेल्या पाच वर्षात तत्कालीन मंत्रीमहोदयांच्या काळात जे काही घडले त्या संदर्भातील माहिती भविष्यात सभागृहाला देणार का? तुम्ही चांगले काम करीत आहात, चोख काम करीत आहात, टेंडर सिस्टीम बददली, खरेदीची पध्दत बदलली. भ्रष्टाचार होत होता हे सांगितले. मागील पाच वर्षे हा विभाग ज्यांच्याकडे होता त्या काळातील अनियमिततेबाबत, पदे भरण्याबाबत काय घडले हेही

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदनाला कळले पाहिजे. आग्रहाने खाते मागून घेतले असल्यामुळे आम्हाला हे कळले पाहिजे. तुमचा सचोटीचा कारभार आम्हाला जाणून घ्यायचा आहे.

श्री.सुरेश शेट्टी : प्रश्नाचे उत्तर देत असताना मी असे सांगितले की, 10 वर्षे या सदनामध्ये आणि विधानसभेमध्ये आरोग्य खात्याच्या संदर्भातील चर्चेच्या अनुषंगाने आरोग्य मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यावर औषध आणि साधनसामुग्री खरेदीबाबत आरोप झाले. म्हणून आम्ही प्रोक्यूरमेंट पध्दत चेंज करुन ट्रान्सपरन्ट प्रोक्यूरमेंट पॉलिसी आणीत आहोत. गेल्या पाच-दहा वर्षात कुठे काय झाले त्यासंबंधी या हाऊसमध्ये काही सांगितलेले नाही. आवश्यक असल्यास रेकॉर्ड तपासून घ्यावा.

डॉ.दीपक सावंत : आपण प्रेसला तसे स्टेटमेंट दिले आहे. गेल्या काही वर्षात झाले तसे माझ्या काळात होणार नाही असे सांगितले आहे.

श्री.सुरेश शेट्टी : खरेदीचा नियम बदलून आम्ही नवीन पारदर्शक धोरण आणणार हे मी सांगितले. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना माझी विनंती आहे की, गेल्या 5-10 वर्षात जे काही झाले ते विसरुन पुढे काम कसे करायचे यासंबंधी चर्चा करावी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोरेगाव पार्क (पुणे) येथील जर्मन बेकरीमध्ये झालेला भीषण बॉम्बस्फोट

मु.शी.: कोरेगाव पार्क (पुणे) येथील जर्मन बेकरीमध्ये झालेला भीषण बॉम्बस्फोट यासंबंधी ॲड.गुरुनाथ कुळकर्णी, सर्वश्री अरुण गुजराथी, रमेश शेंडगे, हेमंत टकले, विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, श्री.सतीश चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अनिल परब, परशुराम उपरकर, किरण पावसकर, रामदास कदम, किसनचंद तनवाणी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" पुणे येथील कोरेगाव पार्क येथील जमर्न बेकरीत दिनांक १३ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या भीषण बॉम्बस्फोटामध्ये १० व्यक्ती मृत्युमुखी पडणे, व सुमारे ५० व्यक्ती गंभीर जखमी होणे, पुण्यातील गजबजलेल्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाल्यामुळे तेथील नागरीकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, बॉम्बस्फोटाच्या सुत्रधाराचा अद्यापही शोध न लागणे, सदर हल्ला पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोएबा या दहशवादी संघटनेने केल्याचा संशय व्यक्त होणे, राज्यातील इतर शहरात सुध्दा बॉम्बहल्ले होण्याची शंका व्यक्त होणे, सबब याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचनेच्या क्रमासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. लक्षवेधी सूचना ज्यावेळेस सन्माननीय सभासद कार्यालयात देत असतात त्यावेळेस पूर्वीची पध्दत अशी होती की, ज्या सदस्याने लक्षवेधी सूचना दिली त्यावर कोणत्या वेळेला लक्षवेधी सूचना दिली ती वेळ लिहिली जात होती. त्यानुसार ज्या सदस्यांनी अगोदर लक्षवेधी सूचना दिली त्यांचे नाव अगोदर येत होते. परंतु आता या पध्दतीत बदल करण्यात आला असून लक्षवेधी सूचना दिल्यानंतर वेळ दिली जात नाही, आमच्या माहितीनुसार त्याला क्रमांक दिला जातो. त्यामुळे जी लक्षवेधी सभागृहात चर्चेसाठी येते ती कोणत्या वेळेला दिली हे समजत नाही.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सभासदांनी ही लक्षवेधी आणण्यासाठी पुढाकार घेतला.....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य व गट नेते श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंबंधीचे रुलिंग कृपया आपण द्यावे, अशी मी विनंती करतो.

उपसभापती : यासंदर्भातील माहिती घेऊन सांगतो.

डॉ. दीपक सावंत : ज्यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यामध्ये सत्ताधारी पक्षाचीच लक्षवेधी सूचना यायला पाहिजे असे होऊ नये म्हणून लक्षवेधी सूचना दिल्यानंतर त्यावर वेळ लिहिणे आवश्यक आहे.

श्री. दिवाकर रावते : आमचेच पाप आम्हीच मांडतो असा हा प्रकार आहे.

उपसभापती : यासंदर्भात मी स्वत: माननीय सभापतींशी बोलून त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्याची व्यवस्था करतो.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : महोदय, लक्षवेधी सूचनेचा विषय मी थोडक्यात वाचून दाखवितो. तसेच त्या लक्षवेधी सूचनेला जे उत्तर दिलेले आहे ते देखील मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

"पुणे येथील कोरेगाव पार्क येथील जमर्न बेकरीत दिनांक 13 फेब्रुवारी, 2010 रोजी झालेल्या भीषण बॉम्बस्फोटामध्ये 10 व्यक्ती मृत्यूमुखी पडणे, व सुमारे 50 व्यक्ती गंभीर जखमी होणे, पुण्यातील गजबजलेल्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाल्यामुळे तेथील नागरीकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, बॉम्बस्फोटाच्या सुत्रधाराचा अद्यापही शोध न लागणे, सदर हल्ला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

पाकिस्तानस्थित लष्कर-ए-तोएबा या दहशतवादी संघटनेने केल्याचा संशय व्यक्त होणे, राज्यातील इतर शहरात सुध्दा बॉम्बहल्ले होण्याची शंका व्यक्त होणे, सबब याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना." असा लक्षवेधी सूचनेतील विषय असून निवेदनामध्ये "पोलीस आयुक्त पुणे शहर व इतर पोलीस अधिकारी यांनी नियमितपणे मिशन मृत्युंजय योजना राबविली यात पुणे शहरातील महत्वाच्या शैक्षणिक संस्था, हॉटेल, परदेशी नागरिकांची वर्दळीची ठिकाणे इत्यादि ठिकाणी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांना सतर्क व जागरुक केले होते. संशयित बेवारस वस्तुंबाबत योग्य काळजी घेण्याबाबत व त्याबाबतची माहिती पोलिसांना कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. अतिरेकी हल्ला होण्याची जी संभाव्य ठिकाणे होती त्यांच्या व्यवस्थापनाला तेथील सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याविषयी पोलीस आयुक्त, पुणे यांनी सूचना दिल्या होत्या. सशस्त्र पोलीस बंदोबस्त व सशस्त्र पोलीस गस्त सुरु करण्यात आली होती. अशा प्रकारे पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडे सुरक्षिततेविषयी खबरदारी घेण्यात आली होती." अशा प्रकारे कॅज्युअल स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. म्हणजे लक्षवेधी सूचनेच्या मूळ गाभ्याला उत्तर देण्यासाठी कशी कार्यपध्दती वापरली हे मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या घटनेला 1 महिना 13 दिवस झालेले असून त्याबाबत अद्यापही संशयित आरोपीही पोलिसांना मिळालेले नाहीत. केंद्रीय गृहमंत्र्यांनी यासंदर्भात स्पष्टपणे भूमिका घेतली होती आणि ती सर्व चॅनल्सच्या माध्यमातून जाहीर झालेली आहे. त्यांनी सांगितले होते की, ही घटना या अमुक दोन ठिकाणी होणार अशा प्रकारची संपूर्ण खबरदारी घेण्याची जबाबदारी राज्याच्या पोलीस यंत्रणेला दिलेली असताना सुध्दा कोणतीच कारवाई झाल्याचे दिसून आले नाही. माझा प्रश्न असा आहे की, पुणे येथील जर्मन बेकरीतील बॉम्बस्फोटातील आरोपींबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ...

अशा प्रकारचे हल्ले, अशा प्रकारच्या गंभीर घटना या राज्यात पुन्हा होणार नाहीत याबाबत शासनाने कोणती पावले उचलली आहेत ? अशा पध्दतीचे हल्ले पुन्हा या राज्यात होऊ नयेत यासाठी शासनाची काय भूमिका आहे?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आतंकवादी हल्ल्याच्या संदर्भात आयबीने छाबड हाऊस आणि लाल देऊळ येथे हल्ले होण्याची शक्यता आहे याबाबत माहिती दिली होती परंतु जर्मन बेकरी येथे आतंकवादी हल्ला होईल यासंदर्भात इशारा दिला नव्हता त्यामुळे शासनाने लाल देऊळ आणि छाबड हाऊस या ठिकाणी कडक बंदोबस्त ठेवला होता तसेच या ठिकाणी पोलीस संरक्षण सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्या अनुषंगाने शहरातील जी महत्वाची ठिकाणी होती, अतिसंवेदनशील भाग होता त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अशा ठिकाणी दिवसरात्र गस्ती वाढविण्यात आल्या होत्या व पोलीस अधिका-यांच्या माध्यमातून संपूर्ण पुणे शहरात लोकांमध्ये जागृती आणण्यासाठी, अवेरनेस आणण्यासाठी कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते. भविष्यकाळात अशा प्रकारचे हल्ले होणार नाहीत यासंदर्भात शासनाने काळजी घेतलेली आहे. मुंबईवर जेव्हा 26.11 चा आतंकवादी हल्ला झाला होता त्यावेळी 120 कोटी रुपये पोलीस दल सक्षमीकरणाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. सन 2008-09 मध्ये 126 कोटी रुपयांपैकी 100 कोटी रुपये पोलीस दलावर खर्च करण्यात आले. सन 2009-10 मध्ये यासाटी 495 कोटी रुपयांची प्रोव्हीजन करण्यात आली होती. त्यापैकी 105 कोटी रुपयांचा निधी पोलिसांना आधुनिक शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठीचा मान्य करण्यात आला होता. 120 कोटी रुपये पोलिसांसाठी अत्याधुनिक साधनसामुग्री, संगणीकरणासाठी मंजूर करण्यात आलेला आहे. अशा प्रकारचे आतंकवादी हल्ले होणार नाही यासाठी पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, अलीकडच्या काळात संपूर्ण जगात, देशात आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

राज्यात आतंकवादी हल्ले झालेले आहेत व या सर्व घटनांचा मुकाबला आपल्या सर्वांना करावा लागला आहे. पुण्यातील घटना राज्याच्या दृष्टीने दुर्दैवी असली तरी सुध्दा राज्य शासनाने मुंबईत झालेल्या 26.11 च्या आतंकवादी हल्ल्यानंतर अनेक प्रकारची गंभीर पावले महाराष्ट्र शासनाने उचलली आहेत. त्यामध्ये राज्य पोलीस दलाची संख्या वाढविणे, गस्त वाढविणे, पोलीस दलाला आधुनिक शस्त्रास्त्रे पुरवणे,

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

मेटल डिटेक्टर्स आणि बॉम्ब डिटेक्टर्स अशा प्रकारची अत्याधुनिक सुविधा पुरविणे या सारख्या उपाययोजना राज्य शासनाने कृतीने करावयास घेतल्या आहेत. गेल्या वर्षभरात म्हणजेच 365 दिवसात एकूण 349 दिवशी अशा प्रकारचे अलर्टस् देण्यात आले होते. विविध एजन्सीकडून राज्यासाठी अलर्ट देण्यात आला नाही असा एखादाच दिवस गेला असेल. एक अलर्ट देण्यात आला की, पोलीस दलातील कर्मचा-यांच्या सुट्टया रद्द केल्या जातात. आठवडयाची सुट्टी रद्द केली जाते. वेगवेगळे 349 अलर्टस् देण्यात आलेले असल्यामुळे जवळजवळ 80 पोलिसांच्या हक्काच्या सुट्टया पोलीस दलाने रद्द केल्या आहेत. डोळयात तेल घालून पोलीस काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. एका बाजूला अशा प्रकारची दक्षता घेत असतांना अतिरेक्यांकडून सॉफट टारगेटस शोधले जातात. सगळयाच ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. त्याचबरोबर मुंबई वा पुणे शहरातील प्रत्येक बसमध्ये, रेल्वेमध्ये, हॉटेलमध्ये जात येत असतांना प्रत्येक माणसाची तपासणी करणे त्या माणसांच्या दृष्टीने देखील अडचणीचे व त्रासदायक आहे. पुण्याच्या बॉम्ब स्फोटाचा येथे उल्लेख करण्यात आला होता.पुण्याचा अलर्ट देण्यात आला होता तेव्हा चार ठिकाणचा अलर्ट देण्यात आला होता त्यावेळी छाबडा हाऊस आणि लाल देऊळ या ठिकाणी पुरेपूर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. छाबडा हाऊसला मी स्वत: भेट दिली होती . पोलीस दलाने ठेवलेल्या पोलीस सुरक्षेबद्दल छाबडा हाऊसमध्ये राहणा-या इस्त्रायली धर्मगुरुंनी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते. तेथ पर्यत अतिरेक्यांना तेथे जाता आले नव्हते हे एक प्रकारे पोलिसांचे यश आहे परंतु दुस-या बाजूला पुण्यातील जर्मन बेकरीत स्फोट झाला होता .ही छोटीशी बेकरी असून तिचे नाव जरी जर्मन बेकरी असे असले तरी ती फार मोठी बेकरी नाही. त्या विभागातील सगळया हॉटेल्सना , दुकानांना, आस्थापनांना सेन्सॉराईज्ड करण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला होता. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या बाबतीत पोलिसांनी सांगतले होते. तसेच संशयास्पद काही वस्तू आढळून आल्या तर पोलिसांना कळवा असे सांगितले होते. जर्मन बेकरीमध्ये एक सीसीटीव्ही आतल्या बाजूला बसविला होता. या जर्मन बेकरीने अतिक्रमण करुन बाहेरच्या बाजूला लोकांची बसण्याची व्यवस्था केली होती त्या ठिकाणी मात्र सीसी टीव्ही कॅमेरा बसविण्यात आला नव्हता त्यामुळे त्या ठिकाणी बॅंग कोणी ठेवली याचा पोलीस शोध घेत आहेत.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

पोलिसांनी दिलेल्या सूचना जर त्यांनी पाळल्या असत्या तर आतापर्यंत आरोपी कदाचित सापडले असते या सगळया एरियामध्ये पोलिसांनी लोकांना जागरुक करण्याचा प्रयत्न केला होता .तसेच त्या विभागामध्ये पोलिसांचा अधिकचा बंदोबस्त देखील ठेवण्यात आला होता.तरीसुध्दा एक बॅग तेथे ठेवण्यात आली होती. जर्मन बेकरीत झालेल्या बॉम्ब स्फोटाचा तपास अद्याप सुरु असल्यामुळे त्या तपासावर कोणताही परिणाम होऊ नये म्हणून मी सदनामध्ये सविस्तर बोलणार नाही. मी जर सविस्तर बोललो तर या प्रकरणातील पळून गेलेल्या आरोपींना फायदा होऊ शकतो. त्या ठिकाणी एक दीड तास एक बॅग बेवारसपणे पडलेली होती. त्या ठिकाणी लोक येत होते आणि उपहारगृहातील पदार्थ घेऊन निघून जात होते परंतु त्या हॉटेलमधील व्यक्तिला किंवा येणाऱ्या ग्राहकाला त्या बेवारस बॅगच्या बाबतीत थोडा जरी संशय आला असता तरी दोन मिनिटाच्या अंतरावर पोलीस तैनात करण्यात आले होते परंतु दुर्दैवाने तसे घडू शकले नाही म्हणून बॉम्ब स्फोटात 17 जण मृत्युमुखी पडले आणि 56 जण जखमी झालेले आहेत. केन्द्र सरकारने आतापर्यंत राज्य सरकारला जे जे अर्लटस् दिले होते तसेच जे इनपूट इनफर्मेशन दिले होते त्या प्रत्येक वेळी अत्यंत गाभीर्याने पोलिसांनी संरक्षण करण्याची भूमिका घेतली होती. त्याचबरोबर देशात कोणत्याही वेळी अशा प्रकारचे कृत्य घडल्यास पोलीस आपोआप अर्लट होतात आणि सवेदनशीलपणाने संरक्षण् करण्याची भूमिका घेत असतात. सभापती महोदय, काही वेळा कोणताच पुरावा न ठेवल्यामुळे तपासामध्ये विलंब लागण्याची शक्यता असते .काही वेळा तपास वेगवेगळया यंत्रणेने लावला असल्याचेदेखील आपल्याला पहावयास मिळते. अहमदाबाद , गुजराथ, कर्नाटक राज्यामध्ये बॉम्ब स्फोट झाले होते. तसेच उत्तर भारतामध्ये तीन राज्यामध्ये स्फोट झाले होते या स्फोटाचा तपास मुंबईच्या क्राईम शाखेने लावला होता. एका गाडीच्या चोरीचा तपास करीत असतांना एवढया मोठया स्फोटाचा तपास करुन त्याचा पर्दाफाश करण्यामध्ये आपल्या पोलिसांना बॉम्ब स्फोट झाल्यानंतर तीन चार महिन्यानी यश आले होते. या सगळया स्फोटातील आरोपी संपूर्ण देशामधून तपासण्यात आले होते. आपल्या पोलीस दलामध्ये निश्चितपणे क्षमता आहे.परंतु मी खालच्या सभागृहात सांगितले होते की,अजूनही या प्रकरणाचा तपास लागलेला नाही.हा तपास

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

महाराष्ट्राच्या ए.टी.एस.ने आणि पोलिसांनीच केला पाहिजे हा मुद्दा राज्य सरकारने यापूर्वीसुध्दा प्रतिष्ठेचा केला नव्हता आणि आता सुध्दा हा तपास आमच्याकडेच असला पाहिजे असा प्रतिष्ठेचा मुद्दा करणार नाही. सभापती महोदय, या संदर्भात माझ्या सह पोलीस दलाची अशी इच्छा आहे की, या प्रकरणातील आरोपी लवकरात लवकर सापडले पाहिजेत. हे आरोपी जर असेच मोकाट सुटले तर आणखी काही ठिकाणी नुकसान करण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, या प्रकरणात पहिल्या दिवसापासून नॅशनल इनव्हेस्टीगेशन एजन्सी, सी.बी.आय., केन्द्र सरकाराच्या आय.बी. सारख्या वेगवेगळया यंत्रणा इतकेच नव्हे तर देशभरातील अन्य ए.टी.एस.चे सहकार्य आम्ही घेतलेले आहे.

नंतर श्री.सरफरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

विविध तंत्रज्ञान देशामध्ये आणि देशाच्या बाहेरुन सुध्दा पोलिसांनी या तपासासाठी आणण्याचा प्रयत्न केला आहे. आरोपी सापडले नाहीत ही गोष्ट खरी असली तरी पोलिसांची पथके अहोरात्र देशभर फिरुन आरोपींचा शोध घेत आहेत. महाराष्ट्राचे पोलीस दल आरोपीला पकडल्याशिवाय राहणार नाहीत या गोष्टीचा मी सदनाला विश्वास देतो. यासाठी आवश्यक असलेला कालावधी आपण जर देऊ शकलो नाही आणि दबाव आणला तर कदाचित बोगस आरोपींना अटक होण्याची शक्यता असते, त्यामधून आपल्याला तपास झाल्याचे समाधान मिळू शकते. परंतु खरे आरोपी बाहेर राहिले तर धोका वाढू शकतो. याकामी कुणाचेही सहकार्य घ्यायला पोलीस दलाला कमीपणा वाटलेला नाही. वेगवेगळया राज्यांमधील अेटीएस, तज्ज्ञांचे सहकार्य पोलीस दल घेत आहे. पोलीस अतिशय गांभीर्याने एक आव्हान म्हणून या केसकडे पहात आहेत. तसेच, मी हेही स्पष्ट करतो की, यापेक्षा अधिक चांगले तंत्रज्ञान कुणाकडे उपलब्ध असेल, सेंट्रल एजन्सीज काय, अन्य राज्यांमधील अेटीएसचे सुध्दा सहकार्य आम्ही घेऊ. याकरिता अधिकचे सहकार्य घेऊन हा तपास लागला पाहिजे. सभागृहातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांच्या मताशी मी निश्चित सहभागी आहे. अधून मधून भारतातील हात वापरले जात आहेत पण हा विचार आणि मेंदू पाकिस्तानातील आहे ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. त्या देशामध्ये घडणाऱ्या घटनांच्या प्रतिक्रिया इथे उमटविण्याचा प्रयत्न केला जात आहे. या देशाच्या विरुध्द पुकारलेले एक प्रकारचे हे युध्द आहे ही वस्तुस्थिती 26/11 च्या खटल्यामध्ये लक्षात आली आहे. आणि हे नुकसान करण्याच्या पाठीमागे नेहमी महाराष्ट्राला टारगेट केले जात आहे. कारण आपले राज्य हे खऱ्या अर्थाने देशाचे शक्तिस्थळ आहे. देशाला दुबळे करण्यासाठी महाराष्ट्रावर हल्ले होत आहेत. हा संभाव्य धोका लक्षात घेऊन या सदनामार्फत राज्यातील जनतेला मी आवाहन करतो की, बेवारस वस्तू, संशयास्पद व्यक्ती असेलतर पोलिसांना माहिती देण्यासाठी आपणासाठी हेल्पलाईन सुरु केली आहे. अशा लोकांची थोडी जरी माहिती आपण दिली तरी अशाप्रकारे संशयास्पद व्यक्तिवर लक्ष ठेवणे पोलिसांना शक्य होईल. व्यापार व उद्योगासाठी जी वेगवेगळी आस्थापने उभी राहिली आहेत त्यांनी आवश्यक असणारी ग्राहकांची सुरक्षा या गोष्टीकडे निश्चितपणे लक्ष दिले पाहिजे. अनेक ठिकाणी कोटयावधी रुपये खर्च करुन मॉल उभे केले जात आहेत.पोलिसांच्या सूचनेनुसार त्याठिकाणी सीसीटीव्हीसारख्या बाबी, मेटल डिटेक्टरसारख्या बाबी सुरक्षेच्या बाबतीत योग्य ती काळजी घेतली जात नाही. एखादा अपघात होतो, एखादा इन्सिडन्स घडतो त्यावेळी पोलिसांवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. आर. आर. पाटील....

नेहमी दोषारोप आणि खापर फोडले जाते. व अशा यंत्रणा सुध्दा मोकळया राहतात. सुरक्षेचा प्रश्न असल्यामुळे त्यांनी सुध्दा योग्य पध्दतीचे सहकार्य पोलिसांना दिले पाहिजे. यामध्ये जे जखमी झाले आहेत, व जे मयत झाले आहेत त्यांना मदत करण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. तीन लोकांच्या बँकेचे अकाऊंट नंबर आणि त्यांचे राहण्याचे पत्ते न दिले गेल्यामुळे त्यांना मदत देता आली नाही. ते पैसे जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा आहेत. ज्याप्रमाणे राज्य सरकारकडून मदत दिली जात आहे त्याप्रमाणे केंद्र सरकारकडूनही मदत दिली जात आहे. केंद्र सरकारला त्यांच्या प्रोफार्मामध्ये माहिती पाठवून बॉम्बस्फोटामध्ये जे मयत झाले व जखमी झाले आहेत त्यांना लवकरात लवकर मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जर्मन बेकरीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी सविस्तर विश्लेषण केले आहे. यापूर्वी देखील या सदनामध्ये वारंवार पुण्यामध्ये अतिरेक्यांच्या असलेल्या केंद्राच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्यामध्ये 26.3.2007 रोजी शासनाने उत्तर देतांना पुण्यामध्ये आम्ही अेटीएसची शाखा किंवा कार्यालय करण्याच्या दृष्टीने पावले उचलीत आहोत असे म्हटले होते. माझा प्रश्न असा आहे की, पुण्याच्या पोलीस आयुक्तांकडून, माननीय गृहमंत्र्यांकडून व अेटीएसच्या अधिकाऱ्यांकडून या बॉम्ब स्फोटानंतर वेगवेगळी विधाने केली गेली आहेत असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. पोलीस आयुक्तांनी सातत्याने सांगितले की, त्या जर्मन बेकरीमध्ये एक ते दीड तास बॉम्ब पडून होता, त्यामुळे तो बॉम्बस्फोट झाला. परप्रांतीय गुन्हेगार बॉम्बस्फोट करण्याचा हेतू ठेवून इथपर्यंत पोहोचले त्यांना रोखण्यासाठी आपण काय कारवाई केली? दुसरा प्रश्न असा की, काही मजूर या स्फोटामध्ये मृत्यूमुखी पडले आहेत त्यामध्ये अनेक नेपाळी लोक आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

त्या नेपाळी मजदूर युनियनचे काम हे मास्टर थापा करतात. त्यांनी आपल्याकडे निवेदन दिले आहे, आम्ही जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन दिलेले आहे. त्यांची अशी मागणी आहे की, दिल्ली येथे ज्याप्रमाणे नेपाळ कॉन्सुलेट आहे, त्याप्रमाणे ते मुंबईमध्ये देखील असावे. जेणेकरुन या सर्व आतंगविरोधी कारवायांच्या संदर्भात पाकिस्तान असो, नेपाळ असो, त्यांना बेकायदेशीर गोष्टी रोखण्यापासून मदत होऊ शकेल. म्हणून मुंबईमध्ये सुध्दा नेपाळ कॉन्सुलेट करण्याच्या संदर्भात आपण केंद्र सरकारकडे शिफारस करणार आहात काय ? माझा दुसरा मुद्दा आहे आणि माझा तिसरा अत्यंत महत्वाचा मुद्दा असा आहे. याठिकाणी तुम्ही ग्लोबल स्वरुपात सांगितले आणि याबाबतीत कितीही दक्षता घेतली असती, पोलिसांनी सी.सी.टीव्ही बसविले असते तर काय झाले असते ? या सगळया मुद्यांपेक्षा मला पुढे जाऊन असे म्हणावयाचे आहे की, ज्यावेळेला बॉम्बस्फोट झाला त्याठिकाणी घटना घडल्यानंतर कॉर्डन ऑफ केले आणि मग तेथे कोणालाही जाऊ देत नव्हते. सदरहू घटना घडल्यावर सुध्दा एस.एम.एस.वर पहिली अधिकृत माहिती अशी येत होती की, गॅस सिलेंडरचे स्फोट झाले. या सगळया गोष्टींमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गोंधळाचे वातावरण तयार झाले. आम्ही वृतपत्रामध्ये असे वाचले की, आपल्या पोलीस महासंचालक श्रीमती रश्मी शुक्ला आणि पोलीस आयुक्त हे दोघेच जण विधाने करणार. पण असे असूनही वेगवेगळी विधाने येत होती. याबाबतीत तुम्ही पुढे काय कारवाई करणार आहात ? हा माझा प्रश्न आहे.कारण वेगवेगळया विधानांमुळे आरोपी बाजूला रहात आहेत. पोलीस कष्ट करीत आहेत हे आमहाला देखील मान्य आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी यासंदर्भात तीन प्रश्न विचारलेले आहेत. पण आम्हाला उत्तर मिळालेले नाही.

उपसभापती : एकावेळी तीन प्रश्न विचारले आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण मुंबईमध्ये ए.टी.एस.पूर्वीच स्थापन केलेले आहे. पण औरंगाबाद, पुणे आणि नागपूर येथे सुध्दा ए.टी.एस.च्या शाखा काढण्याच्या बाबतीत यापूर्वीच निर्णय घेण्यात आला आहे. काही अधिकारी अपॉईंट देखील केलेले आहेत. पण तेथील काही जागा रिक्त आहेत. त्या देखील लवकर भरल्या जातील आणि पुन्हा एकदा या सगळया नवीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील. . . .

धोक्याच्या बाबतीत आढावा घेऊन ए.टी.एस.मधील जागा सुध्दा वाढविल्या जातील. याचे कारण असे आहे की, जरी पोलीस सुरक्षिततेच्या बाबतीत काम करीत असले तरी सुध्दा पोलिसांना बाकीच्या ड्युटीज् सुध्दा असतात. मग लॉ ॲण्ड ऑर्डरचे प्रश्न असतील, सण-समारंभासाठी बंदोबस्त ठेवावयाचे असतो, अशा वेळी सुरक्षिततेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष व्हावयास नको म्हणून ए.टी.एस.च्या संख्येबाबत पुन्हा एकदा आढावा घेऊन ती वाढविली जाईल हे सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे. त्याचबरोबर पुणे येथे जे परप्रांतीय आणि परदेशी अनधिकृत नागरीक येत आहेत. अशा परदेशी नागरिकांचा व्हिसा तपासणे, त्याची मुदत आहे की नाही ते तपासणे याबाबतीत पोलिसांनी मोहीम सुरु केलेली आहे. अशा वेळी तेथे जे संशयास्पद लोक आढळून येत आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम पुणे पोलिसांनी सुरु केले आहे आणि मोठया प्रमाणात नेपाळ मधून लोक महाराष्ट्रामध्ये येत आहेत आणि ते वेगवेगळया इंडस्ट्रीमध्ये कमी पगारामध्ये काम करीत असल्यामुळे त्यांना तेथे कामावर ठेवले जाते. अनेक ठिकाणी गुन्ह्यामध्ये सुध्दा त्यांचा हात असल्याचे आढळून आले आहे. एकदा येथे गुन्हा केल्यानंतर नेपाळला पळून गेल्यानंतर पुन्हा त्या लोकांना येथे परत आणणे हे पोलिसांना सुध्दा अशक्य होत आहे. मुंबईतील अनेक चोरीच्या प्रकरणांमध्ये कमी पगारावर ठेवण्यात आलेले कामगारांचा हात असल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे जे परदेशी नागरीक कामावर ठेवले जातील, त्यांचे सुध्दा पोलिसांकडे रेकॉर्ड ठेवले जाईल आणि त्यांच्या चारित्र्याबद्दल त्या-त्या देशातील संबंधित ॲथॉरिटीला अधिकृतपणे विचारले जाईल आणि जर ते लोक तेथे गुन्हेगार असतील तर त्यांना येथून गुन्हा करण्यापूर्वीच येऊन घेऊन जावे असे सांगण्यात येईल. अशा प्रकारची भूमिका घेण्याबाबत मी पोलीस दलाला सूचना केलेल्या आहेत आणि याबाबतीत सर्व्हेक्षण करण्याचे काम पोलिसांनी सुरु केलेले आहे. तसेच नेपाळ कॉन्सुलेटची शाखा मुंबईमध्ये असावी असा मुद्दा सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडला आहे. मी ही बाब तपासून पाहीन आणि जर आवश्यकता असेल तर आम्ही केंद्र सरकारला तशा प्रकारची विनंती करु.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या गंभीर घटनेची सदनाला माहिती देत असताना आदरणीय गृहमंत्र्यांनी अतिशय सुस्पष्टपणे सर्व माहिती दिली आहे आणि याठिकाणी नम्रपणे एक दक्षता घेतली की, काही महत्वाची माहिती लीक होऊ नये, जेणेकरुन त्याचा उपयोग आरोपींना....

. . . .2 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . . .

होणार नाही. मात्र आपण दोन-तीन दिवसापूर्वी वाहिन्यांवर पाहिले असेल. तेव्हा पुणे येथील जे अधिक्षक आहेत, त्यांनी सारख्या प्रेस कॉन्फरन्स घेऊन माहिती देणे किंवा बातम्या देणे, या बाबतीत केंद्र शासनाच्या गृह विभागाने सुध्दा आयुक्तांच्या बाबतीत नाराजी व्यक्त केली होती आणि माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब, आपण स्वत: सांगितले होते की, मी याची चौकशी करीन आणि याबाबतीत काय करता येईल ते पाहीन. माझी अशी विनंती राहील की, या सर्व गंभीर घटनांच्या बाबतीत पोलीस आयुक्तांसारख्या महत्वाच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा . . . . .

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, ज्या बाबी लोकांना कळणे आवश्यक आहे तेवढयाच बाबी लोकांना सांगितल्या जातील पण तपासाच्या दृष्टीने तपासावर ज्याचा परिणाम होऊ शकेल अशा माहित्या गुप्त ठेवण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. आपण ज्या घटनेचा उल्लेख करीत आहात ती घटना अशी होती की, या घटनेमध्ये गुन्हा घडल्यानंतर इतक्या दिवसात आरोपी सापडलेले नाहीत. काही घटना मला अशा सांगता येतील की, राज्यामध्ये गुन्हा घडत असताना रंगेहात जागेवर त्यांना पकडले आहे. पण परवा घडलेली घटना अशी होती की, गुन्हा घडवण्याचा कट रचला जात होता आणि पाकिस्तानमधून तशा इन्स्ट्रक्शन्स येत होत्या. मुंबईत महत्वाच्या तीन ठिकाणी आगी लावण्याचा कट केला जात होता. त्याबाबतची माहिती पोलिसांना योग्य वेळी मिळाली आणि कुठलाही घातपात करण्यापूर्वीच पोलीस त्यांना पकडू शकले. खूप अभिनंदनीय कामगिरी पोलिसांनी केलेली आहे. सभापती महोदय, हे आरोपी ताब्यात ठेवत असताना एफ.आय.आर.मध्ये या सगळया गोष्टीच्या नोंदी असणे आवश्यक आहे अन्यथा कोर्टातून पोलीस कस्टडी मिळू शकत नाही. एफ.आय.आर.मध्ये नोंद केल्या नंतर ते रेकॉर्ड सगळयांसाठी उपलब्ध होते. म्हणून सभापती महोदय, जे रेकॉर्ड उपलब्ध होणार होते तेवढयापुरतेच त्यांच्याकडून सांगण्यात आले होते. तरी सुध्दा अशा कोणत्याही बाबी की, ज्यामुळे केंद्र सरकारचा किंवा राज्य सरकारचा माहिती मिळण्याचा सोर्स नष्ट होईल अशा पध्दतीची कोणतीही माहिती केवळ प्रसिध्दीसाठी द्यावयाची नाही, अशा पध्दतीच्या सूचना मी दिलेल्या आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी पुण्याच्या घटनेबद्दल अतिशय सविस्तरपणे माहिती दिलेली आहे. (अडथळा) मला वाटते जी आवश्यक माहिती गुप्त ठेवावयाची आहे ती ठेवून अतिशय चांगली माहिती सभागृहाला दिली. एकूणच ही बॉम्बस्फोटाची प्रकरणे आणि सर्वसामान्यांच्या मनामध्ये निर्माण होणारी असुरक्षितता, त्यातच गुन्हेगारांचा तपास न लागणे ही बाब अधिकच असुरक्षितता वाढायला कारणीभूत ठरते. अशा वेळी आतापर्यंत पोलीस खाते ज्या पध्दतीने काम करीत आहे ती पध्दत गुन्हेगारी जगतामध्ये वावरणाऱ्या सगळयांना परिचयाची झालेली असते. त्यामुळे पोलीस यंत्रणेची जी काही योजना आहे त्याच्यापलीकडे जाऊन काय करता येईल अशा पध्दतीचे एक नियोजन या सगळया कटांमध्ये दिसून येत आहे. हे नियोजन आधी आपल्यापर्यंत पोहचावे यासाठी पोलीस दलामध्ये आता ते जे प्रयत्न करण्यात येत आहेत त्यापेक्षा अधिकचे काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले. . .

प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी ए.टी.एस. किंवा पोलिसांचे जे वेगवेगळे विभाग आहेत ते काम करीत असतीलच पण त्याही पलीकडे जाऊन या सगळया बाबतीतील इंटेलिजन्स मिळविण्यासाठी ठिकठिकाणी अधिक प्रमाणात यंत्रणा निर्माण करणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. कारण दिल्ली्वरुन ज्यावेळी सूचना येतात त्यावेळी त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवलेला आहे. तेथे सुरक्षा देण्यात आलेली आहे, हे जेव्हा त्या अतिरेक्यांना समजते त्यावेळी दुसरे एखादे ठिकाण निवडून त्या ठिकाणी त्यांचा मोहरा वळतो. अशा प्रकारे या सगळया घटना घडत आहेत. तेव्हा याबाबतीत विचार करण्यासाठी मुंबईत मुख्य केंद्र ठिकाणी स्वतंत्र असा कृती दल काढून तो आपल्या जवळ व्यवस्थितपणे माहिती घेईल आणि दिल्ली्वरुन सूचना येण्याची वाट न पहाता आपल्या गृहखात्याकडून मुंबईत सगळीकडे सूचना दिल्या जातील यासंदर्भात शासन यंत्रणा उभारु शकेल काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांच्या एका मताशी मी सहमत आहे. जोपर्यंत यातील आरोपी सापडत नाहीत तोपर्यंत लोकांच्या मनामध्ये थोडेसे भितीचे वातावरण राहणे हे स्वाभाविक आहे. पण सभापती महोदय, मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, आरोपींना लवकरच पकडले जाईल आणि भितीचे वातावरण आणि लोकांच्या मनातील साशंकता लवकरात लवकर कमी होईल. ही गोष्ट खरी आहे की, प्रत्येक वेळी अतिरेकी आपले टेक्निक बदलत आहेत. पहिल्या बाबतीत अतिरेकी कटात वापरलेले टेक्निक ते पुन्हा कधीच वापरत नाहीत. पुन्हा काही तरी तिसराच मार्ग काढीत आहेत. परंतु त्यांनी कितीही टेक्निक बदलले तरी आज पर्यंत देशामध्ये जेवढे स्फोट झालेले आहेत त्या सगळयांचा तपास देशभरातील पोलीसदलाने केलेलाच आहे. त्यामुळे त्यांनी यावेळी जरी वेगळे टेक्निक वापरले असले तरी सुध्दा तपासात आरोपी सापडू शकतील.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील .....

या ठिकाणी इंटेलिजेंसच्या बाबतीत महत्वाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अतिरेकी कारवाया टाळण्यासाठी हा महत्वपूर्ण उपाय आहे. आपण पोलिसांची संख्या वाढवून वाढवून किती वाढवू शकू ? प्रत्येक माणसाची झडती घेणे तरी किती शक्य होईल ? त्यावरचा योग्य उपाय एकच आहे आणि तो म्हणजे आगाऊ माहिती मिळणे आणि आपले इंटेलिजेंस मजबूत असणे. देशामध्ये आपण सगळ्यात अगोदर महाराष्ट्र इंटेलिजेंस अकॅडमी सुरु केलेली आहे. आता इंटेलिजेंस विभागामध्ये लागणारे अधिकारी आणि कर्मचारी पोलीस दलातून डेप्युटेशनवर घेतले जात होते. तीन वर्षानंतर ते मूळ दलात गेले तर त्यांनी मिळविलेल्या माहित्या, त्यांनी उभे केलेले सोर्स, त्याचे माहीतगार हे सगळेच बदलत होते आणि माहितीमध्ये सातत्य नव्हते. म्हणून राज्यामध्ये आपण एक निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे आपण आय. बी. च्या धर्तीवर 50 टक्के थेट इंटेलिजेंस विभागामध्ये नेमणुका करतो. त्यातील पहिली बॅच भरलेली आहे. त्यांचे प्रशिक्षण संपलेले आहे आणि लवकरत ही बॅच महाराष्ट्र पोलीस दलाला उपलब्ध होईल. राज्याबाहेरच्या ज्या घटना आहेत त्यासाठी आपल्याला केंद्रीय एजन्सीची मदत लागेल परंतु महाराष्ट्रामध्ये ज्या घटना घडत आहेत त्याबाबतीत आपले इंटेलिजेंस ब्युरो सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनांद तावडे प्रश्न विचारतील.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याची अनुमती मागतात)

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यातील सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी प्रश्न विचारला. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. त्यांना बोलण्याची पूर्ण संधी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली. एका लक्षवेधी सूचनेवर जर 100 सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्यासाठी हात वर केला तर एकाचवेळी 100 सदस्यांना कशी काय संधी देता येईल ? संध्याकाळपर्यंत लक्षवेधी सूचना चालली तरी माझी काही हरकत नाही. भारतीय जनता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना संधी दिली नव्हती म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना प्रश्न विचारण्याची अनुमती दिलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी गुप्तचर संस्था तसेच बाकी सगळ्यांची चर्चा केली. राम प्रधान समितीच्या अहवालामध्ये पृष्ठ क्रमांक 84 वरील मुद्दा क्रमांक 3.8.9 वर स्पष्टपणे म्हटले आहे की, पुणे हे अतिसंवेदनशील व व्यूहरचनेच्या दृष्टीने अतिरेक्यांचे संभाव्य लक्ष असलेले एक शहर आहे. पुण्यात हल्ला होण्याच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर तेथील पोलिसांच्या सज्जतेची चाचपणी करण्याच्या दृष्टीने आम्ही पुण्याला भेट दिली. तेथील काही अधिकारी नक्षलग्रस्त दशहतवादाचा प्रभाव असलेल्या क्षेत्रात काम केलेले असले तरी सुध्दा ते सुसज्ज नव्हते व देशाच्या समोर आ वासून उभे असलेल्या धोक्याची फारच थोडी कल्पना त्यांना होती हे पाहून प्रधान समिती आश्चर्यचकीत झाली. याला गुप्तचर यंत्रणेची गरज नाही. प्रधान समितीने स्पष्ट म्हटले आहे की, चर्चा केली, आम्हाला काढले, घेतले, इतके सगळे झाले. त्यानंतर पुण्यामध्ये काय सज्जता केली होती ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या सगळ्या गोष्टींबाबत इतक्या सविस्तरपणे माहिती दिलेली आहे तेच उत्तर पुन्हा एकदा मला रिपीट करावे लागते. सभापती महोदय, प्रशान समिती ही मुंबईवर जो आत्मघातकी हल्ला झाला त्यासंदर्भात नेमलेली यंत्रणा होती. त्यानंतर मुंबईमध्ये फोर्स वन गठीत केले. त्याचबरोबर प्रत्येक शहरामध्ये आणि पुण्यामध्ये सुध्दा अशा पध्दतीचा आत्मघातकी हल्ला झाला तर पुणे, औरंगाबाद, नागपूर या सगळ्या ठिकाणी क्विक रिस्पॉन्स टीमचे गठन केले आहे. पुण्यामध्ये सुध्दा केलेले आहे. पण त्या हल्ल्याचा प्रकार आणि या हल्ल्याचा प्रकार पूर्णपणे वेगळा आहे. या घटनेमध्ये स्फोट घडविला आहे आणि त्या घटनेमध्ये मरण्यासाठी येऊन गोळ्या घालून त्यांनी माणसे मारली होती. तशा पध्दतीने आत्मघातली हल्ला केला तर त्याला सक्षमपणाने तोड द्यायला क्युआरटी गठीत केलेली आहे. बंदुका घेऊन लढावयास येणारे आणि चोरुन बॅग ठेऊन जाणारे या दोन्हीतील फरक आपण लक्षात घेतला पाहिजे. (अडथळा) राम प्रधान समितीने जे सांगितले होते त्याप्रमाणे तशा पध्दतीचा हल्ला झाला तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

त्यासाठी प्रत्येक शहरामध्ये आपण खास एवढ्याच कामासाठी क्यूआरटी नेमलेल्या आहेत. त्यांना योग्य पध्दतीचे प्रशिक्षण दिलेले आहे. त्यांना योग्य पध्दतीची शस्त्रास्त्रे दिलेली आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या एटीएसचे प्रमुख श्री. रघुंवंशी यांचे त्या अनॉमी रॉय सारखे काय आहे ते कळत नाही. प्रथमत: श्री. रघुवशी यांनी पुण्यामध्ये जाऊन संभावित आरोपी कोण असतील ते जाहीर केले.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयप्रकाश छाजेड)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आपण सांगता की, गुप्ततेची माहिती असल्यामुळे, महत्वाची बातमी असल्यामुळे सदनामध्ये त्याची चर्चा करता येत नाही. त्यामुळे आम्ही पथ्य पाळतो. परंतु हे महाशय ते जाहीर करीत आहेत. केंद्रीय गृहमंत्री श्री.चिदंबरम यांनी श्री.रघुवंशी यांना आवरा असे माननीय गृहमंत्र्यांना आदेश दिले आहेत. श्री.रघुवंशी हे कोण आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश राज्याच्या गृहमंत्र्यांना दिलेले आहेत. मला माननीय गृहमंत्र्यांना अतिशय गंभीरपणे विचारावयाचे आहे. श्री.रघुवंशी यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी ही मागणी करण्यासाठीच मी उभा आहे. राज्याच्या गृहमंत्र्यांना त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यास सांगितले असल्यामुळे शासन त्यांच्याविरुध्द काय कारवाई करणार आहे ते सांगावे. कारण हा आतंकवादी हल्ला कोणी केला हे सांगण्यासाठी संबंधित आयुक्त प्रेससमोर स्टेटमेंट करतात. ते असे म्हणतात की, हा हल्ला पाकिस्तानन केला असा संशय आहे, त्यामध्ये हया ज्या दोन-तीन संघटना आहेत त्या असाव्यात असे आम्हाला वाटते. त्यांनी असे सांगितले नाही, असे ते म्हणत होते. हिंदू आतंकवादी कोण आहेत हे शोधण्यासाठी त्यांनी प्रेसमध्ये जाहीर केले. पुण्यामध्ये ज्या हिंदू संघटना आहेत त्यांच्याकडे पोलीस पाठविले. शिवसेनेच्या शाखा प्रमुखांकडे माणसे पाठविली. हा कोण द्वेष्टा आहे, जो साध्वीला सतवतो. हिंदुत्वाच्या विरोधासाठी हयांच्या डोक्यामध्ये असा कोणता किडा भरला आहे ? देशावर पाकिस्तानच्या माध्यमातून हल्ला होत असताना इकडील हिंदू संघटनेकडे बोटे वळवून हे सर्व प्रकरण वळविण्याचे काम करीत आहेत, त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे की नाही ? हिंदू संघटनांची पोलिसांनी चौकशी केली की नाही ते सांगावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, तपास करणा-या अधिका-यांना आरोपीच्या पिंजयात उभे केल्यावर ते येथे येऊन उत्तरे देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्याबद्दल येथे मते व्यक्त करणे हे देखील बरोबर नाही. पुण्याच्या घटनेसंबंधी श्री.रघुवंशी यांनी कोठेही प्रेस कॉन्फरन्स घेतलेली नाही. मुंबईमध्ये कट करणारे जे दोन लोक होते, त्या लोकांना मुंबईत तीन ठिकाणी जाळपोळ करुन नुकसान करावयाचे होते. हा जो कट चालला होता ती वेगळी घटना आहे. पुण्याच्या घटनेशी या घटनेचा काही संबंध नाही. त्या घटनेतील आरोपींच्या संदर्भात त्यांनी लोकांना प्रेसद्वारे सांगितले होते. यावर केंद्र सरकारने थेट मला नाही, पण अशी नावे जाहीर

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

श्री.आर.आर.पाटील....

करण्यामुळे पाकिस्तानचा फोन बंद होण्याची शक्यता असल्यामुळे पुढील माहिती मिळू शकणार नव्हती. अशाप्रकारचे मत व्यक्त केल्याचे मला समजले आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, या घटनेतील नावे जाहीर केली नाही, आरोपी कोर्टासमोर हजर केले नाही तर त्यांना पोलीस कस्टडी कशी मिळणार ? ज्यावेळी त्यांना आरोपासह कोर्टासमोर उभे केले असते तर एफआयआरमधील या उल्लेखामुळे ही नावे बाहेर गेलीच असती. त्यामुळे ही गोष्ट गोपनीय ठेवणे शक्य नव्हते असे एक मत आहे. हया सर्व गोष्टी मी तपासत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी साध्वीसंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. पण मी या सदनाच्या माध्यमातून सर्वच राजकीय पक्षांना आवाहन करतो. अतिरेकी कोणत्याही जातीचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत, त्यांना जात धर्म नसतो, अतिरेकी हे अतिरेकीच असतात. म्हणून अशा वेळी जे कोणी असातील त्यांच्यावर कारवाई केली गेली पाहिजे....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जर्मन बेकरीसंबंधी हिंदू संघटनांची चौकशी करण्याचे काम का करण्यात आले, ते केले की नाही ते सांगावे. यामध्ये साध्वीचा काय संबंध आहे ?

श्री.आर.आर.पाटील : एखादी घटना घडल्यानंतर पोलिसांनी पहिल्यांदा हे निश्चित करावयाचे असते की, ते आरोपी आहेत असे समजून त्यांना अटक करायची असते. परंतु असे घडत नाही. पोलिसांच्यादृष्टीने सगळया अँगलने सगळे गुन्हेगार ओपन असतात. गुन्हा कोणी केला हे पोलिसांनी तपासले पाहिजे. गुन्हेगार समोर आणले पाहिजेत. पोलिसांनी कोणाला चौकशीसाठी ताब्यात घेतले ते तरी मला सांगावे. एखाच्या धर्माच्या लोकांकडे बघायचे सुध्दा नाही, असे केले तर ते चूक आहे. जे आरोपी आहेत त्यांना पकडलेच पाहिजे...

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, जर्मन बेकरीच्या घटनेपुरता हा मर्यादित प्रश्न आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मला माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा सन्मान राखायचा आहे. मला बोलण्याचा अधिकार आहे. माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या हल्ल्यात पाकिस्तानचा हात असताना हिंदू संघटनांची चौकशी करण्याचे कारण काय आहे ?

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : मी सांगितलेले आहे की, गुन्हेगार हा गुन्हेगार असतो. त्याला जात आणि धर्म नसतो. आज पर्यन्त राज्यामध्ये घडलेल्या घटना पहा. कसाब आणि त्याच्या दोन साथीदारांनी पाकिस्तानामधून येऊन येथील निरपराध माणसाना मारले. राज्यात रल्वेमध्ये झालेले बॉम्बस्फोट, बसमध्ये झालेले बॉम्बस्फोट येथील अतिरेक्यांनी पाकिस्तानच्या मदतीने आणि पाकिस्तानच्या मार्गदर्शनाखाली केले. जशा या घटना घडल्या तशा मालेगाव मधील बॉम्बस्फोट, नांदेडमधील बॉम्बस्फोट, ठाण्यामधील बॉम्बस्फोट पाहता एका बाजूला गुन्हेगार आहेत तर दुस-याही बाजूला साव नाहीत. गुन्हेगारांची जात आणि धर्म बघणे हे पोलिसांचे काम नाही. या घटनेमध्ये सुध्दा पोलीस ही गोष्ट करणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय पराचा कावळा करीत आहेत. गुन्हेगारांची बाजू मी घेतलेली नाही. गुन्हेगार हा कोणत्याही जाती-धर्माचा नसतो असे आमचेही म्हणणे आहे. गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो. परंतु जर्मन बेकरी स्फोट प्रकरणामध्ये तुमचे पोलीस अधिकारी ज्या पध्दतीने तपास करीत आहेत ती पध्दत योग्य नाही. मुद्दाम प्रेस समोर जाऊन या प्रकरणामागे हिंदू संघटना असल्याचा संशय व्यक्त करणे योग्य नाही.

श्री. आर.आर.पाटील : या घटनेकडे माझे बारकाईने लक्ष आहे. प्रत्येक स्टेटमेंट मी तपासून पहात आहे. अेटीएस प्रमुख श्री. रघुवंशी यांनी, "यामध्ये हिंदू संघटनांचा हात आहे" असे म्हटलेले असल्याचे सिध्द करुन दिले तर त्यांच्यावर कारवाई करण्याचा मी शब्द देतो.

(सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे तसेच विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन शांतता राखावी. एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलू लागले तर मी पुढची लक्षवेधी पुकारीन.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, गृहमंत्र्यांनी असे सांगितले की, जर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अेटीसचे प्रमुख श्री. रघुवंशी यांनी, "यामध्ये हिंदू संघटनांचा हात आहे" असे म्हटल्याचे सिध्द करुन दाखविले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, अेटीएस हे वेगळे स्क्वॉड आहे. जेव्हा शाहरुख खानच्या बंगल्यावर निदर्शने करण्यात आली त्यावेळी त्याच्या तपासासाठी अेटीएसचे अधिकारी आमच्या शिवसैनिकांच्या, शाखा प्रमुखांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. अनिल परब...

घरी गेले. हे एटीएसचे काम नाही. जे ऐटीएसचे अधिकारी शिवसैनिकांच्या, शाखा प्रमुखांच्या घरी चौकशीसाठी गेले त्या अधिका-यांची मी नावासहीत यादी आपणास देतो. सभापती महोदय, हे ऐटीएसचे अधिकारी चौकशीसाठी आमच्या शिवसैनिकांच्या घरी जातात याचा अर्थ आम्ही अतिरेकी आहोत काय ? तेव्हा अशा प्रकारचे काम करणा-या ऐटीएसच्या अधिका-यांची नावे आपणास दिली तर त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

....नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.....

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकू.

श्री.विनोद तावडे : जातीवाचक बोलले आहेत.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या जर्मन बेकरीसारख्या संवेदनशील प्रकारावर चर्चा करीत असताना हे जे काही चालले आहे ते मला योग्य वाटत नाही. रेकॉर्डवर कुणाचे आक्षेपार्ह स्टेटमेंट आले असेल तर तपासून घेऊन ते वगळण्यात यावे. इतक्या गंभीर प्रश्नावर चर्चा करीत असताना आपल्या प्रतिष्ठेपेक्षा आणि एकमेकाची उणीदुणी काढण्यापेक्षा राज्याची सुरक्षितता आणि जनतेचे जीवन महत्वाचे आहे. म्हणून सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासावे आणि आक्षेपार्ह असल्यास रेकॉर्डवरुन काढून टाकावे आणि हा प्रश्न येथेच थांबवावा.

तालिका सभापती : रेकॉर्ड तपासून आक्षेपार्ह भाग कामकाजातून वगळण्यात येईल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, शक्यतो एटीएस शाखा, क्राईम शाखा असेल या स्पेसिफिक शाखा आहेत. त्या जनरल बंदोबस्तासाठी कधी काढून घेत नाही. काही वेळ अशी असते की, सगळे पोलीस दल वापरले तरी पोलिसांची संख्या कमी पडते. उदाहरणार्थ गणेशोत्सव आहे, लाखोंच्या संख्येने लोक बाहेर असतात, अन्य राज्यातून पोलीस आणण्याचा प्रयत्न केल्यावर सुध्दा, सेंट्रलचे पोलीस आणल्यानंतर सुध्दा पोलिसांची संख्या कमी पडते. एक वेळ राज्यात सगळीकडे मनुष्यबळ लागण्याची शक्यता आहे त्यावेळी अपवादात्मक स्थितीत या दलाला सुध्दा कायदा व सुव्यवस्थेच्या कामासाठी बाहेर काढावे लागते ही वस्तुस्थिती आहे. पण आमदारांच्या घरी पाठविण्याची काही आवश्यकता नव्हती असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्यांकडून माहिती घेऊ, विभागाकडून सुध्दा माहिती घेऊ. एटीएस या कामासाठी वापरायची आवश्यकता नव्हती असे माझे स्पष्ट मत आहे. असे वापरले असेल तर चौकशी करुन संबंधितांना इन्स्ट्रक्शन्स देण्यात येतील.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक-3 बाबत</u>

तालिका सभापती : कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक-3 पुढे ढकलण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अपंग एकात्म शिक्षण योजनेतील 700 शिक्षकांना मागील दहा महिन्यापासून वेतन न मिळणे

मु. शी. : अपंग एकात्म शिक्षण योजनेतील 700 शिक्षकांना मागील दहा महिन्यापासून वेतन न मिळणे यासंबंधी श्रीमती अलका देसाई, श्रीमती मधु जैन, सर्वश्री मोहन जोशी, संजय दत्त, जैनुद्दीन जव्हेरी, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"सामान्य विद्यार्थ्यांमध्ये शिक्षण घेऊन अपंग विद्यार्थ्यांमधील अपंगत्वाची भावना दूर करण्यासाठी केंद्र सरकारने सुरु केलेल्या अपंग एकात्म शिक्षण योजनेतील सुमारे ७०० पेक्षा अधिक शिक्षकांना केंद्र व राज्य सरकारमधील समन्वयाच्या कमतरतेमुळे मागील दहा महिन्यापासून वेतन मिळालेले नसल्याचे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केंद्र सरकारने १९७८ साली अपंग एकात्म शिक्षण योजना सुरु केली असणे, त्यासाठी सरकारने विशेष शिक्षकांची नियुक्ती केलेली असणे. या योजनेअंर्गत राज्यात ७०० युनिट सुरु करण्यात आले असून त्यामध्ये सुमारे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असणे तसेच ५९५ प्राथमिक व ११७ माध्यमिक विशेष शिक्षक असणे, सन १९९० साली केंद्र सरकारने ही योजना बंद करणे मात्र राज्य सरकारने ही योजना सुरु ठेवणे व पगार देण्यास सुरुवात करणे परंतु राज्याच्या शैक्षणिक धोरणात बदल करण्याच्या नावाखाली एप्रिल, २००९ पासून राज्य शासनाने या शिक्षकांना वेतन देणे बंद करणे परिणामी सदरहू विशेष शिक्षकांमध्ये निर्माण झालेली संतापाची व चिंतेची भावना सबब याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रीया."

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुद्धीत प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 4.....

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सामान्य विद्यार्थ्यांचे शिक्षण हे त्या त्या शाळांमध्ये होते आणि अपंगांसाठी केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या मदतीने काही युनिट्स महाराष्ट्रामध्ये सुरु केलेली आहेत. अपंग एकात्म शिक्षण योजनेच्या माध्यमातून आपण अपंगांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहामध्ये आणू शकतो. ही योजना बंद झालेली आहे याची शासनाला माहिती आहे काय? निवेदनामध्ये म्हटले आहे की, केंद्र सरकार आणि युनिसेफच्या मदतीने 100 टक्के अनुदानाची प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची दुसरी योजना सुरु करणार आहोत. या योजनेला मदत मिळालेली नाही. ही योजना कधी सुरु करणार आहात? तोपर्यंत अपंग विद्यार्थी आहेत त्यांनी आपापल्या घरीच बसून रहायचे का? त्यांच्यासाठी शासनाकडे कोणती योजना आहे?

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

जे शिक्षक या योजनेत काम करीत होते त्यांना गेल्या 10 महिन्यांपासून पगार मिळाला नसल्याने आपल्या कुटुंबासमवेत ते उपाशीपोटी राहत आहेत. उत्तरात असे म्हटले आहे की, या शिक्षकांना शिक्षक पदावर सामावून घेण्याचा शासनाचा विचार आहे. असा शासनाचा विचार केव्हा होणार आणि कधीपासून या शिक्षकांना शिक्षक पदावर समाविष्ट करुन घेणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, राज्यात एकात्म अपंग शिक्षण योजना ही प्राथमिक स्तरावर केंद्रशासनाच्या 100 टक्के अनुदानावर चालू होती. 8 अपंग विद्यार्थ्यांचे एक युनिट धरुन त्यांच्यासाठी स्पेशल शिक्षण चालू होते. पण सन 2009-10 साठी अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अशी नवीन योजना राबविण्याचे ठरविले आणि प्राथमिक स्तरावरील ही योजना बंद करण्यात आली. दीर्घकाळ चालणाऱ्या योजनेची जबाबदारी राज्यशासनावर असते हे शासनाने निश्चित केले आणि ही जबाबदारी आपली आहे असे समजून जे 595 शिक्षक त्यात काम करीत होते त्यांना कायम सामावून घेण्यासंबंधीचा निर्णय आपण घेतला. हा प्रश्न संवेदनशील असून आम्ही लवकरात लवकर या प्रश्नासंबंधीचा निर्णय व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहोत. तसेच यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर देखील बैठक घेतली आणि कायमस्वरुपी सामावून घेण्यासंबंधीचा हा प्रस्ताव मुव्ह केलेला आहे. त्यावर वित्त विभाग तसेच विधि व न्याय विभागाचेही अभिप्राय प्राप्त झालेले आहेत. यानंतर हा प्रस्ताव कॅबिनेटसमोर ठेवून त्याचे निवारण करण्यासंबंधीची प्रक्रिया चालू केली आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाण` : सभापती महोदय, 22 जानेवारी, 2009 रोजी याच प्रश्नाला जे उत्तर दिले होते तेच उत्तर पुन्हा दिले जात आहे. त्यावेळेस देखील "यासंदर्भातील कार्यवाही सुरु असल्याचे" सांगण्यात आले होते. आज देखील "ही बाब विचाराधीन आहे" हा केवळ 595 शिक्षकांचा प्रश्न आहे. या शिक्षकांना गेल्या 12 महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. राज्यात प्राथमिक स्तरावर शेकडो, हजारो जागा रिक्त आहेत. म्हणून एक महिन्याच्या आत जे शिक्षक अतिरिक्त म्हणून घोषित केलेले आहेत त्यांचा शिक्षक म्हणून कायमस्वरुपी समावेश करणार काय? तसेच माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात या उत्तरात कुठेही उल्लेख नाही. त्यांची केवळ 117 च पदे आहेत. म्हणून या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना शासन एक महिन्यात सामावून घेण्यासंबंधीचा निर्णय घेणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : महोदय, यासंबंधीचा निर्णय घेण्याची प्रक्रिया चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे म्हणतात त्याप्रमाणे मागील उत्तरच दिले जात आहे असे नाही तर यासंबंधीची प्रक्रिया चालू असल्याचे मी म्हटले आहे.....

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, मागील प्रश्नाला दिलेले उत्तर मी वाचून दाखवितो.....

प्रा. फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी कृपया मला उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री. विनोद तावडे : प्रथम या शिक्षकांना पगार द्यावा, त्यानंतर आपल्याला बोलता येईल.

प्रा.फौजिया खान : महोदय, आम्ही त्यांना पगार देणारच आहोत. परंतु आपल्याला ज्या शब्दात उत्तर हवे त्या शब्दात उत्तर देता येणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : आम्ही पाहिजे तसे उत्तर द्यावे असे म्हणत नाही. परंतु आपणच जे उत्तर दिलेले आहे ते रेकॉर्ड तपासून पहावे. कारण उत्तरात आपण म्हटले आहे की, "अशा विशेष शिक्षकांना प्राथमिक शाळेमध्ये शिक्षक पदावर सामावून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे". आपण उत्तर देताना मात्र "सामावून घेण्यासंबंधीचा निर्णय घेतला" असे म्हटले आहे. म्हणून आपण लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात जे उत्तर दिले आहे त्यापेक्षा वेगळेच उत्तर प्रत्यक्ष सभागृहात देत आहात. संपूर्ण राज्यात अपंगांना शिकविणाऱ्या फक्त 595 शिक्षकांचाच प्रश्न आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

या ठिकाणी माध्यमिकच्या केवळ 100 शिक्षकांचा प्रश्न आहे. ही बाब विचाराधीन आहे असे आपण या ठिकाणी उत्तर दिलेले आहे. आपण जे काही उत्तर देत होता ते मी काळजीपूर्वक ऐकत होतो. या शिक्षकांना सामावून घेण्याचाही निर्णय घेतला आहे असेही आपण या ठिकाणी सांगितलेले आहे. आपण या प्रश्नाच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे ते अभिनंदनीय आहे. अपंगांसाठी हे शोभेसे उत्तर असल्यामुळे मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. परंतु विचाराधीनच्या पुढे जाऊन जर आपण निर्णय घेतलेला आहे तर दोनच प्रश्न आता शिल्लक राहतात आणि त्यातील पहिला प्रश्न म्हणजे या शिक्षकांना ताबडतोबीने किती दिवसात सामावून घेतले जाणार आणि त्यांचे थकीत वेतन किती दिवसात देणार आहात याबाबतीत मुद्देसूद उत्तर आपण द्यावे अशी मी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची जी भावना आहे तीच भावना शासनाची देखील आहे. शासनाने शिक्षकांच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे परंतु यासंदर्भात काही प्रोसेस आहे. त्यामुळे मी सभागृहाला सांगू इच्छिते की, एक महिन्याच्या आत थकित पगार तसेच त्यांना सामावून घेण्याचे काम आम्ही करणार आहोत एवढेच या निमित्ताने मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणतांना त्यातील काही महत्वाच्या तरतुदी राज्य शासनाने न स्वीकारणे

मु. शी. : सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणतांना त्यातील काही महत्वाच्या तरतुदी राज्य शासनाने न स्वीकारणे यासंबंधी प्रा. बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, कपिल पाटील वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वित्त मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"केंद्र शासनाने लागू केलेल्या सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अमलात आणताना त्यातील काही महत्वाच्या तरतूदी राज्य शासनाने न स्विकारणे, काही योजनांबाबत अजूनही शासन निर्णय निर्गमित न होणे, 'कन्सोलिडेटेड पेन्शन' नवीन वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या निम्म्याहून कमी निश्चित झालेले असेल तर दिनांक २९ जुलै, १९९९ च्या शासन निर्णयाच्या (No PEN-१०९९/२३९-SER ४) परिच्छेद ७ मध्ये असलेली तरतूद व सोबतचे सहपत्र-पाच याबाबतचा शासन निर्णय अजूनही निर्गमित झालेला नसणे, एका विशिष्ट तारखेपूर्वी (१ जानेवारी, २००६) व त्या तारखेनंतर निवृत्त झालेल्या सेवानिवृत्तांमध्ये असा भेदभाव करणे घटनेच्या कलम १४ चा भंग करणारे असल्याचा मा.सर्वोच्च न्यायालयाने डी.एस.नकारा विरुध्द केंद्र शासन प्रकरणात (ISCC ३०५/१९८३) दिलेला निर्णय, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी अतिरिक्त सचिव, वित्त विभाग यांना दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी एक निवेदन देऊन अनेक त्रुटी लक्षात आणून देणे, या निवेदनातून सादर केलेल्या तक्रारीबाबत कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे या सेवानिवृत्तांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. विजय वडेट्टीवार (नियोजन राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन
(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासकीय सेवेतील निवृत्ती धारकांचा हा प्रश्न आहे. शासनातील कर्मचा-यांशी शासनाने चांगल्या रीतीने वागले पाहिजे. या निवेदनात "असे स्पष्ट अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिलेले आहेत" अशा प्रकारचा उल्लेख निवेदनात करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे हे नियमाच्या विरुध्द आहे. विधी व न्याय विभागाचे आपण जरुर अभिप्राय घ्यावेत. परंतु रुल्स ऑफ प्रोसिजर अँड कंडक्ट ऑफ बिझीनेसमध्ये नियम असे आहेत की, विधी व न्याय विभागाचे नाव सभागृहात किंवा कोर्टात कोट करावयाचे नाही. इट इज फॉर युवर ॲप्रिसिएशन. डोंट कोट देम. आपण या निवेदनात असे म्हटले आहे की, "असे झालेले नाही." यासंदर्भातील सुप्रिम कोर्टाचा जो दोन ओळीचा निर्णय आहे तो मी या ठिकाणी वाचून दाखवतो. "...the fixation of cut off date as a result of which equals were treated as unequals: and for the purpose of entitlement and payment of pension to those who retired by a certain date and those who retired thereafter is wholly arbitrary and did not stand the test of Article-14. The object sought to be achieved was not to create a class within a class, but to ensure that the benefits of pension were made available to all pensioners of the same class equally."

सभापती महोदय, हा सुप्रिम कोर्टाचा निर्णय असून या आधारावर अनेक निर्णय झालेले आहेत. माझे म्हणणे असे आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये ही बाब नमूद आहे की, नाही ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. निवेदनामध्ये एवढेच म्हटले आहे की, "सहाव्या वेतन आयोगानुसार लागू असलेले सर्व नियम राज्यातील निवृत्तीवेतनधारकांना लागू करावेत यासाठी मुंबई उच्च न्यायालयात विविध याचिका असून त्यावरील सुनावणी प्रलंबित आहेत." यामध्ये प्रिटीशनर अनेक आहेत. सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न असा होता की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार....

पाचव्या वेतन आयोग निवृत्ती वेतन धारकांना जसाच्या तसा लागू केला तसाच सहावा वेतन आयोगही जसाच्या तसा लागू करावा असा आपल्या प्रश्नाचा सारांश होता. निवृत्ती वेतनधारकांना काही सवलती दिल्या पाहिजेत, काही गोष्टी झाल्या पाहिजेत हे खरे आहे. परंतु केंद्रशासनाचे रिसोर्सेस आणि राज्य शासनाचे रिसोर्सेस यामध्ये फरक आहे. निवृत्ती वेतनधारकांसाठी आपण 3500 रुपयांची किमान मागणी केलेली आहे. शासनाने निवृत्ती वेतन धारकांना 3500 रुपयांच्या अगेन्स्ट 2882 रुपये दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचे सर्व प्रश्न एका मेकाशी रिलेटेड आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सुप्रिम कोर्ट आहे, परंतु यासंदर्भातील उत्तर माननीय मंत्रीमहोदय देत नाही हे आमच्या सर्वांच्या लक्षात आलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

सन्माननीय राज्यमंत्र्यांनी माझे म्हणणे समजावून घेतले पाहिजे. लक्षवेधी सूचनेव्दारे मी आपणास अगोदरच नोटीस दिलेली आहे. तरीसुध्दा सन्माननीय राज्यमंत्री माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देत नाहीत. उलट ते जास्तीची माहिती सांगत आहेत. जी माहिती मी विचारलेली नाही ती माहिती ते मला सांगत आहेत. या बाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता किंवा नाही अशा प्रकारचा पॉईन्टेड प्रश्न मी त्यांना विचारला होता परंतु त्याचे उत्तर त्यांनी दिलेले नाही.म्हणून मी सभागृहाला अशी विनती करतो की,या प्रश्नाचे उत्तर सन्माननीय राज्य मंत्री महोदयांनी द्यावे अशी विनंती त्यांनी सन्माननीय राज्यमंत्र्यांना करावी.सभापती महोदय, यानंतर मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना दुसरा प्रश्न विचारतो.मघाशी मी जो भाग या ठिकाणी वाचून दाखवला होता ती केस 1983 सालची आहे.या राज्यातील थोर न्यायमूर्ती चंद्रचूड आता दिवंगत झाले आहेत त्यांनी असा निर्णय दिला होता की, या तारखेच्या अगोदर निवृत्त झालेला डेप्युटी कलेक्टर आणि या तारखेच्या नंतर निवृत्त झालेला डेप्युटी कलेक्टर यांमध्ये शासनाला भेदभाव करता येणार नाही. अशा प्रकारचा भेदभाव करणे घटनेच्या कलम 14 च्या विरोधात आहे. या संबधी आपण उत्तर दिलेले नाही यातच आपले उत्तर आलेले आहे. मी आपल्याला पुन्हा प्रश्न विचारतो की, कोर्टाचा असा निर्णय असल्यामुळे गेल्या वेळच्या म्हणजेच दिनांक 29 जुलै 1999 च्या शासन निर्णयामध्ये परिच्छेद 7 होता आणि त्या सोबत सहपत्र पाच जोडले होते. या मुद्यासंबंधी मी आपल्याला नोटीस दिली होती. परंतु यावेळी तुम्ही ते का विसरला आहात ?या प्रश्नाचे उत्तर आम्हाला सन्माननीय राज्यमंत्र्यांकडून मिळाले पाहिजे. यानंतर मला त्यांना दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की,नेट लागणा-या प्रश्नाचे उत्तर टाळून ज्या प्रमाणे सभागृहाचे समाधान होत नाही त्याप्रमाणे लोकांचेसुध्दा समाधान होत नाही. शासन आपल्या कर्मचा-यांशी कसे वागत आहे हे यावरुन स्पष्ट होते. मघाशी उत्तर देतांना असे सांगण्यात आले की, केन्द्र सरकारची आणि राज्य सरकारची आर्थिक स्थिती वेगवेगळी आहे.परंतु त्यावरही सुप्रीम कोर्ट आहे. या कर्मचा-यांची ही लहानशी मागणी आहे.नवीन पेबॅन्डमध्ये जे मिनिमम आहे त्याच्या निम्मे निवृत्ती वेतन शासनाने दिले पाहिजे. एक डेप्युटी कलेक्टर 2005 साली निवृत्त झाला आहे आणि दुसरा डेप्युटी कलेक्टर 2006 साली निवृत्त झाला आहे अशा प्रकारचो भेदभाव शासनाला करता येणार नाही. राज्य शासन आपल्या कर्मचा-याशी

अशा प्रकारे वागत असतांना मी विचारलेल्या दुस-या प्रश्नाचे उत्तर तरी सन्माननीय राज्यमंत्र्यांनी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नीट दिले पाहिजे .सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असल्यामुळे त्यासंदर्भात राज्य शासनाने तशी तरतूद केली होती. यासबंधी मी आपल्याला नोटीस दिली होती. 1999 सालच्या शासन निर्णयातील परिच्छेद 7 आणि सहपत्र पाच आपण आता वगळले आहे ते योग्य केलेले नाही. तेव्हा ती तरतूद करणारा जीआर काढण्यात येणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार :सभापती महोदय, शासनाच्या महसुली उत्पन्नाच्या 46 टक्के रक्कम कर्मचा-यांचे वेतन आणि निवृत्ती वेतनावर खर्च होत असते. अशा प्रकारे जर खर्च होत असेल तर राज्य शासनाच्या महसुलाच्या किती टक्के रक्कम यासाठी खर्च केला पाहिजे.? राज्य शासनाच्या रिसोर्सेससंबंधी मी सुरुवातीलाच सभागृहाला माहिती दिली होती. सहावा वेतन आयोग केन्द्र सरकारने दिला त्या प्रमाणे सर्व गोष्टी राज्य सरकारने स्वीकारण्यासाठी .....

प्रा.बी.टी.देशमुख : मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे आता देखील राज्यमंत्री टाळत आहेत. त्यांची चलाखी सभागृहाने आणि सभापती महोदय, आपण देखील लक्षात घ्यावी अशी माझी विनती आहे. मी विचारलेल्या दुस-या प्रश्नाचे उत्तर न देता दुसरेच व्याख्यान ते देत आहेत. अशा प्रकारे त्यांनी दुसरे व्याख्यान देणे बरोबर नाही.सर्वोच्च न्यायालयाने एक निर्णय दिलेला आहे असे मी मघाशी सांगितले होते. मागच्या वेळी त्याप्रमाणे जी.आर. काढला होता परंतु यावेळीसुध्दा तसा जी.आर. काढला नाही तेव्हा याबाबत शासन निदान विचार तरी करणार आहे काय ?

श्री.विजय वडेट्टीवार :शासन याबाबतीत विचार करील.

प्रा.बी.टी.देशमुख : शासन याबाबतीत विचार करील असे माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.तेव्हा शासनाची विचाराची दारे मोकळी झाली आहेत हे काही थोडे आहे काय ? कर्मचा-याशी कसे वागत आहात हे या सभागृहाच्या माध्यमातून सर्व जग पहात आहे.ही चागली गोष्ट आहे. सभापती महोदय, मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी कोर्टाच्या संदर्भात चुकीची माहिती दिली होती.....

श्री.विजय वडेट्टीवार : नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. अजून कोर्टात काहीही ॲडमिट झालेले नाही.त्या बाबतीत अनेक याचिका लोकांनी दाखल केलेल्या आहेत. लोक तरी काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करतील.? या ठिकाणी तुम्ही आमची आणि सभागृहाची अशा प्रकारे थट्टा करीत आहात.याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, अजून कोर्टात काहीही ॲडमिट झालेले नाही.हे शासकीय कर्मचारी आहेत तेव्हा त्यांच्या संघटनेच्या अध्यक्षांना आणि सचिवांना चर्चेसाठी बोलावून घ्यावे.राज्याचे पेन्शनर्स असोसिएशनच्या तीन चार पदाधिकारांना आठ दिवसात बोलावून त्यांच्याशी आपण या विषयी चर्चा करणार आहात काय ? कोणाला बोलवावयाचे हे तुम्हीच ठरवा.

श्री.विजय वडेट्टीवार :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना मी सांगतो की, श्री अर्जुन कृष्णा गलोत्तर या व्यक्तीने पिटीशन दाखल केलेली आहे त्याचबरोबर इतर अनेक जणांनी सुध्दा पिटीशन दाखल केलेल्या आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : या लोकांशी बोलण्यासाठी कोर्टाने मनाई केली असेल तर त्यांना बोलवू नका. त्यांच्याशी चर्चा करण्यास शासनाला मनाई करण्यात आली आहे काय ?कोर्टाने मनाई केली असेल तर त्यांना तुम्ही बोलावू नका..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

मी अगदी सरळ विचारतो की, तुम्ही त्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार काय? कोर्टाने मान्य केले असेल तर तुम्ही त्यांच्याशी चर्चा करा. ते पुण्यामध्ये रहातात, त्यांचा पत्ता निवेदनामध्ये दिलेला आहे. तुमच्या कर्मचाऱ्यांची संघटना आहे. तेव्हा त्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्याबरोबर आपण चर्चा करणार काय?

श्री. विजय वडेट्टीवार : होय.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या अखेरीस म्हटले आहे की, "दिनांक 1 जानेवारी 2006 नंतर सेवानिवृत्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार देण्याची कारवाई सुरु आहे". माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपण या निवृत्ती वेतन धारकांना न्याय देणार आहात काय? आपल्या स्तरावर सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे त्यांना निवृत्ती वेतन देण्याची कारवाई किती दिवसात पूर्ण होईल?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, निवृत्ती वेतन धारकांच्या संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. यामध्ये काही गोष्टी त्यांना लागू करण्यात आल्या आहेत, त्यामुळे त्यांचे समाधान झालेले नाही. म्हणून त्यांनी अधिकची मागणी केली आहे. त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्यातर 700 कोटींचा भुर्दंड शासनावर बसणार आहे. आणि म्हणून त्या संदर्भात चर्चा करीत असतांना त्यांना काय दिले पाहिजे, किती दिले पाहिजे याबाबत चर्चा करुन शासन निर्णय घेणार आहे?

प्रा. बी. टी. देशमुख : मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना "भुर्दंड" हा शब्द वापरला आहे. तेव्हा हा शासनावर भुर्दंड आहे काय?

श्री. विजय वडेट्टीवार : भुर्दंड नाही, बोजा पडलेला आहे.

श्री. एस. क्यू. जमा : सभापति महोदय, निवेदन में यह लिखा है कि " दिनांक 01.01.2006 से पहले तथा दिनांक 01.01.2006 के बाद सेवा निवृत्त कर्मचारियों के निवृत्तीवेतन निश्चित करते समय संविधान की धारा 14 भंग नहीं हुई है तथा डी.एस. नकारा विरुध्द केंद्र शासन मामले में सर्वोच्च न्यायालय द्वारा दिया गया निर्णय लागू नहीं होता है, ऐसी स्पष्ट राय

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यू. जमा....

विधि एवम् न्याय विभाग ने दी है. लेकिन अभी माननीय मंत्री जी ने यह जवाब दिया है कि 6 वें वेतन आयोग की सिफारिशें लागू की गई है. इस स्थिति में मेरा यह प्रश्न है कि सेवा निवृत्त कर्मचारियों को 6 वें वेतन आयोग की सिफारिशें लागू होगी या नहीं, अगर लागू होगी तो सिफारिश के अनुसार पेंशन राशि कब तक मिलेगी और यह सिफारिश लागू करने की वजह से सरकार पर कितना आर्थिक भार पड़ेगा ?

श्री. विजय वडेट्टीवार : सिफारिश लागू करने के बारे में सरकार विचार कर रही है. त्यांच्या संघटनेने जी अधिकची मागणी केली आहे त्याबाबत शासन विचार करीत आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, 1 जानेवारी 2006 नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याचे मान्य केले आहे. तो त्यांना मिळाला पाहिजे परंतु अजूनपर्यंत मिळालेला नाही. आज सुध्दा त्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे निवृत्ती वेतन मिळत आहे. ही सर्व प्रकरणे अे.जी. यांच्याकडे प्रलंबित आहेत. आपण उत्तरात म्हटले आहे की, "बहुतांशी निवृत्ती वेतन धारकांना थकबाकीचा पहिला हप्ता अदा केला आहे" हे चुकीचे आहे. आपण ते तपासून पहावे आणि नागपूरच्या अे.जी. ना सूचना द्याव्यात की, एक महिन्याच्या आत त्यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या प्रकरणांवर निर्णय घेऊन ती निकालात काढण्यात यावीत असे आदेश आपण देणार काय?

श्री. विजय वडेट्टीवार : सजेशन फॉर ॲक्शन.

अशुध्दीत प्रत / शुध्दीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी.: विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी

तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड) : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

(माननीय सदस्या अनुपस्थित)

(यानंतर सौ. रणदिवे)

:

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: केज पंचायत समितीने तब्बल 6 वर्षापासून आमसभा न घेणे.

मु.शी.: केज पंचायत समितीने तब्बल 6 वर्षापासून आमसभा न घेणे याबाबत ॲड.उषा दराडे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"केज तालुक्याचा कारभार पहाणाऱ्या केज पंचायत समितीच्यावतीने गाव पातळीवर 6 महिलांच्या व 6 इतर ग्रामसभा मिळून प्रतिवर्षी किमान 12 आमसभा होणे आवश्यक असताना केज पंचायत समितीने तब्बल 6 वर्षापासून आमसभा न घेणे, तसेच आमसभा न झाल्याने तालुक्याच्या विकास योजना, प्रश्न समस्यांवरील उपायांना मंजूरी न मिळाल्याने, जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी न मिळाल्याने तालुक्याचा विकास न होणे, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, केज तालुक्याचा कारभार पाहणाऱ्या केज पंचायत समितीचे आता नगरपंचायत मध्ये रुपांतर झालेले आहे. केज पंचायत तालुक्याचा कारभार पहाणाऱ्या केज पंचायत समितीच्या वतीने गाव पातळीवर 6 महिलांच्या व 6 इतर ग्रामसभा मिळून प्रतिवर्षी किमान 12 आमसभा होणे आवश्यक असताना, केज पंचायत समितीने तब्बल 6 वर्षापासून आमसभा घेतलेली नाही. तसेच आमसभा न झाल्याचे तालुक्याच्या विकास योजना, प्रश्न समस्यांवरील उपाययोजनांना मंजुरी न मिळाल्याने जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी न मिळाल्याने तालुक्याचा विकास होऊ शकलेला नाही. तेव्हा केजच्या या आमसभेच्या संदर्भात ज्यांनी कसूर केली असेल, अशांच्या संबंधात ताबडतोब कारवाई करणे आणि आमसभा लवकरात लवकर होण्याच्यादृष्टीने प्रयत्न करणे याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना.

---

2 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रास एमआयडीसी कडून 35 एमएलडी पाणी पुरवठा करणे

मु.शी.: मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रास एमआयडीसी कडून 35 एमएलडी पाणी पुरवठा करणे याबाबत श्री.मुझफ्फर हुसेन वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मुझफ्फर हुसैन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

"मिरा-भाईंदरची लोकसंख्या साधारणत: 10 लक्ष इतकी आहे,मिरा-भाईंदर महानगर-पालिका क्षेत्रास 4 वर्षापूर्वी एमआयडीसी कडून 35, एमएलडी पाणी पुरवठा मंजूर करण्यात आला असताना महानगरपालिका क्षेत्रातील शांती नगर वसाहतीत एमआयडीसी कडून होणारा 5 एमएलडी पाणी पुरवठा बंद झाल्याने मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.

35 एमएलडी मंजूर होऊनही फक्त 10-12 एमएलडी एवढाच पुरवठा करण्यात येत आहे. अशा परिस्थितीमुळे पाणी टंचाई होत असल्याने जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.

सदर बाब लक्षात घेता शासनाने एमआयडीसी ला पूर्ण 35 एमएलडी पाणी पुरवठा करण्याचा आदेश द्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

पृ.शी.: तुळजापूर येथील कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या मूर्तीची झीज होऊ नये म्हणून पुजेची परंपरा खंडीत करण्याचा प्रशासनाने घेतलेला निर्णय

मु.शी.: तुळजापूर येथील कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या मूर्तीची झीज होऊ नये म्हणून पुजेची परंपरा खंडीत करण्याचा प्रशासनाने घेतलेला निर्णय याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रीय जनतेचे श्रध्दास्थान असलेले तुळजापूर, कुलस्वामिनी तुळजाभवानी ही सर्वांची दैवत आहे. राज्यातून नव्हेतर बाहेरील राज्यातूनही मोठया संख्येने भक्तगण तुळजापूर येथे भवानीमातेच्या दर्शनासाठी येत असतात. विशेष करुन मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशी लक्षणीय गर्दी असते. उशिरा का होईना, नुकतीच शासनाने तुळजापूर विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे. ही भक्तांच्या दृष्टीने अतिशय आनंदाची बाब आहे. परंतु अलिकडे भवानी मातेच्या पुजेसंदर्भात वाद सुरु झालेला आहे. भवानी मातेची मूर्ती ही पुरातन दगडाची आहे. दिवसभरात दही-श्रीखंडाचे अभिषेक मोठया संख्येने होत असतात. त्यामुळे मुर्तीची झीज होते म्हणून वर्षानुवर्षे सुरु असलेली पुजेची परंपरा खंडीत करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतलेला आहे. त्यामुळे पुजारी मंडळ आणि प्रशासन यांच्यामध्ये वाद सुरु झालेला आहे. परंतु भक्तांच्या भावना लक्षात घेता व मुर्तीची झीज होऊ नये या दोन्ही बाबी लक्षात घेऊन व पुजारी मंडळांना विश्वासात घेऊन मूर्तीच्या अंगावरुन अभिषेक न करता त्यांच्या पादुका तयार करुन त्या मूर्तीसमोर ठेऊन त्यावर अभिषेक केला तर मुर्तीला कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही. तेव्हा तसा निर्णय प्रशासनाने सामुपचाराने घ्यावा व त्यासाठी पुजारी मंडळाला विश्वासात घ्यावे. तसेच तुळजापूर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून तुळजापूरात येणारे चोहोबाजूचे रस्ते हे चौपदरी करावेत अशीही मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: दापोली जि.रत्नागिरी येथील पन्हाळूदूर्ग या ऐतिहासिक लेणी पुरातत्व खात्याने ताब्यात घेउन "ब" वर्ग श्रेणीचा दर्जा देऊन या स्मारकाच्या दैनावस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत.

मु.शी.: दापोली जि.रत्नागिरी येथील पन्हाळूदूर्ग या ऐतिहासिक लेणी पुरातत्व खात्याने ताब्यात घेउन "ब" वर्ग श्रेणीचा दर्जा देऊन या स्मारकाच्या दैनावस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत श्री.विनोद तावडे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दापोली तालुका,जि.रत्नागिरी येथील पन्हाळेदूर्ग या ऐतिहासिक लेणी पुरातत्व खात्याने ताब्यात घेऊन "ब"वर्ग श्रेणीचा दर्जा देऊन ही सदर राष्ट्रीय स्मारकाच्या दैनावस्थेकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याबाबतचा विशेष उल्लेख मांडत आहे."

सभापती महोदय, कोकणातील दापोली तालुक्यामध्ये कुळजाई नदीकाठी डोंगराच्या पायथ्याशी काळ्या दगडामध्ये कोरुन बनविलेली ही लेणी म्हणजे उत्कृष्ट कलेचा एक नमुना आहे. तेथे चारी बाजूने डोंगर आहेत, बारमाही पाणी आहे, बाजूला वाहणारी कुळजाई नदी आहे. डोंगर पोखरुन सुंदर लेणी बनविण्यात आलेली आहे आणि 40 वर्षापूर्वी या ऐतिहासिक पन्हाळेदूर्ग या लेणीचा शोध लागला आणि तेव्हापासून आजतागायत पुरातन खात्याचे या सगळया गोष्टींकडे त्यांच्या उदासिनतेमुळे दुर्लक्ष होत आहे.डोंगरांच्या पायथ्याशी ग्रामस्थांनी आणि इतिहास संशोधकांनी उत्खनन केल्यानंतर 29 लेणी सापडल्या. सभापती महोदय, मला आपल्यामार्फत शासनाला एवढेच सांगावयाचे आहे की, राज्य शासनाच्या पुरातत्व विभागाने केंद्र शासनाच्या पुरातत्व विभागाला याबाबतीत माहिती देऊन, या सर्व बाबींचे नीट संरक्षण होईल हे पहावे यासाठीच मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधत आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

पृ. शी. : वरळी (मुंबई) येथे महापालिकेकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्यामध्ये किडे येत असल्याचे आढळून येणे

मु. शी. : वरळी (मुंबई) येथे महापालिकेकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्यामध्ये किडे येत असल्याचे आढळून येणे याबाबत श्रीमती अलका देसाई वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. जयप्रकाश छाजेड) : सन्मा□□य सदस्या श्रीमती अलका देसाई यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"वरळी (मुंबई) येथे महापालिकेकडून पिण्याच्या पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या पाण्यामध्ये किडे येत असल्याचे आढळून आल्याने नागरिकांमध्ये प्रचंड प्रमाणात संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचे आढळून आले आहे. यापूर्वी अनेक वेळा दुषित पाणी पुरवठा करण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना कॉलरा व हिवताप अशा गंभीर आजाराने ग्रासल्याचे आढळून आलेले आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या संतापाचे व चिंतेचे वातावरण म्हणून या परिसरात शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात यावा, अशा अतिशय गंभीर बाब असलेल्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे, कृपया स्वीकृत करावी, ही विनंती.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या डॉक्टरांनी 'सामना' या वर्तमापत्रामध्ये ही बाब कबूल केलेली आहे, हे देखील मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :पहिली महिला एव्हरेस्टवीर कृष्णा पाटील हिचा राज्य शासनाने यथोचित सन्मान करुन आर्थिक मदत करणे.

मु. शी. : पहिली महिला एव्हरेस्टवीर कष्णा पाटील हिचा राज्य शासनाने यथोचित सन्मान करुन आर्थिक मदत करणे याबाबत श्री. संजय दत वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : सन्मा□□□य सदस्य श्री.संजय दत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत(विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"भारतातील माऊंट एव्हरेस्टसह आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका आणि अंटार्क्टिकामधील सर्वात उंच शिखरे सर करणारी महाराष्ट्र कन्या व देशातील पहिली महिला एव्हरेस्टवीर कृष्णा पाटील हीने आपल्या नावे आणखी एक विक्रम नोंदविला आहे. कृष्णाने नुकतेच ऑस्ट्रेलियातील सर्वात उत्तुंग शिखर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माऊंट कोझुस्को शिखर पार केले. मांऊंट कोझुस्को शिखराची उंची तब्बल 2,228 मीटर असून आतापर्यंत परदेशातील अनेक गिर्यारोहकांनी हे शिखर पार करण्याचा विक्रम केला आहे. परंतु भारतातील पहिलीच गिर्यारोहक असलेल्या कृष्णाने ही कामगिरी केली आहे. तिच्या या श्रेयाबद्दल राज्यासह देशातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या या गिर्यारोहकांच्या अद्वितीय योगदानाचा सन्मान म्हणून राज्य शासनाने यथोचित सन्मान करावा तसेच तिच्या पुढील अशा अनेक धाडशी विश्व विक्रमासाठी आयोजक मिळत नसल्याने व ती मध्यम वर्गीय कुटुंबातील असल्याने हा खर्च तिच्या आर्थिक परिस्थितीला पेलवणारा नसल्याने शासनाने भविष्यातील तिच्या अशा उपक्रमासाठी आर्थिक मदत करावी व केंद्र शासनाकडेही याबाबतीत शिफारस करावी अशी विनंती व मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील स्वयंसेवी संस्था आणि अशा संस्थेचे कार्यकर्ते यांना संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केलेल्या मानांकनाप्रमाणे संरक्षण उपलब्ध करुन देणे.

मु. शी. : राज्यातील स्वयंसेवी संस्था आणि अशा संस्थेचे कार्यकर्ते यांना संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केलेल्या मानांकनाप्रमाणे संरक्षण उपलब्ध करुन देणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : सन्मा□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"राज्यातील स्वयंसेवी संस्था आणि अशा संस्थेचे कार्यकर्ते यांच्या सुरक्षेकरिता मुंबई उच्च न्यायालयाने मानवी हक्कासंदर्भात काम करणाऱ्या संस्था आणि कार्यकर्त्यांना संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केलेल्या मानांकनाप्रमाणे संरक्षण उपलब्ध करुन देण्याचे तसेच त्यांची योग्यय पध्दतीने सर्व शासकीय पातळयांवर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. यासाठी सरकारने वैधानिक आणि दोहोंमध्ये अंमलबजावणी करावी, जेणेकरुन सार्वजनिक तसेच खाजागी क्षेत्रात चालणाऱ्या भ्रष्ट प्रकारांना आळा बसून ही यंत्रणा स्वतंत्र आणि स्ययंभूपणे काम करेल याकडे लक्ष पुरविण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याबाबत तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक वेगवेगळया पध्दतीचे भ्रष्टाचार होत असतांना त्याबाबत आवाज उठविण्यासाठी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये अनेक कार्यकर्ते काम करीत असतात. याबद्दल उच्च न्यायालयामध्ये पोलीस महासंचालकांनी प्रतिज्ञपत्र सादर करावे, असे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार जे लोक सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील भ्रष्ट प्रथा उघड करतात त्यांच्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र यंत्रणा तयार करावी आणि ज्यांच्यावर हल्ले झाले असतील किंवा धमक्या आल्या असतील तर धमक्याची तक्रार आल्यास त्याबाबतचा तपास अतिरिक्त पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याकडून करण्यात यावा आणि त्याबाबतची चौकशी करण्याचे आदेश

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

मानवी हक्क आयोगाला उच्च न्यायालयाने द्यावेत असा यामध्ये उल्लेख आहे. पुण्यामध्ये सतीश शेट्टी या कार्यकर्त्याचा खून झाला. त्याला त्यापूर्वी वेगवेगळया पध्दतीच्या धमक्या आलेल्या होत्या. तसेच वसईमध्ये नवलीनकुमार या महिला कार्यकर्तीवर भयानक पध्दतीने हल्ला करुन त्यांचा खून करण्यात आला होता. "व्हिसल ब्लोअर ॲक्ट" नावाचा परदेशात कायदा आहे. त्याचा अर्थ असा की, जे लोक एखाद्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधतात आणि त्यामुळे अनेकांचे हितसंबंध दुखावले जातात अशा व्यक्तीलाच मग ती सामाजिक क्षेत्रातील असो की राजकीय क्षेत्रातील असो तिला संपवून टाकणे या पध्दतीच्या काही टोळया कार्यरत असतात. म्हणून ज्यावेळी संरक्षणाच्या संदर्भात प्रश्न येतात त्यावेळी कोणत्या कारणामुळे धमक्या येतात हे समजून घेऊन सामाजिक कारणामुळे जर धमक्या येत असतील तर त्या संदर्भात पोलीस यंत्रणेने गांभीर्याने दखल घ्यावी याकडे मी विशेष उल्लेखद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बॉम्बेचे मुंबई, पुणाचे पुणे असा बदल झालेला असतानाही त्याप्रमाणे शब्दप्रयोग न वापरणाऱ्यांविरुध्द कारवाई होण्याची आवश्यकता.

मु. शी. : बॉम्बेचे मुंबई, पुणाचे पुणे असा बदल झालेला असतानाही त्याप्रमाणे शब्दप्रयोग न वापरणाऱ्यांविरुध्द कारवाई होण्याची आवश्यकता याबाबत श्री. दिवाकर रावते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.जयप्रकाश छाजेड) : मा□□य सदस्य श्री. दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्य शासनाचा सर्व कारभार मराठी भाषेत होतो. 'बॉम्बे' चे 'मुंबई', पुणाचे 'पुणे' असा सगळीकडे बदल करण्यात आला आहे. परंतु अद्यापपर्यंत काही ठिकाणी बॉम्बे, पुना असा उल्लेख करण्यात येतो. त्यांचेविरुध्द कारवाई होणे आवश्यक आहे. असे शब्दप्रयोग वापरणाऱ्याविरुध्द कडक कारवाई होणे आवश्यक आहे. संबंधित संस्थांना शासकीय मदत, शासकीय जागा देण्यात येऊ नये, अनुदान दिले असल्यास वसूल करण्यात यावे. याबाबत शासनाने त्वरित निर्णय घेण्याबाबत तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, 'बॉम्बेचे' नाव 'मुंबई' झाले. 'पुनाचे' नाव 'पुणे' झाले. अजूनही मी देशात म्हणणार नाही कारण ते सगळे बदलणे कठीण जाईल परंतु खासकरुन या महाराष्ट्रात, किंबहुना आपली अस्मिता जपण्याचे काम आपल्या राज्यात झाले पाहिजे, अशा प्रकारची माझी आग्रही विनती असते. म्हणूनच अजूनही पुना ब्लाईंड असोसिएशन, पुना मर्चंट असोसिएशन, बॉम्बे शिप यार्ड, बॉम्बे डॉक यार्ड, बॉम्बे शॉप ॲक्ट, बॉम्बे शॉप ॲन्ड एस्टाब्लिशमेंन्ट ॲक्ट, बॉम्बे रेंट कंट्रोल ॲक्ट, बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट,

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. दिवाकर रावते ....

बॉम्बे पोलीस ॲक्ट, बॉम्बे ज्युडिशिअल ॲक्ट, बॉम्बे हॉस्पिटल अशा प्रकारची नावे आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या बाबतीत कालच विशेष उल्लेख मांडलेला आहे. अशा प्रकारे या शहराचे नाव मुंबई झाल्यानंतर तसेच पुणाचे नाव पुणे झाल्यानंतर सुध्दा या संस्थांची नावे बदलली जात नाहीत म्हणून मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो आणि याबाबत कडक अंमलबजावणीची अपेक्षा करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विशेष उल्लेखाव्दारे या ठिकाणी बरीच उदाहरणे देऊन अजूनही मुंबई ऐवजी बॉम्बे असे म्हटले जाते याबाबतचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या सगळ्या संस्थांना त्वरित याबद्दलच्या सूचना देऊन बॉम्बे ऐवजी मुंबई अशी सुधारणा करण्यास सांगावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, होय.

उपसभापती : यानंतर सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु होईल्.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आज माझी अर्धा-तास चर्चा आहे. ती आज व्हावी अशी आपली इच्छा असेल किंवा आपले निदेश असतील तर तसे सांगावे.

उपसभापती : पुरवणी मागण्यांवरील चर्चा 7.00 च्या आत संपली तर ठीक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सन 2009-10 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे आज सोमवार, दिनांक 22 मार्च, 2010 आणि उद्या मंगळवार, दिनांक 23 मार्च, 2010 हे दिलेले आहेत. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व मंगळवार, दिनांक 23 मार्च, 2010 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा मंगळवार, दिनांक 23 मार्च, 2010 रोजी पूर्ण करावी लागेल.

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील :-

(1) उपमुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - एच-3, एच-4, एच-6, एच-7, एच-8, एच-9

(2) महसूल व खार जमीन आणि अतिरिक्त कार्यभार पुनर्वसन व मुदतकार्य व भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक- सी-2, सी-5, सी-6

(3) गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- बी-1, बी-3, बी-5, बी-9

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

(4) सामाजिक न्याय, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मगासवर्गीयांचे कल्याण व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- एन-2, एन-3

(5) परिवहन व बंदरे आणि अतिरिक्त कार्यभार विधी व न्याय मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- जे-1, जे-5

(6) ग्रामविकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- एल-2, एल-3, एल-4

(7) सहकार, पणन व संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - व्ही-2 व्ही-5, व्ही-6

(8) कृषी, जलसंधारण, रोजगार हमी योजना आणि अतिरिक्त कार्यभार शालेय शिक्षण विभाग मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-3, डी-7, ई-2, एल-3, एल-7

(9) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक- वाय-1, वाय-2 वाय-4, वाय-5, वाय-6

(10) वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - डी-3, एस-1, एस-4

(11) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पर्यावरण, राजशिष्टाचार आणि अतिरिक्त कार्यभार क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - आर-1, आर-2, आर-5, यू-1, यू-3, यू-5

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत चर्चेला सुरुवात करतील.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. प्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 8 च्या संदर्भात बोलणार आहे. यामध्ये अंगुली मुद्रा केंद्राकरिता स्वयंचलित अंगुली मुद्रा ओळख पटविण्याबाबतच्या प्रणालीबाबत तरतूद करण्यासाठी ही पुरवणी मागणी केलेली आहे. सभापती महोदय, ही जी तरतूद केलेली आहे त्या विषयी मला फार काही बोलावयाचे नाही. पण विधान भवनाच्या सुरक्षितेचा जो प्रश्न ऐरणीवर आलेला आहे त्यामुळे सध्या आपणासह मंत्री, आमदार सगळ्यांना आपल्या गाड्या बाहेर उभ्या करुन पायी चालत यावे लागते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

विधान भवनासंबंधी एवढी मोठी धमकी असेल तर आपले इन्टेलिजन्स डिपोर्टमेंट काय करीत आहे ? नागपूरच्या अधिवेशनामध्ये सुध्दा हा प्रश्न ऐरणीवर आला होता आणि या अधिवेशनातही तो प्रश्न ऐरणीवर आला आहे. विधान भवनाला कोणापासून भीती आहे, की हा नुसता देखावा तयार केला जात आहे ? हे आम्हाला कळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पान क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 10 वर माझे विचार मांडतो. शिकाऊ चालक लायसन्स देण्यासाठी संगणकीकृत चाचणी पध्दती कार्यान्वित करण्यासाठी ही मागणी केलेली आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, "उमेदवारांना वाहतुकीचे नियम अवगत करुन देण्याच्या दृष्टीने आणि प्राथमिक ज्ञान चाचणीमध्ये कार्यक्षमता व पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने शासनाने 35 परिवहन कार्यालयांमध्ये शिकाऊ चालक लायसन्स देण्याबाबत संगणकीकृत चाचणी पध्दती कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. गाडी कशी चालवावयाची याचे ज्ञान संगणकाद्वारे देणार आहे काय ? गाडीचे ज्ञान प्रॅक्टीकलद्वारे दिले पाहिजे. गाडीचे गिअर्स कसे बदलायचे, गाडी स्टीप राईजवर कशी न्यायची याची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे याचे विवेचन करणे आवश्यक आहे. आज खोटी लायसन्स दिली जातात हे अनेकदा सिध्द झालेले आहे. लायसन्स मिळण्यासाठी मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे, या मुद्यासंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे ते समजले पाहिजे. मी मंत्री महोदयांना एक पत्र पाठविले होते. त्यात मुंबईत किती टॅक्सी चालक आहेत, किती लोकांना परमीट दिले आहे, किती लोकांचे परमीट बाद झाले आहे अशी विचारणा केली होती. दुर्दैवाने आजपर्यंत मंत्री महोदयांकडून किंवा त्यांच्या सचिवांकडून किंवा श्री.संगीतराव यांच्याकडून त्या पत्राला उत्तर आलेले नाही. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे अशी तरतूद पूर्वीपासूनच आहे असे शासनाचे मत असेल तर यापूर्वी जे परवाने दिले त्याची पुन्हा एकदा छाननी केली जाणार आहे काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केलेल्या स्टेटमेंटमध्ये असे म्हटले आहे की, मराठी भाषेचे ज्ञान असणे ही तरतूद पूर्वीपासूनच आहे. परंतु मराठी भाषेचे जुजबी ज्ञान की, मराठी भाषा येणे आवश्यक आहे या पेचात हे शासन अडकले आहे. यावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. आजपर्यंत किती टॅक्सी बॅज

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ SBT/ ST/

डॉ.दीपक सावंत....

रद्द केलेले आहेत आणि ते दुस-यांना दिले गेले काय याची माहिती जाणून घेण्यासाठी मी एक महिन्यापूर्वी पत्र पाठविले होते, परंतु आजपर्यंत ती माहिती मला मिळाली नाही.

सभापती महोदय, पान क्रमांक 40 व 41 वर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत ब्म्हसळा, लातूर व संभाजीनगर येथे आरोग्य संकुल स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्हयातील चिमूर येथे इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, आरोग्य भवन बांधण्याचा प्रश्न आहे. आरोग्य भवनाच्या गळतीसंबंधी मी त्यावेळी प्रश्न विचारला होता. तत्कालीन आरोग्य मंत्री डॉ.विमलताई मुंदडा यांच्या रक्षणासाठी माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ उभे राहिले होते. माननीय उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आपण त्यावेळी असे म्हटले होते की, आरोग्य भवन बांधण्याची जबाबदारी तेथील कंत्राटदारांनी स्वीकारली नाही तर सा.बां.विभागामार्फत ही जबाबदारी पार पाडली जाईल.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

पान क्रमांक 40 वरील बाब क्रमांक 46 मध्ये औरंगाबाद व लातूर विभागीय मंडल येथे आरोग्य संकुल स्थापन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे, पान क्रमांक 41 वरील बाब क्रमांक 47 मध्ये म्हसळा, जिल्हा रायगड येथे ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पान क्रमांक 42 वरील बाब क्रमांक 48मध्ये इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम आणि बहुउद्देशीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये उपस्थित झालेल्या एका लक्षवेधीच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यावेळी जे उत्तर दिले होते त्याचे त्यांना मी स्मरण करुन देऊ इच्छितो. सेंट जॉर्जेस हॉस्पिटलच्या आवारामध्ये आरोग्य भवन इमारत बांधली गेली. ती इमारत सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत बांधावयाची होती. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागा ऐवजी खाजगी कंत्राटदारामार्फत ती इमारत बांधण्यात आली. या विषयाच्या लक्षवेधीच्या संदर्भात तत्कालीन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदया डॉ. विमल मुंदडा यांच्या रक्षणासाठी माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ हे उभे राहिले होते. सभापती महोदय, मला हे सांगावयाचे आहे की, ही आरोग्य संकुले काही सार्वजनिक बांधकाम खात्यामार्फत, तर काही आदिवासी विकास खात्यामार्फत तर काही सार्वजनिक आरोग्य खात्यामार्फत बांधली जातात. त्यामुळे कोणते काम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित आहे, कोणते काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे, कोणते काम आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारित आहे हे समजू शकत नाही. प्रायमरी हेल्थ सेंटर, वैद्यकीय महाविद्यालये यांच्या बांधकामाच्या संदर्भात कोणता क्रायटेरिया लावलेला आहे ? सभापती महोदय, गडचिरोलीतील चिमूर हा आदिवासी तालुका आहे. त्या ठिकाणी आदिवासी विभागाने बांधकाम केले पाहिजे. तसे न करता तेथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काम केले जाते. तेव्हा अशा प्रकारची कामे आपण का करता, हे मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे ?

पान क्रमांक 91 वरील बाब क्रमांक 100मध्ये राज्यात विशेष घटक योजनेअंतर्गत जीवनदायी योजनेकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे या जीवनदायी योजनेचे लिमिट वाढविलेले आहे. या जीवनदायी योजनेचा लाभ रुग्णाला घ्यावयाचा असेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.दीपक सावंत...)

त्यासाठी त्यांना अनेक कागदपत्रे सादर करावी लागतात. शेवटी वैतागून मला तुमचे पैसे नको, ऑपरेशन नको, मी असाच मरतो, असे सांगण्याची त्याच्यावर पाळी येते. ज्यावेळी माननीय मंत्रीमहोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी मंत्रालयामध्ये विभागनिहाय सर्व आमदारांची बैठक घेतली होती त्यावेळी सर्व आमदारांनी या जीवनदायी योजनेच्या संदर्भात सिंगल विण्डो सिस्टिम करावी अशी मागणी केली होती. रुग्णाला या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्याला अनेक खेटे घालावे लागतात. म्हणून जिल्हाधिकारी स्तरावच्या एकाच अधिका-याकडे या योजनेचा लाभ देण्यासंबंधीचे अधिकार सोपवावेत अशी आमदारांनी मागणी केली होती. या योजनेअंतर्गत जे जे. हॉस्पिटलचे दीड कोटी रुपये द्यावयाचे असल्याने तेथे ऑपरेशन्स, एन्जोग्राफी, मज्जासंस्थांचे ऑपरेशन्स आदी होत नाहीत. तेव्हा हे दीड कोटी रुपये पुन्हा केव्हा दिले जातील याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

पान क्रमांक 91 वरील बाब क्रमांक 101 अंतर्गत मंजूर अनुदानापेक्षा अपेक्षित अधिक खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, हिवताप नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत केन्द्र सरकारकडून खूप मोठया प्रामणावर निधी येत असताना देखील हिवताप नियंत्रण यंत्रणा व्यवस्थित राबविली जात नाही. या हिवतापाच्या औषधांची प्रतिकार क्षमता कमी व्हायला लागलेली आहे. यासंदर्भात शासनाने संशोधनाचा कार्यक्रम हाती घ्यावा अशी मला शासनाला सूचना करावयाची आहे.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 104. रिक्त पदे भरण्यासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. रिक्त पदांचा प्रश्न बऱ्याच काळापासून शासनाची डोकेदुखी ठरलेला आहे. आम्हाला सभागृहात वारंवार एकाच प्रकारचे उत्तर दिले जाते की, तीन महिन्यामध्ये रिक्त पदे भरली जातील. तीन महिन्याच्या काळात कोणत्या पध्दतीने ही पदे भरली जाणार आहेत याची सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत ही बाब येते.

सभापती महोदय, पृ.क्र.95, बाब क्रमांक 104. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील नवीन भरल्या जाणाऱ्या पदांना वेतन देण्यासाठी मागणी सादर केली आहे. मुंबईमध्ये दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा संप सुरु आहे. सेंट जॉर्ज कंपाऊंडमधील दंत महाविद्यालयामध्ये संगमनेर येथील दंत महाविद्यालयातील काही मुलांना प्रवेश दिला गेला आहे. वास्तविक नियमानुसार 14 जागा भरणे आवश्यकता असताना 46 मुलांना शासनाने इंटर्नशीपसाठी प्रवेश दिला आहे. सेंट जॉर्जेस येथील दंत महाविद्यालयात प्रवेश मिळालेले जे मूळ विद्यार्थी आहेत त्यांचा याला विरोध आहे. त्यामुळे या दोन्ही विद्यार्थ्यांमध्ये भांडण सुरु आहे. मध्यंतरी त्यांनी आझाद मैदानावर मोर्चा काढला, उपोषणाला बसले होते. यामध्ये चूक कोणाची आहे? माझ्याकडे त्या विद्यार्थ्यांचा अर्ज आहे. त्या विद्यार्थ्यांना आरोग्य विद्यापीठाने संमती देऊन ना हरकत प्रमाणपत्र दिले आणि दुसरीकडे जाण्यासाठी संगमनेर कॉलेजने देखील एनओसी दिली. या विद्यार्थ्यांनी काय करायचे? सेंट जॉर्जेस येथील दंत महाविद्यालयातील मूळ विद्यार्थ्यांचा खरा हक्क आहे. त्यांना काम मिळत नाही म्हणून त्यांनी देखील संप केला. हे दोन्ही विद्यार्थी आपल्या जागी बरोबर आहेत. तुम्ही 14 विद्यार्थ्यांना रस्त्यावर काढणार का? उर्वरित 46 विद्यार्थ्यांना काम न मिळाल्याने अपरिपक्व म्हणून बाहेर काढणार का? या प्रश्नावर तोडगा काढणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आरोग्य विज्ञान विद्यापीठाची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. तिथे सगळेच प्रभारी आहेत. प्र-कुलगुरु प्रभारी, डायरेक्टर (फायनान्स) प्रभारी, रजिस्ट्रार प्रभारी आणि परीक्षा नियंत्रक देखील प्रभारी आहेत. पूर्वी ज्या प्र-कुलगुरु होत्या त्यांनी जाता जाता आपल्या बहिणीची त्या पदावर नियुक्ती करवून घेतली. एका पत्रावर प्र-कुलगुरुंची नेमणूक केली जाते. पूर्वीच्या प्र-कुलगुरु डॉ.मृदुला फडके यांनी आपली सख्खी बहीण डॉ.नीलिमा क्षीरसागर यांच्या नेमणुकीबाबत शिफारस पत्र दिले. शासन एका व्यक्तीच्या पत्राचा संदर्भ घेऊन अशा महत्वाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

पदावर नियुक्ती कशी करते? मी देखील विद्यापीठाच्या सिनेटवर आहे. आज आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये चारही महत्वाची पदे प्रभारी आहेत. आरोग्य विज्ञान विद्यापीठासाठी 100 कोटी रुपयांची जमीन मुंबईत घेऊन मुंबईमध्ये आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथून शिफ्ट करण्याचा घाट घातला जात आहे. हा प्रस्ताव सिनेटमध्ये मांडला जाणार होता. परंतु कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेने तो हाणून पाडण्यात आला. नाशिकमधील आरोग्य विज्ञान विद्यापीठ व्यवस्थित चालत नाही. 304 लोक तेथे टेंपररी म्हणून काम करीत आहेत. फक्त 102 लोक कायमस्वरुपी कार्यरत आहेत. शिफ्ट करण्याचा प्रस्ताव आणला होता तो आम्ही हाणून पाडला आहे. असे प्रकार तिथे चालू आहेत याची दखल घेऊन शासनाने उत्तर दिले पाहिजे. आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाब क्र. 21 च्या संदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे.

फलोद्यानसाठी अनुदान, बाब क्र. 21 मध्ये संत्र्याच्या एका झाडाला 125 रुपये देण्याची ही मागणी आहे. माननीय पालकमंत्र्यांना कल्पना आहे की, 11 जानेवारी, 2010 रोजी चोपडा, यावल अमळनेर तसेच जळगांव या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वादळ झाले. मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. कारण ते व्यासपीठावरुन कार्यक्रम सोडून बघायला आले होते. या वादळामध्ये या भागातील शेतकऱ्यांचे जवळपास 400 ते 500 कोटीचे नुकसान झाले. या घटनेला दोन महिने होऊन अद्यापही शासनाकडून अर्थसहाय्य नाही. वास्तविक हे अर्थसहाय्य देण्याची आत्यंतिक आवश्यकता आहे व ते वाढवून देण्याची गरज आहे. नियमाप्रमाणे केळीला 10 रुपये एवढे सुध्दा अर्थसहाय्य मिळत नाही. माननीय ज्येष्ठ व उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या अनुषंगाने माझ्या तीन मागण्या आहेत. केळी या पिकाचा फळामध्ये समावेश व्हावा. दुसरी मागणी अशी आहे की, केळीच्या पिकाचा विमा सुरु व्हावा. कारण शासन कुठलाही विमा घेत नाही आणि विमा कंपनी देखील केळी पिकाचा विमा घेत नाही. त्यामुळे केळीचे एक झाड देखील पडले किंवा गारपीटीने नुकसान झाले तरी 100 ते 125 रुपयाचे नुकसान होते. या दोन्ही बाबींच्या संदर्भात मी अशी विनंती करतो की, शासनाने केळी पिकासाठी विमा सुरु करावा. प्रत्येक वेळेस शासनाने अनुदान द्यावे असे मी म्हणणार नाही परंतु आजच्या परिस्थितीत शासनाच्या अर्थसहाय्याशिवाय काहीही नाही. एका केळीच्या झाडाला 50 ते 60 रुपये खर्च येतो आणि 125 ते 130 रुपये त्या झाडापासून उत्पन्न मिळते. दुसरी माझी मागणी अशी आहे की, वारंवार वादळे होतात. माझ्या तालुक्यात जून, नोव्हेंबर तसेच जानेवारीमध्ये वादळ झाले आणि रावेर तालुक्यात तर 5 वेळा वादळ झाले. यासंदर्भात देखील विचार होणे आवश्यक आहे. कारण एका वर्षात चार-पाच वेळा वादळ यायला लागले तर शेतकरी टिकू शकणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, या वादळात सापडलेल्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त अर्थसहाय्य देण्यात यावे तसेच हे अर्थसहाय्य 31 मार्च, 2010 पूर्वी दिले जाते. केळीच्या पिकाचा फळामध्ये समावेश व्हावा तसेच केळीच्या पिकाला विमा सुरु करण्याच्या संदर्भात शासनाने विचार करावा अथवा विमा कंपन्यांच्या माध्यमातून असा विमा सुरु करण्याचा प्रयत्न करावा. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलताना गृह विभागातील परिवहन विभागावर प्रामुख्याने मी बोलणार आहे.

महोदय, परिवहन विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी नुकताच नव्याने या खात्याचा चार्ज घेतलेला आहे. हा चार्ज घेण्यापूर्वी रायगड जिल्ह्यातील टू व्हिलर्सचे एक मोठे कांड बाहेर आले. त्या प्रकरणात डिपार्टमेंटल चौकशी झाली. त्यानंतर सभागृहात आवाज उठविला त्यावेळेस सीआयडी चौकशी झाली. परंतु बहुधा सर्व आरटीओच्या अधिकाऱ्यांबरोबर मिली भगत होती आणि त्यामुळे यामध्ये "प्रोसिजर लॅप्सेस" अशा पध्दतीचा निष्कर्ष काढण्यात आला. दुर्दैव असे आहे की, या सरकारला कोर्टाने कानफटावल्याशिवाय सुधारायची सवय नाही. हायकोर्टाने यासंदर्भातील सुओ-मोटो ऑब्जेक्शन घेतले आणि शासनाला स्पष्टपणे बजावले की, 4 आठवड्यात पुन्हा चौकशी करुन अहवाल सादर करावा. मला माननीय मंत्री महोदयांचे आश्चर्य एवढेच वाटते की, 31 मार्च, 2009 ला थिरुवअनंतपुरम येथील स्पेशल ब्रँच सीआयडीचे पत्र आपल्या गृह विभागातील ॲडिशनल डी.जी.च्या लेव्हलचे अधिकारी व सध्याचे मुंबई पोलीस आयुक्त डी.शिवानंदन यांच्याकडे आले. त्यात असे म्हटले होते की, " Illegal import of High Speed Motor Bikes- Suspected terrorist activities." म्हणजे थिरुवअनंतपुरम डी.जी. ऑफ इंटेलिजन्स सांगतात की, पेणमध्ये हायस्पीड मोटर बाईक ज्या एका मिनिटात 200 किलोमीटरचा स्पीड गाठतात अशा बाईक अवैधरित्या इंडियन टेरिटोरी मध्ये इम्पोर्ट झाल्या. त्यांचे रजिस्ट्रेशन आरटीओ पेण मध्ये झाले आणि यानंतर, " Possible use of these Motor Bikes for promoting terrorism." हे स्पेसिफिक डी.जी. ऑफ इंटेलिजन्स, केरळ यांनी कळविले होते.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री. विनोद तावडे ....

परंतु आपल्या खात्याने यामध्ये प्रोसिजर लॅप्सेस आहेत असे सांगितलेले आहे. खरे म्हणजे या सर्व आरटीओ अधिका-यांवर मोक्का लावला पाहिजे. महाराष्ट्रात 800 मोटर बाईक्सची नोंदणी झाली परंतु महाराष्ट्रात आता यातील एकही मोटर बाईक सापडत नाही. त्यातील 40-50 मोटर बाईक्स मधू कोडा घेऊन गेले असे सांगितले परंतु मधू कोडा कोणाच्या मार्फत पेणला पोहचले ? हा खालच्या सभागृहातील सदस्य आहे की, वरच्या सभागृहातील सदस्य आहे याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. यामध्ये जे दोषी आहेत त्यांच्यावर मोक्का लावला गेला नाही तर वस्तुस्थिती बाहेर येणार नाही. या मोटर सायकल्स आतंकवादी आणि दहशतवादी वापरत आहेत हे केरळचे डी.जी.लेव्हलचा अधिकारी सांगतो परंतु त्याला आपण प्रोसिजर लॅप्सेस म्हणतो ? आपण या विषयी उत्तर देतांना सांगाल की, आम्ही डिपार्टमेंटल चौकशी केली, सस्पेंड केले, बदली केली पण एवढयावर हे प्रकरण भागणार नाही खरे म्हणजे संबंधितांना मोक्काच लावला गेलk पाहिजे. सरकारकडे यासंदर्भातील सर्व पुरावे असतांना आपण त्यांना सोडून देता हे खरे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 10 च्या संदर्भात मी आता विचार मांडणार आहे. महाराष्ट्राच्या सीमेवर 22 नाके असून 93 फ्लाईंग स्क्वॉड विविध प्रकारची तपासणी करीत असतात. 22 नाक्यामार्फत आपल्याला 100 ते 120 कोटी रुपये दंडाच्या रुपाने मिळत असतात आणि 93 फ्लाईंग स्क्वॉडच्या माध्यमातून 100 कोटी रुपये मिळत असतात. माझ्याकडे असे एक कार्ड आहे की, ते कार्ड दाखविल्यानंतर काहीही पैसे न देता आपल्याला नाक्यातून बाहेर पडता येते. हे कार्ड आपल्या परिवहन आयुक्तांच्या कार्यालयामार्फत विविध ट्रान्सपोर्टवाल्यांना दिले गेले आहे. हे कार्ड दाखवले की, त्या वाहनाची कोणतीही तपासणी न करता त्याला पुढे जाऊ दिले जाते. मी जबाबदारीने आरोप करतो की, यासाठी महिन्याला 50 लाखाचा हप्ता ठरलेला आहे. यावर्षी धडाडीचे मंत्रीमहोदय आल्यामुळे हा विषय टाईट झालेला आहे. गेल्या सात आठ वर्षामध्ये या नाक्यावरुन 120 आणि 100 कोटी रुपये दंड जमा होत होता त्यामध्ये वाढ झालेली आहे. 22 नाक्याकडून आपल्याला 120 कोटी रुपये मिळत होते तेथून आता आपल्याला 250 कोटी रुपये मिळू लागले आहेत. आणि फ्लाईंग स्क्वॉडकडे पूर्वी 100 कोटी रुपये वर्षातून मिळत होते ते आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

200 कोटी रुपये मिळू लागले आहे. सीमेवरील 22 नाके आणि 93 स्क्वॉड हे फार भ्रष्ट आहेत. सभापती महोदय, 22 नाके आणि 93 स्क्वॉड अजून टाईट केले तर यातून अजून सुध्दा 300-400 कोटी रुपये दंड जमा होऊ शकेल. फयान वादळामुळे आणि अवेळी पावसामुळे ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी या शासनाजवळ पैसे नाहीत त्यामुळे या ठिकाणचे जमा झालेले पैसे फयानग्रस्त आणि अवेळी पावसामुळे ज्या लोकांचे नुकसान झालेले आहे त्यांना तरी देता येईल.

सभापती महोदय, महसूल खात्याच्या बाब क्रमांक 16-17 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. हे एक नवीनच प्रकरण आहे. चार वर्षापूर्वी बजेटमध्ये केबल कनेक्शनवर करमणूक कर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मुंबई उपनगरात सुमारे 22 लाख घरे आहेत. परंतु 22 लाख घरांपैकी फक्त 7 लक्ष घरातच केबल कनेक्शन घेतलेले आहे . याचा अर्थ 22 लाख घरापैकी केवळ 7 लक्ष घरामध्येच टी.व्ही. आहे. त्यामुळे यासंदर्भात आम्ही माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागहवली होती. उपनगरातील प्रत्येक तहसीलदाराने सन 2006 मध्ये सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षणावरून असे लक्षात आले की, अशी किती तरी कनेक्शन्स नोंदवलीच गेली नव्हती. म्हणजे एक कनेक्शन नोंदवले गेले तर 400 केबल कनेक्शन नोंदवलीच जात नव्हती.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या कार्यालयाकडून ही माहिती प्राप्त झाली असून केबल सर्व्हेक्षण 2006 - केबल सर्व्हेक्षणात आढळून आलेल्या जादा केबल जोडण्यांच्या करमणूक कराच्या वसुली बाबतचा हा विषय आहे. प्रत्यक्षात दंडाची रक्कम किती आहे याची माहिती देण्यात आलेली आहे.करमणूक कर 13 हजार रुपये वसूल करण्यात आला असून प्रत्यक्षात मात्र 2 लाख 74 हजार रुपये करमणूक कर वसूल करावयास पाहिजे होता. केबल कनेक्शन 600 दाखविण्यात आली असून प्रत्यक्षात केबल कनेक्शन्स 1795 आहेत. अशा प्रकारे प्रत्येक उपनगरातील माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. या संदर्भात 2006 साली शासनाने सर्व्हेक्षण केले असून शासनानेच ही आकडेवारी दिलेली आहे. 2007,2008 आणि 2009 मध्ये जो करमणूक कर गोळा करण्यात आला होता तो सुध्दा 2006 सालच्या अगोदरच्या केबल कनेक्शनच्या आकडेवारीनुसारच करमणूक कर गोळा करण्यात आला होता.शासनाने केबलचा सर्व्हेक्षण केल्यानंतर असे सागितले की केबलची संख्या वाढलेली आहे परतु त्याप्रमाणे करमणूंक कर मात्र वसूल करण्यात आलेला नाही त्यामुळे करमणूंक करात जवळजवळ 500 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. खाल पासून वरपर्यंत या पैशाचे नियमितपणे वाटत केले जाते हे मी अत्यंत जबाबदारीने येथे सांगत आहे.करमणूक करामध्ये 500 कोटी रुपयांचा घोटाळा झाला असून मुंबई उपनगरातील केबल कनेक्शन्स फक्त 600 दाखविण्यात आलेली आहेत प्रत्यक्षात 1795 केबल कनेक्शन्स आहेत. यासांबंधीची माहिती नव्हती असे सुध्दा शासनाला आता म्हणता येणार नाही.कारण शासनाने यासबंधीचे सर्व्हेक्षण केले होते आणि तरी सुध्दा करमणूक कर गोळा करीत असतांना 2006 सालच्या अगोदर दाखविलेल्या केबल कनेक्शन्सप्रमाणेच करमणूक कर गोळा केला आहे. याबाबतीत केबलचा व्यवसाय करणारे असे सांगतात की, " या पैशाचे वाटप केले जाते ." 500 कोटी रुपयांचे वाटप दरवर्षी होत असते. सान्माननीय उपमुख्यंत्र्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असतांना असे सागितले की," राज्यावर 2 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे." अशा प्रकारे कर वसूल करीत असतांना घोटाळे होत असल्यामुळे कर्जाची रक्कम वाढलेली आहे. मुंबई उपनगर जिल्हयातून दरवर्षी 500 कोटी इतका कर गोळा व्हावयासच पाहिजे आणि तो कर गोळा झाल्यानंतर अमुक इतक्या कोटी रुपयांची योजना तयार केली गेली पाहिजे असे मला वाटते. . केन्द्र सरकारने दोन वेळा राज्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

सरकारला योजना कमी करण्याच्या संदर्भात सागितले होते. राज्य शासनाकडून 18 हजार कोटी रुपये जमा होऊ शकत नसतांना 36 हजार कोटी रुपयांची योजना केन्द्र सरकारला सादर केली होती तेव्हा केन्द्र सरकारने असे सागितले की, तुम्ही ही योजना कमी करण्यात यावी. त्यानतर 26 हजार कोटी रुपयांची योजना सादर करण्यात आली होती तेव्हा देखील केन्द्र सरकारने असे सागितले की पुन्हा ही योजना कमी करण्यात यावी . 18 हजार कोटी रुपये गोळा करण्याची क्षमता नसतांना 36 हजार कोटी रुपये कसे काय मागत आहात ? असे केन्द्र सरकारने राज्य सरकारला विचारले होते. प्रोजेक्टेड फिगर्स त्यावेळी जे दाखविण्यात आले होते त्या प्रमाणे पैसे जमा का करण्यात आले नाहीत. ? अशा प्रकारे घोटाळा होत असल्यामुळे प्रत्यक्षात पैसे जमा होत नाहीत. असे मला सांगावयाचे आहे. 500 कोटी रुपयांचे वाटप खाल पासून वरपर्यत केले जात असल्यामुळेच राज्याची योजना केन्द्र सरकार मंजूर करीत नाही. तेव्हा याचा शासनाने कोठे तरी विचार करण्याची गरज आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 29 पान नंबर 25 संबंधी मला बोलावयाचे आहे. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या तीन महिन्याचा शिक्षकांचा पगार मे महिन्यात होत असतो.त्याबाबतीत शिक्षक कधीही बोलत नाहीत.

एक सन्माननीय सदस्य : संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत.

श्री.विनोद तावडे : अनेक विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत तेव्हा त्यावर बोलावयाचे नाही काय ?. शालेय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्या घरी दुर्देवी घटना घडली असल्यामुळे ते आजच सभागृहात आले आणि लवकर गेले आहेत त्यामुळे त्यांच्या बाबतीत मला काही म्हणावयाचे नाही परंतु बाकीच्या मंत्र्यांनी तरी येथे यावयास पाहिजे होते असे माझे म्हणणे आहे. फेब्रुवारी, मार्च आणि एपिव्रल या तीन महिन्याचे पगार शिक्षकांना गेल्या सात आठ वर्षापासून मे महिन्यात दिले जात असल्यामुळे त्यांना मे महिन्यात बाहेरगावी जावयाचे असेल तर पैसे नसल्यामुळे त्यांना त्यासबंधीचे नियोजन करता येत नाही. त्यामुळे ते जाण्या येण्याचे आरक्षण करु शकत नाहीत व ते बाहेरगावी जाऊ शकत नाहीत.

श्री.सरफरे

अशासकीय सत्र / शासकीयसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

परंतु दुर्दैव असे की, आपले सरकार या विषयामध्ये काहीही करीत नाही. यावर्षी काही ठिकाणी थोडासा वेळेवर पगार देण्याचा प्रयत्न झाला.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 59 व पान क्रमांक 53 मध्ये मुंबईतील विक्रोळी व मुलुंड येथील कोर्ट भाडयाच्या जागेत भरतात. त्याठिकाणी न्यायालयांच्या इमारतीसाठी आरक्षित असलेली जागा रिकामी पडली आहे, परंतु त्यावर बांधकाम केले जात नाही. विधी व न्याय विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बी.ओ.टी. तत्व शिकून घेतले तर न्यायालयाच्या इमारती चांगल्याप्रकारे बांधल्या जातील आणि त्यामधून बाकीच्याही गोष्टी होतील. आज त्याठिकाणी वर्षानुवर्षे रिकाम्या पडलेल्या जमिनीवर पुढेमागे झोपडया होतील, त्यानंतर त्याठिकाणी एस.आर.ए. योजना होईल. परंतु आपण या रिकाम्या जमिनीवर कोर्टासाठी इमारत उभी करीत नाही. ते कुठेतरी कोनाडयामध्ये भाडयाच्या जागेत भरविले जात आहे. यामागे काही वेगळा हेतू आहे म्हणून त्या जागेवर इमारत बांधली जात नाही. माननीय सदस्य श्री. सप्रा हे मुलुंडमधील आहेत. त्यांना माहीत आहेत. समोर मोकळे मैदान पडले आहे, ती जिल्हाधिकाऱ्यांची जागा आहे. असे असतांना ॲनिमल हसबंडरी विभागाच्या जागेमध्ये कोपऱ्यात न्यायालय भरविले जात आहे. आपण फास्ट ट्रॅक कोर्टच्या गोष्टी करीत आहात. तेव्हा याकडे जरा अधिक लक्ष द्यावे अशी माझी सूचना आहे. महाराष्ट्रामध्ये डोमिसाईल सर्टिफिकेटकरिता तहसिलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे जावे लागते. मुंबईमध्ये मॅजिस्ट्रेट यांच्याकडे जावे लागते. त्यांच्याकडे मुळातच 14 कर्मचारी आहेत. त्यापैकी 2-3 कर्मचारी रजेवर असतात. मध्यंतरी म्हाडाच्या अर्जासाठी आणि दहावी-बारावीच्या परिक्षेसाठी डोमिसाईल सर्टिफिकेट मिळविण्याकरिता लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे डोमिसाईल सर्टिफिकेट देण्याचे काम तेथील कर्मचाऱ्यांना करावे लागत असल्यामुळे कोर्टाचे कामकाज रेंगाळत पडले. तेव्हा यामध्ये विधी व न्याय विभागाने लक्ष घातले पाहिजे

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या माध्यमातून मला सांगावयाचे आहे की, महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्हयाला वैद्यकीय महाविद्यालय दिले आहे. आज मुंबईचे के.ई.एम. महाविद्यालय हे मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे आहे. परंतु या महाविद्यालयाची मान्यता रद्द होण्याची शक्यता रोज वर्तमानपत्रामध्ये छापून येणाऱ्या बातम्यांवरुन आम्हाला समजते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. विनोद तावडे....

यामुळे त्या महाविद्यालयाचे डीन हतबल होऊन मी याबाबतीत काही करु शकत नाही असे म्हणत आहेत. मुंबई महानगरपालिका दरवर्षी 2200 कोटी रुपये आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणावर खर्च करीत आहे. तेव्हा याबाबतीत शासनाने लक्ष घालून के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयाची मान्यता एम.सी.आय.कडून काढून घेतली जाणार नाही यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, पर्यावरण विभागाच्या पान क्र. 105 व बाब क्रमांक 111 च्या अनुषंगाने लोटे परशुराम येथील एम.आय.डी.सी.च्या ठिकाणी सेंट्रल एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँट असून तो लहान लहान रासायनिक कंपन्यांसाठी बांधला आहे. परंतु कालांतराने त्याठिकाणी मोठमोठया कंपन्या आल्या. त्यानंतर त्या कंपन्यांनी अस्तित्वात असलेल्या एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँटच्या क्षमतेपेक्षा जास्त अशुध्द पाणी सोडावयास सुरुवात केली. त्यामुळे आसपासच्या गावामध्ये प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला. त्या कारखान्यामधील सॉलीड हझार्डस वेस्ट त्यावर प्रोसेस करुन ते स्पेसिफिक क्षेत्रामध्ये टाकण्याची आवश्यकता आहे. परंतु ते मुंबई-गोवा महामार्गावर कुठेतरी कोपऱ्यात टाकले जाते, त्यामुळे तेथील गावामध्ये प्रदूषण होत आहे. यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने लोटे-परशुराममधील कारखाने बंद केले. बरेच दिवस कारखाने बंद होते. त्याठिकाणी सफिशियंट सेंट्रल एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँट बसविण्यात आले नाही म्हणून त्यांना नोटिस पाठविण्यात आली. परंतु नंतर काय चक्रे फिरली माहीत नाही, कुणाचा तरी आर्थिक, राजकीय दबाव आल्यानंतर ते कारखाने पुन्हा चालू झाले. त्यांनी कोणत्या गोष्टींची पूर्तता केली माहीत नाही. सकाळीच डोंबिवलीच्या संदर्भात चर्चा झाली त्यावेळी माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, त्याठिकाणी 38 कारखाने बंद आहेत. परंतु आपण त्याठिकाणी कारखाने चालू आहेत असे सांगितले. हे कारखाने चालू करण्यासाठी त्यांनी कोणत्या गोष्टींची पूर्तता केली? एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँटची क्षमता वाढविली काय? ही क्षमता वाढविण्यासाठी 60 महिने लागतात. त्यानंतर ते चालू झाले काय? एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँट व्यवस्थितपणे करण्यास 60 महिने लागण्याची आवश्यकता आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण 15 दिवसात नोटीस देऊन सुरु केले. लोटे-परशुरामच्या बाबतीत देखील पुन्हा असेच झाले आहे. त्यामुळे या बाबीवर बोलताना मला सांगावयाचे आहे की, लोटे-परशुराम कारखाना बंद केला होता. डोंबिवली येथील कारखाने बंद केले होते, ते कोणत्या कारणासाठी, कुठल्या दबावामुळे पुन्हा सुरु केले आणि त्यांनी असे काय केले ? याबाबतीत माहिती देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी एकच शेवटचा मुद्दा मांडू इच्छितो. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब उपस्थित आहेत. त्यांनी मघाशी हा मुद्दा मांडला होता. पर्यटन, सांस्कृतिक कार्य विभागाच्या पान क्र.141 वरील बाब क्र.141 मध्ये लिहीलेले आहे की, "मुंबई नॅचरल हिस्टरी या संस्थेस सहायक अनुदान 12,50,000 रुपये देणे. काही शिवसैनिकांनी बॉम्बे नॅचरल हिस्टरी या संस्थेच्या पाटीला काळे फासले होते. याबाबत त्यांच्या चेअरमनचे पत्र आलेले आहे की, आम्ही या संस्थेचे नाव बदलणार नाही. मग माननीय श्री.छगन भुजबळसाहेब याठिकाणी "मुंबई" हे नाव कसे आले ? समजा त्या ट्रस्टचे नाव "बॉम्बे नॅचरल हिस्टरी" असे असेल तर मग याठिकाणी देखील "बॉम्बे नॅचरल हिस्टरी" असे आले पाहिजे. कारण नावाचे भाषांतर करता येत नाही, म्हणजे माननीय श्री.छगन भुजबळ यांचे "आर्म स्ट्राँग" म्हणजे "छगन आर्म स्ट्राँग" असे नाव होऊ शकत नाही. ते नाव "श्री.छगन भुजबळ" असेच आले पाहिजे. तसे "मुंबई नॅचरल हिस्टरी" याचे "बॉम्बे नॅचरल हिस्टरी" असे नाव आले पाहिजे. मग सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब मी आपल्याला विचारु इच्छितो की, "बॉम्बे नॅचरल हिस्टरी"या संस्थेला 12 लाख रुपये द्यावयाचे काय? तेव्हा ही बाब कुठेतरी स्पष्टपणे आले पाहिजे आणि हे सरकार त्यांना कशासाठी पाठिशी घालत आहे. समजा ट्रस्टचे जे नाव आहे, ते बदलण्यासाठी सुध्दा एक प्रोसेस आहे आणि त्यानुसार ते बदलले जाते. पण त्या संस्थेचे अध्यक्ष लिहीतात की, आम्ही नाव बदलणार नाही. मग जर तुम्हाला बदलावयाचे नसेल तर मग आमच्याकडून कशासाठी पैसे घेत आहात ? तुम्ही महाराष्ट्रात आहात ना. मग याचा कुठेतरी विचार केला पाहिजे. सभापती महोदय, एवढीच विनंती आहे की, आम्ही ही घसघशीत भ्रष्टाचाराची प्रकरणे मांडतो, त्याची उत्तरे आली पाहिजेत. पण दुर्दैव असे आहे की, याची उत्तरे येत नाहीत.

उपसभापती : याचे उत्तर एकच आहे की, यामध्ये काहीही भ्रष्टाचार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मग आम्ही पुरवणी मागण्यांवर कशासाठी बोलावयाचे

. . . .3 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . ..

त्यामुळे केबल नेटवर्कचा 500 कोटी रुपयांचा घोटाळा असेल किंवा परिवहन मध्ये मोक्का लावण्याचा मुद्दा असेल किंवा 50 लाखाचा महिन्याचा हप्ता असेल किंवा पर्यावरणाच्या संबंधातील विषय असतील या सर्व विषयांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना माहिती देतील एवढीच अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद.

. . . .3 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पान क्र.5, बाब क्र.4 मध्ये स्मारकांचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, 1) दिवंगत श्री.वि.स.पागे, स्मारक तासगाव, जिल्हा सांगली 2) दिवंगत डॉ.सी.डी.देशमुख, स्मारक रोहा, जिल्हा रायगड 3) दिवंगत श्री.रणजित देसाई, स्मारक कोल्हापूर 4) दिवंगत श्री.बाळासाहेब सावंत, स्मारक जिल्हा रत्नागिरी 5) दिवंगत श्री.वि.स.खांडेकर, स्मारक जिल्हा सिंधुदूर्ग 6) दिवंगत श्री.भाई सावंत, स्मारक सावंतवाडी, जिल्हा सिंधुदूर्ग यांची स्मारके उभारण्यासाठी निधी देण्याचे ठरविण्यात आले आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु माझी शासनाला एकच विनंती आहे की, कणकवली येथे कोकणचे गांधी म्हणून दिवंगत श्री.आप्पासाहेब पटवर्धन यांचेही स्मारक उभारण्यात आले तर ते खऱ्या अर्थाने चांगले होईल. म्हणून त्यासाठी या मागण्यांमध्ये शासनाने तरतूद करावी.

सभापती महोदय, मला छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात शासनाला आणखी एक विनंती करावयाची आहे. सिंधुदूर्ग किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर आहे. त्या बाबतीत शासनाने वेळोवेळी सांगितलेले आहे आणि गेल्यावेळच्या पॅकेजमध्ये यासाठी एक कोटी रुपये जाहीर झाले होते. माझी शासनाला विनंती आहे की, या स्मारकासाठी देखील निधी देण्यात आला तर चांगले होईल.

सभापती महोदय, बाब क्र.10, पान क्र.9 ही गृहनिर्माण विभागाच्या संदर्भातील मागणी आहे. मी एकच सांगू इच्छितो की, सध्या राज्यामध्ये पोलीस खात्यामार्फत भरती सुरु आहे. पण माझी या चर्चेच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, या भरतीमध्ये प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक 50 टक्के उमेदवारांना जागा दिल्या तर चांगले होईल. कारण कोकणातील जे जिल्हे आहेत विशेषत: सिंधुदूर्ग जिल्हा छोटा असल्यामुळे तेथे सांगली, सातारा या परिसरातून जास्तीतजास्त लोक येतात आणि त्यामुळे तेथील स्थानिक बेकार तरुणांवर अन्याय होतो. म्हणून या निमित्ताने माझी शासनाकडे मागणी आहे की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामधील स्थानिक लोकांना किमान 50 टक्के जागा उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री. राजन तेली...

सभापती महोदय, माझी दुसरी प्रमुख मागणी कोकणातील दोन जिल्हयांसाठी आहे. या जिल्हयामध्ये अनुसूचित जमातीच्या जागा भरल्या जात नाहीत. कारण येथे अनुसूचित जमातीचे लोक मिळत नाहीत. ठाकर समाज आहे पण या समाजाला शासन अधिकृत मान्यता देत नाही. त्यामुळे या जिल्हयामध्ये इतर जिल्हयातून अनुसूचित जमातीचे जे लोक नोकरीस लागतात त्यांचे नोकरीला लागलेल्या पहिल्या दिवसापासूनच या जिल्हयाच्या बाहेर बदली करुन घेण्याचे प्रयत्न असतात. म्हणून शासनाला या माध्यमातून विनंती आहे की, या जिल्हयातील स्थानिक जाती व पोटजाती मधूनच हा कोटा भरण्यात यावा. कारण याठिकाणी अनुसूचित जातीची पदे कायम रिक्त असतात. म्हणून या जिल्हयामध्ये तरी स्थानिक लोकांना, स्थानिक पोट जातीतील लोकांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात यावे, अशा प्रकारची मी विनंती करतो.

सभापती महोदय, आमच्याकडे श्री. परकाळे म्हणून एक डी.वाय.एस.पी. आहेत त्यांच्या बाबतीत शासनाकडे बऱ्याच तक्रारी यापूर्वी देखील करण्यात आलेल्या आहेत. वेगवेगळया प्रकारचे हप्ते मागणे, स्टॉलधारकांना, रिक्षा चालकांना त्रास देणे याबाबतीत त्यांच्या विरुध्द तक्रारी आहेत म्हणून त्यांच्यावर कारवाई करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 17, पृष्ठ क्रमांक 15. नैसर्गिक आपत्ती याबाबत मी बोलू इच्छितो. याबाबतीत मी शासनाला अशी विनंती करतो की, कोकणामध्ये फयान वादळ झाले, त्यावेळी शासनाने अतिशय चांगल्या प्रकारची मदत केली. (अडथळा) मच्छिमारांना काही प्रमाणात मदत करण्यात आलेली आहे. नाही असे म्हणू नका. पहिल्यांदाच मच्छिमारांना चांगल्या प्रकारची मदत करण्यात आलेली आहे. काही मच्छिमारांना मदत मिळाली नसेल तर त्यांनाही मदत देण्यात यावी.

सभापती महोदय, कोकणात पूर परिस्थिती निर्माण झाल्यानंतर बरीच गावे बाधीत झालेली आहेत. त्याठिकाणचा गाळ काढण्याची आवश्यकता आहे. ड्रेझर घेतो असे सांगण्यात आले होते ते घेतले की, नाही याची मला कल्पना नाही.पण गेल्या बजेटमध्ये हा विषय आला होता. संपूर्ण कोकणातील अशी जी बाधीत गावे आहेत या बाधीत गावांची एक यादी तयार करुन त्या ठिकाणचा गाळ उपसण्यात यावा. त्यामधील जी गावे शिल्लक रहातील त्या ठिकाणी छोटया फायबरच्या बोटी देण्याचा प्रयत्न करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

सभापती महोदय, बाब क्रमांक 45 पृष्ठ क्रमांक 40 डोंगराळ क्षेत्रातील साकव बांधणीसाठी पैसे देण्यात आलेले आहेत त्यासाठी मी मनापासून धन्यवाद देतो.पण साकव दुरुस्तीसाठी पैसे दिले पाहिजेत अशा प्रकारची विनंती मी या ठिकाणी करतो. कारण जिल्हा परिषदेमध्ये साकव दुरुस्तीसाठी वेगळा हेड नाही आणि जिल्हा परिषदेकडे साकव दुरुस्तीसाठी पैसे नाहीत. म्हणून साकव दुरुस्तीसाठीसुध्दा पैसे देण्यात यावेत, अशी मी याठिकाणी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 59 पृष्ठ क्रमांक 53. विधी व न्याय विभाग. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये वैभववाडी आणि दोडामार्ग हे दोन नवीन तालुके निर्माण झालेले आहेत. वैभववाडीमध्ये न्यायाधिशांना राहण्यासाठी बंगला बांधलेला आहे. परंतु न्यायालयासाठी जागा घेऊन सुध्दा न्यायालयाच्या बांधकामाला सुरुवात झालेली नाही. या ठिकाणी दोन वर्षापूर्वी न्यायाधिशांच्या घराची व्यवस्था करण्यात आलेली आहे. म्हणून वैभववाडीमध्ये न्यायालय होण्याची अत्यंत गरज आहे कारण सध्या कणकवलीमध्ये न्यायालय बसत आहे.

सभापती महोदय, माझी दुसरी विनंती अशी आहे की, दोडामार्ग तालुका हा दहा वर्षापूर्वी तयार झालेला आहे तेथे सुध्दा लवकर न्यायालय व्हावे अशा प्रकारची मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 75. अनुसूचित जाती जमाती. सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, आमच्याकडे ठाकर समाज आहे. सिंधदुर्ग जिल्हयातील ठाकर समाजाला 1973 पूर्वी क्षेत्रबंधनामुळे जातीचे दाखले मिळत नव्हते परंतु भारत सरकारने सन 1976 मधील शेडयुल्ड कास्ट ॲन्ड शेडयुल्ड ट्राईब ऑर्डर यामध्ये अमेंडमेंन्ट केली. ॲक्ट नंबर 108/1976 मध्ये अमेंडमेंन्ट करण्यात आली. त्यावेळी क्षेत्रबंधन उठवून महाराष्ट्रातील सर्व ठाकर समाजाचा अनुसूचित जातीच्या यादीत क्रमांक 44 वर अंतर्भाव केलेला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ठाकर समाजाला घटनेच्या कलम 342 प्रमाणे फायदे मिळू लागले होते परंतु मध्यंतरीच्या काळात या ठाकर समाजाला जातीचे दाखले मिळत नव्हते. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयात जे थोडेफार ठाकर समाजाचे लोक आहे त्यांना न्याय देण्यात यावा.

सभापती महोदय बाब क्रमांक 100 आणि पृष्ठ क्रमांक 91. सार्वजिनक आरोग्य. राज्यात विशेष घटक योजनेतंर्गत जीवनदायी योजना आहे. संपूर्ण राज्यामध्ये प्रत्येक जिल्हयातील किती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा मिळाला याची यादी जाहीर करण्यात यावी. कोकणातील किंवा इतर ठिकाणच्या जिल्हयामध्ये या योजनेचा फायदा मिळत नाही. म्हणून जिल्हानिहाय यादी जाहीर करण्यात यावी, अशा प्रकारची विनंती आहे.

सभापती महोदय,बाब क्रमांक 117 आणि पृष्ठ क्रमांक 111. सहकार आणि पणन विभाग यावर मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, मी याठिकाणी मुद्दाम उल्लेख करतो की, आमच्याकडे 1991 मध्ये महामँगो ही संस्था दाखल झाली. राज्यात पहिल्यांदा महामँगो आणि महाग्रेप या दोनच संस्था होत्या.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

महामँगो संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला. गेली दहा वर्षे ती संस्था बंद आहे. तेथील आंबा बागायतदारांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. ती संस्था पुनरुज्जीवित कशी करता येईल यासाठी प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. महामँगोवर कलम 83 पमाणे 2006 मध्ये कारवाई झाली. ती कारवाई झाल्यानंतर आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. कलम 88 प्रमाणे करावयाची कारवाई दोन महिन्यात पूर्ण करावी अशा प्रकारचे आदेश दिलेले असताना एक वर्षभर कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. फक्त 3.3.2010 ला नोटीस दिलेली आहे. तेथील जे संचालक दोषी असतील त्यांच्यावर कलम 88 प्रमाणे त्वरित कारवाई करावी. तेथील एक संचालक श्री. सुरेश दळवी हे त्या संस्थेचे सभासद नाहीत. वेळेवेळी डीडीआरकडे कागदपत्रे दिलेली आहेत परंतु त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यांच्यावर कारवाई करावी. त्या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे. या दोन्ही बाबतीत कारवाई करावी अशी विनंती करतो आणि आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 40 वरील बाब क्रमांक 46 बाबत बोलणार आहे. औरंगाबाद व लातूर येथे आरोग्य संकुल उभारण्यासाठी या ठिकाणी तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. लातूर येथे आरोग्य संकुलाची अंतिशय सुदर अशी इमारत बांधलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उभारली नसेल एवढ्या चांगल्या इमारतीचे बांधकाम त्या ठिकाणी करण्यात आले आहे. त्याच पध्दतीने महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी या पुढच्या काळामध्ये अशा प्रकारच्या आरोग्य संकुलाच्या इमारती शासन बांधणार असेल त्या इमारती अशाच पध्दतीच्या, लातूरच्या इमारतीचे मॉडेल समोर ठेऊन बांधाव्यात अशी मी विनंती करतो. सार्वजनिक बांधकाम विभाग सातत्याने विविध इमारतींचे बांधकाम करतो. महाराष्ट्रातील विश्रामगृहे असतील, प्रशासकीय इमारती असतील, आय.टी.आय.च्या इमारती असतील, तंत्रनिकेतने असतील त्यांच्या बाबतीत माझी शासनाला विनंती राहणार आहे की, ज्यावेळी आपण सगळ्या ठिकाणी आय.टी.आय.च्या इमारती बांधू, शासकीय तंत्रनिकेतनच्या इमारती बांधू, शासकीय विश्रामगृहांच्या इमारती बांधू तेव्हा सगळीकडे एकाच प्रकारची इमारत असावी असे मॉडेल तयार करता आले आणि त्याप्रमाणे इमारती बांधल्या तर ते फार योग्य होईल. त्यामुळे शहरामध्ये गेल्यानंतर ही इमारत शासकीय विश्रामगृहाची आहे, ही इमारत शासकीय तंत्रनिकेतनची आहे हे इमारत पाहिल्याबरोबर जनतेला ओळखता येईल. अशा पध्दतीचा नवीन उपक्रम करता आलातर तो करावा अशी मी विनंती करतो. आताच काही वेळापूर्वी या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम हाती घेत आहोत. ही अभिनंदनीय बाब आहे. तो रस्ता कोकणाच्या दृष्टीने पूर्ण होणे गरजेचे आहे. तो रस्ता तातडीने पूर्ण करावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने सगळीकडे विकास व्हावयाचा असेल तर तेथील रस्ते चांगले पाहिजेत. रस्ता हा विकासातील प्रमुख घटक आहे. त्या ठिकाणी टोल आकारला तरी हरकत नाही. जिल्ह्याजिल्ह्यांना जोडणारे जे रस्ते आहेत त्यांचे भविष्यकाळामध्ये चौपदरीकरण झाले पाहिजे. टोल आकारला तरी जनतेला हरकत नाही. त्या ठिकाणी लोकांचा वेळ वाचतो, त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

ठिकाणी चांगल्या सुविधा मिळतात. म्हणून भविष्य काळामध्ये विकासाला अधिक गतिमान करावयाचे असेल तर जिल्ह्याजिल्ह्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचे चौपदरीकरण झाले पाहिजे यासाठी कृती कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. तसा कार्यक्रम घ्यावा अशी मी विनंती करतो. ही सगळी कामे होत असताना ती अत्यंत चांगल्या रीतीने पूर्ण झाली पाहिजेत. त्या कामामध्ये क्वालिटी असली पाहिजे. त्यासाठी एखादा स्वतंत्र क्वालिटी सेल आपल्या खात्यामध्ये निर्माण केला तर ती एक चांगली बाब होईल. तसा क्वालिटी सेल आपण स्थापन करावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मला महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमाक 15 वरील बाब क्रमांक 17 बाबत बोलावयाचे आहे. दुष्काळी परिस्थिती तसेच पाणी टंचाईच्या संदर्भात यामध्ये तरतूद केलेली आहे. दरवर्षी आपल्याकडे पाणी टंचाई येत असते.जे तहसीलदार असतात किंवा जिल्हाधिकारी असतात त्यामध्ये विहीर अधिग्रहीत करण्याचे अधिकार असोत किंवा पाण्याचे टँकर लावण्याचे अधिकार असो,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

हे अधिकार तहसीलदारांना नसतात. त्यांना वारंवार जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा लागतो. एखाद्या गावातील शेतक-याच्या विहिरीला भरपूर पाणी असेल तर ती विहिर अधिग्रहित करण्याचे अधिकार बीडीओ किंवा तहसीलदारांना दिले पाहिजेत, जेणे करुन त्या गावातील लोकांना पाणी मिळणे सोयीचे होईल.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पान क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 10 वर शिकाऊ चालक लायसन्स देण्यासाठी संगणकीकृत चाचणी पध्दती कार्यान्वित करण्यासाठी मागणी केलेली आहे. याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करीन. एक चांगली पध्दती आणलेली आहे. सध्या कॉलेजमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना लायसन्सची गरज असते, त्यासाठी त्यांना अभ्यास बाजूला ठेवून लायसन्स मिळविण्यासाठी वेळ द्यावा लागतो. त्याठिकाणी एजंट लोक असतात, त्यांच्या भोव-यामध्ये हे विद्यार्थी अडकतात. त्यामुळे सर्व आरटीओ कार्यालयातील एजंट असलेल्या लोकांचे उच्चाटन झाले पाहिजे. या विद्यार्थ्यांना सुलभरितीने परवाने मिळण्यासाठी एखाद्या रविवारी महाविद्यालयाच्या मोठया मैदानावर कॅम्प घेऊन त्यांना परवाने दिले तर त्यांना सोयीचे होईल आणि तशी योजना पुढील काळात करण्यात यावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 11 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. मोटार वाहन विभागाकरिता 86 मोटार वाहने खरेदी करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. पोलीस अधिकाऱ्यांना चांगली वाहने दिली पाहिजेत याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यांना सुध्दा चांगली वाहने दिली पाहिजेत. आज तेथील वाहने वारंवार बिघडत असल्यामुळे गाडी ढकलत ढकलत न्यावी लागते. ग्रामीण भागातील पोलीस ठाणी सक्षम झ ाली पाहिजेत. त्यांना चांगल्या गाडया दिल्या पाहिजेत, पोलीस ठाणी संगणकीकरणाने जोडली पाहिजेत.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पान क्रमांक 75 वरील बाब क्रमांक 86 वर माझे विचार मांडतो. राज्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये काम करणारे कर्मचारी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

अतिशय थोडक्या वेतनावर काम करतात. या कर्मचा-यांवर मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे त्यांना वेतनश्रेणी दिली गेली पाहिजे. ही मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. म्हणून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांना वेतनश्रेणी देण्यासाठी योग्य ती तरतूद करावी.

त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत आश्रमशाळा चालतात, मतिमंद मुलांची वसतिगृहे चालतात. या आश्रमशाळांमध्ये एखाद्या दिवशी घटना घडली नाही असे कधी होत नाही. कधी विषबाधा झाल्याची तर कधी मारहाण झाल्याची बातमी वर्तमानपत्रातून येत असते. परवा तर लातूरमध्ये एक मोठी घटना घडली. दिनांक 20 तारखेला पहाटे 5.30 वाजता एका मतिमंद शाळेतील शिक्षक श्री.विजयकुमार कांबळे यांचा खून करण्यात आला. त्या शाळेच्या संस्था चालकांना शाळेच्या मुख्याध्यापकपदी अन्य कोणाला तरी आणावयाचे असल्याने श्री.कांबळे यांचा खून करण्यात आला. यासंदर्भात मी माननीय गृहमंत्र्यांना पत्र दिलेले आहे. खून करण्यापर्यंत पोहोचलेल्या अशा शाळांची मान्यता रद्द केली पाहिजे. लोकशाहीमध्ये शिक्षकाचा खून करणा-या संस्था चालकांच्या शाळेची मान्यता रद्द केली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 88 वर मी बोलतो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्या देण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम बँकेमार्फत देण्याचे कबूल करण्यात आले आहे. परंतु शिष्यवृत्ती देत असताना ते वर्ष संपण्यापूर्वी त्या त्या विद्यार्थ्यांच्या हातामध्ये ही रक्कम मिळाली पाहिजे, अशी व्यवस्था तातडीने करण्यात यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 118, पान क्रमांक 110 वर वर मी माझे विचार मांडतो. हा कृषी प्रधान देश आहे. आम्ही सर्वजण शेतक-यांच्या प्रश्नासाठी धडपडत असतो. जून-जुलै महिन्यामध्ये शेतकरी बांधवांना मोठया प्रमाणावर खताच्या टंचाईला सामोरे जावे लागते. शेतक-यांना जुन-जुलै महिन्यात किती खत लागते याचा आराखडा तयार करुन त्यांना जेवढे खत पाहिजे तेवढे खत मे महिन्यामध्ये आणून ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक गावात व तालुक्याच्या ठिकाणी खतांच्या दराचे फलक लावले पाहिजेत, जेणे करुन त्यांना योग्य दरामध्ये खत उपलब्ध होऊ शकेल.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

पान क्रमांक 25 वरील बाब क्रमांक 30 अंतर्गत महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी प्राथमिक शाळांसाठी घेतलेल्या इमारतींच्या भाड्याचा खर्च भागविण्यासाठी रुपये 23,30,79,000/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या एवढ्या रकमेमध्ये 5-10 शाळांच्या इमारती बांधून झाल्या असत्या. नगरपरिषदा आणि महानगरपालिका यांच्या क्षेत्रात अनेक ठिकाणी शाळांसाठी रिकाम्या जागा आहेत. त्याठिकाणी या शाळा बांधता येतील. असे असताना केवळ भाड्यापोटी एवढी तरतूद का करण्यात येते याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. तसेच ही झालेली चूक भविष्यकाळात दुरुस्त करावी, अशी मी विनंती करतो.

पान क्रमांक 26 वरील बाब क्रमांक 31 अंतर्गत अमरावती येथील श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या 14 जुन्या शालेय इमारतीच्या बांधकामाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. अशा पध्दतीने महाराष्ट्रामध्ये अनेक संस्थांच्या शाळांच्या इमारती जुन्या झालेल्या आहेत. शासनाने इमारत भत्ता दिलेला नाही. जर शाळेमध्ये खडू, फळा घ्यावयाचा असेल तर त्यासाठी शिक्षकाला किंवा मुख्याध्यापकाला स्वत:च्या पगारातून पैसे खर्च करावे लागतात. हा इमारत भत्ता देण्यासाठी प्रस्ताव सादर करुन दोन वर्षे झाली. भारताच्या राष्ट्रपती महामहीम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे पती श्री. शेखावतसाहेब या प्रश्नाचा पाठपुरावा करीत असून त्यांनी स्वत:हून माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर दोन वेळा बैठक घेतली. या संदर्भात राज्यमंत्र्यांकडे प्रस्ताव देखील सादर झालेला असून त्यास मान्यता मिळण्याचे काम झालेले नाही. सभापती महोदय वेतनेतर अनुदान 12 टक्क्यावरुन 5 टक्क्यावर आणण्यास हरकत नाही. आम्ही 7 टक्क्यावर पाणी सोडतो, परंतु 5 टक्के जे द्यावयाचे आहे ते तरी कधी देणार ? ते तातडीने द्यावेत अशी मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, शिक्षण सेवकाला तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागते. 6व्या वेतन आयोगामध्ये सर्वांचे पगार वाढले. परंतु शिक्षण सेवक फक्त 3 हजार रुपयावर काम करीत आहे. आमच्या ग्रामीण भागातील एखादी महिला शेतावर गेली तर महिन्याला तिला तीन-चार हजार रुपये मिळातात. पण शिक्षण सेवक हा तीन हजार रुपयावर काम करीत आहे. या शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव मान्य झाल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून आणि टी.व्ही.वाहिन्यावरुन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विक्रम काळे....

देण्यात आल्या आणि जेव्हा प्रत्यक्षात त्यासंबंधीच्या आदेशाच्या प्रतीची मागणी करण्यात आली त्यावेळी हे मानधन वाढलेले नाही, कोणी तरी चुकीची बातमी दिली असे अधिका-यांनी सांगितले. अशा पध्दतीने शिक्षकांच्या भावनांशी खेळणारा हा कोण अधिकारी आहे ? शाहू, फुले, आंबेडकरांच्या राज्यामध्ये हे काय चालले आहे ? या सा-या गोष्टींचा शोध घेतला पाहिजे. शिक्षण सेवकांच्या मानधनाच्या संदर्भात जो निर्णय झालेला नाही असे सांगितले जाते तो निर्णय तातडीने करावा अशी मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, शिक्षणावर किमान 6 टक्के खर्च झाला पाहिजे. परंतु आम्ही गेली अनेक वर्षे पहात आहोत की, शिक्षणावर फक्त 2 टक्केच खर्च करण्यात येत आहे. केन्द्र सरकारने शिक्षण विषयक विधेयक मंजूर केलेले आहे. त्याचा आधार आपण घेतला पाहिजे. कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय यांच्या बाबतीत "कायम विनाअनुदानित" हा शब्द काढून टाकावा अशी मी विनंती करतो.

सन्माननीय राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांना मी विनंती करु इच्छितो की, मुस्लीम समाजाला जर ख-या अर्थाने विकासाच्या गंगेत आणवयाचे असेल तर त्यांच्यासाठी उर्दू अंगणवाड्या निर्माण केल्या पाहिजेत, उर्दू विस्तार अधिका-यांची पदे तालुका आणि जिल्हास्तरावर निर्माण केली पाहिजेत, एवढे बोलून सभापती महोदय, मला बोलण्यासाठी अधिक वेळ दिलात त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

पान क्रमांक 10 वरील बाब क्रमांक 13 अंतर्गत पोलीस स्टेशनला सी.सी.कॅमेरे लावण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. मघाशी या सभागृहामध्ये लक्षवेधीवर चर्चा करीत असताना राज्य शासनाने जनतेला सी.सी.कॅमेरे लावण्यास सांगितले आहे. मोठमोठ्या शहरामध्ये अतिरेक्यांपासून आपला जीव वाचवावयाचा असेल तर सी.सी.कॅमेरे लावा असे शासनाने सांगितलेले आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मला अशी सूचना करावाची आहे की, पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यास गेल्यानंतर तक्रारदाराचे आणि तक्रार नोंदवून घेणा-याचे रेकॉर्डिंग झाले पाहिजे. यामध्ये किती पारदर्शकता येईल हे मला माहीत नाही. परंतु काही तरी पारदर्शकता निश्चितच येईल. आज परिस्थिती अशी आहे की, लोक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी जाण्यास घाबरतात. पोलिसांना पैसे दिल्या शिवाय न्याय मिळणार नाही. असे त्यांना वाटते. पोलिसांना फक्त कलम लावण्याचे अधिकार आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

तपास करायला किती कालावधी मागायचा हा त्यांचा अधिकार आहे. अटक केल्यानंतर 24 तासात न्यायालयात हजर केले पाहिजे. ती वेळ कमी जास्त करण्याचा अधिकार आहे. सीसी कॅमेरे बसविण्याचा खर्च फार कमी आहे. दोन ते तीन हजार रुपयांमध्ये एक कॅमेरा मिळतो. शासन ही व्यवस्था सहजपणे करु शकते. माझी शासनाला विनंती आहे की, प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये सीसी कॅमेरे लावण्यात यावेत, जेणेकरुन जनतेला आणि गरीब लोकांना ख-याअर्थाने न्याय मिळेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 17, पृष्ठ क्रमांक 15 वर महसूल विभागाची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. गुरचरण हे ब्रिटिश काळापासून चालत आलेले आहे. या संदर्भात गावातील ग्रामपंचायत, ग्रामस्थ यांच्या अधिकाराचा हा प्रश्न होता. या राज्यामध्ये नागरीकरण मोठया प्रमाणात वाढत आहे. शहराच्या आजूबाजूला असलेल्या जमिनी बिल्डर आणि भांडवलदार खरेदी करु पहात आहेत. राज्य शासनाने आदेश काढला की, गुरचरण आता कोणाला द्यायचे असेल तर ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या ना हरकत प्रमाणपत्राची जरुरी नाही. मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, गुरचरण हे राखीव ठेवलेले आहे. त्यामध्ये गावठाणाची जागा सुध्दा उपलब्ध होत नाही. सांगलीमध्ये काय झाले, नंदूरबारला काय झाले, चंद्रपूरला गुरचरणाची कशी आवश्यकता नाही हे मंत्रालयात बसून अधिकारी आणि मंत्रीमहोदय, शासन ठरविणार असतील तर ते योग्य नाही. गुरचरणाचा अधिकार ग्रामपंचायतीला आणि ग्रामस्थांना होता तो त्यांना पूर्ववत मिळाला पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 15 वर महसूल विभागाची पूरक मागणी सादर झालेली आहे. नैसर्गिक आपत्तीचे संकट ओढवल्यास कोकणावर नेहमीच अन्याय होतो. समुद्राच्या पाण्यापासून जे नुकसान होते त्याचा समावेश नैसर्गिक आपत्तीमध्ये झाला पाहिजे. समुद्राला भरती येते, उधाण येते अशा वेळी समुद्राचे पाणी आत येऊन मोठया प्रमाणात शेतीचे नुकसान होते. त्याबद्दल तेथील जनतेला नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी मी या पुरवणी मागणीच्या निमित्ताने सरकारकडे मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 45, पृष्ठ क्रमांक 40 वर सार्वजनिक बांधकाम विभागाची पूरक मागणी सादर झालेली आहे. माननीय उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री आता सभागृहात उपस्थित नाहीत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांच्या आभार प्रदर्शनाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, मुंबई गोवा मार्गाचे चौपदरीकरण करण्यात येणार आहे. परंतु त्या भागातील स्थानिक लोक जमिनीसाठी प्रति एकर 80 लाख रुपये मागणी करीत आहेत. हे सांगितल्यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी माझ्याकडे आले आणि म्हणाले की, ही मागणी योग्य नाही. रस्ता चौपदरी झाला पाहिजे. मुंबई आणि लगतच्या जागांचे भाव प्रचंड वाढले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे जे रस्ते आहेत त्याच्या बाजूला टपऱ्या उभ्या केल्या जात आहेत, अनधिकृत बांधकामे उभी केली जात आहेत. याला पायबंद घातला जात नाही. सरकारी जागेवर अतिक्रमणे करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे काम जे अधिकारी टाळतात त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. कोणीही कुठेही राजरोजसपणे जागा अडविण्याचे काम करीत आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. ज्या टपऱ्या उभ्या राहिल्या आहेत, जी अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत त्या संदर्भात कारवाई करताना न्यायालयाची अडचण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अनधिकृत बांधकाम केलेल्या लोकांना अधिकृत वीज जोडणी देण्यात आलेली आहे, त्यांच्या घरांना अधिकृत क्रमांक देण्याचे काम झालेले आहे. यापुढे नवीन अनधिकृत बांधकामे उभी राहिली तर त्या संदर्भात ताबडतोब कारवाई करण्याचे ठोस धोरण शासनाने निश्चित केले पाहिजे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीरित प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. जयंत पाटील.....

जेणेकरुन अतिक्रमण होणार नाही आणि रस्ता रुंदीकरण करताना त्रास होणार नाही.

यानंतर बाब क्र. 117, पृ.क्र.111, सहकार व पणन विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, नुकतेच सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे बोलल्याप्रमाणे राज्यात खताचा तुटवडा आहे. म्हणून शासनाने सहकारी तत्वावर खत कारखाने काढण्याची गरज आहे. तसेच ज्या संस्था असे कारखाने काढतील त्यांना प्रवृत्त केले पाहिजे व त्यांना भरघोस अर्थसहाय्य दिले पाहिजे. खताचा तुटवडा मोठ्या प्रमाणात होतो आणि यापुढेही तो होणार आहे. म्हणून ज्याप्रमाणे शासनाने साखर कारखाने काढले पण पिकासाठी खतच उपलब्ध झाले नाही तर फायदा होणार नाही. म्हणून शासनाने त्यासंबंधीचे नियोजन आणि आराखडा तयार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, विधि व न्याय विभागाच्या पृ.क्र.53, बाब क्र. 58 च्या संदर्भात मी बोलणार आहे. यामध्ये नमूद केलेले आहे की, जनहित याचिका दाखल केलेली असल्याने कौटुबिक न्यायालये सुरु करण्यात येत आहेत. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे जनहित याचिका दाखल केली म्हणून कौटुंबिक न्यायालये सुरु होतात. खरे कौटुंबिक न्यायालयासंबंधीचा कायदा जो सन 1980 मध्ये झाला त्यानंतर सन 1984 मध्ये पहिली दोन न्यायालये सुरु झाली. वास्तविक 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या ज्या ठिकाणी आहे तेथे कौटुंबिक न्यायालय स्थापन केले पाहिजे, परंतु तसे होत नाही. सन 2007-08 च्या अधिवेशनात महाराष्ट्राच्या 22 जिल्ह्यांमध्ये कौटुंबिक न्यायालये सुरु करण्यात येतील आणि त्यासाठी 15 लाखाची तरतूद करण्यात आली असल्याने माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्यामध्ये सोलापूर, कोल्हापूर, नगर, सांगली तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्हा मिळून अशा 22 जिल्ह्यांच्या ठिकाणी कौटुंबिक न्यायालये निर्माण करणार आहोत. जेणेकरुन दत्तक विषयक केसेस, रेस्टीटयुशन ऑफ कॉन्ज्युअल राईट्स तसेच घटस्फोटसारख्या केसेस तिकडे वर्ग होऊ शकतील. परंतु प्रत्यक्षात यासाठी विलंब का लागतो हेच स्पष्ट होत नाही. आगामी अर्थसंकल्पात यासाठी तरतूद करुन अशी कौटुंबिक न्यायालये निर्माण करावीत. तसेच या न्यायालयांमध्ये मराठी भाषेच्या वापरासंबंधी सभागृहात अनेक प्रश्नांच्या व इतर आयुधांच्या माध्यमातून लक्ष वेध्यात आले. त्या अनुषंगाने आश्वासने दिलेली आहेत. परंतु मराठी टंकलेखक आणि मशिन्स नसल्यामुळे तसेच पूर्वीचे स्टेनो इंग्रजी भाषिक असल्याने ते रिटायर झाल्यानंतर त्यांच्या जागी नवीन मराठी स्टेनो भरण्यात येतील परंतु त्याच्या अंमलबजावणीचे काय झाले हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे मराठीतून निकालपत्र देण्यात अडचणी येतात म्हणून ती इंग्रजीतून जाहीर करण्यात येतात नंतर त्याची प्रत मराठीतून तयार करण्यात येते. यासंसबंधी वारंवार शासनाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच विधि व न्याय विभागाची साक्ष सुध्दा घेण्यात आली होती परंतु त्यासंबंधीचा तपशील मी सांगू शकत नाही. परंतु न्यायालयाने सुध्दा शासनाकडे अशा प्रकारची मदत अपेक्षित केलेली आहे. खडकी येथील न्यायालयाच्या दुरवस्थेकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते. खडकी येथील न्यायाधीशांनी तर जिल्हाधिकाऱ्यांना भेट मागितली होती. कारण त्यांच्या न्यायालयाच्या आवारातील शौचालयाची अवस्था अत्यंत वाईट आहे, कॅन्टीनची सुविधा नाही म्हणून या न्यायालयातील सुविधांसाठी शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

निधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. मध्यंतरी मी कणकवली येथे गेले होते. त्या ठिकाणी गेल्यानंतर माझ्या निदर्शनास आले की, तेथील वकिलांनीच त्यांची व्यथा मांडली होती. तेथील वकिलांना बार रुममध्ये पुस्तकेच नाहीत. या निमित्ताने मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, राज्यातील सर्व तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या न्यायालयांमध्ये खास करुन जिल्ह्या ठिकाणी सुध्दा वाचनालयांची सुविधा असली पाहिजे. मुंबई, ठाणे, नागपूर आणि संभाजीनगर अशा ज्या ज्या ठिकाणी कौटुंबिक न्यायालये आहेत तेथे मोठ्या प्रमाणात स्त्रीया बालकांना घेऊन जात असतात. सुविधा नसल्याने त्यांना जमिनीवर बसूनच भोजन वगैरे घ्यावे लागते, कारण त्या ठिकाणी पाळणा घराची व्यवस्था नसते. अशा सर्व ठिकाणी आवश्यक त्या सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करण्याचे शासनाने सातत्याने जाहीर केले परंतु अशा फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये ज्या सोयी-सवलती पाहिजे त्याकडे दुर्लक्ष होते. तसेच न्यायाधीशांची नियुक्ती होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

सभापती महोदय, महसूल आणि वन विभागाच्या संदर्भातील बाब क्रमांक 17 बाबत मी माझे विचार मांडणार आहे. यामध्ये नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी सहाय्य करण्यात आलेले आहे. खरे म्हणजे आज जलदिन आहे. आपण बाब क्रमांक 17 मध्ये पाणी पुरवठयासाठी काही तरतूद केलेली आहे. परंतु मला आपले लक्ष वेधावयाचे आहे की, नैसर्गिक आपत्तीमध्ये महाराष्ट्रात जो अवकाळी पाऊस झालेला आहे त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व जिल्हयांमध्ये नुकसान झालेले आहे त्यामुळे यासंदर्भात देखील तरतूद करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 16 मध्ये दंगलग्रस्त भागात ज्यांना झळ पोहचलेली आहे त्यांना शासनाने मदत केलेली आहे. खरे म्हणजे जर्मन बेकरीचा विषय विधानसभेत आणि विधानपरिषदेत चर्चेला आलेलाच नाही. पूर्वी लोकलमध्ये जे बॉम्बस्फोट झाले होते त्यावेळी ब-याच मोठया प्रमाणात हिरे व्यापारी लोक मृत्यू पावले होते. परंतु जर्मन बेकरीमध्ये गोरगरीब लोक काम करीत होते. या ठिकाणच्या मृत आणि जखमी लोकांना शासनाने मदत केलेली आहे परंतु जर्मन बेकरी पुन्हा सुरु होण्यासाठी शासनाने काही सुध्दा मदत केलेली नाही. जर्मन बेकरीच्या मालकीण या निता खरोसे असून त्या मराठी आहेत. आपत्ती येऊन सुध्दा ही महिला बेकरी सुरु करण्याचा प्रयत्न करीत आहे. बॉम्ब स्फोटाने जर्मन बेकरीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. ही महिला काही खूप काही श्रीमंत आहे अशी परिस्थिती नाही त्यामुळे ही महिला जर्मन बेकरी स्वत:च्या पैशाने सुरु करु शकेल अशी वस्तुस्थिती नाही. पुण्याच्या बॉम्बस्फोटात जर्मन बेकरीचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे ही बेकरी पुन्हा सुरु करण्यासाठी शासनाने मदत करण्याची आवश्यकता आहे. बॉम्बस्फोटात ज्या काही घटना घडतात त्यासाठी कशा प्रकारे मदत करता येईल याचा शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मी मागणी करते की, दंगलग्रस्त भागात झळ पोहचलेल्यांसाठी शासन जशी मदत करते तशीच मदत पुण्यातील जर्मन बेकरी सुरु करण्यासाठी सुध्दा शासनाने करावी अशी माझी कळकळीची विनंती आहे, मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

मुंबईत 26.11 रोजी लिओपॉल्ड कॅफेवर हल्ला झाला होता परंतु काही दिवसांनी त्यांनी कॅफे पुन्हा सुरु केला. या घटनेला एक वर्ष उलटल्याच्या निमित्ताने या लिओपाल्ड कॅफेने बिअरसाठी नवीन मग काढले होते. लिओपाल्ड कॅफेकडे जाणारे गि-हाईक आणि जर्मन बेकरीकडे जाणारे गि-हाईक तसेच कॅफेचा मालक आणि जर्मन बेकरीची मालकीण यांच्यामध्ये खूप मोठा फरक आहे. त्यामुळे मला असे वाटते की, शासनाने यामध्ये संवेदनशील दृष्टिकोन ठेवून जर्मन बेकरीच्या मालकीण श्रीमती निता खरोसे यांना बेकरी पुन्हा सुरु करण्यासाठी मदत करावी. या बेकरीमध्ये अनेक गरीब मजूर काम करीत होते परंतु ही बेकरी बंद पडल्यामुळे हे मजूर उघडयावर पडले आहेत. ही बेकरी सुरु करण्यास शासनाने मदत केली तर या ठिकाणच्या मजूरांच्या हाताला सुध्दा काम मिळू शकेल. या घटनेतील आरोपी कधी मिळतील याची माहिती नाही म्हणून ही बेकरी ठराविक कालावधीत सुरु करण्याची योजना आखली जाणे आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 86, 87 वर मी माझे विचार मांडणार आहे. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्यामध्ये मुलामुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी तरतूद करण्यात आलेली आहे तसेच यामध्ये काम करणा-या कर्मचा-यांचे मानधन वाढविण्यात आलेले आहे. परंतु मी लक्ष वेधु इच्छिते की, समाज कल्याण विभागाचा जो कारभार सुरु आहे तो अजब असा आहे. या वसतिगृहात राहणा-या मुला-मुलींसाठी धान्य आणि अन्न दिले जाते परंतु मुले आणि मुलींच्या धान्यामध्ये बरीच मोठी तफावत आहे. सरकारच्या परिपत्रकात वाढत्या वयानुसार मुलांना 400 ग्रम जेवण दिले जाते तर मुलींना 300 ग्रॅम जेवण दिले जाते. मुलांना फळे आणि भाज्या 300 ग्रॅम आणि मुलींना 250 ग्रॅम दिले जातात. मुलांना 40 ग्रम गोडेतेल दिले जाते आणि मुलींना 20 ग्रम गोडेतेल दिले जाते. मुलींचे कोलेस्ट्रॉल वाढू नये यासाठी बहुतेक ही काळजी घेतली जात असावी. मुलांना 3 पोळया आणि 2 भाज्या तर मुलींना 2 पोळया आणि 1 भाजी दिली जाते. समाज कल्याण विभागाचे अनुदान देण्याची जी पध्दत आहे ती चुकीची आहे. मुलींना टयूशन फी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

म्हणून एका महिन्याला 10 रुपये दिले जातात आणि एका वर्षाचा वैद्यकीय खर्च म्हणून 20 रुपये दिले जातात. यावर जवळ जवळ 24 मंत्रीमहोदयांनी विचार करण्याचे आश्वासन सुध्दा दिलेले आहे. राज्यात एकंदर 271 वसतीगृहे असून त्यात 22 हजार मुले-मुली शिक्षण घेत आहेत. परंतु यामध्ये मुले आणि मुली यांच्यामध्ये अनुदानाबद्दल दुजाभाव आहे. हा दुजाभाव दूर केला तरच महिला धोरणाला न्याय मिळू शकेल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भातील घरकुल योजनेचे 927 कोटी रुपये अजूनही पडून राहिलेले आहे. यासंदर्भात अर्थसंकल्पात चर्चा होईल परंतु घरकुलांची योजना जर प्रत्यक्षात राबवली जात नसेल तर कशा प्रकारे गोरगरीब जनतेला निवारा मिळेल ? याची माहिती शासनाने देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या संदर्भात मी आता माझे विचार मांडणार आहे. प्राथमिक शिक्षणासाठी सहाय्य या 29 आणि 30 बाबीमध्ये मध्ये शाळांच्या इमारतीसाठी भाडयासाठी व्यवस्था केलेली आहे. विदर्भासकट महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छता गृहाची सोयच नाही. असली तर कुठे तरी कोनाडा केलेला असतो परंतु त्याला छत नसते, बहुतेक ठिकाणी तर पाण्याची व्यवस्था त्या ठिकाणी केलेलीच नसते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

दिनांक 19 सप्टेंबर 2006 रोजी महिला व बाल विकास विभागाने एक जी.आर.काढला असून तो शिक्षण विभागासाठी पाठविण्यात आला होता. त्या जी.आर.मध्ये असा उल्लेख करण्यात आला होता की , "ज्या ठिकाणी महिला आणि मुली काम करतात त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विशाखा निकालपत्रानुसार समित्या करण्यात याव्यात" हे अधिवेशन सुरु होण्याच्या अगोदर रायगड जिल्हयात गणेशपुरी गावात चार मुलींचा शिक्षकांनी विनयभंग केला असून त्या शिक्षकाला बडतर्फ न करता त्याची दुसरीकडे बदली करण्यात आली आहे.या बाबतीत मी माननीय मुख्यमंत्र्यांनासुध्दा एक निवेदन पाठविलेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने मला माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष एका गोष्टीकडे वेधावयाचे आहे की, मुलींच्या प्राथमिक शिक्षणाची शासनाने सोय केली परंतु मुलीच्या सुरक्षिततेंच्या दृष्टीने जर योग्य ती खबरदारी घेतली नाही तर सातवी आणि आठवी नंतर मुलीची शाळा बंद होईल..प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींसाठी स्वच्छतागृहाचे बांधकाम केल्यानंतर त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या बाबीकडे लक्ष वेधून मी माझे भाषण संपविते .धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, 2009-2010 सालच्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. प्रथम मला कृषी विभागाची बाब क्रमांक 21पान क्रमांक 20 सबंधी बोलावयाचे आहे. विदर्भातील विशेष करुन नागपूर अमरावती व वर्धा जिल्हयातील शेतक-यांना वित्तीय सहाय्य देण्याकरिता ही तरतूद करण्यात आली आहे. या विषयावरील चर्चा सुरु असतांना या ठिकाणी संत्री आणि केळी या फळाच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला होता . यसा चर्चेच्या निमित्ताने मला द्राक्षाच्या बाबतीत एक मुद्दा मांडावयाचा आहे. एका माजी आमदाराचा आज वाढ दिवस असल्यामुळे मी काल रात्री त्यांना शुभेच्छा देण्यासाठी फोन केला होता . त्यावेळी त्यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा स्वीकारण्या ऐवजी मला असे सांगितले की, माझ्या तालुक्यात 100 एकर द्राक्षाची बाग असून ती सगळी बाग शेतकरी तोडावयास निघालेले आहेत तेव्हा त्याबाबतीत तुम्हाला काही मदत करता येत असेल तर ती करावी.नाशिक जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात द्राक्ष बागेची तोडणी सुरु आहे. या सबंधी काही ऐकीव बातम्या असतात तर काही बातम्या वर्तमानपत्रात येत असतात परंतु मी स्वत: 3 एकर द्राक्षाची बाग आदरणीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांचा फोटो लावून तोडून टाकली होती. माझ्या गावच्या बाजूला श्री.माधवराव पाटील नावाच्या माझ्या एका मित्राने 18 एकर द्राक्षाची बाग तोडून टाकली होती. या संदर्भात आम्ही शासनाकडे मदत मिळावी म्हणून पत्रव्यवहार केला असतांना आम्हाला असे उत्तर देण्यात आले होते की, "द्राक्ष पिकविणा-या शेतक-यांनी वायनरीज कंपनीबरोबर करार केलेले आहेत हे पणन विभागाला माहिती नाही त्यामुळे आम्ही मदत करु शकत नाही." शासनाला प्रत्येक गोष्ट शेतक-याने विचारावयास पाहिजे काय ? द्राक्ष बागायतदाराना मदत देण्याच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे जर शासनाने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही तर सर्व द्राक्ष उत्पादक आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतील . मी जर आमदार नसतो तर मी नक्कीच आत्महत्या केली असती बाकीच्या शेतक-यांचे काय होईल हे मला सांगता येणार नाही.

सभापती महोदय, यानंतर मला पान नंबर 20 बाब क्रमांक 19 सबंधी बोलावयाचे आहे विभागीय व जिल्हा स्तरीय कृषी कार्यालयाच्या सांगणकीकरणाचा खर्च भागविण्याकरता ही तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय,. या राज्यातील सर्व शेती मालाचे भाव ज्या कार्यालयातून

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरविले जातात त्या कार्यालयात मी परवा गेलो होतो. त्या कार्यालयाची इमारत पाहिल्यानंतर ती इमारत एवढी विचित्र आहे की, तेथील सर्वच्या सर्व कर्मचारी मनोरुग्ण कसे झाले नाहीत असा मला प्रश्न पडला आहे. फोर्टमध्ये सेंट्रल लायब्ररी जवळ असलेल्या या कार्यालयाच्या इमारतीमध्ये मी गेलो असूने.ती इमारत म्हणजे भूत बंगलाच असावा असे वाटते.मी तेथील अधिका-याना असे विचारले की," तुम्ही या ठिकाणी कसे काय काम करता ? तसेच शेत मालाचे भाव तुम्ही कसे ठरविता ?" तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की, "आमच्याकडे फॅक्स मशिन नाही, तसेच संगणकही नाही. संपूर्ण राज्यातील शेतक-याच्या शेती मालाचे भाव ठरविणारे जे कार्यालय आहे त्या कार्यालयाची जर इतकी वाईट अवस्था असेल तर शेतक-यांची अवस्था कशी असेल ? त्यामुळे सन्माननीय मंत्री श्री गुलाबराव देवकर यांना मी सांगू इच्छितो की,आपण आता नव्याने राज्य मंत्री झाला आहात तेव्हा शेतक-यांसाठी काही प्रयत्न करता आला तर तो प्रयत्न आपण जरुर करावा. एकदा मंत्री म्हणून रुळल्यानंतर शेतक-यांसाठी काही करीत नाही नवीन असतांना काही तरी करण्याचा प्रयत्न करीत असतो तेव्हा आपल्याला जर शक्य झाले तर या कार्यालयासाठी सोयी सुविधा देण्याच्या बाबतीत लक्ष देण्यात यावे अशी माझी त्यांना विनंती आहे..

सभापती महोदय, यानंतर कृषी विभागाची बाब क्रमांक 20 पान नंबर 20 संबंधी मला बोलावयाचे आहे . रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुरांची मजुरी 66 रुपयावरुन 100 रुपये करण्यात आली आहे.12 वर्षानंतर ही वाढ करण्यात आली आहे. सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर कर्मचा-यांना दररोज 500 रुपये मिळत होते त्या ऐवजी 2500 रुपये मिळू लागले परतु तुम्ही आम्ही ज्या शेतक-याची मते घेतो त्याची मजुरी मात्र 66 रुपयावरुन 100 रुपये करण्यात आली आहे.सन्माननीय राज्यमंत्री श्री देवकर यांना मी सांगतो की, शेती मालाचे भाव ठरवत असतांना.....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल...

मजुरांचे दोन नमुने आहेत. एक म्हणजे रोजंदारीवरील मजूर आणि दुसरा कौटुंबिक मजूर. या दोघांच्या मजूरीमध्ये किती फरक आहे? कौटुंबिक मजूर हा स्वत:च्या शेतावर काम करतो म्हणून तो रोजंदारीवरील मजुरापेक्षा 25 टक्के जास्त काम करतो. म्हणून 25 टक्के जास्त मजूरी घेतो. तुम्ही निवडून आला असल्यामुळे तुम्ही कौटुंबिक मजूर, तुम्हाला 82 रुपये मजूरी मिळते त्यामधून दररोजचे इस्त्रीचे पैसे निघतात काय? या बाबीकडे आपण गंभीरपणे बघितले पाहिजे. माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील आज सभागृहात उपस्थित नाहीत. आपल्या माहितीसाठी सांगितले पाहिजे की, अखिल भारतीय शेतमाल भाव समितीचे अध्यक्षपद महाराष्ट्राकडे आले असून माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे अध्यक्ष झाले आहेत. देशातील सर्व शेतकऱ्यांचे भविष्य तुमच्या हातामध्ये आले आहे असे मी त्यांना म्हणालो. तेव्हा ते हळूच मला म्हणाले की, नोट देता कां? तेव्हा एवढी मोठी जबाबदारी त्यांच्यावर आली असल्यामुळे त्यांचा बघण्याचा दृष्टीकोन मोठा असला पाहिजे. त्या संदर्भात तुम्ही काय करणार आहात? हे आपण ठरविले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 115 आणि पान क्रमांक 110 च्या अनुषंगाने खताची चर्चा करण्यात आली. आजकाल आपल्या गावामध्ये चर्चा सुरु झालेली आहे. काल रविवार असल्यामुळे मी गावामध्ये गेलो होतो. तेव्हा पोत्यामागे 100 रुपये ऑन देऊन आत्ताच पोते घ्या, पुन्हा मिळणार नाही असे मला सांगण्यात आले. शेतामध्ये पेरणी जूनमध्ये होणार आहे, आणि ती सुध्दा वेळेवर पाऊस पडला तर. आता मार्च महिना सुरु आहे, अजून अडीच महिने बाकी आहेत. तरीसुध्दा पेरणीच्या तीन महिने अगोदर खताच्या पोत्यामागे 100 रुपये द्यावे लागत असतील तर पेरणीच्या वेळी काय हाल होतील? हे लोक तुमचे कपडे फाडल्याशिवाय राहणार नाहीत...

(माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी बसून बोलतात.)

अरे येड्या गप्प... ज्याला शेतीतले काही कळत नाही त्याने मध्ये मध्ये बोलू नये...

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : माननीय सदस्यांनी उच्चारलेली वाक्ये कामकाजातून काढून टाकण्यात येत आहेत...

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मी ते शब्द मागे घेतो. पान क्रमांक 142 व बाब क्रमांक 145 च्या बाबतीत सांगितले पाहिजे की, जेव्हा जेव्हा सभागृहामध्ये अल्पसंख्यांकांवर चर्चा होते तेव्हा तेव्हा याठिकाणी आखाडा तयार होतो. अल्पसंख्यांकांच्या बाबतीत सरकारला फार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री.सय्यद पाशा पटेल....

पुळका आहे. अल्पसंख्यांक असलेल्या सुशिक्षित तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी आपण कार्यक्रम तयार केला आहे. परंतु त्यामध्ये अशी मजा आहे की, अल्पसंख्यांक असलेल्या ज्या पोरांना सेवाभावी संस्थांमार्फत प्रशिक्षण द्यावयाचे आहे त्यांना एक रुपयांचे सुध्दा अनुदान दिले गेले नाही. त्यांनी पदरचा खर्च करावयाचा आणि दुसऱ्यांच्या पोरांना प्रशिक्षण द्यावयाचे असे कधीही शक्य होत नाही. आणि म्हणून अल्पसंख्यांकाबाबत असा रिकामा पुळका दाखविण्यापेक्षा या योजनेची आपण प्रभावी अंमलबजावणी करावी आणि त्या संस्थांना अनुदान द्यावयाचे तेवढे पहावे. तेव्हा शासनाने अल्पसंख्यांकाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनी अधिकाधिक पुढे यावे असे आपणास वाटत असले तरी त्यांना काहीच मिळाले नाही तर त्या पुढे येणार नाहीत. त्यांना जर खऱ्या अर्थाने प्रशिक्षण द्यावयाचे असेल आणि त्यांचे भले व्हावे असे वाटत असेलतर त्या संस्थांना अनुदान देण्याची बाब गंभीरपणे लक्षात घ्यावी अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) सभापति महोदय, पृष्ठ क्रमांक 29, बाब क्रमांक 32 - नगर विकास विभाग के अन्तर्गत नागरी क्षेत्र में स्थित महानगरपालिका क्षेत्र की दलित बस्तियों में सुविधा प्रदान करने हेतु प्रावधान किया गया है. मैं इस संबंध में यह बताना चाहता हूं कि महाराष्ट्र की नगरपरिषदों को और खास तौर से विदर्भ की चंद्रपुर, गड़चिरोली नगरपरिषदों को दलित बस्ती में सुविधा प्रदान करने के लिए यूडी को जो धनराशि ट्रांसफर हुई है उस धनराशि का वितरण अब तक नगरपरिषदों को नहीं किया गया है. चंद्रपुर, गडचिरोली, वर्धा इत्यादि नगरपरिषदों के पास पहले ही फंड नहीं है इसलिए अगर यह धनराशि 31 मार्च तक नगरपरिषदों को नहीं मिली तो ये नगरपरिषदें तकलीफ में आ जाएगी. इसलिए मेरी यह मांग है कि जल्द ही यह धनराशि नगरपरिषदों को ट्रांसफर की जाए.

सभापति महोदय, पृष्ठ क्रमांक 33, बाब क्रमांक 37 - वित्त विभाग के अन्तर्गत मैं यह कहना चाहूंगा कि आमदार निधि जो वितरीत किया जाता है, उसकी समय सीमा 31 मार्च होती है. चंद्रपुर के ट्रेझरी ऑफिसर ने यह सूचित किया है कि जो बिल 15 फरवरी से पहले हमारे कार्यालय में पेश किए जाएंगे उसका ही भुगतान किया जाएगा, धनराशि दी जाएगी. सम्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी जी के लोकमान्य विद्यालय का 1 लाख 16 हजार रुपये का बिल वापस आ गया है. इस संबंध में वित्त विभाग के सचिव श्री. श्रीवास्ताव को पत्र भी भेजा गया है. हमने उनसे कहा है कि जो निधि मंजूर हुआ है, वह अभी तक नहीं दिया गया है. अत: मेरा निवेदन है कि मंत्री महोदय इस मामले में ध्यान दें और निधि जल्द से जल्द प्रदान करें.

सभापति महोदय, पृष्ठ क्रमांक 127, बाब क्रमांक 133 - पाणी पुरवठा विभाग के अन्तर्गत मैं यह बताना चाहूंगा कि चंद्रपुर, वर्धा, गड़चिरोली इत्यादि विदर्भ की नगरपरिषदों की आर्थिक स्थिति दयनीय है. शासन द्वारा इन नगरपरिषदों को अनुदान नहीं दिया गया है. उद्योगों से प्रापर्टी टॅक्स नहीं मिलता है. वर्धा और पुलगांव नगरपरिषद के द्वारा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण को कुछ पैसा देना बाकी है. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण की पानी पुरवठा योजना नगरपरिषद को 10 वर्ष पूर्व ट्रांसफर की गई थी, उस संबंध में यह धनराशि देना बाकी है. नगरपरिषद को ब्याज के रुप में 10 करोड़ रुपये देना है. पैसे न देने की वजह से नगरपरिषद के बैंक एकाउण्ट सील कर दिए गए हैं. मार्च का महीना है. यह आखरी महीना है. सरकार इन नगरपरिषदों को 31 मार्च

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी .....

से पहले फंड प्रदान करें. नगरपरिषद के पास पहले से ही फंड नहीं है. नगरपरिषदों की आर्थिक स्थिति अच्छी नहीं है. इस वजह से ये नगरपरिषदें पैसे अदा नहीं कर पा रही है. ऐसी स्थिति में बैंक खाते सील किए गए हैं. इसलिए मेरी विनती है कि वर्धा के जिला अधिकारी को सूचना दें कि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण की देय रकम माफ करें और जो बैंक खाते सील कर दिए गए है, उन्हें मुक्त करें. आज विदर्भ के इन जिलों में पीने के पानी की समस्या है. इस समस्या को दूर करने के लिए बैंक खातों को मुक्त करना जरुरी है.

भाषण अपूर्ण, यानंतर कु. थोरात

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी...

सभापती माहेदय, पान क्रमांक 105, बाब क्रमांक 112 वर मी बोलणार आहे. चंद्रपूर जिल्हयात अनेक उद्योग आहेत. भारतातच नाही तर पूर्ण विश्वामध्ये चंद्रपूर जिल्हा हा प्रदूषणयुक्त आहे. परंतु मी सांगू इच्छितो की चंद्रपूर येथील कारखान्यांकडून सांडपाणी तथा एसिडयुक्त पाणी नदीत सोडण्यात येते त्यामुळे नदीतील पाणी दूषित होत आहे. तसेच घुगुसमध्ये एलआयडी स्टील लोखंडाचे कारखाने, सिमेंट कारखाने तसेच तेथे जे कोल माईन्स आहेत त्याठिकाणी जे प्रदूषण होत आहे याची शासनाने दखल घ्यावी आणि चंद्रपूर जिल्हा प्रदूषणमुक्त व्हावा यासाठी एखाद्या योजनेची आखणी करण्यात यावी. लोकांच्या जीवाला धोका होऊ नये यादृष्टीकोनातून काय कार्यवाही करता येईल याबाबतची शासनाने गंभीर दखल घेऊन लोकांच्या जीवाला धोका होईल अशा प्रकारचे कोणतेही काम उद्याजगाकडून होऊ नये तसेच नियमानुसार उद्योग चालविण्यात यावेत अन्यथा त्या उद्योगांना नोटीसा देण्यात याव्यात. अनेक वेळा नोटीसा देण्यात आल्यानंतर मॅनेजर नोटिसा घेतात व त्याला उत्तर देतात म्हणून या उद्योगाचे जे मालक आहेत, एम.डी. आहेत त्यांच्यावर शासनाने नियमानुसार कारवाई करावी, एवढे बोलून या पुरवणी मागण्यावरील माझे भाषण मी पूर्ण करतो. जय हिंद जय विदर्भ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्रमांक 58, पान 53. ठाणे येथील कुटुंब न्यायालयाकरिता रुपये पंधरा लाखाची तरतूद केलेली आहे त्यासाठी शासनाचे अभिनंदन करु इच्छितो. सभापती महोदय, मुंबई (पूर्व) उपनगरात सत्र न्यायालयाची गरज आहे. या ठिकाणी मुलुंडला एक न्यायालय आहे पण ते खूप लहान आहे त्याठिकाणी खूप रिकामी जागा आहे. यासंदर्भात श्री. विनोद तावडेनी देखील उल्लेख केलेला आहे. या रिकाम्या जागेवर कधीना कधी अतिक्रमण होणार आहे म्हणून ते अतिक्रमण होण्याच्या अगोदर शासनाने त्या ठिकाणी सत्र न्यायालय बांधावे. त्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा विषय क्रीडेबाबतचा आहे. मुलुंड (पूर्व) येथे एका क्रीडा संकुलासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे त्याठिकाणी उपनगर क्रीडा संकुल किंवा तालुका क्रीडा संकुल होऊ शकते त्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावी अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, बाब क्रमांक 13, पान क्रमांक 10 मध्ये पोलिसांच्या निवासस्थानासाठी व इमारती दुरुस्तीसाठी 23 लाख 38 हजार इतका खर्च करण्यात येणार आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. नव्या मुंबईमध्ये अशी अनेक निवासस्थाने आहेत की, त्या निवासस्थानात रहाण्यासारखी परिस्थिती नाही. अनेक निवासस्थानाचे दरवाजे, खिडक्या, बाथरुम्स नादुरुस्त आहेत. पोलिसांच्या निवासस्थानाबद्दल आम्ही सातत्याने या सभागृहात प्रश्न मांडत असतो. शासनाने पोलिसांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीच्या संदर्भात नव्या मुंबईमध्ये सुध्दा प्राधान्य द्यावे अशी माझी मागणी आहे. कळंबोली असेल, खारघर असेल, एरोली असेल, तुर्भे असेल किंवा इतर ठिकाणी पोलिसांची जी निवासस्थाने आहेत त्या निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी तसेच माझ्या विभागात सी.बी.डी.मध्ये पोलिसांची जी निवासस्थाने आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात यावी, अशा प्रकारची माझी मागणी आहे.

सभापती महोदय बाब क्रमांक 25, पान क्रमांक 22. मासेमारी बंदरातील गाळ उपसण्यासाठी 1 कोटी 90 हजार इतक्या रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणचा समुद्र किनारा सर्वात मोठा समुद्रकिनारा आहे तसेच ठाणे जिल्हयामध्ये जेथे जेटी आहेत तेथे लोक फिरायला जातात पण त्या ठिकाणी घाणेरडा वास येतो. तसेच त्याठिकाणी खूप गाळ असतो त्यामुळे तेथे लोक उभे देखील राहू शकत नाहीत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

ठाणे जिल्ह्यामध्ये आणि नवी मुंबईमध्ये ज्या ज्या ठिकाणी जेटी आहेत तेथील गाळ उपसण्याचा प्रयत्न करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मी मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 22 वरील बाब क्रमांक 27 बाबत बोलणार आहे. मच्छिमारांसाठी अपघाती गट विमा योजनेच्या अंमलबजावणीसाठी यामध्ये तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते. ज्या मच्छिमाराचे अपघातामध्ये निधन होते त्याच्यासाठी ही विमा योजना आहे. ही योजना राबवित असताना या योजनेचा प्रसार आणि प्रचार व्हावयास पाहिजे. फयान वादळ आल्यानंतर अनेक मच्छिमारांच्या जाळ्या तुटल्या, बोटी तुटल्या परंतु काही ठिकाणचे लोक शासनापर्यंत पोहचू शकले नाहीत त्यामुळे त्यांना कोणताही फायदा मिळाल नाही. म्हणून यासंदर्भात ज्या योजना आहेत त्यांची चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला आरोग्य विभागाच्या संदर्भात बोलावयाचे आहे. जीवनदायी योजनेच्या संदर्भात काही सन्माननीय सदस्य म्हणाले की, जीवनदायी योजनेमध्ये पारदर्शकता आली पाहिजे. बऱ्याचदा शस्त्रक्रिया करण्याची वेळ आली तरी पैसे दिले जात नाहीत. हे रुग्ण गरीब कुटुंबातील असतात. त्यांना वेळेवर पैसे मिळाले नाहीत तर अनेक वेळा लोकांचा मृत्यू होतो. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी मागे सर्व आमदारांची बैठक घेतली होती. त्यांनी ज्या योजना आणल्या त्या अतिशय चांगल्या आहेत. त्या योजनांचा पाठपुरावा करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 12 बाबत बोलावयाचे आहे. मध्यंतरी मनोरुग्ण तसेच आरोग्य विभागाच्या संदर्भात अनेक लक्षवेधी सूचना आल्या होत्या. आम्ही मनोरुग्ण हॉस्पिटलला भेटी दिल्या. आम्ही ठाणे येथील मनोरुग्ण आरोग्य केंद्राला भेट दिली त्यावेळी काही गोष्टी आमच्या लक्षात आल्या. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सांगतात की, अन्न करपले, भात करपला, चपाती करपली. त्यामध्ये केवळ अधिकाऱ्यांना दोषी धरुन चालणार नाही. तेथील व्यवस्थेची आम्ही पाहणी केल्यानंतर असे दिसून आले की, तेथील जे मोठमोठे गंज किंवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .....

टोप होते ती भांडी फार पातळ झालेली होती. टोपाच्या बुडाला पातळपणा आलेला होता. भांडी जुनी होती. अशी भांडी असल्यामुळे भाजी करपते, भात करपतो. आम्ही आमदार निधीतून 5 लाख रुपयांची भांडी घेण्यास मान्यता दिली. पण आम्हाला असे सांगण्यात आले की, आमदार निधीतून भांडी देऊ शकत नाही. त्या ठिकाणी मनोरुग्णालयाला आमदार विकास निधीतून एखादी वस्तू द्यावयाची असेल तर खास बाब करुन ती देता आली पाहिजे. कारण मनोरुग्णालयात चपाती करपणे, भात करपणे असे प्रकार होतात. त्या ठिकाणी गॅस सिलेंडर नव्हते. पाण्याची टाकी फुटलेली होती. त्या ठिकाणी जेवणाची भांडी बरोबर नव्हती. आरोग्याच्या संदर्भातील खास बाब म्हणून मनोरुग्णालयाच्या ठिकाणी कपडे धुण्यासाठी वाशिंग मशीन देण्यासाठी किंवा चपाती बनविण्याचे मशीन देण्यासाठी आमदार निधीतून व्यवस्था करता आली तर योग्य होईल. त्या ठिकाणी दिवसाला तीन ते चार हजार चपात्या लागतात. म्हणून पोळ्यांचे मशीन देण्याची व्यवस्था आमदार निधीतून करता आली तर बरे होईल. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपविते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ ST/

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी पृष्ठ क्रमांक 139 वरील बाब क्रमांक 137 बाबत बोलणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या आस्थापनेवर 12 पदे निर्माण करण्यासाठी यामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा घोषित करुन अनेक वर्षे झाली पण आजही त्या जिल्ह्यामध्ये पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ज्या पध्दतीचे रस्ते, वीज आणि इतर प्राथमिक सुविधांची गरज आहे त्या आजही झालेल्या नाहीत. दरवर्षी सरकारच्या तिजोरीतून खर्च करुन त्या ठिकाणी पर्यटनासाठी पर्यटन आठवडा साजरा केला जातो. त्या ठिकाणी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी केली जाते परंतु त्या ठिकाणी पर्यटक येण्यासाठी ज्या प्राथमिक सुविधा द्यावयास पाहिजे त्या दिल्या जात नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये धार्मिक स्थळे भरपूर आहेत. मंदिरे भरपूर आहेत. त्या ठिकाणी होणारी गर्दी पाहता त्यादृष्टीने त्या ठिकाणी शौचालयाची, पाण्याची तसेच विजेची व्यवस्था केलेली नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये समुद्र किना-याच्या जवळ नदी आहे. त्यामुळे वॉटर स्पोर्टसची भविष्यात काहीही सुविधा सरकारकडून झालेली नाही. यासंदर्भात मी मेरिटाईम बोर्डाच्या कार्यालयात जाऊन तेथील अधिका-यांना भेटून चर्चा केली आहे. तेथे समुद्राला नदी मिळत आहे. त्यामुळे पर्यटकांना आकर्षित केले तर शासनाला मोठया प्रमाणात महसूल मिळू शकतो असे सुचविलेले आहे. परंतु पर्यटन विभागाकडून या वॉटर स्पोर्टससंबंधी काही पाऊल उचलले गेले नाही.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा गोवा राज्याला लागून आहे. त्या गोव्याकडे येणारे परदेशी पर्यटक मेडिकल टूरिस्ट म्हणून येतात. डेंटिस्टसाठी येतात, कॉस्मेटिक सर्जरी करुन घेण्यासाठी येतात. त्यामुळे त्या राज्याला अधिक महसूल मिळतो. त्यांच्या देशापेक्षा गोवा हे राज्य त्यांना स्वस्तात सुविधा देत आहे. भारतात येऊन सर्जरी करुन घेणे फायद्याचे ठरत आहे. त्यामुळे गोवा राज्यात मेडिकल टूरिस्टची संख्या वाढत आहे. गोव्यापासून 50 कि.मी.अंतरावर सिंधुदुर्ग जिल्हा आहे. तेथे जे पर्यटक येतात त्यांच्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देणारे स्थानिक लोक आहेत. ते साधा उपचार करु शकतील अशा साध्या हॉस्पिटलची सुध्दा सुविधा नाही. पर्यटकांसाठी मेडिकल टूरिझम करु नका, परंतु सिंधुदुर्ग जिल्हयात जे लोक राहतात, त्यांना आरोग्याच्या कोणत्याही सुविधा मिळत नाहीत, संपूर्ण जिल्हयात अत्याधुनिक एकही हॉस्पिटल नाही, ही खंत मी व्यक्त करतो. पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले जाते तेव्हा या सर्व सुविधा मिळाव्यात अशी मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 22, बाब क्रमांक 25 वर मी बोलतो. रत्नागिरी, मिरकरवाडा मासेमारी बंदरातील गाळ काढण्यासाठी 1 कोटी 1 लाखाची तरतूद केलेली आहे. या बंदराबरोबर रत्नागिरी जिल्हयातील केळशी, हर्णे, दाभोळ, पालशेत, जयगड, वडोदा, संगमेश्वर, जैतापूर ही बंदरे आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामधील विजयदुर्ग, देवगड, आचरा, मालवण, निवटी ही बंदरे आहेत. 1960 ते 70 बंदरांच्या यंत्रसामुग्रीसाठी शासनाने 44 लाख रुपये खर्च केले होते. आजच्या बाजारभावाने ती कोटयवधी रुपयांची यंत्रसामुग्री आहे. या बंदरामधील व नदीमधील गाळ काढण्यासाठी आणलेली ही यंत्रसामुग्री तशीच पडून आहे. मिरकरवाडा बंदरातील गाळ

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

काढण्यासाठी 6 कोटी 70 लाख रुपयांची तरतूद केली. ते काम 2008 पासून सुरु करण्यात आले. पण ते काम वारंवार सक्शन ड्रेझरमुळे मागील 9 महिन्यापासून संथ गतीने चालले आहे. किंबहूना, ते बंद पडलेले आहे. राज्यात 26 ठिकाणी मोठी बंदरे आहेत. खाडयांतील गाळ काढण्यासाठी हायड्रोग्राफिक सर्वेक्षण करण्यासाठी शासनाने आवश्यक निधी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाला दिला असल्याची माहिती 2008 च्या अर्थसंकल्पाच्या वेळी तत्कालीन बंदर विकास मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी दिली होती. गाळ काढण्यासाठी 9.82 कोटी रुपये मंजूर केल्याचे त्यांनी सांगितले होते. परंतु रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील 12 बंदरांमधील गाळ काढण्यासाठी आणखी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पान क्र.25, बाब क्र.29 व 30 वर बोलतो. शिक्षण विभागाच्या सर्व शिक्षा अभियानाचा किती बोजवारा उडाला याबाबत सभागृहात चर्चा झालेली आहे. सन 2009-10 मध्ये या योजनेसाठी केंद्राने राज्याला निधी पाठविला नाही. त्याचे कारण असे की मागील वर्षाचा हिशोब केंद्राला न पाठविल्यामुळे पुढील वर्षी केंद्राने निधी दिला नाही, ही गोष्ट खरी आहे काय ? या योजनेत भ्रष्टाचार झालेला आहे. या योजनेवर कोटयवधी रुपये खर्च होऊनही ग्रामीण भागातील 35 हजार मुलींसाठी प्रसाधनगृहे नाहीत, 3 हजार शाळांमध्ये साधा फळाही नाही. सरकारचे अस्थिर धोरण, पालकांची लुबाडणूक करणारी फी वाढ यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. जसे साखर सम्राट म्हटले जाते, तसे शिक्षण सम्राट सुध्दा सरकारमध्ये बसलेले आहेत. शैक्षणिक धोरणाबाबत विचारविनिमय होऊन निर्णय होत नाही. त्यामुळे आत्महत्या थांबत नाहीत ही एक दुर्दैवी बाब आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री. किरण पावसकर ...

पान क्रमांक 91 वरील बाब क्रमांक 100मध्ये राज्यात विशेष घटक योजनेअंतर्गत जीवनदायी योजनेकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. जीवनदायी योजनेच्या संदर्भात यापूर्वीही सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या निमित्ताने मला शासनाच्या हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या योजनेअंतर्गत कोटयवधी रुपये वाया जात आहेत, लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळत नाही. या योजनेत भ्रष्टाचार बोकाळला आहे. भ्रष्टाचाराची कारणे देखील दिलेली आहेत. जे अधिकारी औषधे खरेदी करतात त्यांच्या परदेश वा-या वाढल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. तेव्हा ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना या जीवनदायी योजनेचा लाभ व्हावा, या योजनेपासून ते वंचित राहू नयेत यासाठी या योजनेमध्ये जे जे कोणी भ्रष्टाचार करणारे असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षण) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यांवर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

पान क्रमांक 25 वरील बाब क्रमांक 29 अंतर्गत प्राथमिक शिक्षणासाठी जवळ जवळ 201 कोटी 23 लाख 33 हजार रुपयाची पुरवणी मागणी शासनाने केलेली आहे. प्राथमिक शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे आणि ती आवश्यकताही आहे. हा खर्च नसून ती इन्व्हेस्टमेण्ट आहे अशी लोकांची भावना आहे. आज आपण प्राथमिक शाळांचा विचार केला तर या प्राथमिक शाळांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी काही बाबींचा उल्लेख या ठिकाणी केला. राज्यातील 43 हजार शाळांमध्ये मुलींसाठी प्रसाधनगृहे नाहीत, 14835 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्ययवस्था नाही, 33 हजार शाळांमध्ये फळयाची व्यवस्था नाही आणि 4300 ह्या एकशिक्षकी शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील शाळामध्ये सर्वसामान्य गरिबांची मुले शिकतात. म्हणून या दृष्टीकोनातून विचार केला तर यामध्ये सुधारणा होण्याची नितांत आवश्यकता आहे. राज्य शासनाने गुणवत्ता विकासासाठी खाजगी प्राथमिक शाळांना पहिलीपासून सेमी इंग्रजी शिक्षणाची सवलत लागू केलेली आहे. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे शालेय शिक्षण मंत्री असताना आणि त्याही आधीपासून ही सवलत खागजी प्राथमिक शाळांना लागू करण्यात आलेली आहे. परंतु जिल्हा परिषदेच्या, नगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी सेमीइंग्रजीची सवलत अद्याप लागू केलेली नाही. आपण मोठ्या प्रमाणावर प्राथमिक शिक्षणाकरिता खर्च करीत असताना त्या त्या विषयातील तज्ज्ञ शिक्षण नेमून ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजीमधून, सेमीइंग्रजीमधून शिक्षण घेण्याची सवलत मिळण्याची नितांत आवश्यकता आहे.

पान क्रमांक 25 वरील बाब क्रमांक 30 अंतर्गत नगरपालिका आणि महानगरपालिकेने शाळांसाठी ज्या इमारती भाड्याने घेतलेल्या आहेत त्या भाड्यापोटी जवळ जवळ 23 कोटी 30 लाख 79 हजार रुपयाची तरतूद केलेली आहे. राज्यातील या खाजगी संस्थांना वेतनेतर अनुदान किंवा भाड्याच्या इमारतीसाठी गेल्या 6-7 वर्षामध्ये एक नया पैसा देखील दिलेला नाही. त्यामुळे संस्थाचालकांना शाळा चालविणे अत्यंत अडचणीचे ठरत आहे. म्हणून ज्या पध्दतीने नगरपालिका, महानगरपालिकांच्या शाळांना इमारत भाडे मिळते.....

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

त्याच पध्दतीने खाजगी शाळांसाठी सुध्दा त्यांचे इमारत भाडे किंवा त्यांचे वेतनेतर अनुदान दिले जावे. टक्केवारीमध्ये जो काही बदल शासनाला करावयाचा असेल तो करावा. पूर्वी 12 टक्के होते, ते 9 टक्क्यावर आणले, 9 टक्क्याचे 6 टक्के केले. काय द्यायची ती टक्केवारी द्या परंतु शासनाने वेतनेतर अनुदान देणे अत्यंत गरजेचे आहे. एका बाजूला शासन वेतनेतर अनुदान देत नाही. मग अशा शाळांनी प्रिंटिंग, इमारतीची दुरुस्ती किंवा डागडुजी करण्यासाठी, अन्य खर्च भागविण्यासाठी, पिण्याच्या पाण्याचे बिल देण्यासाठी, विजेचे बिल भरण्यासाठी पैसा कुठून आणायचा? म्हणून या शाळा विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मदत निधी उभा करुन खर्च भागविण्याचा प्रयत्न करीत आहेत. एका बाजूला शासनाने अनुदान द्यायचे नाही. वेतनेतर अनुदान द्यायचे नाही. दुस-या बाजूला पालकांनी मदत केली, पालकांनी पैसे दिले, अशा पालकांकडून ज्या ज्या शाळांनी पैसे घेतले त्या शाळांवर कारवाई करण्याचे आदेश दिले गेले, त्यांच्यावर पोलीस केस दाखल करण्याचे आणि त्या त्या शाळांनी विद्यार्थी व पालकांकडून घेतलेले पैसे परत करण्याचे आदेश दिले जातात. ठाण्यामधील बेडेकर शिक्षण संस्थेला पालकांनी स्वखुषीने मदत दिली. अन्य शाळांनी त्यांना मदत केली. अनुदान अनेक वर्षे दिले गेले नाही. शिक्षणाधिकाऱ्यांनी तातडीने पैसे परत करा अन्यथा दंडात्मक कारवाई करु, मान्यता काढून घेऊ असे कळविले. असे प्रकार होत असतील तर हे गंभीर स्वरुपाचे आहे. आम्ही पालकांकडून एक नया पैसा घेणार नाही, परंतु आम्हाला शासनाने वेतनेतर अनुदान देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 26, बाब क्रमांक 21 वर शिवाजी शिक्षण संस्थेच्या शाळेसाठी दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ही आनंदाची बाब आहे. शासन अशा प्रकारच्या जून्या संस्थेच्या शाळेसाठी मदत करीत आहे. राज्यामध्ये 100 वर्षे पूर्ण झालेल्या अनेक शाळा आपला शतक महोत्सव साजरा करीत आहेत. या संस्थेप्रमाणेच अन्य 100 वर्षे पूर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थांना मदत करण्याची आवश्यकता आहे. मी स्वत: दोन-तीन शाळांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. त्या संबंधित संस्थांनी शासनाला विनंती केली. मी स्वत: शिफारस केली. 100 वर्षे पूर्ण झालेल्या संस्था आहेत त्यांनी ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण देण्याचे काम केले. इतर संस्थांना दीड कोटी रुपये देत असताना या शाळांना देखील मदत करण्याची आवश्यकता आहे. राजकीय पक्षाशी संबंधित आहे किंवा नाही याचा विचार न करता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

केवळ शिक्षण संस्थेला 100 वर्षे पूर्ण झाली त्यांना काही ना काही प्रमाणात मदत करण्याची आवश्यकता आहे. एका संस्थेला दीड कोटी रुपये देत असताना 100 वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेला 10 लाख रुपये, 15 लाख रुपये परंतु काही ना काही काही मदत करण्याची आवश्यकता आहे याचा शासनाने जरुर विचार करावा. शिक्षण सेवकांचे मानधन वाढविणे, सेवानिवृत्तीच्या विषयाच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 75, बाब क्रमांक 86 अन्वये वसतिगृहासाठी 1.30 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. वसतिगृहांची आज अवस्था काय आहे? मी अनेक वसतिगृहांबाबत सभागृहात चर्चा घडवून आणली. मंत्रीमहोदयांनी सभागृहात आश्वासन दिले की, तुम्हाला सोबत घेऊन वसतिगृहाला भेट द्यायला येईन. ते स्वत: आले नाहीत. मला बोलावले नाही. आज त्या वसतिगृहांची अवस्था आहे त्याच स्थितीत आहे. सभागृहात चर्चा झाल्यानंतर थोडीफार सुधारणा झाली. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था, त्यांना मिळणारे साहित्य, शैक्षणिक सुविधा, अन्य काही सवलती या दृष्टीकोनातून विचार होण्याची आवश्यकता आहे. त्यांना दिले जाणारे जेवण हा महत्वाचा विषय आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. केवळ वसतिगृहांना निधी देऊन चालणार नाही तर सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 75, बाब क्रमांक 88 वर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासाठी 93 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. बजेट कसे केले? बजेटमध्ये केलेली तरतूद कमी पडली म्हणून पुरवणी मागणी मांडली गेली तर समजू शकतो. कशा प्रकारचे बजेट केले, कशा प्रकारचा अंदाज केला आणि कशा प्रकारे शासनाने 93 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केली? हे अत्यंत गंभीर आहे. याचा अर्थ नियोजन योग्यरित्या झालेले नाही. ही पुरवणी मागणी मंजूर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती केव्हा मिळणार? वर्ष संपल्यानंतर 4-6 महिन्यानंतर शिष्यवृत्ती दिली जाणार आहे का? शासनाची चाके धिम्या गतीने फिरतात. म्हणून ही तरतूद यापूर्वीच व्हायला पाहिजे होती. विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 77, बाब क्रमांक 90 वर इतर मागासवर्गीयांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासाठी तरतूद केली आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

इतर बाबतीत म्हणजे वैद्यकीय शिक्षणासाठी तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी देखील शासनाने तरतूद केली आहे पण जे आमचे ओबीसी व मागासवर्गीय विद्यार्थी डीएड आणि बीएड चे प्रशिक्षण घेणारे आहेत त्यांना कुठल्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. कारण काय तर डीएड व बीएड प्रशिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा फायदा देत नाही असे सांगितले जाते. याचे कारण दिलेले आहे की, तशी जी.आर.मध्ये तरतूद केलेली नाही. डीएड व बीएड ही व्यावसायिक पात्रता नाही म्हणून असे प्रशिक्षण वगळून अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्तीची तरतूद करणे ही एक प्रकारे ॲनामली आहे. बीएड आणि डीएडचे प्रशिक्षण हे प्रोफेशनल क्वॉलिफिकेशन आम्ही मानतो व शासन देखील मानते परंतु शिष्यवृत्ती देताना मात्र हे अभ्यासक्रम व्यावसायिक मानावयाचे नाही. म्हणून जो मागासवर्गीय व इतर मागासवर्गीयांवर अन्याय होतो तो दूर करावा व या मुलांनाही शिष्यवृत्ती देण्याचा विचार करावा. एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ ST/ KGS/

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्र. 18, पृ.क्र.15-बीड जिल्हाधिकारी कार्यालयाचे भूमी पूजन होऊन जवळपास एक वर्ष पूर्ण झालेले आहे. तरी देखील ही इमारत अर्धवट आहे तसेच अजूनपर्यंत लागणारा निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला नाही. वित्त विभागाचे सचिव श्री. सोनी यांच्याकडे ती फाईल पडून आहे. माझी विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांनी सचिव श्री. सोनी यांना सांगून बीड जिल्ह्यातील हे सोन्यासारखे काम आहे ते ताबडतोब मार्गी लावावे. आमचे महसूल मंत्री हे बीड जिल्ह्याचेच आहेत तसेच इमारतीचे भूमीपूजन माननीय महसूल मंत्र्यांनीच केलेले आहे. माननीय राज्यमंत्री व माननीय महसूल मंत्री हे सुध्दा दादा आहेत अशा स्थितीत इमारतीचे बांधकाम अर्धवट राहणे योग्य नाही असे मला वाटते. ते लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, बाब क्रमाक 43,पृष्ठ क्रमांक 39, सार्वजनिक बांधकाम विभागावर मी माझे विचार मांडण्याकरिता या ठिकाणी उभा आहे. महाराष्ट्राचे माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्या निदर्शनास मी एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, मध्य मुंबई उपविभाग अंतर्गत इलाखा शहर 2008-2009 या आर्थिक वर्षात नॉर्म्स प्रमाणे 4.78 कोटी रुपये मंजूर झाले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र खर्च 16.13 कोटी रुपये झालेला आहे. हा खर्च मार्च महिन्यात झालेला आहे. माननीय उपमुख्यमंत्री हे धाडसी, निधडे, निर्मळ, निष्पाप आणि धडाडीचे असल्यामुळे ते संबंधित अधिका-यावर निश्चितपणे कारवाई करतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 103, पृष्ट क्रमांक 98, शासकीय दंत महाविद्यालय आंतरवासीय विद्यार्थ्यांची संख्या 10 ते 12 असली पाहिजे. परंतु या ठिकाणी प्रत्यक्षात 60 अंतरवासीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. यासंदर्भात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उपोषण केले आहे. त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 69, पृष्ठ क्रमांक 63 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. बीड जिल्हयामध्ये नारायण गड आणि भीमगड या ठिकाणी भाविक मोठया प्रमाणात येत असतात. ही दोन ठिकाणे जिल्हयातील महत्वाचे केंद्र आहेत. त्यामुळे नारायण गड आणि भीम गडाला कमीत कमी 11-11 कोटी रुपये प्रत्येकी दिले जावेत. असे जर झाले तर या ठिकाणच्या जनतेसाठी ते सोईचे होईल. त्यामुळे शासनाने यासंदर्भात प्रयत्न करावेत ,अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 113, पृष्ठ क्रमांक 105 वर मी माझे विचार मांडणार आहे. महाराष्ट्रातील बहुतेक डोंगर हे बोडखे आणि उजाड आहेत. वन खते आणि समाजिक वनीकरण यांच्या मार्फत या बोडख्या डोंगरावर वृक्ष संवर्धन होईल, याची आम्हाला खात्री नाही. त्यामुळे वृक्षकर स्थापुन करुन बोडख्या डोंगराचे संरक्षण केले तर चांगले होईल. आपल्या संतानी म्हटले आहे की, "वृक्ष वल्ली आम्हा सोयरे, वन चरे". त्यामुळे असे झाले तर पर्यावरणाच्या दृष्टीने सुध्दा ते चांगले होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 86, पृष्ठ क्रमांक 75 अनुसूचित जातीच्या मुलांकरिता व मुलींकरिता शासकीय वसतिगृहासाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी 1,30,00,000 ची मागणी सादर करण्यात आलेली आहे. सामाजिक न्याय विभाग प्रत्येक विद्यार्थ्यांमागे 630 रुपये अनुदान देते. त्यामुळे या अनुदानात वाढ करावी व हे अनुदान 630 रुपयावरुन 1000 रुपयांपर्यंत केले तर ख-या अर्थाने या मुलांचे संगोपन होऊ शकेल.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाची जी सहकारी बँक आहे त्या बँकेचे संचालक श्री. सुरेश दळवी आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ..

त्यांनी बोगस कागदपत्रे तयार केली होती.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाची वेळ संध्याकाळी 7.00 वाजेपर्यंत ठरविण्यात आली होती. आता 7.00 वाजले असल्यामुळे सभागृहापुढील कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.तसेच सर्व सन्माननीय सदस्याना माझी अशी विनंती आहे की, पूरक मागण्यांवर अजून अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी दोन तीन मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, श्री.सुरेश दळवी नावाच्या संचालकांनी बोगस कागदपत्रे तयार करुन ते जिल्हा सहकारी बॅकेत संचालक म्हणून गेलेले आहेत. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी शासनाकडे तक्रार केलेली आहे की..

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी भाषण संपवावे.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय श्री सुरेश दळवी हे बॅकेचे संचालक होते आणि ते त्यांच्याच बरोबर होते परंतु हल्ली ते बाहेर पडलेले आहेत. त्यामुळे ते हजर नसतांना त्यांच्याविषयी आरोप करता कामा नये.त्यामुळे ते हजर नसतांना त्यांच्यावर आरोप करणे बरोबर होणार नाही. म्हणून श्री.सुरेश दळवी यांचा उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या सदनातील सन्माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी तशा प्रकारची लेखी तक्रार शासनाकडे केलेली आहे तेव्हा याबाबत चौकशी करावी अशी माझी शासनाला विनंती आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, 2009-2010 सालच्या पूरक मागण्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्व प्रथम महसूल व वन विभागाची बाब क्रमांक 16 पान नंबर 14 संबंधी मला बोलावयाचे आहे. दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तिंना सहाय्य करण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. या चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्या डॉ.श्रीमती नीलम गो-हे यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तिंना शासनामार्फत मदत केली जाते व त्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. पुण्याच्या जर्मन बेकरीमध्ये बॉम्ब स्फोट होऊन काही निष्पाप जणांचा मृत्यू झाला होता व त्याच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत केलेली आहे. त्याचप्रामाणे जे जखमी झाले होते त्याना देखील आर्थिक मदत केली आहे.परंतु मराठी कुंटुबातील व्यक्ती ही जर्मन बेकरी चालविण्याचा व्यवसाय करीत असून या बॉम्ब स्फोटामुळे त्यंचे नुकसान झालेले असल्यामुळे त्यांना आर्थिक मदत देण्याची भूमिका शासनाने घ्यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय यानंतर बाब क्रमांक 25 पान नंबर 22 संबंधी मला बोलावयाचे आहे. रत्नागिरी जिल्हयातील मिरकरवाडा बंदरातील गाळ काढण्यासाठी 1 कोटी 19 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. हा गाळ काढण्यासाठी केन्द्र सरकारकडून 50 टक्के रक्कम देण्यात येणार आहे. मिरकरवाडा बंदरातील गाळ काढण्याचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे त्याचबरोबर कोकण किनारपट्टीतील सर्वच बंदरे आज गाळाने भरलेली आहेत. व तेथील गाळ त्वरित काढण्यात आला पाहिजे. एक काळ असा होता की कोकणात जाण्यासाठी एस.टी.ची सोय नव्हती त्यावेळी बोटीतून प्रवास केला जात होता. त्यावेळी कोकण किनारपट्टीतील बंदरे चांगल्या स्थितीत होती. दुर्देवाने काळानुरुपाने या बंदरात मोठया प्रमाणावर गाळ साठला आहे. रत्नागिरी जिल्हयातील मिरकरवाडा बंदर हे एक चांगले बंदर आहे . मिरकरवाडा बंदरासाठी दरवर्षी कोटयावधी रुपये खर्च केले जातात . परतु मेरिटाईम बोर्ड एका ड्रेझरची सोय देखील करु शकलेले नाही.त्यामुळे गाळ काढण्यासाठी केरळ मधून ड्रेझर आणावे लागतात व तेथून आणलेल्या ड्रेझरच्या माध्यमातून मिरकरवाडा बंदरातील गाळ काढला जातो. तेव्हा बंदर खात्याच्या मार्फत किंवा मेरी टाईम बोर्डाच्या मार्फत कोकणाच्या बंदरातील गाळ काढण्यासाठी कायम स्वरुपी ड्रेझर घेण्यात आला पाहिजे अशी माझी शासनाला विनंती करावयाची आहे

नंतर श्री.सरफरे .

अशोधित प्रत / शोधित्रीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, बाब क्रामंक 27 व पान क्रमांक 22 मध्ये मच्छिमारांसाठी अपघात गट विमा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मच्छिमार बांधव रात्रंदिवस आपला व्यवसाय करण्यासाठी समुद्रात जातात. त्यावेळी कित्येकदा त्यांना अपघाताला सामोरे जावे लागते. त्या अपघातामध्ये दगावल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर मोठे संकट येते . आणि म्हणून त्यांचा विमा उतरविण्याची योजना अधिक व्यापक स्वरुपामध्ये अंमलात आणावी. जेणेकरुन कुणीही मच्छिमार बांधव या योजनेमधून बाहेर राहणार नाही याची शासनाने खबरदारी घेतली पाहिजे.

त्यानंतर बाब क्रमांक 30 व पान क्रमांक 25 मध्ये महानगरपालिका व नगरपालिकांच्या प्राथमिक शाळांच्या इमारतींचा भाडयाचा खर्च भागविण्यासाठी आपण तरतूद केली आहे. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी मघाशी मुद्दा उपस्थित केला होता की, ज्या खाजगी माध्यमिक शाळा आहेत व ज्यांचे व्यवस्थापन एखाद्या खाजगी संस्थेकडे आहे. त्या शाळांना शासन आज फक्त वेतन अनुदान देते, त्याव्यतिरिक्त वेतनेतर अनुदान दिले जात नाही. त्या संस्थांनी बांधलेल्या शाळांच्या इमारतींचे भाडे हे शासन कित्येक वर्षे देत नाही. आज आपण महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या इमारतींच्या भाडयांसाठी याठिकाणी तरतूद करीत असतांना खाजगी संस्थांनी बांधलेल्या इमारतींच्या भाडयांच्या बाबतीत सुध्दा शासनाने विचार केला पाहिजे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 122, पान क्रमांक 117 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महात्मा फुले आणि अण्णाभाऊ साठे यांच्या अप्रकाशित साहित्याच्या प्रकाशनासाठी तरतूद करण्यात आली आहे. विधानसभेमध्ये या विषयासंबंधी लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असता माननीय अध्यक्षांनी शासनाला असे निदेश दिले की, ज्या मान्यवरांचे साहित्य अप्रकाशित आहे ते प्रकाशित करण्यासाठी शासनाने व्यवस्था केली पाहिजे, त्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग पुरविला पाहिजे. त्यामुळे त्या प्रश्नाचे महत्व लक्षात घेऊन शासनाने या अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमध्ये अधिक वाढ करण्याबाबत विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 136, पान क्रमांक 139 मध्ये खैबर हॉटेलच्या भाडयाकरिता तरतूद करण्यात आली आहे. मला या मागणीचा उलगडा होत नाही की, खैबर हॉटेल हे एका खाजगी माणसाच्या मालकीचे आहे. असे असतांना त्या मालकाला आपण शासनाच्या वतीने 4 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी....

41 हजार रुपयांचे भाडे कशासाठी देत आहात? शासनाने त्यांची कोणती जागा घेतली आहे? ज्यांचे भाडे साडे चार लाख रुपये त्यांना द्यावे लागत आहेत? याबाबतीत उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, शेवटची बाब क्रमांक 137 व पान क्रमांक 139 च्या बाबतीत दुर्दैव असे म्हणता येईल की, गेल्या कित्येक वर्षापासून सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा आहे असे शासनाच्या वतीने वारंवार सांगण्यात येते. माननीय उप मुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेब पर्यटनमंत्री असतांना ते सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये यायचे. त्यावेळी त्यांनी पर्यटनाला चालना देण्यासाठी जरुर प्रयत्न केले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, आभार मानतो. परंतु आज त्या जिल्हयामध्ये येणाऱ्या पर्यटकांना सूटचे आरक्षण करावयाचे असेल तर सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कोणतीही व्यवस्था केलेली नाही. सूटचे आरक्षण करण्याची व्यवस्था कोल्हापूर किंवा मुंबई येथे करण्यात आली आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा असतांना पर्यटक्ांना सूटचे आरक्षण करण्यासाठी कोल्हापूरला जावे लागते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंवा मुंबई येथून आरक्षण करावे लागते. या व्यवस्थेमध्ये बदल करण्याची गरज आहे. खऱ्या अर्थाने जर तुम्हाला सिंधुदूर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हणून मान्यता द्यावसयाची असेल तर त्यासाठी अजून तुम्हाला पुष्कळ उपाययोजना कराव्या लागतील, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. असे केले तर ज्याप्रमाणे गोव्यामध्ये टुरिझम वाढले, त्याप्रमाणे या जिल्ह्यामध्येही टूरिझम वाढू शकते. मध्यंतरीच्या काळामध्ये आमच्या माननीय राज्यमंत्री सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये गेल्या होत्या. आम्ही तेथील आमदार आहोत पण माननीय मंत्री महोदया तेथे कधी गेल्या आणि परत कधी आल्या हे आम्हाला समजलेही नाही. माझी माननीय राज्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, तुम्ही असे करु नका. पुढच्या वेळी तुम्हाला जर तेथे जावयाचे असेल तर आम्हाला अगोदर तसे सांगावे. जर आम्हाला वेळ मिळाला तर आम्ही जरुर तुमच्याबरोबर येऊ. आम्हाला तेथील जी माहिती असेल ती तुम्हाला सांगू शकतो. एवढेच मी या निमित्ताने सांगतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .4 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी पुरवणी मागण्यांवर बोलत असताना मी प्रथम पर्यावरण या विषयावर बोलू इच्छितो. पान क्र.105, बाब क्र.112 मध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्यातील अनेक मायनिंग प्रकल्पांना प्रशासनाने परवानगी दिलेली आहे. तसेच याठिकाणी सुमारे 56 खनिज पट्टयाला प्रशासनाने परवानगी दिली आहे आणि त्यातील किमान 3-4 मायनिंग प्रकल्प सुरु झालेले आहेत. याठिकाणी मायनिंग प्रकल्पामुळे खूप मोठया प्रमाणात वृक्ष तोड झालेली आहे. त्याच प्रमाणे अत्यंत दुर्मिळ अशी वनौषधी असलेली झाडेही तोडण्यात आली आहेत. या भागामध्ये पट्टेरी वाघ, बिबटे, गवा, रेडे, हत्ती इ.वनचर प्राणी देखील फिरत असतात. आज सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये सुमारे चार ते पाच पट्टेरी वाघ आहेत. तेथील टायगर प्रोजेक्टचे अध्यक्ष माननीय पंतप्रधान असल्यामुळे या वाघांचा बचाव करण्यासाठी शासनाने काळजी घेण्याची गरज आहे. केंद्र शासनाने हल्लीच पश्चिम घाटाकरता डॉ.माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखली बायो डायव्हर्सिटी कमिटी नेमलेली आहे. ही कमिटी नेमलेली असल्याने या जिल्ह्यात पुढील महिन्यात जन-सुनावणी लागलेली आहे. पण जोपर्यंत सहा महिन्यामध्ये या कमिटीचा रिपोर्ट येत नाही, तोपर्यंत सगळया लावण्यात आलेल्या जन-सुनावण्या रद्द करण्यात याव्यात आणि तेथील मायनिंग प्रकल्पांना स्थगिती देण्यात यावी. या जिल्ह्यातील पर्यावरणाचा बचाव करुन, तेथील पर्यटनाला अधिक प्रमाणात चालना देण्याची गरज आहे. या दृष्टीकोनातून प्रशासनाने खनिज पट्टयाच्या संबंधात असलेल्या सर्व सुनावण्या स्थगित कराव्यात अशी मी पुन्हा एकदा सूचना करतो.

सभापती महोदय, पान क्र.111,बाब क्र.117 यामध्ये सिंधुदूर्ग जिल्हा बँकेबाबत सांगावयाचे तर याठिकाणी दोन-तीन सन्माननीय सदस्य बोलले आहेत. पण 2006 मध्ये या जिल्हा सहकारी बँकेच्या भाई सावंत पतसंस्थेने सुमारे 5 कोटी रुपयांचे कर्ज घेऊन, त्यापैकी एकही पैसा न भरल्यामुळे संबंधितांकडून जवळजवळ 7 कोटी रुपयांचे रि-पेमेंट होणे शिल्लक आहे. त्या पतसंस्थेचे चेअरमन हे या बँकेचे संचालक आहेत. या बँकेच्या संचालकांनी पतसंस्थेवर प्रशासक नेमलेला आहे. पण त्या संचालकांनी कोणत्याही प्रकारचे दप्तर उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रशासकही तेथे जात नाही. तेव्हा जिल्हा बँकेच्या संचालकांवर कारवाई करण्यासाठी शासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्र.22, पान क्र.25 मत्स्योद्योगाबाबत आहे. सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये फयान वादळ आल्यानंतर 4 कोटी रुपयांचे अनुदान देण्याचे जाहीर केले होते. पण अजूनपर्यंत फक्त 1 कोटी 23 लाख रुपयांचे वितरण झालेले आहे आणि 2 कोटी 77 लाख रुपये . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : मी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना सांगू इच्छितो की, आज मत्स्य विभागाच्या संदर्भातील पूरक मागण्या सादर करण्यात आलेल्या नाहीत.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. आज मत्स्य विभागाच्या पूरक मागण्या चर्चेसाठी नाहीत.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, ठीक आहे. हरकत नाही. पान क्र.9, बाब क्र.9 यामध्ये सिंधुदूर्ग जिल्ह्यात पोलीस विभागाने पोलीस कल्याण निधीच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्याला 9 लाखाचे टारगेट दिलेले आहे. त्याप्रमाणे ते जवळजवळ 72 लाख रुपये जमा करणार आहेत. गेले 2-3 वर्षे पोलीस कल्याण निधी बंद करण्यात आला होता. आता प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक नाक्यावर पोलीस उभे राहिलेले असून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहन चालकांकडून नाटकाची तिकीटे घ्या नाहीतर तुमच्यावर कारवाई करतो असे सांगण्यात येत आहे. अशा प्रकारे अनेक धंदेवाल्यांच्या गळयात ही तिकीटे मारुन जवळजवळ 72 लाख रुपयांचा निधी जमा करण्यात येत आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

हा निधी कुठे जातो त्याचे काय होते याची कोणत्याही लोकप्रनिधीला किंवा पोलीस विभागाला कल्पना येत नाही. या ठिक्राणी आलेल्या सर्व अधिकाऱ्याची उठबस करणे, त्यांची रेस्ट हाऊस बांधणे आणि तेथे सर्व मौजमजा करणे यासाठी हा सगळा पैसा खर्च केला जातो. याबाबतीत त्याठिकाणी पोलिसांमध्ये देखील चर्चा सुरु आहे. एकाही पोलीस कॉन्स्टेबलच्या किंवा पोलिसांच्या कुटुंबियाना त्यातील एकही पैसा दिला जात नाही, अशा प्रकारची तक्रार पोलिसांचीच आहे. म्हणून अशा प्रकारे जमा होणाऱ्या पैशाची चौकशी होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 10 बाब क्रमांक 12. सिंधुदुर्ग जिल्हयात नुकतीच पोलीस भरती झाली. सुमारे चार ते पाच हजार मुले तीन दिवस उन्हातान्हात तडफडत होती.या ठिक्राणच्या पोलीस भरतीमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला अशा प्रकारच्या बातम्या आलेल्या आहेत. अनेक पोलिसांनी आपापल्या नोतेवाईकांना पुढे नेले आणि ज्यांचे वशिले नाहीत अशा उमेदवारांना तासंतास दिवसभर उन्हातान्हात बसून ठेवले अशा प्रकारच्या तक्रारी आता पालकांकडून लोक प्रतिनिधीकडे येत आहेत. आमच्या मुलाचा वशिला लावण्यासाठी एक लाख, दोन लाख रुपयाची पोलीस विभागाकडून मागणी करण्यात येत आहे. पण आम्हाला ते पैसे देणे शक्य होत नाही अशा प्रकारच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे या भरतीची पूर्णपणे चौकशी करण्याची गरज आहे. ती चोकशी करण्यात यावी अशा प्रकारची मी मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 25, बाब क्रमांक 29. सर्व राज्यातील कला शिक्षक औरंगाबाद खंडपीठामध्ये गेले होते. त्यावेळी ज्यांनी कला शिक्षणाचा कोर्स केलेला आहे त्यांनाच कला शिक्षक म्हणून नेमावे अशा प्रकारचा न्यायालयाचा निर्णय झालेला आहे. यासंदर्भात आंदोलने करण्यात आली होती. त्या आंदोलनाच्यावेळी माजी शिक्षण मंत्री श्री. विखे-पाटील यांनी शब्द दिला होता की, अशा प्रकारचा आदेश काढून कला शिक्षकांना सेवेत घेण्यास भाग पाडू पण त्यासंदर्भात अद्याप कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही. तो निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावा, अशा प्रकारची विनंती आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 26, बाब क्रमांक 31. सिंधुदुर्ग जिल्यामध्ये जवळ जवळ एक हजार बचत गटांना पोषण आहाराची योजना दिलेली आहे. या बचत गटांनी पोषण आहाराची

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर.....

योजना चालविण्याकरिता आपल्या अंगावरचे दागिने गहाण ठेवले आहेत. तर काही महिलांनी कर्ज घेतलेले आहे आणि शाळेतील मुलांना पोषण आहार देण्याची योजना चालू ठेवली आहे. पोषण आहाराचे पैसे दहा-दहा महिने मिळत नाहीत. तेव्हा याबाबतचा गांभीर्याने विचार करण्यात यावा.

पान क्रमांक 53, बाब क्रमांक 58. दोडामार्ग तालुक्यामध्ये न्यायालय निर्माण होण्यासाठी मंजुरी मिळालेली आहे पण त्यासंबंधीची फाईल वित्त विभागाकडे अडकलेली आहे. वित्त विभागातून फाईल लवकर क्लीअर होत नसल्यामुळे दोडामार्ग येथील न्यायालय चालू होऊ शकत नाही. त्यामुळे वित्त विभागाकडे असलेली फाईल लवकरात लवकर क्लीअर करुन दोडामार्ग येथे न्यायालय चालू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत अशी विनंती आहे.

पान क्रमांक 62,बाब क्रमांक 68. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेतील कुडाळ ग्रामपंचायतीतील जवळ जवळ 11 लाख रुपयाचा भ्रष्टाचार उघडकीस आलेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अभियंता यांनी चौकशी केली असता 11 लाख रुपयाची कामे झालेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याचप्रमाणे कणकवली तालुक्यातील साकेडी, ताबंळवाडी येथे विहीर खोदली गेली . त्या विहिरीचे बांधकाम न करताच त्या बांधकामाचे सुमारे सव्वा चार लाख रुपयाचे बिल काढण्यात आले पण त्या बिलाची एम.बी. ग्रामपंचायतीमध्ये नसल्याची माहिती मिळालेली आहे. ग्रामसभेमध्ये ग्रामस्थानी त्याची एम.बी असल्याची माहिती मागविली असता ग्रामसेवकाने त्याची एम.बी. नसल्याचे कबूल केलेले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि बी.डी.ओ.ने यासंदर्भात चौकशी केली असता त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही.

सभापती महोदय,पान क्रमांक 91,बाब क्रमांक 101. आरोग्य विभागामध्ये प्रोटिन खरेदी करण्यात आले. 37 लाख रुपयाचे प्रोटीन एकत्रित खरेदी करण्यात आले ते प्रोटीन निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आले आहे.

यानंतर श्री. बरवड.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

या प्रोटीनची चौकशी होऊन हे प्रोटीन अंगणवाडीच्या माध्यमातून घ्यावयाचे असताना आरोग्य विभागाने खरेदी करुन त्यामध्ये मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. त्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची गरज आहे. या ठिकाणी मी मांडलेल्या मुद्यांच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तराची अपेक्षा करतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यावर बोलत असताना प्रथम मी गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 10 वरील बाब क्रमांक 13 बाबत बोलणार आहे. यामध्ये उदवाहनाच्या दुरुस्तीचा खर्च 23 लाख 38 हजार दाखविलेला आहे. पोलिसांच्या इमारतीमध्ये उदवाहन आहे हे ऐकून खूप बरे वाटले. या निमित्ताने मला असे सुचवावेसे वाटते की, एखादी झोपडपट्टी सुध्दा एसआरएच्या माध्यमातून चांगल्या घरापर्यंत जाते. पोलिसांच्या वसाहती ज्या ज्या ठिकाणी आहेत त्या जास्तीत जास्त तळमजल्याच्या किंवा एक मजल्याच्या आहेत. त्या ठिकाणचा एफएसआय वापरुन चांगल्या बिल्डरला काम देऊन पोलिसांच्या चांगल्या वसाहती बांधल्या तर पोलिसांच्या घरांची जी दयनीय अवस्था आहे ती दूर होईल.

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पान क्रमांक 91 वरील बाब क्रमांक 100 बाबत बोलावयाचे आहे. जीवनदायी योजनेसंबंधी अनेक विषय मांडले गेले. एक धक्कादायक बातमी आहे ज्याचा आपणा सगळ्यांनाच विचार करावा लागेल. आंध्रप्रदेश सरकार जीवनदायी योजनेमध्ये 1200 कोटी रुपये खर्च करते आणि महाराष्ट्र सरकार या योजनेमध्ये फक्त 42 कोटी रुपये खर्च करते. आंध्रप्रदेश सरकार एकूण 36 प्रकारचे आजार या जीवनदायी योजनेमध्ये कव्हर करते तर महाराष्ट्र सरकार केवळ 4 प्रकारचे आजार कव्हर करते. याचा विचार करता महाराष्ट्र सरकारच्या जीवनदायी योजनेमध्ये जी 42 कोटी रुपयांची तरतूद आहे ती अपुरी असल्यामुळेच अनेक हॉस्पिटल्सना वेळेवर पैसे मिळत नाहीत. म्हणून ही तरतूद वाढवली जावी असे मला प्रामुख्याने सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, यानंतर मला सहकार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 111 वरील बाब क्रमांक 117 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये प्रामुख्याने पतसंस्थांमध्ये जी दहा हजार रुपयांपेक्षा कमी रकमेची डिपॉझीट्स आहेत ती लोकांना मिळावी यासाठी शासनाने 200 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले. परंतु त्याची कोठेही तरतूद केलेली दिसत नाही. घोषणा झाल्यापासून मोठ्या प्रमाणावर लोक दहा हजार रुपयांचे डिपॉझिट तरी परत मिळेल याची वाट पाहात आहेत. त्यामुळे 200 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित करुन दहा हजार रुपयांपर्यंतचे डिपॉझिट परत देण्याचे सरकारने जे घोषित केले आहे त्याचा शासनाने अतिशय गांभीर्याने विचार केला पाहिजे आणि अंमलबजावणी केली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील मोठे भ्रष्टाचाराचे उदाहरण झालेली आहे. त्या ठिकाणी रिझर्व्ह बँकेने प्रशासक नेमला. त्या ठिक्राणी जवळजवळ 42 टक्के एन.पी.ए. आहे. गेली तीन महिने त्या ठिकाणी प्रशासक असून सुध्दा संचालकांना सामुहिक जबाबदार धरुन त्यांच्यावर जी कायदेशीर कारवाई करावयास पाहिजे ती केली गेली नाही. 600 कोटी रुपयांपर्यंतची कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची थकबाकी असून ही संपूर्ण बँक बुडेल अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पर्यटन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 139 वरील बाबीच्या संदर्भात बोलावयाचे आहे. शिवाजी महाराजांचे दुसरे चिरंजीव राजाराम यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी ताराराणी यांनी 1710 मध्ये कोल्हापूर राज्याची निर्मिती केली आणि पन्हाळा ही त्याची राजधानी झाली. त्या गोष्टीला आता 300 वर्षे पूर्ण होत आहेत. कोल्हापूरला ताराराणीची जी समाधी आहे आणि ताराराणीचे जे स्मारक आहे ते अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. ज्या ताराराणीने कोल्हापूर राज्याची निर्मिती केली आणि पन्हाळा राजधानी केली आणि अतिशय शौर्याने त्या भागातील किल्ला लढविला त्या ताराराणीच्या स्मरणार्थ तेथील स्मारक नीट करावे अशी मी या निमित्ताने पर्यटन विभागाला विनंती करतो. मी तीन बाबी सुचविलेल्या आहेत त्याचा शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना मी प्रथम पृष्ठ क्रमांक 14 वरील बाब क्रमांक 15 बाबत बोलणार आहे. पाडळी, ता.शिरुर, जिल्हा बीड येथील जमिनी प्रकल्पासाठी संपादित झाल्या. जमीन संपादित झाल्यानंतर त्याचा मुआवजाचेही वाटप झाले. परंतु अद्याप त्या जमिनी 7/12 वरुन कमी केलेल्या नाहीत आणि त्यांच्याकडून महसूल घेतला जातो. बीड जिल्ह्यामध्ये आणि विशेषत: शिरुर तालुकयामध्ये पावसामुळे पिकांचे नुकसान झाले. मी पिकांच्या नुकसान भरपाईसबंधीचा प्रश्न टाकला होता. मला दोन दिवसांपूर्वी उत्तर मिळाले की, नुकसान झाले हे खरे आहे परंतु 65 मिलीमीटरपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे त्या ठिकाणी नुकसानभरपाई देता आली नाही. माझी शासनाला विनंती आहे की, एक तर 65 मिलीमीटरची अट कमी करावी किंवा विशेष बाब म्हणून नुकसानभरपाई देण्याच्या दृष्टीने काय करता येईल ते बघावे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 8 बाबत बोलावयाचे आहे. माजलगाव पोलीस स्टेशनमध्ये हल्लीच घडलेली घटना आहे. तेथील पी.आय. आणि ए.पी.आय यांनी मिळालेल्या हप्त्याच्या वाट्याच्या भांडणावरुन एकमेकात मारामाऱ्या केल्या अशा प्रकारच्या बातम्या सर्व स्थानिक वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या आहेत. अर्थातच कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. त्यामुळे यासंदर्भामध्ये नकारात्मक भूमिका न घेता या घडलेल्या घटनेच्या संदर्भात संबंधितांना जाब विचारावा आणि त्यांना शिक्षा करावी अशा प्रकारची विनंती करते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

याच माजलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत याच आठवडयामध्ये एका मुलीला छेडले आणि कम्पाऊंड वॉलवरुन उडी मारुन पोलीस कॉन्स्टेबल पळाले, त्यामुळे स्थानिक लोकांनीच कॉन्स्टेबलला मारले आहे. परंतु त्याबाबतचाही गुन्हा दाखल करण्याबाबत माजलगाव पोलीस ठाण्याने कुचराई केलेली आहे. त्याबाबतही शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, यानंतर सामाजिक न्याय विभागाच्या पान क्रमांक 74 वरील बाब क्र.84 वर मी बोलू इच्छितो. बीड जिल्हयात ऊसतोड कामगार आहेत. त्यांच्या पाल्यांसाठी केवळ दोन शाळा इयत्ता सातवीपर्यंतच्या आहेत. पण ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा देऊ नयेत असा जो जी.आर आहे तो स्थगित करण्याचा प्रस्ताव मंत्री महोदयांकडे आहे. त्याचप्रमाणे श्रेणीवाढ करण्याचा प्रस्तावही मंत्रिमहोदयांकडे आहे. तेव्हा शासनाने त्वरित लक्ष घालून ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना न्याय मिळवून द्यावा.

त्याचप्रमाणे पान क्र.20 वरील बाब क्रमांक 19 वर मी बोलू इच्छिते. बीड जिल्हयात 1200 एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आलेली आहे. हे लक्षांक 2000 एकरपर्यंत वाढवून देण्यात यावे. या प्रश्नासंबंधी मी मागील 3 वर्षांपासून प्रयत्न करीत आहे.

त्याचप्रमाणे 3 संयुक्त पाणी पुरवठा योजना आहेत. परळी तालुक्यातील संगम अठरा खेडी पाणी पुरवठा योजना, फकीरजवळ पाणी पुरवठा योजना आणि असोरडोह अशा योजना आहेत. परंतु या योजनांमधून गावांना पाणी पुरवठा होत नाही. तो केला जावा अशी विनंती करते.

बीड जिल्हयामध्ये वामनभाऊचा गहनीनाथ नावाचा एक गड आहे. त्या गडावर पुण्यतिथीला दरवर्षी 4-5 लाख लोक जमतात. पण तेथे पिण्याच्या पाण्याची योजना नाही, तेथे टँकर्सने पाणी पुरवठा केला जातो. त्याठिकाणी कायम स्वरुपी पिण्याच्या पाण्याची योजना करण्यात यावी.

यानंतर मी पृष्ठ क्र.91 वरील बाब क्रमांक 100 वर मी बोलते. हल्ली सर्वेमध्ये माझ्या वाचनात आले की, महाराष्ट्रामध्ये आदिवासी भागामध्ये मुलींचे प्रमाण 0 ते 14 वयोगटाचे आहे. मुलांच्या तुलनेत आदिवासी भागात हे प्रमाण बरे आहे. परंतु बीड जिल्हयात एक हजार मुलांच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

तुलनेत मुलींची संख्या 843 इतकी आहे. विशेषत: शिरुर तालुक्यात 799 ही जी संख्या समोर आली आहे ती गंभीर आहे. याकडे शासनाने गंभीरपणे लक्ष देऊन मुलामुलींचे प्रमाण समान होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

यानंतर विधी व न्याय विभागाच्या पान क्रमांक 53 वरील बाब क्रमांक 58 वर मी बोलणार आहे. परळी न्यायालयाच्या इमारतीसाठी जागा नसल्यामुळे पाटबंधारे विभागाच्या रेस्ट हाऊसची जागा दिली होती. या न्यायालयाच्या डागडुजीसाठी 1 वर्षापासून फक्त 55 लाख रुपये निधी देण्याचे प्रकरण मंत्रालयात आहे. हा प्रश्न विधी व न्याय विभागाने सोडवावा.

यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पान क्रमांक 39 वरील बाब क्रमांक 40 वर मी बोलू इच्छिते. आम्ही बीड वरुन मुंबईला येतो त्यावेळी आम्हाला चाकणला क्रॉस करावे लागते. त्याठिकाणी जो चौक आहे तेथून पुढे येताना किमान 30 ते 40 मिनिटे थांबावे लागते. त्यामुळे एक ओव्हर ब्रीज तेथे केला तर हा प्रश्न कायमचा सुटू शकेल. तसेच धर्मापुरी-परळी हा रस्ता आहे. या रस्त्यावरुन सुध्दा ताशी 20 ते 30 कि.मी. या गतीपेक्षा अधिक गतीने गाडीने जाता येत नाही. दोन दिवसापूर्वीच मी मुखेड-शिरुर-ताजबंगा-अहमदपूर-धर्मापुरी-अंबेजोगाई या रस्त्याने प्रवास केला. त्या रस्त्याचीही तशीच अवस्था आहे, या रस्त्यांची दुरुस्ती करावी अशी मी मागणी करते. मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देते आणि माझे दोन शब्द संपविते.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाची पान क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 17 वर मी बोलणार आहे. या मागणीच्या अंतर्गत निगडीच्या पाणी पुरवठा योजना, टंचाई प्रवण क्षेत्रामध्ये पुरेसा पाणी पुरवठा करणे यासाठी ही तरतूद केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक गावांमध्ये ऐन उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागलेली आहे. तेथील वाडयांना व गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी या पुरवणी मागण्यात करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

यानंतर ग्रामविकास विभागाच्या पान क्रमांक 62 वरील बाब क्रमांक 68 या मागणीवर मी माझे विचार मांडतो. सिंधुदुर्ग जिल्हयातील धामापूरमध्ये एक तलाव आहे. त्या तलावाच्या भोवती 100 सौर दिवे लावण्याची योजना तत्कालीन ग्रामविकास मंत्र्यांकडे मी दिली होती. त्यासंबंधी बैठक झाल्यावर त्यांनी त्या योजनेला मंजुरी दिली होती. ती मंजुरी जिल्हा नियोजन मंडळाकडे आल्यावर त्यांच्याकडूनही शासनाकडे प्रस्ताव गेला होता. परंतु अजूनपर्यंत ते पैसे मिळालेले नाहीत. तो निधी मिळावा. त्यांचे असे म्हणणे आहे की, जी छोटी छोटी गावे आहेत, त्यांना 'क' विभाग म्हणजे जिल्हा नियोजन विभागाने तो पैसा द्यावा. विद्यमान ग्रामविकास मंत्री सभागृहात नाहीत. त्यांच्याकडेही यासंबंधी बैठक झाली होती.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुभाष चव्हाण ...

पान क्रमांक 75 वरील बाब क्रमांक 86 अंतर्गत अनुसूचित जातीतील मुलांकरिता व मुलींकरिता शासकीय वसतिगृहासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी काल देखील या गोष्टीचा उल्लेखा केला होता की, संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र हे असे राज्य आहे की या राज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी जास्तीत जास्त निधी खर्च केला जातो. हे श्रेय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे आहे. आश्रमशाळा, वसतिगृहे यांची स्थिती आपणा सर्वांना माहीत असते. कुठे दारे नसतात, कुठे खिडक्या नसतात, बाथरुम नसतात, साबण नसतो. तेव्हा या आश्रमशाळासाठी, वसतिगृहांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी विनंती करतो.

पान क्रमांक 105 वरील बाब क्रमांक 113 अंतर्गत पर्यावरणासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावली जातात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग, धामापूर या ठिकाणी पर्यावरणासाठी झाडे लावताना आंबा, फणस, रातांबे, बांबू अशा प्रकारची झाडे लावावित जेणे करुन शासनाला त्यापासून उत्पन्न मिळू शकेल.

पान क्रमांक 139 वरील बाब क्रमांक 137 अंतर्गत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या आस्थापनेवर 12 पदे निर्माण करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळामध्ये मॅनेजिंग डायरेक्टरचे पद रिक्त आहे. या रिक्त पदाचा कार्यभार जॉईण्ट डायरेक्टरकडे दिला जातो. मी या ठिकाणी हे सांगून सांगून कंटाळलो की सिंधुदुर्ग जिल्हा हा राज्यामध्ये एकमेव पर्यटन जिल्हा आहे. परंतु या ठिकाणी पायाभूत सुविधा नाहीत. या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने रिक्त पदेही भरणे गरजेचे आहे. श्री. सुरेश शेट्टी हे राज्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी भारत सरकारकडून 14 कोटीचा जंगल सफारीचा प्रस्ताव मान्य करुन आणलेला होता. एक सल्लागार नेमून 50 कोटीची योजना तयार करावयाची आहे. ही योजना तातडीने करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पान क्रमांक 111 वरील बाब क्रमांक 117अंतर्गत आर्थिक अडचणीत असलेल्या नागरी/ग्रामीण कृषीतर सहकारी पतसंस्थांना आपल्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याकरिता चालू वर्षासाठी रु. 32,78,79,912 इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.पतसंस्थांना मदत करण्यासाठी किंवा पतसंस्थेच्या ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी ही मागणी केलेली आहे. या राज्यामध्ये जशा नागरी सहकारी पतसंस्था आहेत तशा नागरी सहकारी बँका देखील आहेत. मल्टीस्टेट शेड्यूल्ड को.ऑप. बँका आहेत. रिझर्व्ह बँकेच्या धोरणामुळे आज मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँका आणि नागरी सहकारी बँका यांचे पुनरुज्जीवर करणे ही काळाची गरज झालेली आहे. आपल्या राज्याचा प्रगतिशील राज्य म्हणून पहिला क्रमांक कायम ठेवायचा असेल तर या क्षेत्राला मदत केली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

भारत सरकारने राष्ट्रीयकृत बँकांना आतापर्यंत 40746 कोटी रुपयांची मदत केली आहे. त्याप्रमाणे क्षेत्रीय ग्रामीण बँकांना 1767 कोटी रुपयांची मदत केली आहे. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शेतकरी पॅकेजद्वारे व एनपीए वसुलीसाठी 30 हजार कोटी रुपयांची मदत केली आहे. भारत सरकारने खुले आर्थिक धोरण मान्य केल्यावर बँकिंग क्षेत्रामध्ये विविध सुधारणा मान्य केल्या. त्यानुसार बँकांचे भांडवल हे क्रेडिट रिस्क, मार्केट रिस्क इत्यादीसाठी रिस्क वेटेड ॲसेटच्या 9 टक्के असावयास हवे व उत्पन्न देखील प्रत्यक्ष वसुलीवर आधारित असावयास पाहिजे हे तत्व मान्य केले आहे. बासल समितीने यात सुधारणा करुन मार्च, 2011 पर्यंत सीआरएआर 12 टक्के करावा असे सुचविले. याची पूर्तता करण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीयकृत बँका आणि क्षेत्रीय ग्रामीण बँकांना वर नमूद केल्याप्रमाणे प्रचंड प्रमाणात मदत केली. 40 हजार कोटी रुपये राष्ट्रीयकृत बँकांना दिले आणि ग्रामीण बँकांना 1767 कोटी रुपये दिले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना 30 हजार कोटी रुपयांचे पॅकेज शेतकरी कर्जाच्या माध्यमातून दिले. मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकांसह नागरी सहकारी बँकांना देखील वरील सुधारणा रिझर्व्ह बँकेने लागू केल्या. परंतु त्यांचा वाली कोणी नाही. खरे म्हणजे सहकारी बँकांच्या अडचणी राष्ट्रीयकृत बँकांपेक्षा अधिक आहेत. उदा.गुंतवणुकीच्या बाबतीत सहकारी बँकांना काही स्वातंत्र्य नाही. सहकारी बँका राष्ट्रीयकृत बँकांप्रमाणे बाजारात आपले भागभांडवल विकू शकत नाहीत. त्यांना सरकारी कंपन्यांच्या रोख्यांमध्ये गुंतवणूक करता येत नाही अथवा शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास बंधने आहेत. इतकेच नव्हे तर जेव्हा या सुधारणा लागू केल्या त्यावेळी सिक्युरिटी मार्केटमध्ये भारत सरकारने 1 लाख कोटीवरुन 4 लाख कोटी बॉंड विकून पैसा गोळा केला. सहकारी बँकांना व्याजाव्यतिरिक्त उत्पन्नाला खूप मर्यादा आहेत. सहकार मंत्र्यांना माहिती आहे, बहुतेक सहकारी बँका परकीय चलनाचा व्यवसाय करीत नाहीत. सहकारी बँकांनी इश्यू केलेल्या काही गॅरंटीज आणि डिमांड ड्राफ्टला सरकारी मान्यता नाही. एक्स्पोझर नॉर्म्स कमी असल्यामुळे मोठे कर्ज देता येत नाही त्यामुळे पर एम्प्लॉई बिझीनेस कमी होतो व सहकारी बँकांचे नॉन फंड बेस्ड उत्पन्न इतर बॅकांपेक्षा कमी असते. सहकारी बँका ज्या औद्योगिक युनिटना कर्ज देतात त्या प्रामुख्याने लेबर बेस्ड असतात. नॉलेज बेस्ड उद्योग नसल्यामुळे या उद्योजकांची नफा क्षमता कमी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

असते. बहुतेक युनिटस हे कृषि उत्पादनावर आधारित उद्योग असल्यामुळे हे सर्व उद्योग पावसावर अवलंबून असतात. पाऊस येईल तशा पध्दतीने या उद्योगांचे आधारित असते. याची परिणीती सहकारी बँकांच्या आर्थिक क्षमतेवर होत असते आणि त्यांचा आर्थिक पाया मजबूत रहात नाही. रिझर्व्ह बँकेचा ताजा अहवाल आला तो पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, दुर्बल अथवा आजारी बँका म्हणता येईल अशा ग्रेड 3 आणि 4 मधील 186 सहकारी बँका या राज्यामध्ये आहेत. सहकारी क्षेत्रातील बँकांच्या व्यवसायात महाराष्ट्राचा वाटा 61 टक्के आहे. देशाच्या तुलनेत सहकारी बँक क्षेत्रात 61 टक्के महाराष्ट्राचा वाटा आहे. या बॅकांमध्ये महाराष्ट्राचे 96249 कोटी रुपयांचे डिपॉझिट आहे व 60 हजार कोटी रुपयांची कर्जे या बँकांनी वाटली आहेत. संपूर्ण ग्रामीण आणि निमशहरी उद्योजक सेवाक्षेत्राशी निगडित लोक या क्षेत्रावर आधारित आहेत. महाराष्ट्रातील 10 कोटी लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार क्षेत्रातील बॅकांशी निगडित आहे. या मागण्यांवर बोलत असताना मी सरकारला विनंती करणार आहे की, पश्चिम बंगालसारख्या कम्युनिस्ट राजवटीतील सरकारने सहकारी बॅंक क्षेत्रातील राज्याची आर्थिक जडणघडणातील महत्व ओळखून तज्ज्ञ समितीची नेमणूक केली. कम्युनिस्ट राज्य असलेल्या पश्चिम बंगाल सरकारने सहकार क्षेत्रातील बँका सामाजिक जीवनामध्ये किती महत्वाच्या आहेत यासाठी तज्ज्ञ समितीची नेमणूक केली आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

व त्यांनी विविध अंगांचा अभ्यास करुन आर्थिक मदतीची शिफारस केली व पश्चिम बंगाल सरकारने ती मान्य देखील केली. जर पश्चिम बंगालसारखे सरकार असा व्यावहारिक निर्णय घेऊ शकते तर महाराष्ट्रासारख्या सहकार क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या प्रगतीशील राज्याने असा निर्णय का घेऊ नये. उद्योग क्षेत्राशी निगडित वस्त्रोद्योगाला तसेच आजारी सहकारी साखर कारखान्यांना सरकारने 10 हजार कोटीच्या वर मदत केली आहे. तर उद्योगांनापत पुरविणाऱ्या बँकांना मदत का नको असा माझा सवाल आहे. सत्यमसारख्या खाजगी कंपनीत मालकाने स्वत: घोटाळा केल्यावर सुध्दा भारत सरकार सॉफ्टवेअर कंपन्याची विश्वासार्हता धोक्यात येऊ नये म्हणून मदतीस पुढे सरसावली. सहकारी क्षेत्राच्या बँकांची विश्वासार्हता धोक्यात असताना महाराष्ट्र सरकारने स्वत:हून पुढे येणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. कारण एक सहकारी बँक अडचणीत आली तर दुसऱ्या येतात व पूर्ण क्षेत्रास धक्का पोहचतो. या बँका जर सरकारने सुदृढ ठेवल्या तर दिलेल्या पॅकेजपेक्षा सरकारला अर्थव्यवस्थेत सुधारणा झाल्यामुळे जास्त उत्पन्न परत मिळेल. हे पॅकेज कसे दिले पाहिजे यासंदर्भात मी सूचना करुन इच्छितो की, दि. 31 मार्च, 2010 च्या ऑडिटेड बॅलन्सशिटच्या आधारावर सहाय्य देण्यात यावे. निगेटिव्ह नेटवर्थच्या बँका पॉझिटिव्ह नेटवर्थमध्ये आणाव्यात आणि सीआरएआर कमीत कमी 9 टक्के होईल इतकी मदत करावी. खरे म्हणजे हा पैसा त्यांना मदत म्हणून नको आहे तर काही काळासाठी अतिशय अल्प दरात सॉफ्ट लोनच्या स्वरुपात दिला तर निश्चितपणे सहकारी बँका वाचू शकतात. सहकाराशी निगडित जनतेच्या 96 हजार कोटीचे डिपॉझिट आणि 60 हजार कोटीच्या वर फायनान्स उद्योगांना दिलेले आहे त्यालाही या माध्यमातून चालना मिळू शकते. महाराष्ट्रसारख्या प्रगतीशील राज्याने पुढाकार घेऊन यासंदर्भात माननीय सहकार मंत्री निश्चितपणे ठोस आश्वासन सभागृहाला देतील अशी मी अपेक्षा करतो.

यानंतर बाब क्र.55, पृ.क्र.50 पाटबंधारे विभागाच्या संदर्भात बोलत असताना मी असे सांगू इच्छितो की, कुंभे जलविद्युत प्रकल्प व काळ जलविद्युत प्रकल्पासाठी तरतूद करण्यासाठीची ही मागणी आलेली आहे. काळ प्रकल्पासाठी छत्री निजामपूर येथे धरण बांधण्याचे काम गेल्या 5 वर्षांपासून सुरु आहे. या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या छत्री निमाजपूर, बावले, सांदोशी या गावांचे पुनर्वसन करण्याचे शासनाने ठरविले होते. धरणातून सोडण्यात येणारे पाणी बारमाही उपलब्ध

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

झाल्याने गांधारी सिंचन प्रकल्पाच्या मूळ आराखडयात बदल करण्यात आला. बदललेल्या आराखडयात धरणाऐवजी वळण बंधारा बांधण्याचे ठरविले. त्यामुळे बुडित क्षेत्र फक्त 26 हेक्टर

झाले व त्यामुळे प्रकल्पाचा खर्चही कमी झाला. परंतु काळ-कुंभे प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायद्यानुसार अद्यापही शेतजमीन मिळालेली नाही. सिंचन क्षेत्रात पुनर्वसनाची प्रत्यक्ष अमलबजावणी करण्याबाबत दिनांक 23 नोव्हेंबर, 2009 रोजी माननीय जलसंपदा मंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीत पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला. परंतु जिल्हाधिकारी, रायगड यांनी अद्यापही धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. आपणास न्याय मिळावा म्हणून धरणग्रस्तांनी दि. 26 नाव्हेंबर, 2008 ते 3 डिसेंबर, 2008 या कालावधीत धरणे आंदोलनही केले होते पण त्याचाही परिणाम प्रशासनावर झाला नाही. काळ-कुंभे प्रकल्पाच्या नवीन कामासाठी खर्च करीत असताना प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचाही विचार करण्यात यावा अशी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाब क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 20 वर माझे विचार मी व्यक्त करणार आहे. विदर्भातील विशेषत: नागपूर, अमरावती आणि वर्धा या ठिकाणच्या संत्रा बागायतदारांना वित्तीय सहाय्य देण्याच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, जळगाव जिल्हयातील केळी हे महत्वाचे पीक असून देशातील सर्वात जास्त केळी पिकविणारा जिल्हा म्हणून जळगाव जिल्हयाला ओळखले जाते. गेल्या वर्षभरात नैसर्गिक आपत्ती आलेली आहे. फयान वादळ,गारपीट आणि अवेळी पाऊसामुळे रावेर, चोपडा आणि यावल या तालुक्यात हजारो कोटी रुपयांचे शेतक-यांचे नुकसान झाले. या वित्तीय वर्षात नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसानभरपाई मिळावी अशी मी अपेक्षा करतो. पंचनामे झाले, आश्वासनेही झालीत मात्र प्रत्यक्षात शेतक-यांना कोणतीही मदत या शासनाकडून अद्याप मिळालेली नाही. केळी पिकाचा केळी फळ म्हणून समावेश व्हावा, केळी पिकाचा विमा काढण्यात यावा आणि नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 30,पृष्ठ क्रमांक 25 - शिक्षण. महानगर, नगरपालिकेतील प्राथमिक शाळांची इमारतीच्या भाडयाच्या संदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. सन 2004-05 पासून माध्यमिक विभागाकडे मात्र इमारत भाडे आणि वेतनेतर अनुदानाची तरतूद अद्यापही झालेली नाही. त्यामुळे या ठिकाणी शिक्षणाच्या संदर्भातील अनेक प्रश्न निर्माण झालेले आहे. त्यामुळे माध्यमिक विभागाकडे इमारत भाडे आणि वेतनेतर अनुदाची व्यवस्था करावी, अशी मी विनंती करतो. तसेच जळगाव जिल्हयातील नुतन मराठा संस्थेस गेल्या 12 वर्षापासून वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. त्यामुळे यासाठीही तरतूद करावी अशी अपेक्षा या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, धुळे जिल्हयात एस.टी. चे 21 टक्के आरक्षण आहे. धुळे आणि नंदूरबार जिल्हयाचे विभाजन होत असतांना नंदूरबार जिल्हयावर अन्याय झालेला आहे. नंदूरबार जिल्हयात एस.टी. मधील लोकांची टक्केवारी 21 आहे. धुळे जिल्हयात एस.टी.ची लोकसंख्या कमी असतांना धुळे जिल्हयात पूर्वी जे एस.टी.चे आरक्षण होते ते आरक्षण आज सुध्दा तसेच कायम आहे. त्यामुळे धुळे जिल्हयाचे एस.टी.चे आरक्षण बदलण्याच्या संदर्भात त्वरीत निर्णय घेण्यात यावा. यामुळे अनेक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

प्रश्न निर्माण झालेले आहेत. या ठिकाणी एस.टी. आरक्षणामुळे शिक्षण क्षेत्रापासून नोक-या मिळेपर्यंत, जिल्हा बदल्यापर्यंत अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे येथील जनतेचे पिढयानपिढया नुकसान होत आहे. म्हणून माझी विनंती आहे की, धुळे जिल्हयाचे एस.टी. चे आरक्षण आहे ते लोकसंख्येनुसार निश्चित करण्यात यावे. म्हणजे धुळे जिल्हयाचे एस.टी.चे आरक्षण 21 टक्क्यावरुन 7.5 टक्के करण्यात यावे, अशी अपेक्षा करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय राज्यमंत्री श्री.अब्दूल सत्तार यांच्या निवेदनाच्या संदर्भात

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री. अब्दूल सत्तार यांच्या संदर्भात आजच निवेदन करण्यात येईल, असे माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले होते. आता सभागृह संपण्याची वेळ झालेली आहे आणि खालच्या सभागृहात यासंदर्भात निवेदन झालेले आहे. जर खालच्या सभागृहात निवेदन झाले असेल तर या सभागृहातही निवेदन झाले पाहिजे.

श्री. अब्दूल सत्तार (अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री) :सभापती महोदय,...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, खालच्या सभागृहात सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. अब्दूल सत्तार यांच्या संदर्भात निवेदन केलेले आहे. आम्ही माननीय राज्यमंत्रीमहोदयांकडून खुलासा मागितलेला नाही. जर खालच्या सभागृहात निवेदन झाले असेल तर ते निवेदन वरच्या सभागृहातही झाले पाहिजे अशी पध्दत आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय राज्य मंत्री श्री. अब्दूल सत्तार यांच्या संदर्भातील मुद्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. माननीय राज्यमंत्रीमहोदयानी यासंदर्भात खालच्या सभागृहात निवेदन केलेले आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी संध्याकाळ पर्यंत निवेदन करावे, असे निदेश माननीय सभापती महोदयांनी दिलेले आहेत. माननीय राज्यमंत्र्यांच्या संदर्भातीलच ही घटना आहे. सन्माननीय राज्यमंत्र्यांच्या संदर्भात खालच्या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी जे विधान केले होते, त्यावर खालच्या सभागृहात सन्माननीय राज्यमंत्र्यांनी खुलासा केला होता. त्यामुळे या ठिकाणी सुध्दा माननीय राज्यमंत्री खुलासा करण्यास तयार आहेत. त्यामुळे यासंदर्भात आपली अनुमती असेल तर सन्माननीय राज्यमंत्री खुलासा करु शकतील.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : पुरवणी मागण्यावरील चर्चा संपल्यानंतर व त्यावर माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर व सभागृहाची वेळ संपण्याच्या अगोदर यासंदर्भातील निवेदन करता येईल.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुद्धीत पत्र / शोधनीसाठी नाही

पृ.शी.मु.शी. सन 2009-10 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(पुढे सुरु)

श्री.दिलीपराव सोनावणे :सभापती महोदय, यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाची पूरक मागणी क्रमांक 5 पान नंबर 4 संबंधी मला बोलावयाचे आहे. महान राष्ट्र पुरुषांची स्मारके आणि पुतळे बांधण्याकरता ही तरतूद करण्यात आलेली आहे. या मागणीच्या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की जळगाव जिल्हयातील अमळनेर येथे सानेगुरुजींचे स्मारक करण्यात यावे. त्याचबरोबर खांनदेश कन्या बहिणाबाई चौधरी यांचे देखील स्मारक जळगाव जिल्हयातील जळगाव तालुक्यातील आसोदा या त्यांच्या माहेरी करण्यात यावे. त्याचबरोबर मला विधि व न्याय विभागाची बाब क्रमांक 58 पान नंबर 53 सबंधी बोलावयाचे आहे. ठाणे येथे कुटुंब न्यायालय बांधण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे जळगाव जिल्हयातील भडगाव येथे तालुका न्यायालयाच्या इमारतीसाठी प्लॅन तयार करण्यात आला असून तरतूदही करण्यात आली आहे परंतु अजूनही कामाला सुरुवात झालेली नाही. तेव्हा या इमारतीच्या बांधकामाला त्वरित सुरुवात करण्यात यावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 75, जलसंधारण मंडळासाठी पूरक मागणी करण्यात आली आहे. पाणलोट क्षेत्राच्या विकासाकरिता शासनाने जास्तीत जास्ती तरतूद करावी त्याचबरोबर बाब क्रमांक 72 पान नंबर 63 सबंधी मला बोलावयाचे आहे. नाशिक विभागातील जुन्या लहान पाटबंधारे आणि कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यासाठी खानदेश पॅकेजमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की,जळगाव जिल्हयातील नदीजोड प्रकल्पासाठी प्लॅनिंग करण्यात आलेले आहे परंतु निधी अभावी हे काम सुरु करण्यात आलेले नाही. तेव्हा या कामासाठी शासनाने त्वरित निधी उपलब्ध करुन द्यावा.

सभापती महोदय,बाब क्रमांक 88 पान नंबर 75 संबंधी मला बोलावयाचे आहे. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती,इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्राथमिक माध्यमिक आणि मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्या दिल्या जातात. या शिष्यवृत्या सदर शैक्षणिक वर्षामध्ये जर देण्यात आल्या तर योग्य होईल. तेव्हा या शिष्यवृत्या विद्यार्थ्यांना वेळेवर देण्यात याव्यात, अशा प्रकारची मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009-2010 सालच्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे. बाब क्रमांक 17, पान नंबर 15 संबंधी मला बोलावयाचे आहे. निकडीच्या पाणी पुरवठा योजनेसाठी 40 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, पाणी पुरवठयाच्या संदर्भात जेवढे बोलावे तेवढे कमी आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात निरनिराळया वर्तमानपत्रात ज्या बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या, त्याचे मी फक्त हेडीग वाचतो व त्यानंतर या विषयासंबंधी माझे विचार मांडतो. "विद्युतदेयक थकबाकीमुळे बनगाव पाणी पुरवठा योजना बंद होणार", "विद्युत पुरवठा कापल्याने बनगाव पाणी पुरवठा योजना बंद", पुण्यनगरी दिनांक 5 मार्च 2010, "पिण्याच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करा". पुण्यानगरी, दिनांक 11 मार्च 2010, "जिल्हयातील एकाही पाणीपुरवठा योजनेचे जिल्हा परिषदेला हस्तांतरण नाही". लोकमत दिनांक 12 मार्च 2010, "चंन्द्रपूर जिल्हयातील रखडलेल्या पाणी पुरवठा योजनेचे भवितव्य काय". तरुण भारत 11 मार्च 2010, "ऑगस्ट महिन्यात केली गेले ली पाणी कपातीची तयारी" तरुण भारत दिनांक 6 मार्च 2010, "अवैध नळ कनेक्शनविरुध्द प्राधिकरणाची धडक मोहीम," लोकमत दिनांक 8 मार्च 2010, "चिमुरकरांना शुध्द पाणी केव्हा मिळणार," तरुण भारत दिनांक 11 मार्च 2010,"पवनी तालुक्यातील कोंढा येथील पाणी पुरवठा योजना कोलमडली "पुण्यनगरी दिनांक 8 मार्च 2010,"जल स्वराज्य प्रकल्पाची पाणी टाकी शोभेची वस्तू", तरुण भारत दिनांक 10 मार्च 2010, "11 वर्षापासून नळ योजना अपूर्ण", युवाराष्ट्रदर्शन दिनांक 11 मार्च 2010.

सभापती महोदय, अत्यत वाईट अवस्थेत आज विदर्भ असून तेथील व्यथा या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. अशा परिस्थितीत जर आम्ही वेगळया विदर्भाची मागणी केली तर ती अयोग्य आहे काय ? विदर्भाच्या बाबतीत करार करण्यात आल्या पासून हे शासन विदर्भावर अन्यायच करीत आहे. या मुद्याच्या अनुषंगाने मी शासनाला सांगू इच्छितो की, गोंदिया जिल्हयात 15 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना 1988 च्या सुमारास मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यापैकी 13 योजना तयार असून 5 योजना अजूनही सुरु झालेल्या नाहीत. उर्वरित अर्जुनी मोरगाव आणि रामपुरीची पाणीपुरवठा योजना रखडलेली आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, 48 गावच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांची माहिती सांगण्यासाठी आज मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्या संबंधी या सभागृहामध्ये यापूर्वीही चर्चा केली आहे. आपण कनेक्शन वाढविण्याबाबत सांगितले होते. गावामध्ये आज साडे तीन हजार कनेक्शन झाले आहेत. त्यापोटी 3 लाख रुपये वसुली करण्यात आली आहे आणि अनामत रकमेपोटी 7 लाख रुपये मिळून 10 लाख रुपये शासनाकडे जमा केले आहेत. आपल्या अअधिकाऱ्यांनी त्यापैकी फक्त 60 हजार रुपये भरले म्हणून तात्पुरते कनेक्शन चालू केले. बाकीचे बिलाचे पैसे 23 मार्चपर्यंत भरतो असे कार्यकारी अभियंत्यांना आश्वासन दिले. मी मागील वर्षीपासून मंत्रिमहोदयांकडे मागणी करीत आहे की, गेल्या दोन वर्षापासून जिल्हयामध्ये टंचाईची परिस्थिती आहे. गोंदिया व भंडारा या दोन जिल्हयामध्ये 200 च्या वर दुष्काळी तालुके घोषित झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत विदर्भातील पाणी पुरवठयाच्या योजना चालू करावयाच्या असतील तर टंचाई निवारणाकरिता असलेल्या 40 कोटीपैकी 20 कोटी विदर्भाला दिले पाहिजेत.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 100 पृष्ठ क्रमांक 91 मध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल लोकांसाठी वैद्यकीय मदत म्हणून जीवनदायी योजनेमधून 70 हजार पेक्षा जास्त मदत विदर्भामध्ये दिली गेली नाही. आजारी पडल्यानंतर औषधोपचार करण्यासाठी दारिद्रय रेषेखालील लोकांनी पैसे कोठून आणायचे हा प्रश्न आहे?. या योजनेमध्ये 1 ते दीड लाख रुपये प्रत्येक लाभार्थ्यांना दिले पाहिजेत. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी म्हटल्याप्रमाणे याठिकाणी फार मोठा निधी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 91 व बाब क्रमांक 101 मध्ये हिवताप निर्मूलन योजनेबाबत सांगावयाचे झाल्यास विदर्भामध्ये मोठया प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव आहे. हिवताप निर्मूलन यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांना कोणतेही काम दिले जात नाही म्हणून 2 फेब्रुवारी पासून त्यांचे उपोषण सुरु आहे. कोणत्याही प्रकारे फवारणी होत नसल्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे. फवारणी करुन डासांवर नियंत्रण मिळविण्यासाठी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असतांनाही त्यांना सेवेमध्ये सामावून घेतले जात नाही. फक्त त्यांना कामावर घेण्याचे कोरडे आश्वासन दिले जाते. गोंदिया तालुक्यामध्ये गेल्या सात महिन्यात हिवतापाच्या आढळलेल्या 749 रुग्णांपैकी 595 रुग्ण आदिवासी भागामध्ये आढळले. आणि 154 रुग्ण गैर आदिवासी विभागात आढळले. हिवतापापासून बचाव करण्यासाठी शासनाने त्यांना दिलेल्या मच्छरदाण्या धूळ खात पडलेल्या आहेत, त्यांचा उपयोग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KTG/ SBT/ KGS/

श्री. केशवराव मानकर...

होत नाही. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, मच्छर मारणाऱ्या रॅकेट आदिवासी भागात फुकट दिल्या तर डासांवर बरेच नियंत्रण मिळविता येईल. डासांवर नियंत्रण मिळविण्यासाठी मोठी योजना राबविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 10 च्या बाबतीत काही नमुने याठिकाणी सादर करतो. जे पोलीस कर्मचारी नक्षलवाद्यांच्या एरीयामध्ये राहून नक्षलवाद्यांपासून लोकांचे संरक्षण करीत आहेत. अशा पोलिसांची काय अवस्था आहे ? याबाबत वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातम्यांचे शीर्षक आपणास वाचून दाखवितो. "गल्लीत घाण, भिंतीला करंट, देवरीच्या पोलीस वसाहतीला समस्यांचे ग्रहण", "सापांसह विषारी किडयांचेही वास्तव्य, पडक्या इमारतींमुळे गावात शोधावे लागते किरायाचे घर" ,"गोरेगावच्या पोलीस वसाहतीत पाण्याचे दुर्भिक्ष, शासनाचे दुर्लक्ष, विंधन विहिरींच्या क्षारयुक्त पाण्याचा वापर, तक्रारी देऊनही प्रशासनाची उदासीनता कायम" सभापती महोदय, अत्यंत दुरवस्था असलेल्या या पोलिसांच्या वसाहती आहेत. आपण वर्धा आणि नागपूर या शहरांमध्ये बांधण्यात आलेल्या पोलिसांच्या वसाहती पहाव्यात. ग्रामीण भागामध्ये नक्षलवाद्यांचा जर हल्ला झाला व शिटया जरी वाजविल्या तरी एकही पोलीस त्याठिकाणी धावून येणार नाही. त्याकरिता चांगल्या प्रकारच्या वसाहती निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

(यानंतर सौ.रणदिवे) -

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.केशवराव मानकर . . . .

कालही मी विषय मांडला होता. नक्षलवादी एरियामध्ये कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था तुटपूंजी केलेली आहे. चार-पाच लोकांची व्यवस्था करुन चालणार नाही. सभापती महोदय, मी थोडक्यामध्ये चार मुद्दे मांडून भाषण संपविणार आहे, फार जास्त बोलणार नाही.

सभापती महोदय, आपण मागास विद्यार्थ्यांसाठी 91 कोटी 67 हजार रुपयाची शिष्यवृत्ती साठी तरतूद केलेली आहे. मग याबाबतीत ओ.बी.सी.वर का अन्याय करीत आहात ? आम्हाला विदर्भ देऊन टाका मग आम्ही ओ.बी.सी.च्या लोकांना 100 टक्के शिष्यवृत्ती देऊ. अशा प्रकारची शिष्यवृत्ती केरळ राज्य, केंद्र सरकार देखील देत आहे मग तसे महाराष्ट्र सरकारला द्यावयास काय झाले ? त्यामुळे माझी मागणी आहे की, या महाराष्ट्रामध्ये ओ.बी.सी.च्या लोकांना खरच न्याय द्यावयाचा असेल, छत्रपती शिवाजी महारांच्या या राज्यामध्ये या लोकांना न्याय द्यावयाचा असेल तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या शिष्यवृत्तीच्या जी.आर.प्रमाणे 100 टक्के शिष्यवृत्ती देण्यात यावी.

सभापती महोदय, बाब क्र.31, पान क्र.30 यामध्ये शिक्षण विभागाच्या संबंधात जी तरतूद करण्यात आलेली आहे, मी त्याचे समर्थन करतो. परंतु यामध्ये तुम्ही माध्यमिक शाळा आणि खाजगी शाळांवर अन्याय करीत आहात, तो ताबडतोब थांबवला पाहिजे. पुष्कळ झाले, 2004 ते 2010 सात वर्षे झाली, आणखी त्यांना किती वर्षे थांबविणार आहात असा प्रश्न आहे. त्यांना वेतनेतर अनुदान मिळत नाही, शाळेचे भाडे मिळत नाही अशी स्थिती आहे. तेव्हा यासाठी एक पॉलिसी निश्चित करावयास पाहिजे. या संबंधातील जी कमिटी आहे, ती कुठे आहे ? त्या कमिटीचे काय झाले ? याची माहिती उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी. आम्हाला याचे उत्तर हवे आहे. जर याबाबतीत काही झाले नसेल तर उपाययोजना जाहीर करा. सन्माननीय सदस्य आदरणीय श्री.रामनाथ मोतेसरांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांवर, मुख्याध्यापकावर किंवा संस्थेवर कारवाई करावयाची असेल तर मग खुशाल करा. मग आम्हाला स्वतंत्रपणे निर्णय करावा लागेल की, जर शासन हे करीत नसेल तर मग खाजगी शाळांच्या संचालकांची बैठक घेऊन त्यामध्ये आम्हाला निर्णय घ्यावा लागेल. मग याबाबतीत सामुहिक याबाबतीत जी काही कार्यवाही करावयाची असेल ती करावी. शासनाच्या शाळा कशा चालतात याची आमच्याकडे उदाहरणे आहेत. म्हणून माझी मागणी आहे की, यासंबंधात शासनाने ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे.

. . . .4एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा शेतकऱ्यांच्या संबंधात असून, तो अत्यंत महत्वाचा आहे. मी एका शेतकऱ्याचा मुलगा आहे. अहो, तुम्ही कशासाठी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसता. तुम्ही मागील दोन वर्षामध्ये खत घेतलेच नाही. यावर्षी तर महाराष्ट्र शासनाला सुवर्ण संधी आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना आणि माननीय कृषी मंत्र्यांना आवाहन करतो की, ताबडतोब 627 कोटी रुपयांचे रासायनिक खत खरेदी करावे आणि 10 टक्के वाढलेल्या दराबाबत तुम्ही शेतकऱ्यांना मदत द्यावी. तुमचे भले होईल आणि शेतकऱ्यांचेही भले होईल. लोक आघाडी सरकारचे नाव घेतील. मी विरोधी पक्षाचा नेता म्हणून सांगत आहे की, शेतकऱ्यांवर अन्याय करु नका. 100 रुपये, 150 रुपये, 200 रुपये ब्लॅकमध्ये खत घेण्यासाठी कोणी बाध्य केले असेल तर माझा आघाडी सरकारवर आरोप आहे की, त्यांनी या शेतकऱ्यांवर अन्याय केलेला आहे. जर पूर्ण खरेदी केली असती, कारण फक्त सहा महिने गुंतवणूक करावयाची आहे. एप्रिल, मे व जून हे महिने कोरडवाहू आहेत आणि ओलिताची सोय आहे तेथे जून,जुलै आणि ऑगस्ट अशा प्रकारे सहा महिन्यामध्ये गुंतवणूक केली तर शेतकऱ्यांना न्याय मिळू शकतो. पण तुम्ही रासायनिक खताच्या किंमतीमध्ये दहा टक्के वाढ केलेली आहे, बियाणाच्या भावामध्ये वाढ केलेली आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आकस्मिक निधीतून 627 कोटी रुपये खर्च करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, तरच तो जिवंत राहील. सभापती महोदय, आपण मला भाषणासाठी वेळ दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र जय विदर्भ.

. . . .4 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, उद्या देखील पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार आहे. त्यावेळी ज्या सन्माननीय सदस्यांना भाषणे करावयाची आहेत, त्यांची नावे आजच पक्ष प्रतोदांनी पाठवून द्यावीत. कारण सकाळी विशेष बैठक घेऊन सभागृहाचे कामकाज सुरु करावयाचे आहे. आता पुरवणी मागण्यांवरील माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराची भाषणे सुरु होतील.

. . . .4 एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल सत्तार (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, याठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये आदरणीय सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंतजी, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.राजनजी तेली आणि इतर सन्माननीय सदस्य यांनी भाग घेतला . या विभागाच्या बाब क्र.1 ते 10 पर्यंत पुरवणी मागण्या आहेत. रस्ते व पूल यासाठी एक हजार इमारती . . . ..

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की,माननीय मंत्रिमहोदयांच्या संदर्भामध्ये एक बातमी आली होती की, सार्वजनिक बांधकाम मंत्री, या सदनाचे नेते आणि या राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी त्यांना कोणताही अधिकार दिलेला नाही त्यमुळे ते संतप्त झ ाले आणि ते त्यांच्या केबिनमध्ये घुसले.सभापती महोदय, हे शब्द माझे नाहीत. वर्तमान पत्रातील बातमीमध्ये असे म्हटलेले आहे. ते त्यांच्याशी अद्वादद्वा भांडले आणि मला अधिकार कधी देणार असा त्यांना जाब विचारला. (अडथळा) अशा प्रकारची दादागिरी माननीय उपमुख्यमंत्र्यांबरोबर केल्याची बातमी आम्ही वर्तमानपत्रात वाचली. (अडथळा) मंत्रिमहोदयांची दादागिरी हा विषय आहे. मी जो हरकतीचा मुद्दा मांडीत आहे त्याचे आपण उत्तर द्यावे. सभापती महोदय, हे कोण मला विचारणार? मी माननीय सभापतींची मान्यता घेऊन बोलत आहे. तुमच्या मंत्र्यांनी गुंडगिरी करायची आणि आम्ही ऐकायचे काय?

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सभागृहासमोर हा विषय नसतांना सन्माननीय सदस्य या विषयावर कसे काय बोलत आहेत.

श्री. दिवाकर रावते : हा सदनाचा विषय नाही काय? मी या विषयावर कसेध काय बोलतो हे मला सांगणारे कोण, सभापती महोदय, या पध्दतीने चालणार नाही.

श्री. सुरेश नवले : हरकतीच्या मुद्यावर हरकतीचा मुद्दा मांडता येत नाही काय?

तालिका सभापती (श्री. प्रकाश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांचा मुद्दा मांडून झाल्यावर आपण बोला.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्यावर हरकतीचा मुद्दा मांडता येतो काय? मी हरकतीचा मुद्दा मांडल्यानंतर त्याला शासनाने उत्तर द्यावे.(अडथळा) माझा हरकतीचा मुद्दा पूर्ण करु द्यावा. आपण येथे कॅबिनेट मंत्री म्हणून बसलेले आहात. माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे जाऊन यासंदर्भात तक्रार केलेली आहे.असे असताना ते मंत्री या सभागृहाने मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करण्यासाठी या सभागृहात उभे आहेत.

ॲड. उषा दराडे : पुरक मागण्यांशी या विषयाचा काय संबंध आहे?

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्रीमहोदय, मागण्या मंजूर कराव्यात अशी सभागृहाला विनंती करण्यासाठी ते उभे आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय,या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. खरे म्हणजे वर्तमानपत्रात काय आले, काय नाही, यासंदर्भात सन्माननीय उपमुख्यमंत्री किंवा या सभागृहाच्या नेत्यांनी काही भाष्य केलेले आहे यासंदर्भात या सभागृहात चर्चा झालेली नाही. आता पुरवणी मागण्याच्या संदर्भातील उत्तराची भाषणे सुरु आहेत. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, आपण पुरवणी मागण्यांवरील उत्तराची भाषणे होऊ द्यावीत. सभापती महोदय, विनाकारण हरकतीचे मुद्दे उपस्थित करुन सभागृहाचा वेळ जातो. म्हणून सभापती महोदय, आपल्याला विनंती आहे की, पुरवणी मागण्यावरील उत्तराची भाषणे पूर्ण होऊ द्यावीत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी एवढयाचसाठी हरकत घेतलेली आहे की, स्वत: माननीय मंत्रिमहोदय सांगतात की, आम्हाला अधिकार नाहीत. वर्तमानपत्रामध्ये तशा प्रकारची बातमी येते. ज्यांना अधिकार नाहीत (अडथळा) हे रेकॉर्डवर आलेले आहे. शासनाकडून या गोष्टीचा इन्कार केलेला नाही.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : मी माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ यांचे नाव घेतलेले आहे ते या सदनाचे नेते आहेत त्यांना या सभागृहात बोलावण्यात यावे आणि त्यांनी याबाबतचा खुलासा करावा.

तालिका सभापती : आता बराच वेळ झालेला आहे तेव्हा उत्तराच्या भाषणाला आपण सुरुवात करु या.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय सभापती महोदय, माझे म्हणणे पूर्ण झालेले नाही. सन्माननीय सदस्यांच्या हरकतीवर मी बोलू शकतो.

तालिका सभापती : ठीक आहे आपण बोला.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्हाला असे वाटते की, या सभागृहात ही चर्चा झाली पाहिजे. (अडथळा) आम्ही पण या सभागृहात आठ वर्षे घालविलेली आहेत. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी पण त्याप्रमाणे वागले पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. आम्हाला याठिकाणी बोलण्याचा अधिकार नाही काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, आपला मुद्दा माझ या लक्षात आला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील :सभापती महोदय, यामधील वाद न वाढवता मी याबाबतीत तोडगा काढीत आहे. माननीय मंत्री महोदय, आम्हाला असे बोलण्याची पुन्हा संधी मिळू नये. या पध्दतीची कुठेही चर्चा होऊ नये. आपला अवमान म्हणजे आमचा अवमान आहे असे आम्ही समजतो. त्यामुळे या सभागृहात पुन्हा असे घडू नये म्हणून मी याठिकाणी बोलत आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. यासंदर्भात सन्माननीय श्री. विखे-पाटील साहेबांनी स्पष्टीकरण दिलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अब्दुल सत्तार : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनुक्रमांक 40 ते 49 या 10 मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल, पुनर्वसन व मदतकार्य, भूकंप पुनर्वसन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 15, 16, 17 आणि 18 या पुरवणी मागण्या चर्चेसाठी आहेत. बाब क्रमांक 15 मध्ये मुद्रांक व नोंदणी विभागात मंजूर अनुदानाहून अपेक्षित अधिक खर्च भागविण्याकरिता 3 कोटी 10 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच बाब क्रमांक 16 मध्ये दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य करण्यासाठी तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, महसूल विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, राजन तेली, विक्रम काळे, गुरुनाथ कुलकर्णी, जयंत प्र. पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, प्रा. सुरेश नवले, परशुराम उपरकर, ॲड. उषा दराडे, श्री. पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन काही सूचना केल्या. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मुंबई उपनगरातील केबल कनेक्शनच्या संदर्भात या ठिकाणी तक्रार मांडली. केबल कनेक्शनच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार मांडलेली आहे त्यासंदर्भात निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि कशा पध्दतीने महसुलामध्ये घट झालेली आहे याची माहिती घेतली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी मच्छिमार बांधवांना मदत मिळावी तसेच गाळ उपसणे आणि मच्छिमारांना छोट्या फायबरच्या बोटी देणे याबाबत आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सध्या नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत जी मदत केलेली आहे ती केंद्र शासनाच्या सीआरएफ च्या निकषाप्रमाणे केली जाते आणि हे निकष बदलण्याचे काम निश्चितपणे केंद्र शासनाचे असते अशी राज्य सरकारची भूमिका आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी पाणी टंचाईच्या बाबतीत गट विकास अधिकारी आणि तहसीलदार यांना विंधन विहिरी अधिग्रहीत करण्याचे तसेच टँकर लावण्याचे अधिकार द्यावेत अशी मागणी केली. विंधन विहिरी अधिग्रहीत करण्याचे अधिकार तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांना आहेत परंतु टँकरच्या बाबतीत मात्र जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत प्रस्ताव आणावा लागतो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी कोकणात समुद्राला भरती आल्यामुळे जे नुकसान होते त्याबाबतीत मदत मिळावी अशा प्रकारची मागणी केलेली आहे. मी आताच सांगितल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या सीआरएफच्या निकषामध्ये हे बसत नाही आणि त्या निकषामध्ये बदल करण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. प्रकाश सोळंके....

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जर्मन बेकरीच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा उपस्थित करुन त्या बेकरी मालकाला मदत करावी अशा प्रकारची मागणी केलेली आहे. मदत देण्याच्या निकषामध्ये ही बाब बसत नाही. तरी सुध्दा निश्चितपणे यासंदर्भात शासनाच्या वतीने खास बाब म्हणून, त्या ठिकाणी अतिरेकी हल्ला झालेला आहे ही बाब लक्षात घेऊन त्यांना मदत करण्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सहकार खात्यावर बोलताना प्रामुख्याने नागरी सहकारी बँकांचे पुनरुज्जीवन करण्याची गरज आहे, महाराष्ट्रातील ग्रेड 3-4 च्या नागरी सहकारी बँका आहेत त्यांना मदत करण्याची मागणी केलेली आहे. यानिमित्ताने मला सांगावयाचे आहे की, ज्या नागरी सहकारी बँका आर्थिक अडचणीत आहेत अशा बँकांना ज्या चांगल्या बँका आहेत त्यांनी टेक ओव्हर करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. या बँकांसाठी अधिकचा विचार करण्याची गरज आहे. त्याबाबतीत सुध्दा निश्चितपणे शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेतला जाईल. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, महसूल व वन विभाग तसेच सहकारी विभागाच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत त्यांना पाठिंबा द्यावा आणि मंजूर कराव्या, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री.राजन तेली, श्री.विक्रम काळे, श्री.चंद्रकांत पाटील, श्रीमती नीलम गोऱ्हे, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.परशुराम उपरकर, श्रीमती उषाताई दराडे, श्री.केशवराव मानकर या सर्वांनी मौलिक सूचना केल्या आहेत. या सूचनांचे मी स्वागत करतो. गृह विभागाची बाब क्रमांक 8, 9 तसेच 12 ते 14 अशा 5 मागण्या 253 कोटी 23 लाख रुपयांच्या आहेत. या पुरवणी मागण्या मंजूर कराव्या अशी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो आणि येथे थांबतो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 86, 87, 88, 89 व 90 या मागण्या सभागृहाला सादर झालेल्या आहेत. या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.केशवराव मानकर यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना एवढेच सांगू इच्छितो की, आता वसतिगृहातील मुलांना 30 ग्रॅम, 40 ग्रॅम इतके अन्न न देता जून महिन्यापासून मुलांना पोटभर जेवण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे राज्यात जी 2300 शासकीय वसतिगृहे आहेत त्यात 400 मुलींची आहेत. यापुढील काळात मुलींची वसतिगृहे वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, सामाजिक विभागामार्फत घरकुलांसाठी आवश्यक तेवढा पैसा खर्च करण्याची मागणी करण्यात आली आहे. या विभागासाठी या कामासाठी भरपूर निधी आहे. पूर्वी एका गावात केवळ 4-5 घरकुले मंजूर होत होती. आता जो बी.पी.एल.कार्डधारक असेल पण त्याच्याकडे घर नसेल किंवा कुडाचे घर आहे अशा राज्यातील सर्व लोकांना पुढील 3 वर्षामध्ये 70 हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे बीपीएल कार्डधारक असतील मग ते कोणत्याही जातीचे असोत ज्यांना स्वत:चे घर नाही, त्यांना घरकुलासाठी अनुदान दिले जाईल, हे घर त्यांनी स्वत: बांधावयाचे आहे किंवा एखाद्या समुहाने घर बांधण्याची परवानगी मागितली तर तशी परवानगी दिली जाईल.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. शिवाजीराव मोघे...

यामध्ये वैशिष्ट्यपूर्ण बाब अशी आहेत की या विभागाकडे भरपूर पैसे आलेले आहेत. त्यामुळे येत्या तीन वर्षामध्ये बीपीएल कार्डधारकाला घर मिळणार आहे. अनुसूचित जातीमधील ज्या लोकांनी यासाठी अर्ज केले होते आणि जे नियमामध्ये बसतात त्यांना सुध्दा ही घरे देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

शिष्यवृत्ती कमी मिळते, ती वेळेवर मिळत नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ही गोष्ट लक्षात घेता आता शिष्यवृत्ती ही संस्थेला न देता ती ऑन लाईन दिली जाणार आहे. यासंबंधीचा एक जी.आर निघालेला असून दुसरा जी.आर. जूनमध्ये निघणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या 18 लाख विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या वैयक्तिक खात्यामध्ये जमा होणार आहे. यामुळे विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीसाठी प्रतिक्षा करावी लागणार नाही, संस्थेकडील कामाचा ताण कमी होईल आणि आर्थिक घोटाळा होण्याची शक्यताही राहाणार नाही. या शिष्यवृत्तीमध्ये वाढ झाली पाहिजे अशी विनंती राज्य शासनाने केन्द्राला केलेली आहे. केन्द्रीय मंत्रीमहोदय श्री. मुकूल वासनिक हे त्यासंदर्भात विचार करीत असून शिष्यवृत्तीमध्ये वाढ होईल आणि त्याचा फायदा राज्यातील विद्यार्थ्यांना होईल असा मला विश्वास आहे. सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी आश्रमशाळा देण्यासंबंधीचा मुद्दा मांडला. आता नवीन आश्रमशाळा देण्याचे शासनाचे धोरण नाही. ऊसतोड कामगारांच्या मुलांकडे अतिशय दुर्लक्ष झालेले आहे. त्यांच्यासाठी राज्यामध्ये फक्त दोन शाळा आहेत. या शाळांचे ग्रेडिंग वाढविणे, नवीन शाळा देणे यासंबंधी विचार झाला आहे. जुलै पर्यन्त नवीन शाळा आणि ग्रेडिंग वाढवून मिळणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी जास्तीत जास्त सवलती देण्याची मागणी केली. आपण त्यांना सवलती देणार आहोत. अन्य सन्माननीय सदस्यांनी देखील अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांचा शासन निश्चितपणे विचार करील. तेव्हा सामाजिक न्याय विभागाच्या पूरक मागण्या संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, आता ही चर्चा आपण येथे थांबवावी अशी माझी आपणास विनंती आहे. सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांना बोलवावे. आमदारांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात ते निवेदन करणार होते. सन्माननीय राज्यमंत्री श्री. अब्दुल सत्तार यांच्या बाबतीत बोलायला ते तयार नाहीत. आमदारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी 5.30 वाजेपर्यन्त निवेदन करावे असे निदेश आपण दिले होते. परंतु अजून निवेदन झालेले नाही. हे निवेदन करण्यासंबंधी मी आता पर्यन्त पाचवेळा तरी आठवण करुन दिलेली आहे. आम्ही सकाळ पासून या सभागृहामध्ये उपस्थित आहोत. तालिका सभापती महोदय, आपण निदेश दिल्यानंतर देखील त्या निदेशांचे पालन होत नसेल तर त्याला काय म्हणावे ? **तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : अजून काही मंत्र्याची उत्तरे व्हावयाची आहेत. विधयकेसुध्दा कामकाजपत्रिकेवर दाखविलेली आहेत. तोपर्यन्त निवेदन करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : आता मागण्या झाल्यानंतर आपण विधेयके घेणार आहात काय ? आपण कामकाजाच्या संदर्भात निर्णय घेऊ शकणार नाही. माझी आपणास विनंती आहे की, आपण माननीय सभापती किंवा उपसभापतींना बोलवावे. ते कामकाजाच्या बाबतीत निर्णय घेतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (परिवहन, बंदरे आणि विधी व न्याय मंत्री) : सभापती महोदय, परिवहन, बंदरे आणि विधी व न्याय विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. किरण पावसकर, चरणसिंग सप्रा, परशुराम उपरकर, गुरुनाथ कुलकर्णी यांनी भाग घेऊन काही उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

...नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

सभापती महोदय, संगणकीकृत पध्दतीने लर्निंग लायसन्स देण्याची पध्दत आपण संपूर्ण राज्यभर सुरु केली आहे. काही कार्यालयांमध्ये ही पध्दत सुरु झाली असून संपूर्ण राज्यात अतिशय सोप्या पध्दतीने लर्निंग लायसन्स देण्याची व्यवस्था करण्याचे ठरविले आहे. लायसन्स देण्यासाठी जो विलंब होतो तो टाळण्यासाठी सामान्य ज्ञान, जनरल नॉलेज टेस्ट संगणकद्वारे घेण्याची व्यवस्था केली आहे. टॅक्सी नूतनीकरणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. ती माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. मी पटलावर ठेवावयास तयार आहे. किती परमिट आहेत, किती परमिट बंद झाले, किती सुरु आहेत याची माहिती देता येईल. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी परदेशी मोटार सायकलचा मुद्दा मांडला आहे. या प्रक्रियेमध्ये प्रोसीजर लॅप्सेस होतात म्हणून 10 अधिकाऱ्यांना निलंबित केले असून 11 अधिकाऱ्यांची चौकशी सुरु आहे. यात परिवहन विभागाच्या काही त्रुटी आढळलेल्या आहेत. शेवटी डायरेक्टर ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स यांच्याकडून विचारणा झाल्यानंतर ही प्रक्रिया सुरु झाली. अद्यापही या प्रकारच्या मोटार सायकलींच्या संदर्भात तपास केंद्रीय संस्था डीआयआर, कस्टम्स आणि महाराष्ट्र शासनाच्या पोलीस दलाकडून सुरु आहे. केरळचे ॲडिशनल डी.जी.यांच्याकडून आलेल्या पत्राच्या अनुषंगाने चौकशी सुरु आहे. फेक पासपोर्ट आणि आयडेन्टीटीबाबत कारवाई झाली, त्याची दखल नामदार हायकोर्टाने घेतल्यानंतर सीआयडी चौकशीची प्रक्रिया सुरु झाली. ती लवकरात लवकर पूर्ण करुन सत्य समोर आले पाहिजे अशा प्रकारची राज्य सरकारची भूमिका आहे.

श्री.विनोद तावडे : ऑफेन्स दाखल केला पाहिजे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : नामदार हायकोर्ट ही प्रक्रिया मॉनिटर करीत आहे. सरकारची हस्तक्षेप करण्याची भूमिका नाही. नामदार हायकोर्टाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे कारवाई करावयाची असल्यामुळे त्याबाबतची यथायोग्य कारवाई सुरु आहे. दुसरा मुद्दा मोक्का लावण्याच्या संदर्भातील होता. मी यापूर्वी सांगितले आहे की, हायकोर्टाचे या प्रकरणात नियंत्रण असल्यामुळे वेगळी काही भूमिका राज्य सरकारला घेणे शक्य नाही. नामदार हायकोर्ट निर्देश देईल त्याप्रमाणे कारवाई करणार आहोत. नाक्यांच्या तपासणीबद्दलचा मुद्दा उपस्थित केला गेला....

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : माननीय मंत्रीमहोदयांनी हायकोर्टाचा उल्लेख केला म्हणून मी सांगू इच्छितो की, सूओ-मोटो पिटिशन हायकोर्टाने दाखल करुन घेतली. सीआयडीने प्रोसीजर लॅप्सेस ठेवल्यामुळे हायकोर्टाने ताशेरे ओढले. सीआयडीने चौकशी अधिकारी बदलले. नव्याने चौकशी सुरु केली. शासनाकडून नीट कारवाई होत नाही म्हणून हायकोर्टाने निर्देश दिले. शासनाकडून नीट कारवाई होत नाही हे पटल्यानंतर हायकोर्टाने निर्देश दिले. शासनाने नीट चौकशी केली तर हायकोर्ट काही म्हणणार नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : मी सुरुवातीलाच मान्य केले की, परिवहन विभागाकडून काही त्रुटी राहिल्या म्हणून नामदार हायकोर्टाने पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन दाखल करताना सरकारला फटकारले. जे निर्देश दिले त्याप्रमाणे कारवाई सुरु आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता या संदर्भात सरकार हायकोर्टाकडून पुन्हा सूचना येण्याची वेळ येऊ देणार नाही. त्या दृष्टीने योग्य ती पावले उचलली आहेत. जी कारवाई होत आहे ती हायकोर्टाला कळवावी लागते. आम्ही कारवाई करणारच आहोत. कारवाईपासून सरकार बाजूला जाणार नाही. 22 नाक्यांच्या तपासणीचा उल्लेख करण्यात आला. फ्लाईंग स्क्वॉडबद्दलही आपण सांगितले. ओव्हरलोडेड ट्रक्सच्या संदर्भात काही ठिकाणी रॅकेट सुरु असल्याची तक्रार आली म्हणून नाक्यांचे पूर्णत: संगणकीकरण झाले तर या सगळ्या लॅप्सेस दूर होतील.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / अशुधारित नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

आणि अशा प्रकारे थोडेसे नियंत्रण आणल्यामुळे राज्याचे महसुली उत्पन्न सुध्दा जवळपास यावर्षी 400 कोटीनी वाढविले आहे. तसेच केंद्रशासनाने सुध्दा यामध्ये सिमिलर्स ट्रॅफिक व्हावी म्हणून सर्व तपासणी नाके त्यात स्टेट एक्साईज, सेल्स टॅक्स आणि परिवहन विभाग या तिन्ही विभागांनी मिळून एकत्रितपणे ही कार्यवाही सुरु आहे.....अडथळा.....म्हणून आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंबंधी चौकशी केली जाईल आणि त्यात जो भ्रष्टाचार झाला त्याबाबतची देखील चौकशी होऊन दोषी आढळून येणाऱ्यांवर कारवाई सुध्दा करण्यात येईल.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई यांनी कौटुंबिक न्यायालयासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. महापालिका क्षेत्रात अशी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर व अकोला या ठिकाणी ऑलरेडी अशी न्यायालये सुरुच आहेत. अमरावती व ठाणे येथे आता सुरु करण्यासंबंधीची कार्यवाही चालू आहे. त्याचप्रमाणे तालुका पातळीवर किंवा ग्रामीण भागात अशा न्यायालयांची आवश्यकता भासत नाही. कारण जेएमएफसीकडे तशी तरतूद असतेच. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे कौटुंबिक न्यायालये सुरु करण्याचा विचार केला तर पुन्हा एस्टॅब्लिशमेंट वाढवावी लागेल व त्यांचा खर्च सुध्दा वाढेल. म्हणून जरुर त्या ठिकाणी आणि केसेसचे प्रमाण जास्त झाले असेल अशा ठिकाणी कौटुंबिक न्यायालय सुरु करण्यासाठी शासनाला कोणतीही अडचण नाही, कारण तसे धोरण आपण स्वीकारलेले आहे. अशा न्यायालयांमधून मराठीचा वापर सुरु करण्याबाबत देखील सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. या अनुषंगाने मला अशी माहिती द्यावयाची आहे की, तालुका न्यायालयांमध्ये मराठीचा वापर सध्या सुरुच असून निकाल पत्र सुध्दा मराठीतून मिळतात. अशा प्रकारे टप्प्याटप्प्याने व प्रोग्रेसिव्हली वरिष्ठ न्यायालयात सुध्दा मराठीचा वापर सुरु करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

खडकी येथील न्यायालयाची दुरवस्था यासंबंधी सुध्दा येथे मुद्दा उपस्थित करण्यात आला. खरे म्हणजे या ठिकाणी जागेची अडचण आहे म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकार्फत तशी कार्यवाही सुरु आहे. विशेष करुन खडकी कॅन्टोन्मेंट येथील न्यायालयाची इमारत बांधून देण्याचे सुध्दा मान्य केले आहे फक्त जागेची जी अडचण आहे त्यासंबंधीच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. महिला ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात येतात तेथे त्यांच्या बालकांसाठी पाळणा घर आणि महिला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

वकीलांसाठी स्वतंत्र कक्षाची मागणी देखील त्यांनी केली आहे. कणकवली येथील न्यायालयामध्ये पुस्तके उपलब्ध नसल्याचे उल्लेख देखील सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई यांनी केला. खरे म्हणजे जिल्हा न्यायालयाच्या निधीतूनच अशी पुस्तके उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था असते. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही होत नसेल तर जरुर त्याबाबतची उपाययोजना करण्यात येईल.

मुलुंड येथील न्यायालयाच्या जागेच्या संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याच्या अनुषंगाने असेही निदर्शनास आणण्यात आले की, या ठिकाणी अतिक्रमण होण्यापूर्वी न्यायालयाची इमारत बांधावी. या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, जिल्हा पातळीवरील न्यायालयांचे कामकाज एवढे कमी होत चालले आहे की, कारण सध्या सन 2009-2010 चे दावे सुरु आहेत. म्हणून न्यायालयांच्या वाढत्या संख्येची वकिलांची मागणी असली तरी पुढील तीन महिन्यात विधि व न्याय विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात येईल. ही समिती यासंबंधीचा आढावा घेऊन प्रत्यक्ष न्यायालयांची गरज आहे की कसे तसेच पुनर्रचना करुन आवश्यक असतील तेथे हलविता येतील काय याबाबतही सूचना समितीला देण्यात आल्या आहेत.

बंदरे विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मुद्दा उपस्थित केला की, समुद्र किनाऱ्यावर जेट्टी सुरु आहेत परंतु त्यामध्ये गाळ साचल्यामुळे बोटी येत नाहीत. सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सुध्दा मिरकरवाडी येथील बंदराचा प्रश्न उपस्थित केला. या ठिकाणी आपण 58 कोटीची योजना मंजूर केली व त्या माध्यमातून समुद्र किनाऱ्याच्या बाजूला आपण टयुब टाकत आहोत त्यामुळे समुद्रात गाळ साचणार नाही व बोटी देखील किनाऱ्यापर्यंत पोहचण्यात अडचण येणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

त्यांना आम्ही सूचना केलेली आहे की, तुम्हाला जर जेट्टीचा वापर पूर्णत: तुमच्याकडे ठेवायचा असेल तर आम्ही मिरकडवाडा करिता स्वतंत्र बंदर बांधत आहोत. त्यामध्ये बर्फाचा कारखाना, प्रोसेसिंग आणि मच्छीमारांना चढउतार करण्यासाठी मशीनची व्यवस्था मिरकडवाडा बंदराकरिता आम्ही स्वतंत्रपणे करीत आहोत. कोकण पॅकेज मध्ये 60 कोटी रुपये ड्रेझर घेण्यासाठी मंजूर झाले होते त्यातील 20 कोटी रुपये यावर्षी मिळणार आहेत. यासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर निविदा काढल्या असून त्यासंदर्भातील टेंडर सुध्दा आलेले आहेत. त्यामुळे कायमस्वरुपी ड्रेझर घेऊन ही प्रक्रिया त्या ठिकाणी बाराही महिने चालेल व त्यामुळे या बंदरात गाळ राहणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर साहेबांनी मेरीटाईम बोर्डाच्या संदर्भात पर्यटनाच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. यावर्षी मेरीटाईम बोर्डाकडून आपण पोर्ट पॉलिसी आणलेली आहे. त्यामध्ये बंदराच्या विकासाबरोबर टूरीझम राईट्स देण्याच्या संदर्भातही आपण निर्णय घेत आहात. टूरीझम राईटस् पोर्ट, डेव्हलपमेंट बोर्ड डेव्हलप करण्यासाठी शासनाने नवीन धोरण आखलेले आहे. रेवस किंवा मांडवी बंदराच्या भोवती छोटी छोटी टुरीझम किंवा कोकणाच्या किनारपट्टीचा उपयोग करतांना जे लोक खाजगीकरणातून यासंदर्भात मागणी करतील त्यांना सुध्दा परवानगी देण्याचे शासनाचे धोरण आहे.

सभापती महोदय, हैड्रोग्राफीक सर्व्हेच्या संदर्भात आपल्याकडे पूर्णवेळ हायड्रोग्राफर राहणार आहे. हैड्रोग्राफरला संपूर्ण ग्राफींग सर्व्हे करण्याची कार्यवाही देखील करण्यात आलेली आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर साहेबांनी दोडामार्ग न्यायालयाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. न्यायालयाच्या संदर्भात मी अगोदरच उल्लेख केलेला आहे की, पुढील तीन वर्षात या राज्यातील सर्व तालुका न्यायालयाच्या इमारतींचे काम शासनाला पूर्ण करावयाचे आहे. तालुक्याची न्यायालये, न्यायाधिशांची निवास्थानासह परिपूर्ण करण्याचा राज्यसरकारचा संकल्प आहे. ज्या काही न्यायालयाच्या इमारतीचे काम अपूर्ण आहे, ज्या न्यायालयाच्या इमारतींच्या कामाची मंजुरी दिलेली आहे परंतु ती कामे निधी अभावी सुरु होऊ शकली नाही अशा कामांना गती देण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी परळी न्यायालयाचे वकील उपोषणाला बसले होते अशी माहिती दिलेली आहे. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, यासाठी आपण इरिगेशन डिपार्टमेंटची जागा घेतलेली असून या ठिकाणी सुध्दा निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, भडगाव तालुका न्यायालयाच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे न्यायालयांच्या इमारतींना निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने पुढाकार घेतलेला आहे. यामध्ये केंद्रसरकारची एक नवीन योजना येत आहे, त्यामध्ये राज्य सरकारच्या हिश्याचा समावेश करुन या न्याय पालिकेची व्यवस्था सक्षम करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकरडून निश्चितपणे केला जाणार आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्याबद्दल पुन:श्च आभार व्यक्त करतांना परिवहन, बंदरे, विधी व न्याय विभागाच्या मागण्यांना आपण मंजुरी द्यावी अशी विनंती करतो.

...3..

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्रामविकास, पाणी पुरवठा व फलोत्पादन विभागाच्या मागण्यांच्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. फलोत्पादनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी दोन तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी केळीला फळ म्हणून शासनाने संबोधावे अशी मागणी केलेली आहे. यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, केळी हे पीक सीझनल आहे, ते पेरेनिअल क्रॉप नाही. त्यामुळे केळीला फळ म्हटले जात नाही. तसेच त्यांनी नुकसान भरपाईच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, आपण प्रत्येक केळीच्या झाडाला 10 रुपये या प्रमाणे नुकसानभरपाई देतो परंतु शासनाने 50 रुपये नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी मागणी सदस्यांनी केलेली आहे. एका हेक्टरमध्ये केळीचे 1000 ते 1200 झाडे असतात. एका झाडाला 10 रुपये नुकसान भरपाई दिली तरी हेक्टरी ही नुकसान भरपाई 10 ते 12 हजार रुपयांपर्यंत जाते. आपण नुकसान भरपाई देतो परंतु पूर्ण किमंत देत नसतो. इरिगेशनच्या खाली जी पिके येतात त्यांना सुध्दा आपण तितकीच नुकसान भरपाई देत असतो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे ...

सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील चोपडा आणि यावल या तालुक्यामध्ये जे नुकसान झालेले आहे त्या सबंधी शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशा प्रकाराची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली होती त्या बाबत मी त्यांना सांगू इच्छितो की,2009-2010 साली जे नुकसान झाले होते त्यासबंधीचा अहवाल शासनाने मागवला आहे. ज्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले आहेत त्या ठिकाणी मदत करीत असतांना महाराष्ट्र रिमोट सेन्सीग ॲप्लीकेशन सेन्टर कडून व्हेरिकशन करण्यात येत असते आणि त्यांच्याकडून व्हेरिफिकेशन झाल्यानंतर ताबडतोब पैसे उपलब्ध केले जातील.

सभापती महोदय, यानंतर पाणी पुरवठा विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दिन जव्हेरी आणि श्री केशवराव मानकर यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री जैनुद्दिन जव्हेरी यांनी असे सागितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांचे काही बिले थकीत आहेत त्याबाबतीत मी या सदनाला सांगू इच्छितो की, गेल्या तीन चार वर्षा पासून वर्धा किंवा पुलगावच्या जीवन प्राधिकणाची रक्कम आम्ही वसूल करीत आहोत. मागच्या दोन वर्षापूर्वी काही प्रमाणात पैसे भरण्याची परिस्थिती असल्यामुळे त्यांना पैसे भरण्यास सागितले होते परंतु या वर्षी हप्ते पाडून दिले तर जिल्हाधिका-यांना सांगून जप्ती थांबविण्यात येईल . सन्माननीय सदस्य श्री केशवराव मानकर यांनी टंचाईच्या कामासाठी पैशाची मागणी केली होती. मी त्यांना एक गोष्ट सांगू इच्छितो की, टंचाईच्या कामासाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत त्यासाठी या वर्षी जवळजवळ 240 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.पाणी पुरवठा योजनेच्या बाबतीत त्यांनी असे सांगितले की, एम.एस.ई.बी.चे विजेचे बिल न भरल्यामुळे योजना बंद आहेत.त्याबाबत मी सांगू इच्छितो की, योजना चालू आहेत, त्या योजनेसाठी लागणाऱ्या पाण्याचा स्त्रोतही आहे परतु योजना चालवत असतांना एम.एस.ई.बी.चे विजेचे बिल जर भरले नाही तर त्या योजनेचा लोकांना काहीही फायदा होणार नाही. एका बाजूला असे सांगण्यात येते की, पाण्याची टंचाई आहे आणि दुसऱ्या बाजूला पाणी आहे परंतु विजेचे बिल न भरल्यामुळे पाणी पुरवठा बंद आहे.एम.एस.ई.बी.च्या विजेच्या दराबाबत शासनाने वारंवार एम.ई.आर.सी.ला सांगितले आहे की पाणी पुरवठा योजनेसाठी आकारण्यात येणारे दर कमी करण्यात यावेत परंतु जोपर्यत ते या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे...

गोष्टीस मान्यता देणार नाही तो पर्यत शासनाला काही करता येणार नाही. आज पाणी पुरवठा योजनेसाठी कमर्शिअल दर आकारला जातो . त्यामुळे या बाबतीत शासन सघ्या काही करु शकत नाही परंतु ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे एवढेच मी आपल्याला सांगतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तसे नाही.....

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर सन्माननीय सदस्यानी प्रश्न विचारावा.

श्री.केशवराव मानकर : त्यासाठी पैसे आहेत का ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी अर्जुनी मोरगाव येथील पाणी पुरवंठा योजनेसंबंधी प्रश्न मांडला होता तेव्हा तो मुद्दा मी तपासून घेतो. प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेसंबधी काही प्रश्न आहेत. आपल्याकडे अशाही काही योजना आहेत की त्यासाठी पैसे आहेत. तेव्हा अशा योजनेच्या संदर्भात आपल्या बरोबर चर्चा करण्यासाठी मी उद्या किंवा शुक्रवार शनिवारी एक बैठक ठेवीन. त्याशिवाय चंद्रपूरच्या नळ पाणी पुरवठा योजनेसंबंधी देखील सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी मुद्दा मांडला होता . ती योजना नगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आली असून अनेक वर्षापासून ही योजना त्यांच्याकडे आह. तेव्हा पाणीपुरवठा सुरळीत कशी चालवावयाची आणि पैसे कसे वसूल करावयाचे हा त्यांचा प्रश्न आहे परंतु चंद्रपूर मध्ये पाण्याची कमतरता नाही. फक्त पाणी पुरवठा योजना व्यवस्थितपणे चालविली जात नाही. त्यामुळे ग्राम विकास , पाणीपुरवठा आणि कृषी विभागाच्या पूरक मागण्यांना मान्यता द्यावी अशी विंनती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी एम.ई.आर.सी.बद्दल बोलताना असे सागितले की, विजेचे दर कमी करण्यासंबंधीची बाब त्यांच्या हातामध्ये असून ही बाब शासनाच्या हातात नाही. परंतु प्रत्यक्षात तसे नाही. एम.ई.आर.सी. कायद्याच्या कलम 21 (5) प्रमाणे वीज खरेदी करण्याचा दर ते ठरवून देतात. म्हणजे त्या कंपनीची विजेची प्रॉडक्शन कॉस्ट विचारात घेऊन शासनाने वीज कोणत्या दराने खरेदी करावयाची यासंबंधीचा दर ते ठरवून देतात परंतु एकदा माल विकत घेतल्यानंतर तो माल मी कोणत्या दराने ग्राहकाला विकत द्यावयाचा यासबंधीचा अधिकार मला आहे . गरीब व्यक्तिला मी कमी दरात माल विकत देईन श्रीमंत व्यक्तिला जास्त दराने माल विकत देईन. अशा प्रकारची विजेच्या दरासबंधीची पध्दत आहे एम.ई.आर.सी.ने अशा प्रकारचे बंधन घातलेले आहे असे ज्यावेळी मागच्या वेळी शासनाकडून सांगण्यात आले होते त्यापेळी मी त्या कायद्यातील तरतूद वाचून दाखवली होती त्यानंतर याविषयावर पुन्हा बोलत असतांनासुध्दा मी ती तरतूद नंतरही वाचून दाखविल .ग्रामपंचायतीला विजेचे दर परवडत नाही म्हणून ते दर कमी करण्यात यावेत अशी त्यांची मागणी आहे वीज खरेदीचा दर एम.ई.आर.सी. ठरविते परंतु आपण विकत घेतलेली वीज लोकांना फुकट द्यावयाची की त्याला अनुदानावर द्यावयाची हे ठरविण्याचा अधिकार शासनाचा आहे. असे असतांना माननीय मंत्र्यांनी चुकीची माहिती देता कामा नये.एवढेच मला म्हणावयाचे आहे.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / अशुधारित नाही

श्री. दिवाकर रावते....

आपण कोणाकडूनही वीज विकत घेतांना लोकांना ती फुकट द्यायची, की अनुदान द्यायचे की, सबसिडी द्यायची हा सरकारचा विषय आहे. तेव्हा आपण चुकीचे स्पष्टीकरण करु नका.

श्री. गुलाबराव देवकर (कृषी, जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, जलसंधारण व कृषी विभागाच्या पूरक मागण्यांवर विचार मांडण्यासाठी माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, पाशा पटेल यांनी काही सूचना केल्या आहेत. माननीय सदस्य श्री. काळे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना जूनमध्ये खत मिळाले पाहिजे व त्याची किंमत ग्रामपंचायतीमध्ये लावली पाहिजे. तेव्हा खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना खते मिळण्यासाठी राखीव साठा करण्याचा निर्णय घेतला असून तो साठा करण्यात येईल. तसेच, खताची किंमत ग्रामपंचायतीच्या कार्यालयामध्ये लावण्याबद्दल सूचना करण्यात येईल.

त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी संगणक कक्षासाठी सुविधा पुरविण्याबाबत सूचना केल्या आहेत. त्याबाबत आमच्या कार्यालयाकडून वेळोवेळी शासनाकडे प्रस्ताव सादर केले आहेत. संगणकीकरण करण्याबद्दल योग्य ती कारवाई करण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत. सभापती महोदय, मी याठिकाणी जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 69, 70, 71, 72, 74 आणि 75 व कृषी विभागाच्या बाब क्रमांक 19, 20, 21 व 28 च्या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर विचार मांडण्यासाठी माननीय सदस्य श्री. विक्रम काळे, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, रामनाथ मोते, गुरुनाथ कुलकर्णी, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील यांनी चर्चेमध्ये भाग घेतला व पुष्कळ चांगल्या सूचना केल्या. त्यांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन त्यावर निश्चितपणे उपाय योजना करण्याचा प्रयत्न केला जाईल.

शालेय शिक्षण विभागामध्ये नुकतेच केंद्र शासनाच्या वतीने सक्तीचे मोफत शिक्षण देण्यासंबंधीचे विधेयक संमत झाले आहे. त्या विधेयकानुसार राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून शालेय शिक्षण विभागाने रिफार्मस् इन एज्युकेशन अशाप्रकारची एक मोहीम घेण्याचे निश्चित केले आहे. एस.सी.आर.टी., टेक्सबुक ब्यूरो,एस.एस.सी. बोर्ड, एन.सी.इ.आर.टी., शिक्षण मंडळ या सर्वांनी संयुक्तरित्या 21 वेगवेगळया विषयांवर अभ्यास सुरु केला आहे. मुलांसाठी अभ्यासक्रम करीत असतांना शिक्षण पध्दती, कंटेंट लोड काय आहे, टाईम ऑन टास्क, शिक्षकांचे प्रशिक्षण, पाठयपुस्तके, पूर्व प्राथमिक शिक्षण, चाचण्या व परीक्षा पध्दती, मॉनिटरींग सिस्टीम, समुपदेशन, आय.टी. शिक्षण, पाळणा घर या सर्व 21 बाबींवर अभ्यास सुरु आहे. आणि त्यांचा ड्राफ्ट फायनल झाल्यानंतर यशदा, युनिसेफ, टी.आय.एस.एस., चाईल्ड राईट्स कमिशन, इंडियन इंस्टिटयूट ऑफ एज्युकेशन यासारखे एन.जी.ओ.ज आणि शिक्षण तज्ज्ञांसोबत महसूल विभागाच्या पातळीवर चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. त्यानंतर रिफॉर्मस् इन एज्युकेशनचा ड्राफ्ट निश्चित करण्याचे ठरविले आहे. त्याशिवाय ऑन लाईन ग्रेडेशन ऑफ स्कूलसाठी आपण पाऊले उचलली आहेत. सर्व शाळांमधून त्यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेचे इव्हॅल्युशन करावे याकरिता ऑनलाईन पध्दतीने सुरुवात केली असून शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी ही सर्व पाऊले उचलण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे सर्व माध्यमांच्या शाळांकरिता म्हणजे मराठी, हिंदी, गुजराती, उर्दू, इंग्रजी, सिंधी यांच्याकरिता एक प्रोफेशनल एजन्सी म्हणून जी.आय.एस. मॅपिंग करुन इंटिग्रेटेड परस्पेक्टिव्ह प्लॅन करण्याचे आम्ही ठरविले आहे.

सभापती महोदय, याठिकाणी वेतनेतर अनुदान देण्यासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला. तो प्रश्न कॅबिनेट सब कमिटीसमोर विचाराधीन असून लवकरच हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर होईल अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे शिक्षण सेवकांच्या मानधनाचा प्रश्न सुध्दा मंत्रिमंडळासमोर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

ठेवण्यात आला आहे. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत सूचना केली.

(यानंतर डॉ. नीलम गोऱ्हे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . . .

मी याबाबतीत सांगू इच्छिते की, 43231 शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय उपलब्ध आहे. तसेच 19224 शाळांमधून स्वच्छता गृहाची सोय उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याशिवाय पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध आहे. 54,537 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा विचार सुरु आहे. याशिवाय सन्माननीय सदस्सय श्री.विक्रम काळे यांनी उर्दू अंगणवाडीबद्दल व उर्दू ईडीआय बद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. यावर शासन जरुर विचार करील. कारण हा महत्वाचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशाखा विकल्पा बद्दल मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबतीत आपण जरुर लक्ष घालू आणि तीन-चार सन्माननीय सदस्यांनी अजूनही काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. ज्याप्रमाणे आपण शिवाजी शिक्षण संस्थेला 100 वर्षे पूर्ण झाल्यानंतर इन्फ्रास्ट्रक्चरसाठी मदत केलेली आहे. अशा दुसऱ्याही संस्था आहेत आणि आपण त्याबाबतीत जरुर विचार करु असे मी सांगू इच्छिते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांकडून ज्या सूचना करण्यात आल्या आहेत, त्यावर सिरिअसली विचार करण्याचे शासनाचे धोरण आहे. तसेच शिक्षकांचे वेतन वेळेवर होण्यासाठी यापुढे निगेटीव्ह प्राधिकार पत्रावर वेतन काढण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. राज्यातील सर्व संबंधित शिक्षकांचे वेळेमध्ये वेतन होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. शालेय शिक्षण क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे आणि यामध्ये कशा प्रकारे इम्प्रुव्हमेंट करता येईल याबाबतही विचार सुरु आहे. सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, त्यांनी बाब क्र.29, 30 व 31 या पुरवणी मागण्यांना मान्यता द्यावी. धन्यवाद.

. . . .4 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आज पुरवणी मागण्यांवरील चर्चेनंतर एक विधेयक मंजूर करावयाचे आहे आणि आता रात्रीचे नऊ वाजलेले आहेत.

सभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेच्या अनुषंगाने विविध विभागाच्या माननीय मंत्री महोदयांची उत्तरे पूर्ण होऊ देत. सदरहू उत्तरे पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेते, नेते, गटनेते यांची अशी इच्छा आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेकवरील अनु.क्र.7 वर असलेले शासकीय विधेयक हे आज चर्चेसाठी न घेता पुढे घेण्यात यावे. याबाबतीत माननीय संसदीय कार्य मंत्र्यांचे काय म्हणणे आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, असे करण्यास सत्ताधारी पक्षाकडून काही अडचण नाही. फक्त आपल्याला एकच विनंती करावयाची आहे की, उद्या सकाळी सभागृहाची विशेष बैठक होणार आहे. तेव्हा उद्या हे बिल कॅरिफॉरवर्ड केल्यानंतर त्याला आपण सर्वांनी अनुमती द्यावी एवढीच माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. यानंतर माननीय वैद्यकीय शिक्षण व पर्यटन मंत्री महोदयांनी त्यांच्या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर द्यावे.

. . . .4 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण व पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंतजी, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेजी, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवलेजी, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीजी, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकरजी, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाणजी इ.सन्माननीय सदस्यांनी वैद्यकीय शिक्षण व पर्यटन विभागाच्या पूरक मागण्यांवर आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंतजी यांनी चार प्रश्न विचारलेले आहेत. त्यांचा पहिला प्रश्न असा होता की, वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये जी रिक्त पदे आहेत, ती कधी भरण्यात येणार आहेत ? याबाबतीत सदनामध्ये काल लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली होती, त्यावेळी मी सांगितले होते की, जी पदे चौथ्या श्रेणीमधील आहेत, ती आम्ही आऊट सोर्सने भरणार आहोत. जी तृतीत वर्गातील पदे आहेत, ती अर्धी प्रमोशनची आहेत आणि ही पदे पुढील दोन महिन्यामध्ये डीनच्या लेव्हलवरुन भरण्यात येतील आणि उरलेली पदे डायरेक्टर लेव्हलवरुन भरण्यात येतील. तसेच एक व दोन क्रमांकाची पदे एम.पी.एस.सी.कडून भरली जातील आणि दुसरी आस्थापना मंडळामार्फत पदोन्नतीव्दारे भरली जातील आणि ही एक व दोन क्रमांकाची 80 टक्के पदे "मे"पर्यंत भरण्याच्या बाबतीत आदेश दिलेले आहेत आणि त्याप्रमाणे ती भरण्यात येतील.

सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक प्रश्न विचारला होता की, सेंट जॉर्ज येथे शासकीय दंत महाविद्यालय आहे आणि सध्या तेथे संप सुरु आहे. या दंत महाविद्यालयाची क्षमता 100 विद्यार्थ्यांची आहे. पहिल्या टर्ममध्ये एक्सटर्नशीपच्या विद्यार्थ्यांची क्षमता 18 आहे. बाकीची क्षमता इंटर्नशीपच्या विद्यार्थ्यांसाठी आहे आणि ते विद्यार्थी त्याच महाविद्यालयातील असणार आहेत. इतर महाविद्यालया-तील जे 18 विद्यार्थी आपल्याकडे येणार आहेत, ते आरोग्य विद्यापीठाचे जे व्हॉईस चान्सलर आहेत, त्यांनी पाठविलेले असतात.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

त्याच्यामध्ये एकूण 46 विद्यार्थी मिळाले. आपल्याकडे बाहेरच्या विद्यार्थ्यांच्या जागा फक्त 18 आहेत पण त्यांनी देतांना 46 विद्यार्थी पाठविले त्यामुळे आपल्याकडे 28 विद्यार्थी जास्त झालेले आहेत. यामध्ये 12 विद्यार्थी हे संगमनेरचे आहेत आणि उरलेले विद्यार्थी बाकीच्या महाविद्यालयातील आहेत. त्यामुळे 18 विद्यार्थ्यांना विरोध नाही. जे जास्तीचे विद्यार्थी आलेले आहेत त्यांना विरोध आहे. तो संप आता मिटलेला असून त्यामधून असा मार्ग काढण्यात आलेला आहे की,इन्टर्नशिपचे विद्यार्थी हे आपल्या कॉलेजचे आहेत. तसेच एक्सटर्नशीपचे 18 विद्यार्थी घेण्यात येणार आहेत आणि बाकीच्या उरलेल्या विद्यार्थ्यांना आपापल्या महाविद्यालयामध्ये पाठविण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी याठिक्राणी के.ई.एम.रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित केला होता. के.ई.एम. रुग्णालयात सध्या दुरुस्तीचे काम चालू आहे. या के.ई.एम. रुग्णालयाच्या संदर्भात मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने काही त्रुटी दाखविल्या आहेत. जागेच्या संदर्भात त्रुटी दाखविण्यात आलेल्या आहेत तसेच प्रोफेसरच्या पदांच्या संदर्भात त्रुटी दाखविण्यात आलेल्या आहेत. या त्रुटीमुळे पुढच्या काळात या रुग्णालयातील एम.बी.बी.एस.,एम.डी., हे जे कोर्सेस आहेत त्याची मान्यता रद्द होऊ शकते. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. पण तो प्रश्न महानगरपालिकेशी संबंधित आहे. तो राज्य शासनाशी निगडीत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी नाशिकच्या आरोग्य विद्यापीठाचे स्थलांतर मुंबईला करण्यात येणार आहे काय? अशा प्रकारचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मला याबाबतीत असे सांगावयाचे आहे की, असा कुठलाही विषय शासनाच्या विचाराधीन नाही.

सभापती महोदय, कोकण आणि सिंधुदुर्गमधील पर्यटनाच्या संदर्भात या ठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी असे म्हणाले की, वर्षा गायकवाड आपण सिंधुदुर्गमध्ये आलात पण त्याबद्दल आम्हाला सांगितले नाही. सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी उपस्थित केलेल्या अर्धा-तास चर्चेला उत्तर देताना सांगितले होते की, मी सिंधुदुर्ग जिल्हयात येणार आहे. सभापती महोदय, पर्यटन विभागाकडे मी नक्कीच लक्ष देणार आहे. याचे कारण असे की, पर्यटन विभागामार्फत उद्योगधंदे वाढू शकतात. पर्यटन विभागत एकदाच इन्व्हेस्टमेंन्ट केली जाते परंतु त्यानंतर त्यापासून

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड....

नेहमी महसूल मिळतो. म्हणून विविध तऱ्हेने पर्यटन विभागाकडे लक्ष देण्याचे काम मी करणार आहे. केंद्र शासनाकडून पर्यटन विभागाला खूप पैसा मिळालेला आहे पण तो पैसा खर्च होऊ शकलेला नाही, याबद्दल मी याठिकाणी खंत व्यक्त करते. पण आता तशी परिस्थिती रहाणार नाही. पर्यटनासाठी 187 कोटी रुपये मिळालेले आहेत. 187 कोटी रुपये चांगल्या तऱ्हेने कसे खर्च होतील याबाबतीत शासनाने पॉझिटिव्ह दृष्टिकोन ठेवलेला आहे. सन्मानीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी यासंदर्भात उल्लेख केलेला आहे. महाराष्ट राज्याच्या बाजूला असलेले गोवा आणि केरळ या राज्यांनासुध्दा समुद्र किनारा आहे आणि महाराष्ट्राला सुध्दा समुद्रकिनारा आहे. पण आज गोवा आणि केरळची परिस्थिती पर्यटनाच्या दृष्टीने फार वेगळी आहे आणि महाराष्ट्राची परिस्थिती फार वेगळी आहे हे मी मान्य करते. त्यामुळे सभापती महोदय, ॲडव्हेन्चर स्पोर्ट्स आणि मेडिकल टुरिझमच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. हे दोन्ही विषय शासनाच्या विचाराधीन आहेत. मालवणला स्नॉरकेलिंग सुरु केले आहे तसेच स्पीड बोट चालू केलेली आहे.हाऊस बोड चालू केली आहे. आता आपण स्कुबा डायव्हिंग सुरु करीत आहोत. मी स्वत: स्नॉरकेलिंग केले आहे. स्कुबा डायव्हिंगच्या सेंटरचे काम चालू आहे. त्यामुळे शासनाने पर्यटनावर पूर्णता: लक्ष केंद्रीत केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी मेडिकल टुरिझमच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याच्या अंतर्गतसुध्दा गोवा असो की केरळ असो त्याठिकाणी स्पा केंद्र केलेली आहेत त्याप्रमाणे स्वा केंद्र उभी करण्याचा शासनाचाही प्रयत्न आहे. सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, सभागृहाने वैद्यकीय शिक्षण आणि पर्यटन विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात आणि पुढे याबाबत एखादा विषय उपस्थित करावा, त्यावर चर्चा करण्यास मला नक्की आवडेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पयर्टनाच्या बाबतीत बॉम्बे नॅचरल सोसायटीला अनुदान देण्याचा मुद्दा होता. त्या ट्रस्टचे नाव बॉम्बे नॅचरल असे आहे. कालच माननीय सभापतींनी मराठीचा प्रस्ताव मांडला आणि या सभागृहात आग्रहाने त्यावर चर्चा केली. त्यामुळे त्या सोसायटीने आपले नाव, बॉम्बेच्या ऐवजी मुंबई केले तर त्यांना 12 लाख 50 हजार रुपये द्यावेत, अन्यथा त्यांना हे पैसे कशासाठी द्यावयाचे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आजच्या माझ्या विशेष उल्लेखात उल्लेख केलेला आहे की, जेथे जेथे (अडथळा) केंद्र सरकारच्या नपुंसकतेचे ते उदाहरण आहे. एवढे दिवस झाल्यानंतरही केंद्र सरकार याबाबतीत निर्णय घेत नाही, हे तुमचे नपुंसकत्व आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : 6 वर्षे तुमचे सरकार होते त्यावेळी आपण काय केले?

श्री. दिवाकर रावते : कसले सरकार? तुमच्या केंद्र सरकारला विचारा. अजून केंद्र सरकार करीत नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

जे केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली आहे त्यासंदर्भात मी काही बोलू शकत नाही. कारण तो माझा अधिकार नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केंद्रातील सरकार नपुंसक आहे अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांचे ते वाक्य मी कामकाजातून काढून टाकणार आहे.

श्री. दिवाकर रावते : केंद्राचे नाकर्ते सरकार आहे. नाकर्ते सरकार आहे त्याला आम्ही काय करणार ? निर्णय घेण्याकरिता आपले नाकर्ते सरकार केंद्रामध्ये बसले आहे त्याला आम्ही करणार ? आपण तिकडे गदागदा हलवा ना. आपले पुढारी बसलेले आहेत त्यांना हलवावयास सांगा. आम्ही दहा वर्षे झक मारली, आपण करा. आपण काय केले असे सन्माननीय सदस्य सांगत आहेत. मग आपण करा ना. आता आपण सत्तेत आहात. लोकांनी आपल्याला निवडून दिले आहे. सभापती महोदय, यांना निवडून दिले आहे. यांचे सरकार काम करीत नाही. आम्ही काय केले, आम्ही काय केले असे विचारतात. मग आपण करा ना. आपण कर्तृत्ववान आहात ना, आपल्याला सरकार चालवावयास दिले आहे ना, मग का करत नाही ? त्याला नाकर्तेपणा म्हणतात. नाचता येईना अंगण वाकडे अशी परिस्थिती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या वक्तव्यातील जो आक्षेपार्ह भाग आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, परवा हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला होता. माननीय उपमुख्यमंत्री यांना प्रश्न विचारला की, एका बिलामध्ये बॉम्बे म्हणतात आणि एका बिलामध्ये मुंबई म्हणतात. मी सांगितले की, या राज्याच्या अधिपत्याखाली येणारे जे जे कायदे आहेत, जी महामंडळे आहेत किंवा ज्या संस्था आहेत, ज्यांचा सरकारशी संबंध आहे त्यांनी बॉम्बेचे मुंबई जर केले नसेल तर त्यांच्या अनुदानाकरिता, जमिनीकरिता कशाहीकरिता सरकारने विचार करु नये अशा प्रकारचा विशेष उल्लेख मी मांडला. या ठिकाणी बॉम्बे कल्चरल असोसिएशन आहे. सभापती महोदय, आपण परिस्थिती समजून घ्यावी. त्या ठिकाणी विद्वान महाभाग बसतात आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मुंबईच्या विकासाला खीळ घालत आहेत. तो विषय वेगळा आहे. ज्यावेळेला बॉम्बे नावाला काळे फासण्यासाठी गेले तेव्हा ते सांगतात की, वाटेल ते झाले तरी आम्ही बॉम्बे शब्द बदलणार नाही. या मुंबईमध्ये राहून जर अशी त्यांची मग्रुरी असेल तर या सरकारने त्यांना अनुदान का द्यावयाचे हा विषय आहे. जर सरकारने या शहराचे नाव मुंबई केले असेल, जे दिल्लीकडे मान्य झाले असेल आणि या शहरामध्ये असणारी संस्था या राज्याच्या कायद्याला मानत नसेल तर या सरकारने ते अनुदान देऊ नये हा विषय आहे. या विषयाच्या संदर्भात आमची ठाम भूमिका आहे. आजच्या या पुरवणी मागण्यांमधील सगळ्या मागण्या आम्ही मान्य करीत असताना सरकारने त्यांचे ते अनुदान जोपर्यंत नावात बदल करीत नाही तोपर्यंत स्थगित करावे अशा प्रकारचा प्रस्ताव माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी मांडणे महत्वाचे आहे. हा आमचा आग्रह आहे. आपल्या राज्याचा कायदा ते मानत नसतील तर त्यांचे अनुदान स्थगित करावे.

श्री. रणजित कांबळे : आपल्याला करावयाचे असेल तर बॉम्बे हायकोर्टाला सांगा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या ज्ञानात मला भर घालावयाची आहे.

सभापती : त्यांना ज्ञान बरे आहे पण तसे बोलून त्यांना डिस्करेज कशाला करता ? माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण यादृष्टीने सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय उपमुख्यमंत्री यांच्याबरोबर चर्चा करावी आणि यामध्ये काय करता येणे शक्य आहे त्यादृष्टीने जरुर बघावे आणि यादृष्टीने जी भावना आहे ती जपावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंदर्भामध्ये आपण निदेश दिल्याप्रमाणे निश्चितपणे यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन यातून योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ SBT/ ST/

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्रमांक 100, 101 आणि 102 या तीन पुरवणी मागण्या सभागृहाने संमत कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो. या मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. मोते तसेच सन्माननीय सदस्य श्री. मानकर यांनी जीवनदायी योजनेसंबंधी आपले विचार मांडले. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गेल्या अधिवेशनामध्ये आपण दोन्ही सभागृहामध्ये चर्चा केली होती आणि सर्व सन्माननीय आमदारांशी चर्चा करुन आपण एक नवीन जीवनदायी योजना राज्याला देणार आहोत. गेल्या कॅबिनेटमध्ये श्री. राजीव गांधी जीवनदायी योजना ट्रस्ट यासाठी कॅबिनेटने मान्यता दिलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

आणि संपूर्ण योजना तयार झाल्यानंतर मी पुन्हा सभागृहाला संपूर्ण योजनेची माहिती देणार आहे. पर्यावरण खात्यासंबंधीच्या बाब क्रमांक 111 वर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी बोलताना असे म्हटले की, लोटे परशुराम, डोंबिवली येथील 38 कंपन्यांना क्लोजर नोटीस दिली होती. परंतु या कंपन्या सुरु आहेत. मी याबाबत माहिती देतो की, ज्यांनी कंडिशनची पूर्तता केली आहे त्यांना परवानगी दिली आहे. त्यांच्याजवळ आणखी काही अधिक माहिती असेल तर त्यांनी ती माझ्याकडे द्यावी. त्या माहितीच्या आधारे मी पुन्हा चौकशी करण्याचे आदेश देईन. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या 3 आणि पर्यावरण विभागाची एक मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि माझे उत्तर पूर्ण करतो.

सभापती : सन 2009-10 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमदारांना संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने आज संध्याकाळी 5.30 वाजता निवेदन करण्यात येईल असे आपण घोषित केले होते. परंतु आज त्याबाबतचे निवेदन करण्यात आलेले नाही.

सभापती : माननीय संसदीय कार्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी याबाबतचे निवेदन आज संध्याकाळी केले जाईल असे सांगितले होते. परंतु हे निवेदन उद्या करण्याची परवानगी देण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : उद्या निवेदन करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

NTK/ SBT/ KTG/

सभागृहाच्या कामकाजाबाबत

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले शासकीय विधेयक पुढे ढकलण्यात येत आहे. हे विधेयक उद्याच्या कामकाजपत्रिकेवर जरुर दाखविण्यात येईल.

त्याचप्रमाणे आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्ध्या तासाच्या चर्चा आज होणार नाहीत. त्या पुढे ढकलण्यात येत आहेत.

सभागृहापुढील दिवसाचे कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या मंगळवार, दिनांक 23 मार्च, 2010 रोजी पुन: भरेल. सकाळी 10 ते 11.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा होईल. त्यानंतर दुपारी 12 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 7 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 23 मार्च, 2010 रोजीच्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही